ISSN 0973- 8452

मनुष्याणाम् वृत्तिरर्थः ।

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक

# अर्थसंवाद

भारतीय सौर पौष - फाल्गुन १९३२

जाने-मार्च २०११ / खंड ३४ अंक ४



परामर्ष विकासाचा : परिप्रेक्ष्य अपवर्जन व समावेशाचा

असंघटित क्षेत्रातील श्रमिकांचा अभ्यास

सहकार चळवळ आणि महाराष्ट्राचा आर्थिक विकास

भारतातील बेरोजगारी व शासकीय धोरण - एक चिकित्सा

सातारा जिल्ह्यातील सौर उर्जा उपकरणांच्या घरगुती वापरा संबंधीच्या बाजारपेठेचे (स्वॉट) विश्लेषण

97-11

लोककल्याणमूलस्य अर्थशास्त्रस्य सिध्दये ।
शोधचर्चाविवादार्थ संवादोऽयं प्रवर्तितः ॥
मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक

# अर्थसंवाद

जानेवारी – मार्च 2011/खंड 34, अंक 4

मनुष्याणाम् वृत्तिरर्थः।

www.marthpari.org

प्रमुख संपादक
जगन्नाथ शामराव पाटील

सहायक संपादक
संतोषकुमार बबनराव यादव

सल्लागार मंडळ
(2009-12)
लालासाहेब घाटगे
मोहन चौधरी
शिवाजी अंभोरे
संतोष कदम

संपादकीय पत्रव्यवहार
जगन्नाथ शामराव पाटील
शांती प्लाझा, बी- 9,
880/881, शनिवार पेठ.
सातारा. 415 002
मो.9423261796
फोन:(02162)233152

। अ नु क्र म णि का ।

संपादकीय
जगन्नाथ शामराव पाटील . . . . . 312

परामर्ष विकासाचा : परिप्रेक्ष्य अपवर्जन व समावेशाचा
मुक्ता दिगंबर जहागिरदार . . . . . 315

असंघटित क्षेत्रातील श्रमिकांचा अभ्यास
ऋता खापर्डे . . . . . 346

सहकार चळवळ आणि महाराष्ट्राचा आर्थिक विकास
लालासाहेब ना. घाटगे, अनिल कृ. वावरे . . . . . 355

भारतातील बेरोजगारी व शासकीय धोरण – एक चिकित्सा
राहूल शं. म्होपरे . . . . . 368

सातारा जिल्ह्यातील सौर उर्जा उपकरणांच्या घरगुती वापरा संबंधीच्या बाजारपेठेचे स्वॉट विश्लेषण
उदय मारूती लोखंडे . . . . . 375

अर्थ शब्दांची वाट पाहे
शि. ना. माने . . . . . 387

चौतिसावे वार्षिक अधिवेशन
बबनराव खामकर, मुलाणी एम.यू.,
अनिल बाबुराव सुर्यवंशी, जगन्नाथ शामराव पाटील . . . . . 390

पस्तीसावे वार्षिक अधिवेशन : विषयांची रूपरेषा
कैलास काशिनाथ पाटील,
सुहास आल्हाड, बाळासाहेब माने . . . . . 410

**मराठी अर्थशास्त्र परिषद**

**कार्यकारी मंडळ(2010-11)**

**अध्यक्ष**

मुक्ता दिगंबर जहागिरदार

**कार्याध्यक्ष**

दिलीप खंडेराव पाटील (सांगली)

**कार्यवाह–खजिनदार**

अनिल बाबुराव सूर्यवंशी (बार्शी)

**प्रमुख संपादक अर्थसंवाद**

जगन्नाथ शामराव पाटील (सातारा)

**विश्वस्त**

ज. फा. पाटील (कोल्हापूर)

के.जी.पठाण (पुणे)

चारूदत्त गोखले (जळगांव)

**सदस्य**

1) हिरालाल चव्हाण(जळगाव)
2) प्रशांत काटोले (अमरावती)
3) अविनाश निकम (शहादा)
4) रामकृष्ण टाले (नागपूर)
5) विकास सुकाळे (नांदेड)
6) ज्ञानोबा मोरे (उस्मानाबाद)
7) महंमद रफिक मुलाणी (पुणे)
8) तानाजी भोसले (सांगली)
9) श्रीरंग मंडले (सिंधुदुर्ग)
10) वनिता चोरे (अमरावती)
11) बाळासाहेब माने (सांगली)
12) शामराव कुलकर्णी (बदलापूर)

**अर्थसंवादसाठी अनुदानाबद्दल आभार :**

1) भारतीय सामाजिक विज्ञान अनुसंधान परिषद, दिल्ली

2) महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

(टीप : म.रा.सा.सं.मंडळाने अनुदान दिले असले तरी या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ आणि राज्य शासन सहमत असेलच असे नाही.)

**कार्यालयीन पत्रव्यवहार**

(आजीव सदस्य नोंदणी, जाहिरात पाठविणे)

अनिल बाबुराव सूर्यवंशी

कार्यवाह – खजिनदार – मराठी अर्थशास्त्र परिषद,

"गोदाई" शिवशक्ती मैदानाजवळ, शिवाजीनगर,

बार्शी 413 411. जि.सोलापूर

दूरध्वनी (02184) 224294 मो.9011339906

**परिषदेचे प्रमुख कार्यालय :**

मराठी अर्थशास्त्र परिषद, द्वारा / सेंटर फॉर दी स्टडी ऑफ सोशल चेंज, एम.एन.रॉय ह्यूमन डेव्हलपमेंट कॅंपस प्लॉट क्र.6 एफ. ब्लॉक, कार्डिनल ग्रेशियस स्कूल जवळ, सहकारी वसाहत इमारत क्र. 323 समोर, बांद्रे (पूर्व) मुंबई 400051

**वर्गणी :**

**अ) परिषदेचे सदस्य :**

| | |
|---|---|
| आजीव सदस्य (एकरकमी) | : रू. 2000 |
| साधारण सदस्य | : रू.300 (वार्षिक) |

**आ) संस्था सदस्य व अर्थसंवाद वर्गणीदार**

| | |
|---|---|
| शैक्षणिक संस्था | : रू.250 (वार्षिक) |
| व्यावसायिक संस्था | : रू.600 (त्रैवार्षिक) |
| ग्रंथालये | : रू.1000(पंचवार्षिक) |
| **इ) वर्षगणना** | 1 एप्रिल ते 31 मार्च |

*** संस्थांना आजीव सभासद होता येत नाही.**

*** कृपया आजीव सदस्य वर्गणी डिमांड ड्राफ्टनेच मराठी अर्थशास्त्र परिषद या नावाने कार्यवाहांकडे पाठवावी.**

* अर्थसंवादची वर्गणी डिमांड ड्राफ्टनेच मराठी अर्थशास्त्र परिषद या नावाने प्रमुख संपादकांकडे पाठवावी.

# संपादकीय

मराठी अर्थशास्त्र परिषदेने तीन वर्षापूर्वी सोपविलेली अर्थसंवादच्या प्रमुख संपादक पदाची जबाबदारी पूर्ण करून ती नव्या संपादकाकडे सूपूर्द करीत आहे. मराठीतून अर्थशास्त्र विषयक दर्जेदार शोध निबंध प्रकाशित व्हावेत, या उद्देशाने सुरू झालेल्या व तज्ञ अभ्यासकांनी, संशोधकांनी व संपादकांनी समर्थपणे चालविलेल्या अर्थसंवादचे संपादन करण्याची संधी मला प्राप्त होणे माझ्या दृष्टीने भाग्याचा योग होता. हा योग मला प्राप्त करून देण्यामध्ये मराठी अर्थशास्त्र परिषदेचे माजी अध्यक्ष, कार्याध्यक्ष गुरूवर्य डॉ.ज.फा. पाटील यांचे महत्वाचे योगदान होते. अर्थशास्त्रातील विविध विषयावर लेख मिळवणे, ते शास्त्रीय भाषेत संपादीत करणे, माहितीच्या व संदर्भाच्या चुका टाळणे, नवे लेखक नवे वाचकही मिळविणे हे मोठे आव्हान होते. तसेच अर्थसंवाद हे आर्थिक दृष्ट्या सक्षम व्हावे यासाठी प्रयत्न करणे गरजेचे होते.

अर्थसंवादच्या प्रमुख संपादकाची जबाबदारी, मी माझ्या कुवतीनुसार एप्रिल 2008 ते मार्च 2011 या कालावधीत 12 अंक प्रकाशित करून पूर्ण केली. प्रत्येक अंकात अद्ययावत माहिती विद्यार्थ्यांना उपयुक्त होतील असे लेख, संशोधकांना दिशादर्शक ठरेल असे साहित्य देण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला. पानांच्या मर्यादेमुळे प्राप्त झालेले सर्वच लेख प्रकाशित करता आले नाहीत, याची खंत वाटते. असे असले तरी सुध्दा नवोदित लेखकांना न्याय देण्याचा प्रयत्न केला आहे.

एप्रिल 2008 ते मार्च 2011 या तीन वर्षात 12 अंकामध्ये एकूण निबंध 76, भाषणे 4, अर्थ शब्दांची वाट पाहे 4, पीएच.डी. प्रबंधांचे सारांश 9, ग्रंथपरीक्षणे 9, पारितोषिक प्राप्त लेख 6 छापण्यात आले. क्षेत्रीय नुसार वर्गिकरण करता असे दिसून येते की, शेती संबंधीत 24, उद्योग संबंधीत 5, सेवा संबंधीत 13 व राजस्व, अर्थव्यवस्था, पर्यावरण, महिला सबलीकरण, शासकीय योजना, नोबेल पारितोषिक विजेते या संबंधी 49 लेख छापण्यात आले.

गेल्या तीन वर्षात अर्थसंवादचा दर नगाचा सरासरी खर्च कमी

करण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे. तो खर्च 33.38 वरून 31.29 पर्यंत कमी केला आहे. तर एकूण खर्च हा रू. 2,16,233 वरून 2,09,696 पर्यंत कमी केला आहे.

वास्तविक पहाता अखिल भारतीय पातळीवरील अर्थसंवाद या त्रैमासिकाला ISSN क्रमांक प्राप्त झाल्याने जागतिक पातळीवरील नियतकालिकांच्या यादीमध्ये समाविष्ट झाला आहे. अर्थसंवादच्या आर्थिक स्थितीचा विचार करता असे दिसून येते की अर्थसंवादचा जमा खर्चाचा विचार करताना काही महत्वाच्या बाबी विचारात घेणे आवश्यक आहे. तसे झाल्यास अर्थसंवादला तूट निर्माण होणार नाही. दरवर्षी भारतीय सामाजिक विज्ञान अनुसंधान परिषद, दिल्ली व महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई यांचेकडून प्रत्येक वर्षी अर्थसंवादच्या प्रकाशनासाठी अनुदान प्राप्त होत असते. या अनुदानाचा अर्थसंवादच्या उत्पन्नात समावेश करावा, तसेच मराठी अर्थशास्त्र परिषदेने अर्थसंवादसाठी जो स्थायी निधी ठेवला आहे त्यावरील व्याज अर्थसंवादच्या उत्पन्नात विचारात घ्यावे. हे परिषदेने कायम धोरण म्हणून पाळले पाहिजे असे मला वाटते.

गेल्या तीन वर्षात अर्थसंवाद वर्गणीदारांची संख्या वाढविण्यावर भर देण्यात आला आहे. त्यामुळे अर्थसंवादच्या उत्पन्नात वाढ झाली आहे. अत्यंत महत्वाचे म्हणजे, गेल्या तीन वर्षाच्या कालावधीत अर्थसंवादसाठी रू. 1,77,000 च्या जाहिराती मिळविण्यात आल्या या जाहिराती प्राप्त करून देण्यामध्ये माजी अध्यक्ष, कार्याध्यक्ष, कार्यवाह, सहाय्यक संपादक, विश्वस्त मंडळ, कार्यकारिणी सदस्य, सल्लागार मंडळ यांचे योगदान महत्वाचे आहे. अर्थसंवादसाठी जाहिराती प्राप्त करून देण्यामध्ये ज.फा. पाटील, सुहास सहस्त्रबुध्दे, चारूदत्त गोखले, के.जी.पठाण, संतोष दास्ताने, बबनराव खामकर, सुधीर परचुरे, जे.टी. पाटील, बी.के. माने, जयवंत इंगळे, अशोक साबळे, दिलीप पाटील, अनिल सुर्यवंशी, सुमंत कुलकर्णी, संजय ठिगळे, प्रताप लाड, संतोष कदम, सुरवशे बी. टा. यांनी मदत केली.

अर्थसंवादचे काम करताना मुद्रणशोधन झालेले असते. परंतु अंतीम टप्प्यावर काही चुका राहतात. प्रमुख संपादक म्हणून माझ्या परीने मी चुका राहणार नाहीत या दृष्टिने प्रयत्न केलेले होते. परंतु अशा गोष्टीचे भांडवल किती करावे याबद्दलही संतुलित विचार होणे आवश्यक आहे. जागृक वाचकांनी ज्या त्या वेळी संपादकांना कळविणे आवश्यक असते म्हणजे भविष्यकाळात चुका होणार नाहीत. प्रमुख संपादकानी शोध निबंधाच्या संदर्भात दिलेल्या निवेदनासंदर्भात अजूनही लेखक काटेकोरपणे पालन करीत नाहीत. अर्थसंवाद अधिक दर्जेदार होण्याच्या दृष्टिने अशा सूचनांचे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे. प्रत्येक वर्षातील जाने.-मार्च हा अंक वेळेत प्रसिध्द होण्यासाठी सूत्रसंचालकांनी आपले अहवाल व निबंध लेखकांच्या मार्गदर्शनासाठी रूपरेषा तयार करणाऱ्यांनी आपले टिपण वेळेत पाठविणे आवश्यक आहे.

तीन वर्षाच्या काळात अर्थसंवादची

जबाबदारी पार पाडताना मला परिषदेचे माजी अध्यक्ष, कार्याध्यक्ष ज. फा. पाटील यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. तसेच माजी अध्यक्ष विनायक भिसे, विनायक देशपांडे, सौ. मुक्ता जहागिरदार, के.जी.पठाण, शि. ना. माने, माजी कार्यवाह खजिनदार चारूदत्त गोखले, विद्यमान अध्यक्ष आ. गो. पुजारी, कार्यवाह खजिनदार अनिल सुर्यवंशी, कार्याध्यक्ष दिलीप पाटील, विश्वस्त मंडळाचे सदस्य, सहाय्यक संपादक, संतोष यादव, अर्थसंवाद सल्लागार मंडळाचे सर्व सदस्य सर्व आजी–माजी कार्यकारिणी सदस्य, अर्थसंवादसाठी ज्यांनी लेखन केले ते सर्व लेखक, परिषदेचे सर्व सदस्य यांचे सहकार्य लाभले, त्याबद्दल मी या सर्वांचा ऋणी आहे. जाहिरातदारांनी अर्थसंवादसाठी जाहिराती देऊन जे आर्थिक सहकार्य केले त्याबद्दल परिषदेच्या वतीने मी त्यांचा अत्यंत आभारी आहे. मुद्रक, टंकलेखक, मित्रपरिवार व कुटुंबिय या सर्वांची उत्तम साथ लाभल्यामुळे हा जगन्नाथाचा रथ पुढे नेणे शक्य झाले त्यांच्या प्रति कृतज्ञता व्यक्त करतो.

अधिवेशन संयोजक महाविद्यालयांनी अर्थसंवादसाठी पूर्ण पानाच्या रंगीत जाहिराती देऊन बहुमोल आर्थिक मदत केली त्याबद्दल मी परिषदेच्यावतीने त्यांचा अत्यंत आभारी आहे.

भारतीय सामाजिक विज्ञान अनुसंधान परिषद, दिल्ली व महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई या संस्थाकडून प्रत्येक वर्षी अर्थसंवादच्या प्रकाशनासाठी जे आर्थिक अनुदान देण्यात आले त्याबद्दल परिषदेच्या वतीने मी या संस्थांचा अत्यंत आभारी आहे.

आता यापुढे प्रमुख संपादकपदाची धुरा डॉ. अविनाश निकम हे सांभाळणार आहेत. आपल्या मनातील अर्थसंवाद प्रत्यक्षात साकारण्याची संधी त्यांना प्राप्त झाली आहे. अविनाश निकम यांना माझ्या हार्दिक शुभेच्छा.

संतश्रेष्ठ तुकाराम महाराजांनी आपल्या अभंगातून केलेले वैचारिक धनाचे सामर्थ्य उद्‌धृत करून अर्थसंवादचा प्रमुख संपादक म्हणून लेखणीला विराम देतो.

''आम्हा घरी धन शब्दांचीच रत्ने ।
शब्दांचीच शस्त्रे यत्न करू ।।''

**जगन्नाथ शामराव पाटील**
प्रमुख संपादक अर्थसंवाद

# परामर्ष विकासाचा :
# परिप्रेक्ष्य अपवर्जन व समावेशनाचा

**सौ. मुक्ता दिगंबर जहागिरदार**
माजी विभागप्रमुख,
पदव्युत्तर अर्थशास्त्र विभाग,
शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था, अमरावती.
दुरध्वनी : (0721) 2661851

आदर्श कला आणि वाणिज्य महाविद्यालय, कुळगांव-बदलापूर, जि. ठाणे येथे संपन्न झालेल्या मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या 34 व्या वार्षिक अधिवेशनात दि. 13 नोव्हेंबर 2010 रोजी केलेले अध्यक्षीय भाषण.

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या सदस्य बंधू भगिनींनो मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या 34 व्या वार्षिक अधिवेशनाच्या अध्यक्षपदी माझी निवड केल्याबद्दल सर्वप्रथम मी आपणाप्रति आभारपूर्वक कृतज्ञता व्यक्त करते. विशेषत: महाराष्ट्र राज्य निर्मितीच्या सुवर्ण महोत्सवी वर्षात; भारतीय गणराज्याच्या व भारताच्या नियोजनबद्ध विकास प्रयत्नांच्या हीरक महोत्सवी वर्षात; आर.सी. दत्तांच्या स्मृती शताब्दीच्या सरलेल्या वर्षात प्राप्त झालेला अध्यक्षपदाचा सन्मान हा मी विशेष सुयोग मानते.

सामाजिक कार्याकरिता राष्ट्रपतींकडून गौरविलेल्या बदलापूर गावात आदर्श विद्या प्रसारक मंडळाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त आयोजित अधिवेशनात हा योग आला याचा विशेष आनंद आहे. उज्वल भावी वाटचालीसाठी संस्थेला माझ्या मन:पूर्वक शुभेच्छा.

परिषदेची वार्षिक अधिवेशने, नियमित उपक्रम आणि लोकमान्यता तसेच राजमान्यताप्राप्त 'अर्थसंवाद' च्या माध्यमातून आर्थिक विषयांवर दर्जेदार विचारमंथन हे परिषदेचे उल्लेखनीय वैशिष्ट्य. परिषदेचे आजवरचे कर्तृत्व आणि नावलौकिक हा परिषदेचे संस्थापक प्रो. नी. वि. सोवनी, त्यांचे सहकारी तसेच माजी अध्यक्ष, कार्याध्यक्ष आणि परिषदेच्या आजी-

माजी पदाधिकाऱ्यांनी परिषदेच्या हिताशी बांधिलकी राखून समर्पित वृत्तीने केलेल्या कार्याचा व त्याला परिषदेच्या सर्व सुजाण सदस्यांनी दिलेल्या हार्दिक सहकार्याचा परिणाम आहे. या सर्वांप्रति मी कृतज्ञता व्यक्त करते. परिषदेचे संस्थापक प्रो. नी. वि. सोवनी स्मृती व्याख्यान सुरु होण्याचा अमृतयोग यावर्षी आल्याचा आवर्जून उल्लेख करते.

या अधिवेशन प्रसंगी सगळ्यांचा उल्लेख अशक्य असला तरी प्रातिनिधिक स्वरुपात काही आदरणीय मान्यवरांप्रति कृतज्ञता व्यक्त करणे मी माझे कर्तव्य मानते. आधी माझे गुरु व नंतर अनेक वर्षे माझे विभागप्रमुख असलेले प्रा. ओझरकर सर विदर्भ अर्थशास्त्र परिषदेचे अध्यक्ष असताना मी प्राध्यापकी व्यवसायातील पहिला शोध निबंध ३० वर्षापूर्वी लिहिला. त्यासाठीचे त्यांचे मार्गदर्शन मोलाचे होते. त्यांचे व पितृतुल्य डॉ. श्री. आ. देशपांडे सरांचा आशीर्वाद व आत्मीयता नेहमीच माझा मोठा आधार राहिला आहे. मराठी अर्थशास्त्र परिषदेसाठी लिहिलेल्या पहिल्या शोध निबंधासाठी प्रो. नी. वि. सोवनींनी केलेले कौतुक माझ्या मराठीतील लिखाणाची प्रेरणा आहे. डॉ. रवीन्द्र सबनीस परिषदेचे अध्यक्ष असताना हा शोधनिबंध लिहिला होता त्यावेळी त्यांनी दिलेली पावती व पुढे काही वर्षांनी तुम्ही दोघेही अध्यक्ष झालेले पाहायला मला आवडेल अशी व्यक्त केलेली भावना भारावून टाकणारी होती. डॉ. रवीन्द्र दोशींच्या काटेकोर कार्यशैलीचा ठसा अमीट आहे. मी अध्यक्ष व्हावे अशी भावना व्यक्त करुन या पदासाठी माझ्या योग्यतेबद्दल जो विश्वास परिषदेच्या सदस्य व अनेक ज्येष्ठांनी व्यक्त केला तो माझ्यासाठी पदापेक्षाही मोठा आणि कायम आनंदाचा ठेवा आहे, त्यांची या अधिवेशनातील उपस्थिती प्रोत्साहक आहे.

अर्थशास्त्रासारख्या सामाजिक शास्त्राचे अभ्यासक या नात्याने अर्थशास्त्र आणि समाज दोन्हीबद्दल बांधिलकी जोपासणारे गुरुवर्य डॉ. श्री. वि. खांदेवाले सरांचे व्यक्तिमत्त्व, त्यांचे समर्थ मार्गदर्शन व प्रोत्साहन आमचा अमूल्य आधार आहे. आपापल्या कार्यक्षेत्रात श्रेष्ठ योगदानासह लक्षणीय ठसा उमटवलेला आहे तरीही माझ्या लहानसहान उपलब्धींसाठीही ज्यांचे अमाप कौतुक नेहमीच माझ्या वाट्याला आले त्या आमच्या आप्तांच्या कायम ऋणात राहायलाच मला आवडेल. अर्थशास्त्राचे अध्ययन, अध्यापन आणि संशोधनाच्या 40 वर्षांच्या वाटचालीत माझे गुरु, मार्गदर्शक, मित्र आणि तत्त्वज्ञ असलेले माझे पती डॉ. दि. व्यं. जहागिरदार यांचे प्रोत्साहन, मार्गदर्शन आणि सहकार्य शब्दातीत आहे. या सर्व उल्लेखित व अनुल्लेखित मान्यवरांना मी अभिवादन करते आणि भाषणाकडे वळते.

अलीकडच्या काळात समावेशी विकासाची कल्पना मांडली जाते. तथापि कोणताही विचार आकस्मिकपणे अवतरत नाही. आजचे वास्तव आणि कालच्या विचारांमध्ये त्याची मुळे असतात. वंचितांचे अस्तित्व आणि त्यांच्यापर्यंत विकास पोहोचवण्याचा प्रयत्न या स्वरुपात विकासाच्या विचारातील समावेशी विकासाचा मागोवा घेण्याचा माझा विचार आहे.

**1. प्रस्तावना :**

दुसऱ्या महायुद्धानंतर पुन्हा सुरू झालेल्या

विकासविषयक विचारमंथनाला सहा दशके पूर्ण झालीत. या काळातील विकासाची चर्चा मुख्यत्वे विकसनशील देशांच्या विकासाला अनुलक्षून झाली. विकासाची प्रक्रिया व निष्पत्तीचा आढावा घेण्यासाठी हा काळ पुरेसा मानता येण्यासारखा आहे. आजचे विचार आणि वास्तव कालचे विचार आणि धोरणांचे फलन असते. गतकाळाकडे आपण जास्त तटस्थपणे व चिकित्सक दृष्टिकोनातून पाहू शकतो म्हणूनही या प्रकारचे विवेचन उपयोगी ठरते. विकास विषयक विवेचनाची व्याप्ती मोठी, विविधांगी आहे. त्यामुळे त्याचे विश्लेषण अनेक प्रकारे करता येईल. विकास हा माणसाला सुखी, संपन्न जीवन जगता यावे यासाठी आहे. या अर्थाने मनुष्य विकासाचे साध्य आहे. विकासाच्या विचारात सामान्य माणसाचा विचार आहे. विकासाच्या प्रारंभी अर्थव्यवस्थेतील दारिद्र्य म्हणजे सुस्थितीपासूनचे वंचन अस्तित्वात होते. विकासाच्या वाटचालीतही दारिद्र्य, विषमता, बेरोजगारी या स्वरुपात विकासाची प्रक्रिया व फलनिष्पत्तीतून काहींचे अपवर्जन झाले. अपवर्जनाचे वास्तव आणि म्हणून समावेशनाचा प्रस्ताव व प्रयत्न हा विकास विषयक विवेचनाचा गाभा असल्याचे जाणवते. विकास विषयक विचारांचा प्रभाव किंबहुना प्रतिबिंब भारताच्या आर्थिक नियोजनावर जाणवतो. विकासाच्या विचारांचा आणि भारताचे आर्थिक धोरण व निष्पत्तीचा आढावा त्या संदर्भात घेण्याचा मानस आहे.

विकास म्हणजे वृद्धी, विकास म्हणजे स्वातंत्र्य, रोजगार आणि न्याय, सहभागात्मक विकास, चिरंजीव विकास या सारख्या घोषवाक्यांची मालिका आपल्याला परिचित आहे. विकासाच्या विवेचनात विकासाचा आशय, उद्दिष्टे, विकासाची साधने व निर्देशके, विकास प्रक्रियेचे स्वरुप व सातत्य इ. च्या संदर्भात विश्लेषण आढळून येते. विकासात वृद्धी म्हणजे भौतिक वस्तू वा उत्पन्नातील वाढ अत्यंत महत्त्वाची मानली गेली. बचत व गुंतणूक दर, भांडवल-उत्पादन अनुपात, उत्पादकता, उत्पादन तंत्र यांचे त्या संदर्भात विश्लेषण झाले. वृद्धीच्या सातत्याकरिता वितरणातील समानता, संसाधनांचे वर्धन व संधारण, नवीकरणीय नसलेल्या संसाधनांच्या समाप्तीवर प्रतिबंध, पर्यावरणाचे संरक्षण यासारख्या प्रश्नांचा विचार झाला. विकास प्रक्रिया कशी असावी ? या संबंधात सहभागात्मक विकास, खालून वर विकास, चिरंजीवी विकास, समावेशी विकास यासारख्या कल्पना मांडल्या गेल्या. विकास म्हणजे उदारीकरण वा स्वातंत्र्य, बाजार मैत्र विकासासारख्या कल्पना विकासानुकूल अशी व्यवस्थात्मक वैशिष्ट्ये, यंत्र वा संस्थांचा निर्देश करतात. आशय व उद्दिष्टांच्या संदर्भात विकास म्हणजे दारिद्र्य व विषमता निर्मूलन, मुलभूत गरजांची पूर्तता, समानता व न्याय, रोजगाराची सुरक्षितता, विकासाचा हक्क, विकास म्हणजे निवडींचा विस्तार, मानव विकास या प्रकारे परिभाषित झाला. विकास ही व्यक्ती व समाजाच्या उन्नयनाची म्हणजे सातत्यपूर्ण सुधारणांची प्रक्रिया असल्यामुळे त्यातून व्यक्तीला ज्या प्रकारचे जीवन मौल्यवान वाटते त्या प्रकारे जगण्याचे स्वातंत्र्य प्राप्त व्हावे; मानवी जीवनाची गुणवत्ता व दर्जात वाढ

व्हावी, अधिक मानवीय जीवनाकडे वाटचाल व्हावी अशी अपेक्षा आहे.

**2. विकासाच्या विचारातील साम्य स्थळे:**

विकासाच्या वाटचालीत तर्क सुसंगती, वास्तव आणि विकासाची उच्चतर अवस्था यांच्या अनुषंगाने विकासाला नवनवीन आयाम जोडले गेले. तथापि विचारांच्या वाटचालीत काही बाबींची समानता प्रकर्षाने जाणवते. प्रारंभीचे आर्थर लेवीस आणि आज अमर्त्य सेन यांची परिभाषा 'विकास म्हणजे निवडीचा विस्तार' हीच असली तरी दारिद्र्य निर्मूलन ते मानव विकास या प्रकारे विकासाची आशय घनता वाढत गेली. भौतिक गरजांसह वाढत्या समृद्धीबरोबर साध्य व्हाव्यात अशी अपेक्षा असलेल्या परंतु साध्य होतीलच याची शाश्वती नसलेल्या मानवी हक्क, स्वातंत्र्य इ. भौतिकेतर गरजा मन:स्थितीशी निगडीत अनेक बाबींचा विकासाच्या आशयात अन्तर्भाव झाला. तथापि विकासात मनुष्याचा सर्वांगीण विकास अभिप्रेत आहे. विकास म्हणजे मानवी समाजाचे सातत्यपूर्ण उन्नयन; विकास म्हणजे अधिक मानवीय जीवनाकडील वाटचाल ही आकांक्षा म्हणजे साध्या शब्दात विकासाचे साध्य 'मनुष्य' आहे हा गाभा मात्र कायम आहे.

विकास घडवून आणण्यासाठी आर्थर लेवीससारख्यांनी बाजार यात्रांवर विश्वास दर्शवला होता. मूलत: बाजार यंत्रणेच्या आधारे झालेल्या प्रवासात विकासाचे उद्दिष्ट साध्य करण्याबाबतच्या मर्यादा, भ्रमनिरास, अडसर आणि अपयशानंतरही आज जागतिकीकरणाच्या युगात पुन्हा तथाकथित कार्यक्षम, स्वयंचलित बाजार यांत्रावर विसंबून आर्थिक व्यवहार व्हावेत. बाजार मैत्र विकास असावा असेच प्रतिपादन आहे. विकासाचे विवेचन बाजाराधिष्ठित अर्थव्यवस्थेच्या गृहीतावर आधारलेले आहे. तथापि अर्थव्यवस्थेच्या सुव्यवस्थित परिचालनाकरिता; विकासासाठी आवश्यक पूर्व तयारी, सुविधांचा प्रोत्साहक अटींवर पुरवठा, विकासातील अवरोध दूर करणे आणि विकासातून अपवर्जितांसाठी पुनर्वितरणाचे प्रयत्न व सार्वजनिक कृतीद्वारे दिलासा यासाठी राज्याच्या मदतीची अनिवार्यता विकास विचारातील संपूर्ण कालखंडातील विवेचनात जाणवते.

प्रारंभीच्या काळात उत्पादनातील व उत्पन्नातील वाढ वा आर्थिक वृद्धी हा विकासाचा कामगिरीदर्शक निर्देशक असल्याचे प्रतिपादन केले गेले. आजही त्याबाबतचा आग्रह मुळीच कमी झालेला नाही. विकासातून दारिद्र्य निर्मूलन, रोजगार आणि न्याय, विषमतेत घट, मुलभूत गरजांची पूर्तता, मानव विकास कोणतेही उद्दिष्ट गाठायचे असले तरी ते वृद्धीच्या मार्गाने वा माध्यमातून साध्य करण्याचा आग्रह राहत असतो. या प्रकारची उद्दिष्टे साध्य करण्यात वृद्धीच्या मर्यादा स्पष्ट होऊनही विकासाचे मुख्य साधन, विकास प्रयत्नांचा केंद्रबिंदू आर्थिक वृद्धी हाच आहे.

सगळ्यात महत्त्वाची बाब म्हणजे विकासाच्या संपूर्ण वाटचालीत विकासाची प्रक्रिया व फलनिष्पत्तीतून समाजातील काहींचे विशेषत: तळाच्या स्तरावरील लोकांचे अपवर्जन अपरिहार्यपणे आढळले. अपवर्जनाचे वास्तव आणि म्हणून त्यांच्या समावेशनाचा अभिस्ताव हा

विकास विवेचनाचा गाभा राहिलेला जाणवतो.

### 3. विकासाच्या विचारातील टप्पे – द्वंद्व समावेशन अपवर्जनाचे :

विकासाचे विवेचन व वास्तवातील गाभाभूत साम्य लक्षात घेतल्यानंतर पॉल स्ट्रीटीन उल्लेखित विकासाच्या विचारातील महत्त्वाचे टप्पे आधारभूत मानून विकास विषयक विचारांच्या वाटचालीचा मागोवा घेऊ. नंतर या विचारांचे भारतीय आर्थिक नियोजनातील उपयोजन व अर्थव्यवस्थेतील वास्तवाच्या विश्लेषणाकडे वळू.

1950 च्या दशकात आर्थर लेवीसने विकासाचे प्रयोजन निवडीची विस्तारित कक्षा असल्याचे प्रतिपादन केले. विकसनशील जगाच्या स्वातंत्र्य व विकास प्रयत्नांच्या या प्रारंभ काळात निवडीच्या विस्तारित कक्षेचा आशय दारिद्र्य निर्मूलन असा होता. आश्चर्य म्हणजे वृद्धीमध्ये समृद्धी अभिप्रेत असूनही दारिद्र्य निर्मूलनाचा उद्देश विकासाच्या क्रमोन्नत वाटचालीत आजतागायत टिकून आहे. वृद्धी विकासाचा कामगिरीदर्शक निकष व दारिद्र्य निर्मूलनाची किल्ली होती. बाजारामार्फत वृद्धी घडून येणार यावर विश्वास होता. उत्पादन वाढीसाठी श्रमाची वाढती मागणी, वाढती उत्पादकता परिणामत: घटत्या किंमतीच्या माध्यमातून वृद्धी खालपर्यंत पाझरून दारिद्र्य निर्मूलनाची अपेक्षा होती. मात्र या परिणामासाठी आवश्यकपणे अपेक्षित पूर्ण स्पर्धायुक्त बाजार वास्तवात नसल्यास आणि तसा तो नसतोच त्यामुळे वृद्धीच्या लाभात संकेंद्रणाच्या प्रवृत्तीची जाणीव व सूचनाही होती. दारिद्र्य निर्मूलन वृद्धीतून घडून येणारी स्वयंचलित प्रक्रिया नाही; त्या एकाच प्रक्रियेच्या दोन बाजू नाहीत हे मान्य करून वितरणाच्या दुरूस्तीचे अनिवार्य दायित्व राज्याने पार पाडावे असे सूचविण्यात आले.

1950 व 60 च्या दशकातील वृद्धीची अवस्था वा टप्पा सिद्धान्त विकासाचा विशिष्ट मार्ग निर्दिष्ट करीत होते. रोस्टोसारख्या आर्थिक इतिहासकाराने विकासासाठी विशिष्ट अवस्थात्मक संक्रमण आवश्यक असल्याचे प्रतिपादन केले तत्कालीन विकसित देशांच्या विकास मार्गाच्या अनुकरणाची शिफारस होती. बचत, गुंतवणूक, कार्यक्षम तंत्र, विदेशी मदत इ. ची निकड होती. विकसनशील देशांच्या विकासाला चालना व वेग देण्यासाठी मागणी व पुरवठ्याची अविभाज्यता, कौशल्य निर्मितीची आवश्यक अट इ. मुद्यांच्या आधारावर मोठ्या प्रमाणावरील गुंतवणूकीची निकड 'मोठा धक्का सिद्धान्तात' रोझेस्टीन रोडान स्पष्ट करीत होते. लायबेस्टीन तर विकसनशील देशातील लोकसंख्या वाढीच्या पार्श्वभूमीवर स्वयं सातत्यशील वृद्धीपथासाठी निर्वाह पातळीपेक्षा वरच्या पातळीवर उत्पन्न पोहोचणे आवश्यक म्हणून मोठ्या गुंतवणूकीच्या गरजेबरोबरच त्यापेक्षा कमी पातळीवर गुंतवणूकीने अर्थव्यवस्था पुन्हा निर्वाहपातळीवर घसरेल असे भवितव्यही वर्तवत होते. या पार्श्वभूमीवर वृद्धीतून दारिद्र्यनिर्मूलन ही तातडीने साध्य होण्याची किंबहुना साध्य करावयाची बाब नाही या विचारातून वृद्धी व दारिद्र्य निर्मूलनातील अर्थात गरीबांच्या विकासातील समावेशनातील दरी रूंदावण्याला आरंभ झाला. उत्पादन वाढीच्या प्रक्रियेत प्रत्यक्षपणे दारिद्र्य निर्मूलनाऐवजी राज्य हस्तक्षेपाद्वारे दारिद्र्य निर्मूलन

या पहिल्या टप्प्यानंतरचा जास्त व्यवहारी विचार म्हणजे आधी दारिद्र्य निर्मूलनाचे सामर्थ्य प्राप्त करा, वाढवा हा होता. भांडवल निर्मिती, आधारिक संरचनेचा विकास, औद्योगिकरण, उत्पादन क्षमतेतील वाढ या त्यासाठी आवश्यक बाबी होत्या.

दारिद्र्य निर्मूलनाच्या सामर्थ्य प्राप्तीच्या प्रक्रियेचे वैशिष्ट्य म्हणजे विकास व विषमतेच्या सहभागामित्वाला किंबहुना तिच्या अनिवार्यतेला मान्यता हे होते. कारण दारिद्र्य निर्मूलनाच्या सामर्थ्य प्राप्तीचा हा काळ मोठा असण्याची शक्यता होती. या काळात गरीबांकडचे उत्पन्न घटणार होते तर श्रीमंताकडचे वाढणार होते. त्याचा वापर बचत, भांडवल संचय, नवप्रवर्तनादिसाठी करून दारिद्र्य निर्मूलनाचे सामर्थ्य वाढवायचे होते. आर्थिक विषमतेची निर्मिती आणि निरास दोन्ही विकास प्रक्रियेतील स्वाभाविक बाबी असल्याचे प्रतिपादन होते. त्याचा संबंध लेवीसने औद्योगिकरण व नागरीकरणाशी जोडला. निम्न उत्पन्न गटाचे उच्च उत्पन्न नागरी औद्योगिक क्षेत्रात स्थलांतरणाने प्रारंभी विषमता वाढेल. निम्न उत्पन्न धारकांना सामावून घेईल अशा औद्योगिकरणाच्या पातळीनंतर समानतेकडील वाटचाल सुरू होईल. कुझनेट्सनी घंटीच्याआकाराच्या वक्राच्या प्रतिपादनांद्वारे विषमतेचा संबंध अर्थव्यवस्थेच्या उत्पन्न पातळीशी जोडला. 1000डॉलर प्रति व्यक्ती उत्पन्न पातळी पर्यंत विषमतेत वाढ व तदनंतर उत्पन्न विषमतेतील घटीला प्रारंभ होईल असे प्रतिपादन केले.

विकास प्रक्रियेसंबंधी मार्गदर्शन, विकासनशील देशांची विकासाची तीव्र आकांक्षा, आंतरराष्ट्रीय पातळीवरील सहाय्य व सहकार्य यामुळे वृद्धीची प्रक्रिया अपेक्षेपेक्षा वेगवान व यशस्वी झाली. विकास विचारकांच्या पुर्वानुमानाशी सुसंगतपणे निम्न उत्पन्न गटाचे वृद्धीच्या लाभातून अपवर्जन प्रत्यक्षात आले. विषमतेचा परिहार मात्र होऊ शकला नाही. या अनुभवामुळे विकासाच्या विचारातील पुढचा टप्पा हा रोजगार आणि न्यायाचा होता (jobs and justice). दारिद्र्य निर्मूलनाचा रोजगार निर्मिती आवश्यक असल्याचा निष्कर्ष निघाला. रोजगाराच्या प्रश्नावर अनेकांगी विश्लेषण झाले.

रोजगार प्रश्नाचे गांभीर्य लक्षात घेऊन आंतरराष्ट्रीय श्रम संघटनेने रोजगाराचे विकासाशी एकीकरण व दुर्मिळ भांडवलाचे श्रमाद्वारे प्रतिस्थापनाची शिफारस केली. संघटनेने जगातील अनेक विकसनशील देशात विश्व रोजगार कार्यक्रम राबवला. त्यातून रोजगारासंबंधी काही पैलू समोर आले. त्यानुसार विकसित देशात राज्याद्वारे उत्पन्न आधार, सामाजिक सुरक्षिततादि सुविधांमुळे तात्पुरती, संरचनात्मक, चक्रीय इ. प्रकारची बेकारी असूनही बेरोजगारी म्हणजे जीविकेच प्रश्न नव्हता. विकसनशील देशात मात्र या प्रकारच्या सुविधा अभावी व उत्पन्नाच्या पर्यायी स्त्रोतांच्या अनुपस्थितीमुळे खरा प्रश्न बेरोजगारीचा नाही तर निम्न उत्पादक रोजगाराचा होता. मूलत: निर्वाहाचा पर्यायाने दारिद्र्याचा प्रश्न होता. त्यामुळे जास्त उत्पादक रोजगारासाठीचा प्रयत्न महत्त्वाचा असल्याचा निष्कर्ष काढण्यात आला.

औद्योगिकीकरणातून अपेक्षेप्रमाणे रोजगार निर्मितीचा दर वाढू न शकल्याने बेकारी वाढली.

रोजगाराच्या शोधात शहरात येणाऱ्या लोंढ्यांनी रोजगाराचा समतोल ढळला. शेतीचे स्वरुप हंगामी होते. केवळ घटक अनुपाताची ताठरता नसल्यामुळे पर्यायी रोजगार संधीच्या अभावी शेतीत प्रच्छन्न बेरोजगारी होती. महत्त्वाची बाब म्हणजे प्रच्छन्न बेरोजगारीतून भांडवल निर्मितीचा विचार रेनिस फाई, जॉर्गसन, सॅन फ्रान्सीस्को इ. अनेकांनी मांडला होता. अतिरिक्त श्रम बचत व भांडवल निर्मितीचा स्त्रोत बनू शकतो अशी मांडणी रॅग्नर नर्क्सनी केली. स्थिर वेतनदरावर उपलब्ध अमर्याद श्रम पुरवठ्यद्वारे गुंतवणूक व विकासाची शक्यता लेवीससारख्या अर्थतज्ज्ञांनी प्रभावीपणे वर्तवलेली होती.

रोजगार संधीच्या अपर्याप्ततेत असलेले प्रच्छन्न बेरोजगारीचे व कमी उत्पन्नाचे मूळ रोजगार वृद्धीची निकड अधोरेखित करीत असताना; रोजगार निर्मितीद्वारे जीविकेचा प्रश्न सुटणारा असून आणि प्रच्छन्न बेरोजगारांचा उत्पादक कार्यातील वापराद्वारे भांडवल निर्मितीचा विकासाला चालना देण्याचा पर्याय उपलब्ध असतानाही खरा प्रश्न बेरोजगारीचा नाही म्हणणे धाष्ट्याचे व आश्चर्यकारक होते. जास्त उत्पन्न देणाऱ्या, जास्त उत्पादक रोजगाराकडे पर्यायाने उत्पादकता वाढीकडे लक्ष केंद्रित केल्यामुळे आधुनिक भांडवल प्रधान तंत्राच्या वापराला प्रोत्साहन देण्यासाठी भांडवलाची किंमत जाणीवपूर्वक कमी ठेवली गेली. उत्पादन तंत्र आणि रोजगारातील मूलगामी संबंध मात्र उपेक्षित राहिला.

मिर्दलने रोजगाराऐवजी श्रम उपयोजनाची संकल्पना वापरली. रोजगाराचा प्रश्न कामकरी गरिबांचा प्रश्न असल्यामुळे असंघटित क्षेत्रातील वेतनी व स्वयंरोजगार, लघु व कुटीर उद्योगातील उत्पादकता, स्त्रिया, बालमजूर इ. प्रश्नांची उत्तम चर्चा झाली. मात्र रोजगाराचा प्रश्न रोजगार वृद्धी ऐवजी श्रमाच्या उपयोजनाशी जोडल्या गेला. रोजगार वृद्धीच्या निकडीपासून अपसरण हा त्याचा परिणाम होता.

विकासाच्या प्रक्रियेत बेरोजगारीच्या किमान विशिष्ट पातळीला आणि श्रमाचे वैपुल व भांडवलीच्या न्यून उपभोगासह बेरोजगारीच्या सहअस्तित्वाला मान्यता देण्यात आली. रोजगार चर्चेच्या विरामात त्याचा शेवट झाला. रोजगाराच्या वाढी अभावी विकासातून अपवर्जन वाढले. रोजगाराच्या प्रभावी माध्यमातून लोकांच्या विकासातील समावेशना ऐवजी दारिद्र्य निर्मूलनाच्या पर्यायी उपायाकडे चर्चा वळली. उत्पन्नाचे पुनर्वितरण आणि दारिद्र्य निर्मूलनातील सांधणीच्या विचाराच्या पुढच्या टप्प्यात पुनरोदय झाला.

विश्व बँकेच्या 1974 मधील 'Redistribution with Growth' या ग्रंथात्मक अभिक्रमाने वृद्धीसह पुनर्वितरणाची चर्चा सुरु झाली. वृद्धी विषमता वाढवते व दृढमूल करते या वृद्धी प्रक्रियेसंबंधीच्या कठोर वास्तवाला व वृद्धीतील या गरिबांविरुद्धच्या अभिनतीत बदलाच्या गरजेला आणि वाढलेल्या उत्पन्नाच्या पुनर्वितरणाच्या समष्टी व्यूहनीतीची व्याप्ती आणि प्रभाव फार कमी आहे या अनुभवाला स्वीकृती हे त्याचे वैशिष्ट्य. अशा स्थितीत वृद्धीला पुनर्वितरणाची जोड देण्याकरिता गरीबांचे लक्ष्य-गट शोधून पुनर्वितरणाच्या व्यष्टी व्यूहनीतीचा वापर प्रभावी ठरेल असे सूचविण्यात आले.

वृद्धीसह पुनर्वितरणाचे विवेचन वृद्धी वंचितांना लाभ देण्यासाठी असल्यामुळे वस्तूत: तत्कालीन चर्चा सापेक्ष उत्पन्न पातळीशी नाही तर निम्न उत्पन्न गटातील उत्पन्न पातळी व त्यातील वाढीशी संबंधित असायला हवी होती. प्रत्यक्षात सगळ्या उत्पन्न गटाचा विचार, गिनी गुणांकाद्वारे त्यातील उत्पन्न वितरणाचा विचार झाला. लक्ष्य गट शोधून विषमता घटण्याच्या दृष्टीने वाटचाल झाली. परंतु दारिद्र्याच्या मूळ प्रश्नाकडे आवश्यक ते लक्ष दिले गेले नाही.

वृद्धीद्वारे व दारिद्र्य निर्मूलनाच्या सामर्थ्य प्राप्तीद्वारे दारिद्र्य निर्मूलनाबाबत भ्रमनिरास, रोजगार प्रश्नांचा लोप, पुनर्वितरणाच्या मर्यादा यानंतरचा टप्पा मूलभूत गरजांचा दृष्टिकोन हा होता. माणूस आणि त्याच्या मूलभूत गरजांमध्ये अन्नवस्त्रादि बरोबर सुरक्षित पाणी, आरोग्य सुविधादिंचा अन्तर्भाव करण्यात आला. केवळ आर्थिक वृद्धीद्वारे हे साध्य होणे नाही म्हणून पुन्हा सार्वजनिक कृतीची निकड अधोरेखित केली. जनसामान्यांसाठी स्थायी, स्थैर्ययुक्त आणि न्याय्य उपभोग वृद्धी अस्तित्वात यावी, समाज आणि स्वयंशासक संस्थांच्या सहभागात्मक पद्धतीने हे काम व्हावे अशी अपेक्षा केली गेली. मूलभूत गरजा पूर्ण न होणारे लोक गट शोधून त्यांच्या मूलभूत गरजा पूर्ण होतील अशा योजनांचे रुपांतरण लक्ष्य गट दृष्टिकोनाचा पुढचा टप्पा या प्रकारे झाले. 'गरिबांची गणना करा, त्यांना वाटप करावयाच्या वस्तू गटाच्या खर्चाचे मापन करा आणि लक्ष्य गटाला वाटप करा '(count, cost and deliver) असे स्वरुप आले. त्यात राज्याला सोपवलेली भूमिका पैतृकवादी होती.

मूलभूत गरजांचा दृष्टिकोन अल्पायुषी ठरला. केवळ मूलभूत गरजा लक्षात घेणे फारच संकुचित दृष्टिकोन असल्याचा आक्षेप घेण्यात आला. या कल्पनेचे निर्वचन विकसित देशांनी मूलभूत गरजा भागवण्यासाठी व भागवण्यापुरतीच मदत द्यावी असे करुन विकसनशील देशांना दिली जाणारी विकासात्मक मदत घटवण्यासाठी व संरक्षणात्मक प्रतिबंध घालून विकसनशील देशांची कोंडी करण्यासाठी केला. विकसनशील देशांनाही केवळ मुलभूत गरजांची पूर्तता विकासातून अपेक्षित नव्हती. परिणामत: अत्यंत प्राधान्य योग्य उद्दिष्ट असूनही आंतरराष्ट्रीय चर्चेतून त्यासंबंधीची चर्चा अस्तंगत झाली.

1980 चे दशक विकासविषयक विचारांच्या विविधांगी विस्ताराचे होते. विकासाच्या चर्चेतील घटकांची व्याप्ती वाढवणारे होते. दशकाचा आरंभ अरिष्ट, अवरोध आणि माघारीचा असल्यामुळे स्थिरीकरण व समायोजन धोरणावर लक्ष केंद्रित झाले. तथापि भौतिक पर्यावरण, मानवी हक्क, राजकीय स्वातंत्र्य, प्रशासन, स्त्रियांची भूमिका, सक्षमीकरण इ. घटकांच्या चर्चेला चालना मिळाली. वृद्धीच्या भौतिक घटकांकडून मानवी घटकांकडे लक्ष हे महत्त्वाचे संक्रमण या काळात घडले. वृद्धीच्या नवीन सिद्धांतात विकास व मानव संसाधनातील संबंधाकडे लक्ष वेधण्यात आले. दीर्घकालीन विकास केवळ भौतिक भांडवल व तांत्रिक प्रगतीसारख्या बाह्य घटकांनी निर्धारित होत नाही. मनुष्य केवळ श्रमाचा पुरवठादार नाही. आरोग्य, शिक्षण इ. द्वारे सुधारणा केली तर भौतिक

भांडवलाप्रमाणेच मानवी भांडवलाची उत्पादकता वाढीला व विकासाला लक्षणीय मदत करते. उपलब्ध तंत्रज्ञानाचा कार्यक्षम वापर व कौशल्यादि प्रसाराबरोबरच संशोधन व विकासातील गुंतवणूकीच्या परिणाम स्वरुप तंत्रज्ञानाची उंचावलेली पातळी सार्वजनिक वस्तूंचे स्वरुप धारण करुन विधायक बाहयतांचाही लाभ देते हे स्पष्ट केले गेले.

विकासाचे साध्य व प्रयोजनासंबंधीची चर्चा हे 1990 च्या दशकाचे वैशिष्ट्य. विकासाचे साध्य मनुष्य असल्याचे अध्यहृत होते, वेळोवेळी स्पष्टही केले गेलेले होते. जीविकोपार्जन, आत्मसन्मान आणि दास्यमुक्ती विकासाच्या गाभ्याची मूल्ये असल्याचे प्रतिपादन करुन गौलटने व्यक्तीचे केंद्रस्थान आधीच लक्षात आणून दिलेले होते. तथापि, अमर्त्य सेन सारख्या अभ्यासकांनी व्यक्तीच्या केंद्रीय स्थानावर पुन्हा प्रभावी प्रकाशझोत टाकला. अमर्त्य सेन यांनी उपयोगितावाद व कल्याणवादाच्या मर्यादा स्पष्ट करुन पर्यायी दृष्टिकोनाची मांडणी करताना मूलभूत गरजा दृष्टिकोनाचे घनीकरण आणि विस्तरण केले. विकास प्रयत्नांचा केंद्र बिंदू मनुष्य असून विकासाचे प्रयोजन लोकांच्या निवडीची कक्षा विस्तारित करणे असल्याचे प्रतिपादन केले. त्यासाठी पोषण, आरोग्याबरोबर उत्पन्न घटकही महत्त्वाचा आहे. मात्र त्यातून जीवनाची गुणवत्ता वाढली पाहिजे यावर भर दिला. मानवी शक्ततांचा विकास आणि त्या शक्ततांच्या वापराची संधी विकास प्रक्रियेत निर्माण व्हावी असे प्रतिपादन केले. अर्थशास्त्राचे अधिष्ठान मागणीचे शास्त्र नसून कार्य आणि प्रयत्नांचे शास्त्र आहे. (science of activities) या मार्शलच्या भूमिकेचेही ते एक प्रकारे परिष्करण आहे.

उत्पन्नात अभिव्यक्त न होणाऱ्या तसेच उच्च उत्पन्नाबरोबर अपेक्षित पण प्राप्त होतीलच याची शाश्वती नसलेल्या गोष्टींचा विचार झाला. नियमित, सुरक्षित व समाधान देणारा रोजगार विकासात अपेक्षित आहे. भौतिकतेवर लाभाच्या विचारात जीविकेचे व काम निवडण्याचे स्वातंत्र्यासारखे हक्क, प्रत्यक्ष सबलीकरण, पुरेसा विश्रांती काळ व तिच्या वापराची समाधानकारक साधने यांचा विकासातून अपेक्षित उद्दिष्टात अन्तर्भाव झाला. जीवन व कामात प्रयोजनाची, सार्थकतेची भावना, समाजाप्रति तदीयतेची भावना (काळजी घेण्याचे, दायित्व निभावण्याची अपेक्षा आणि विश्वास असणाऱ्या बद्दल तदीयता म्हणजे मी समाजाचा आहे, समाज माझी काळजी घेईल अशी भावना) सारख्या मन:स्थितीशी संबंधित बाबींचा विकासात समावेश होऊन विकासाच्या आशयाला व्यापक स्वरुप प्राप्त झाले.

21व्या शतकाच्या पहिल्या दशकात अन्तरावेशी वा समावेशी वृद्धीची कल्पना मांडली गेली. अपवर्जन बहुविध स्वरूपाचे असल्यामुळे समावेशनाचा विचारही बहुआयामी आहे. विश्व बँकेच्या प्रतिपादनानुसार समावेशी वृद्धीत विकासाच्या संधीबाबत न्याय, वृद्धीचे प्रादेशिक क्षेत्र व संपत्तीची विस्तारित प्राप्यता अभिप्रेत आहे. संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रमानुसार ज्यात जनतेतील सर्व गट वृद्धीच्या आयोजनात सहभागी व लाभान्वित होतील अशी वृद्धीची प्रक्रिया व निष्पत्ती म्हणजे समावेशी वृद्धी होय.

अभिजित सेन कृषी व कृषीतर क्षेत्रातील प्रति व्यक्ती उत्पन्नातील तफावत न रुंदावणे समावेशी वृद्धीची आवश्यक अट मानतात; तर वृद्धी प्रक्रियेतील गरिबांच्या समावेशनासाठी दारिद्र्याची वृद्धी लवचिकता निर्देशकाचे प्रतिपादन बेस्ले करतात. समावेशनाची गरज अपवर्जितांबाबत उद्भवते व सांगितली जाते. त्यादृष्टीने स्थूल मानाने एम. एच.सूर्यनारायण यांनी उत्पादन प्रक्रियेत प्रभावीपणे सहभागी नाहीत; उत्पन्न निर्मितीच्या संज्ञेत लाभान्वित नाहीत आणि उपभोगाद्वारे मापन केलेल्या कल्याणाच्या वाढीचा अनुभव नसणाऱ्यांना वृद्धी प्रक्रियेतून अपवर्जित असल्याचे मानले आहे.

वृद्धीच्या प्रक्रियेतून वगळल्या गेलेल्यांचा समावेश वृद्धी प्रक्रियेच्या मुख्य प्रवाहात व्हावा हा समावेशी वृद्धीचा खरा गाभा. त्यांच्याशी प्रामाणिक राहून खऱ्या अर्थाने विचार व प्रयत्न झाले तरच आतापर्यंतच्या विकासाच्या समावेशन, विशेषत: विकासाच्या लाभात समावेशनाऐवजी वृद्धीच्या प्रक्रियेतील समावेशनाचा विचार एक अत्यंत महत्त्वाचा टप्पा ठरेल.

विकास मनुष्यासाठी आहे याचे संसूचन; विकासाच्या प्रक्रियेत जनसामान्याच्या समावेशनाबाबत अपयश; विकासातून अपवर्जितांना सहभागी करुन घेण्याच्या गरजेचा निर्देश आणि त्यासाठी नीतीविषयक दृष्टिकोन व साधनांचे प्रतिपादन हा आजपर्यंतच्या विकासविषयक विचारांच्या वाटचालीचा सारांश.

**4. विकासातील निहीतार्थ–साध्य व्यक्तीकेंद्री प्रक्रिया वृद्धीकेंद्री :**

विकासाच्या वाटचालीत विचार आणि वास्तवाच्या आधारावर दोन गोष्टी प्रत्ययास येतात. 1) विकासाचे साध्य मनुष्य आहे याला मान्यता आणि 2) विकासाची प्रक्रिया वृद्धी केंद्रित ठेवण्याचा अट्टहास.

विकासाचे साध्य मनुष्य आहे. दारिद्र्य निर्मूलन, रोजगार, विषमतेत घट, मूलभूत गरजा, मानव विकास, समावेशी विकास या सर्व बाबी विकास मनुष्यासाठी असल्याचे निर्दिष्ट करतात. विकासातून व्यक्ती व व्यक्तिसमूहांचे दारिद्र्य नष्ट करावयाचे होते. दारिद्र्य निर्मूलनाचे सामर्थ्यही त्याच करता प्राप्त करावयाचे होते. मात्र वृद्धीतून दारिद्र्य आपोआप नष्ट होईल म्हणताना किंवा दारिद्र निर्मुलनाचे सामर्थ्य वाढवताना दारिद्र्य वाढवायला अनुमति म्हणजे विकासाचे साध्य असलेल्या व्यक्तीचे विकास प्रक्रियेतून अपवर्जन, निर्मम विलगता होती. गरीबांना भविष्यात उत्पन्नाच्या वरच्या पातळीवर नेण्यास समर्थ होऊ या अपेक्षेपोटी आज खालच्या पातळीवर नेणे; व्यापक व यशस्वी उत्पन्न हस्तांतरण फक्त कठोर हुकूमशाहीत व्यवहार्य असल्याची जाणीव न ठेवण्यात दारिद्र्याला अन्यायाची जोड देऊन विकास व मनुष्यात दरी निर्माण होते.

रोजगार आणि न्यायाच्या टप्प्यात व्यक्तीला रोजगार पुरवून न्याय्य व्यवस्थेची निर्मिती अपेक्षित होती. कमी उत्पन्नामुळे रोजगार जीविकेचा प्रश्न होता हे खरे,परंतु आधुनिक उत्पादन तंत्राच्या पार्श्वभूमीवर उत्पादन वाढीचा दर आणि रोजगार वाढीचा दर यांच्यात पूर्वनिश्चित, स्थिर व अनतिक्रमणीय संबंध वा घटक अनुपाताची ताठरता

या वस्तुस्थितीची उपेक्षा केली. उत्पादकतेतील वाढीकरिता रोजगार वाढीवर होणाऱ्या परिणामाकडे दुर्लक्ष केल्याने विकास व्यक्तीपासून दुरावला. वृद्धीसह पुनर्वितरणात वस्तूत: पुनर्वितरणाच्या व्यूहनीतीची वृद्धीच्या समष्टी व्यूहनीतीशी सांगड अभीष्ट होती. वृद्धीच्या व्यूहनीतीतून पुनर्वितरणाची प्रक्रिया अस्तित्वात आली असती तर विकास व्यक्तीशी थेट जोडला गेला असता.

मूलभूत गरजा दृष्टिकोनाने विकासाचे साध्य असलेल्या मनुष्याकडे पुन्हा लक्ष वेधले. विकासाद्वारे सगळ्यांच्या किमान, मूलभूत गरजा पूर्ण व्हाव्यात हा त्यातील निर्देश व त्यात अपेक्षित व्यक्ति गट व वस्तू गट सुस्पष्ट होता. अन्नवस्त्रादि बरोबर आरोग्य, शिक्षणादि सुविधांचा मूलभूत गरजांमधील अन्तर्भाव विकास पातळीतील सुधारणा व विचारातील प्रगल्भतेची कालोचित अभिव्यक्ती होती. मात्र मूलभूत गरजा वंचितांच्या गरजा भागविण्याचे दायित्व मदत वाटण्याच्या माध्यमातून शासनाने पार पाडावे या भूमिकेमुळे विकास प्रयत्नांचा केंद्रबिन्दू व्यक्तिवरून ढळला.

मानव विकास दृष्टिकोन मनुष्याला साध्य, केंद्रस्थानी मानणारा आहे असे सुस्पष्ट आणि आग्रही प्रतिपादन आहे. मानवी विकासासाठी शिक्षणादि सुविधा वाढवण्यावर भर देताना खाजगीकरणाच्या लाटेत जनसामान्यांना त्यांच्या प्राप्यतेचा मुद्दा मागे पडला. मानवी क्षमतांच्या उपयोजन पैलूकडे तर गंभीर दुर्लक्ष झाले. क्षमतांच्या उपयोजनाकरिता नियमित, सुरक्षित रोजगारावर लक्ष केंद्रीत केले असते; मानव विकास निर्देशंकात रोजगारासारखा क्षमतांच्या उपयोजनातील यशाचा निर्देशक असता; उत्पन्नाच्या निर्देशकात मानवी क्षमतांच्या विकासासाठी आवश्यक किमान उत्पन्नाची मर्यादा निर्धारित करून त्या उत्पन्न मर्यादेखालील लोकसंख्या गटाचे उत्पन्न किती वाढले यावर भर दिला असता तर विकास खऱ्या अर्थाने मानवकेंद्री राहिला असता. आजच्या समावेशी विकासाच्या कल्पनेत वृद्धीच्या प्रक्रियेत सर्वांना समाविष्ट व लाभान्वित करण्याचा निर्देश मनुष्याला केंद्रस्थानी ठेवतो. मात्र त्यासाठीच्या प्रयत्नात पुन्हा वृद्धीच्या प्रक्रियेपेक्षा लाभात समाविष्ट करून घेण्यावर भर देताना दिसतो. या सगळ्याचा परिणाम म्हणजे विकासाचे साध्य मनुष्य आहे याला मान्यता देऊनही व्यक्ती आणि विकासात दुरावा वा विलगता व्यवहार आणि विचार दोन्ही पातळीवर अस्तित्वात आला. विकासाची प्रक्रिया कधीच मनुष्यकेंद्री राहिली नाही.

**विकासाची वृद्धी केंद्रितता :**

विकासाची प्रक्रिया वृद्धीकेंद्रीत ठेवण्याची प्रवृत्ती विकासातून दारिद्र्य निर्मूलन ते समावेशी विकासापर्यंतच्या संपूर्ण वाटचालीत प्रकर्षाने जाणवते. वृद्धी ही दारिद्र्य निर्मूलनाची किल्ली आहे येथपासून ते मेहबूब हक सारख्याचे 'वृद्धी विकासाचे अंतिम लक्ष्य नाही; परंतु तिचा अभाव मात्र विकासाचा अंत असेल' या प्रतिपादनापर्यंत हीच भावना आढळते. सगळ्या गोष्टी वृद्धीमार्गे वा वृद्धीच्या माध्यमातून साध्य करण्याचा प्रयत्न आढळतो.

प्रारंभी उत्पन्न वाढ व दारिद्र्य घटीचे सहगामित्व पाझर प्रभावाच्या माध्यमातून गृहीत धरून वृद्धी दारिद्र्य निर्मूलनाची किल्ली मानली.

पुढच्या टप्प्यात अर्थव्यवस्थेत दारिद्र्य निर्मूलनाचे सामर्थ्य वाढवायला महत्त्व दिले. समाजाच्या उत्पन्नातील वाढ त्यासाठी अपरिहार्य होती. दारिद्र्यनिर्मूलनाच्या उद्दिष्टाला स्थगिती व विषमतेच्या वाढीला अर्थात दारिद्र्य व समृद्धीच्या जुळ्या स्थितीला त्याकरिताच मान्यता देण्यात आली. 1000 डॉलर प्रति व्यक्ती उत्पन्न पातळी नंतर विषमता आपोआप घटेल असे मानल्यानंतर त्या उत्पन्न पातळीपर्यंत पोहचण्याची म्हणजे वृद्धीचे महत्त्वच नाही तर त्वरा होती. विश्व रोजगार कार्यक्रमाच्या निष्कर्षानुसार विकसनशील देशातील बेरोजगारीचा प्रश्न रोजगारापेक्षा निम्न उत्पादकतेचा व उत्पन्नाच्या पर्यायी साधनाच्या अभावामुळे मूलत: जीविकेचा म्हणजेच गरिबीचा प्रश्न होता. गरिबी दूर करण्याकरिता उत्पादकता व उत्पन्न वाढ म्हणजे वृद्धी हेच उत्तर होते.

वृद्धीसह पुनर्वितरणाच्या दृष्टिकोनात वृद्धीच्या साधन व उपायात गरिबांविरुद्ध अभिनत असल्याची व्यक्त केलेली शंका वास्तववादीच होती. तरीही वृद्धी आपल्या पद्धतीने होऊ द्या. वृद्धीचे फायदे वृद्धी वंचितांना मिळावेत यासाठी जास्त प्रभावी उपाय योजावे हीच भूमिका ठेवली गेली. पुनर्वितरणासाठीच्या लक्ष्य गट दृष्टीकोनात पुनर्वितरणातील सरकारची भूमिका पैतृक होती. पुनर्वितरणासाठी सरकारला अतिरिक्त संसाधने प्राप्त करायची तर अर्थव्यवस्थेच्या उत्पन्नात वेगवान वाढीसाठी वृद्धीचा वेग वाढवण्याची निकड अधोरेखित होती. मूलभूत गरजांच्या संदर्भात शासनाचे दायित्वही वृद्धीकडेच निर्देश करीत होते. माणसाच्या मूलभूत गरजा भागविणे हे विकासाचे प्राथमिक उद्दिष्ट असताना आणि ते गाठण्यात अपयश आल्यानंतरही मूलभूत गरजांचा दृष्टिकोन संकुचित असल्याचे मानणे तर व्यक्ती गौण आणि समृद्धीतील वाढ प्राधान्ययोग्य असल्याचे सूचित करणारे होते.

विकासाच्या विचारात भौतिक घटकांकडून मानवी घटकांकडे वळवणारा, मानवी भांडवलाचे महत्त्व अधोरेखित करणारा मानवी संसाधन विकास दृष्टिकोन मनुष्याकडे उत्पादनाचे, वृद्धीचे साधन म्हणून बघणारा; भौतिक भांडवलाच्या घटत्या प्रत्यायावर मात करण्याच्या दृष्टीनेच पुढे आलेला होता. त्यामुळे तो मुळातच वृद्धी केंद्री होता. मानव विकास दृष्टि कोनात शिक्षण आरोग्यदि सुविधा मानव विकासाला सहाय्यक आहेच; परंतु खाजगीकरणातून खर्चिक सुविधांचा वेगवान विस्तार वृद्धीचा दर वाढवणारा होता. उत्पन्न वाढीबरोबर मानव विकास निर्देशांकात वाढ म्हणजे मानव विकासात वाढ मानली जाणार होती. त्यासाठी प्रति व्यक्ती 4000 डॉलर्सची उत्पन्न मर्यादा गाठण्यासाठी विकसनशील देशांना वर्षानुवर्षे आर्थिक वृद्धीवर भर देणे आवश्यक होते.

समावेशी वृद्धीची कल्पना लोकांचा वृद्धीच्या प्रक्रियेत समावेश व्हावा असे प्रतिपादन करणारी म्हणजे मुळातच वृद्धी केंद्रित आहे. वृद्धीचे महत्त्व बाजूला सारून लोकांच्या वृद्धी प्रक्रियेतील समावेशनाला केंद्रस्थान मिळण्याची अपेक्षा निरर्थक आहे. वृद्धीच्या प्रक्रियेत म्हणजे उत्पादन वाढीच्या प्रक्रियेत समावेशनासाठी उत्पादन तंत्राचा मुद्दा केंद्रस्थानी येतो. श्रमसधन तंत्राला प्राधान्य, त्यादृष्टिने दीर्घकालीन योजनेद्वारे गंभीर प्रयत्नांचा

आरंभ या दिशेने विचाराचा सुद्धा मागमूसही नाही. त्यामुळे वृद्धीच्या प्रक्रियेत म्हणजे वृद्धीच्या लाभात समावेशन या पद्धतीचेच प्रयत्न राहणार असे नि:शंकपणे म्हणता येते.

एकंदरीत विकासाचे साध्य मनुष्य असला तरी त्यासाठीची सर्व उद्दिष्टे वृद्धीच्या माध्यमातून साध्य करावयाची या निर्देशामुळे विकासाचे साधन मानली गेलेली आर्थिक वृद्धीची विकास विषयक चर्चेत कायम प्रकाश झोतात राहिली. वृद्धीकेंद्रीत विकास प्रक्रियेत तिची परिणती झाली.

मूलत: आर्थिक वृद्धीच्या सहाय्याने विकासाची उद्दिष्टे साध्य करावयाची असा दृष्टिकोन होता. विकासाची उद्दिष्टे साध्य करण्याबाबत वृद्धीच्या मर्यादाही वस्तूत: प्रारंभापासूनच सूचित केल्या गेल्या. पूर्ण स्पर्धात्मक बाजाराच्या अभावाच्या स्थितीत वृद्धीच्या लाभात संकेंद्रणाची प्रवृत्ती असते. वृद्धी आणि विकासात स्वयंभू श्रृंखला नाही. ती जाणीवपूर्वक निर्माण करावी लागते. स्वयंचालित बाजार यंत्रणेत ती अस्तित्वात नसते. उलट ती गरिबांचे सीमान्तीकरण घडवून आणते. वृद्धीच्या दराएवढीच तिची गुणवत्ता महत्त्वाची आहे. वृद्धीतून विकासाची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी जाणीवपूर्वक व सजग सार्वजनिक धोरणाची निकड असते. वृद्धी निर्माण करीत असलेल्या संधीचे योग्य व्यवस्थापन गरजेचे असते. या प्रकारच्या प्रतिपादनातून वृद्धीच्या मर्यादा सुव्यक्त झालेल्या आहेत. वृद्धी समुच्चयात्मक दृष्टिकोन प्रस्तूत करते. वस्तू सेवांचे मूल्य त्यांच्या बाजार किंमतीवर मोजताना वस्तूंच्या सामाजिक दृष्ट्या असलेल्या महत्त्वाकडे दुर्लक्ष करते. सगळ्यात महत्त्वाची बाब म्हणजे वृद्धी ही कोणताही विशिष्ट निर्देश नसलेली अत्यंत अमूर्त व समुच्चयात्मक संकल्पना आहे. त्यात उत्पन्नाबाबत मर्यादा रहित अनंत क्षितिज ध्वनित असल्यामुळे ती आर्थिक धोरणाचे व्यवहार्य उद्दिष्ट होऊ शकत नसल्याचेही म्हटले गेले.

विकासाचे साधन म्हणून सुद्धा वृद्धीचे महत्त्व योग्य अटी व पूर्वनिश्चित गृहीतावर आधारलेले आहे. लोकांचे जीवन समृद्ध करण्याचे साधन यापेक्षा वृद्धीचे महत्त्व नाही. वृद्धीला साध्याचा दर्जा देणे अधिष्ठानभूत स्वरूपाची भ्रांती आहे असेही म्हटले गेले. एवढे असूनही विकासाच्या प्रयत्नांच्या वृद्धीकेंद्रित गाभ्यातून काही ग्रह ध्वनित होतात –

1) विकासाच्या उद्दिष्टाच्या दिशेने सरळ वा थेट प्रयत्न करावयाचे नसून सर्व काही वृद्धीच्या मार्गाने, वृद्धीच्या माध्यमातूनच साध्य करावयाचे आहे.
2) विकासाद्वारे साध्य करावयाची दारिद्र्य निर्मूलन, पुनर्वितरण, मूलभूत गरजांची पूर्तता, मानवी क्षमतांचा विकास व वापर रोजगार निर्मितीसारख्या थेट प्रयत्नांतून नगण्य वृद्धी होईल.
3) दारिद्र्य कालांतराने नष्ट झाले; विषमता निर्माण होऊन दीर्घकाळ टिकून राहिली; रोजगार निर्मिती कमी झाली किंवा बेरोजगारी भविष्यात केव्हा तरी अनिश्चित काळी, अनिश्चितपणे दूर झाली तरी चालेल; समाजातील काहींच्या मूलभूत गरजा पूर्ण न झाल्या तरी हरकत नाही; पण वृद्धी मात्र होणे, आजच होणे अधिक महत्त्वाचे आहे.
4) वृद्धीची उच्च पातळी गाठून झाली; जगात

महासत्ता बनण्यापर्यंत मजल मारली तरी विकासाची उद्दिष्टे समाधानकारकपणे साध्य होत नसतानाही वृद्धीच्याच मार्गाने प्रयत्न करणे म्हणजे विकासाच्या विचारात आणि विवेचनात काहीही म्हटले असले तरी वृद्धीला तिच्या उद्दिष्टांपेक्षा श्रेष्ठ मानणे होय.

**५. वृद्धी केंद्रीत विकास प्रक्रिया – आशय आणि परिणती :**

विकासविषयक विचाराच्या आरंभापासूनच वृद्धी विकासाची उद्दिष्टे साध्य करण्याचे मुख्य साधन व विकासाचा मुख्य निर्देशक मानली गेली. वृध्दी म्हणजे उत्पादन वाढ वा उत्पन्न वाढीच्या दराला विकासाच्या प्रक्रियेत महत्त्व असणे अस्वाभाविक नाही.परंतु वृद्धीकेंद्रित विकास प्रक्रियेचे सार्वत्रिकीकरण झालेले आढळते. त्यामुळे वृद्धी केंद्रित विकास प्रक्रियेचा आपल्याला अभिप्रेत असलेला आशय स्पष्ट करणे गरजेचे आहे.

**वृद्धी केंद्रीत विकास प्रक्रियेची लक्षणे :**

1) वृद्धीचे महत्त्व सर्वोपरि असते.
2) विकासाच्या मूल्यांकनाचा मुख्य निकष वृद्धि दर असतो.
3) आर्थिक धोरण व प्रयत्नांचा केंद्र बिंदू वृध्दी दर वाढवणे व वाढवलेला टिकवणे हाच असतो.
4) वृद्धी व अन्य उद्दिष्टातून निवडीचा प्रश्न निर्माण झाला तर वृद्धीची निवड केली जाते.
5) दारिद्र्य, बेकारी, विषमता निर्मूलन, मूलभूत गरजांची पूर्तता व या गरजा पूर्ण झाल्यानंतरची मानव विकास जीवनाचा उच्चतर दर्जा, अधिक मानवीय जीवनाकडील वाटचाल इ. विकासाची उद्दिष्टे फारशी साध्य होत नसली तरी वृद्धीवरच भर दिला जातो. याचा अर्थ वृद्धीला साधनाऐवजी साध्याचा दर्जा दिला जातो.
6) वृद्धी केंद्रित विकास प्रक्रियेच्या पुढच्या टप्प्यात वृद्धीची पातळी व दर केवळ विकासाचाच निर्देशक नाही तर अर्थव्यवस्थेच्या किंबहुना देशाच्या श्रेष्ठत्वाचा व यशाचा निर्देशक मानला जातो.
7) आपला वृद्धि दर टिकून रहावा म्हणून अतिरिक्त उत्पादन, भांडवल, मंदी इ. वृद्धीतील अवरोधांची निर्यात, प्रदूषणकारी उत्पादनाचे दुसऱ्या देशात स्थानांतरण इ.चा प्रयत्न केला जातो.
8) इतरांवरील वर्चस्वाचे साधन म्हणून वृद्धीचा उपयोग करते, त्यासाठी अंतर्गत व आंतरराष्ट्रीय पातळीवर आर्थिक वसाहतवादाचा आश्रम घेते. आपले वर्चस्व टिकून राहील या पद्धतीने इतर देशांची धोरणे, विकास व्यूहनीती, गुंतवणूक व उत्पादन अनुबंधादि प्रभावित करते.

वरील प्रकारच्या विकास प्रक्रियेला वृद्धीकेंद्रित विकास प्रक्रिया म्हणता येईल.

**वृद्धी केंदित विकास प्रक्रियेची परिणती :**

आर्थिक वृद्धी विकासाचे साधन असल्यामुळे वृद्धीद्वारे वा वृद्धीचा वेग वाढवून विकासाची उद्दिष्टे साध्य होतील अशी अपेक्षा असते. वृद्धी केंद्रित विकास प्रक्रियेत असे घडताना दिसत नाही. वृद्धी केंद्रित विकास प्रक्रियेची अंतिम परिणती मुख्यत्वे तीन प्रकारे विचारात घेता येईल. 1) प्रारंभिक

समस्यांचे दृढीकरण 2) वृद्धीचे स्वनाशकारी स्वरूप 3) बाजारपेठीय समाजाची निर्मिती. त्यांचा क्रमश: विचार करू.

**1) प्रारंभिक समस्यांचे दृढीकरण :** दारिद्र्य, विषमता, बेरोजगारी सारख्या समस्या देशात विकासाच्या प्रारंभिक अवस्थेत असतात. त्या सोडवणे विकासाचा मुख्य उद्देश असतो. मूलत: हे प्रश्न सोडवायचे म्हणजे वृद्धी वंचितांना विकासात सामावून घेणे. प्रत्यक्षात हे प्रश्न वृद्धी केंद्रीत विकास प्रक्रियेचे परिणामही असतात. समस्यांचे दृढीकरण होऊन त्या अर्थव्यवस्थांचे स्थायी वैशिष्ट्य बनण्याची प्रवृत्ती दिसून येते. ह्या प्रक्रियेची संक्षेपाने रूपरेषा पाहू.

दारिद्र्यादि समस्या सोडवण्यासाठी वृद्धी केंद्रित विकास प्रक्रियेचा आश्रय घेतला जातो. या प्रक्रियेत उत्पादन वाढ व उत्पादकता वाढीचे प्रयत्न केले जातात. कार्यक्षम तंत्राच्या वापरावर भर दिला जातो. अधिकाधिक कार्यक्षम तंत्राचा शोध व वापर ही अर्थव्यवस्थेची स्वाभाविक प्रवृत्ती असते. कार्यक्षम तंत्राच्या स्वरूपात भांडवल सधन तंत्र वापरले जाते. उत्पादनाच्या रोजगार लवचिकतेत घट होत जाते. रोजगार वृद्धीच्या दरावर प्रतिकूल परिणाम होतो. प्रगत तंत्राच्या वापरासाठी संचयाचा दर वाढवण्याची निकड वाढते. उत्पन्न वाढीबरोबर सीमान्त बचत प्रवृत्ती वाढते म्हणून विषमता विकास प्रोत्साहक मानली जाते. भांडवलसघन तंत्रामुळे झालेल्या श्रम विस्थापनामुळे एका बाजूने दारिद्र्य तर दुसऱ्या बाजूने त्या तंत्रातील उत्पादकतेतील वाढीमुळे रोजगार प्राप्त झालेल्यांचे उत्पन्न वाढते. त्यातून विषमतेचे पोषण होते. एका बाजूने रोजगार वृद्धी दरावर संरोध तर संचयासाठी विषमतेचे पोषण यातून दारिद्र्यात वाढ होते.

वाढती बचत, गुंतवणूक, आधुनिक तंत्राचा वापर यांचा एकत्रित परिणाम उत्पादन क्षमतेत प्रचंड वाढ हा असतो. बेकारी, विषमता, दारिद्र्याचा संयुक्त परिणाम मागणीचे संकुचन हा असतो. या तफावतीने उत्पादन वाढीचे सातत्य धोक्यात येते. तो प्रश्न सोडवण्यासाठी उत्पादक व उपभोक्ते दोघांनाही सूट सवलती दिल्या जातात. विषमतेमुळे सुखद चैनीच्या वस्तूंची मागणी वाढून त्यांच्याशी सुसंगत उत्पादन, उपभोग व गुंतवणूक अनुबंध अस्तित्वात येतो. वस्तूंच्या टिकावू स्वरूपामुळे वृद्धीच्या सातत्याची समस्या कायम स्वरूपात सुटत नाही. विकासातून विषमता आणि विषमतेतून वृद्धीचे चक्र सुरू होते. जागतिकीकरणात वृद्धीसाठी आणि आंतरराष्ट्रीय स्पर्धेत टिकण्यासाठी ही प्रक्रिया अधिक वेगवान व तीव्र होते.

अशा प्रकारे वृद्धी केंद्रीत विकास प्रक्रियेत उत्पादन वाढवण्याचा प्रश्न सोडवताना उत्पादन वृद्धीच्या सातत्याची समस्या निर्माण होते आणि ही समस्या सोडवताना विषमता, दारिद्र्य व बेरोजगारीच्या समस्यांचे दृढीकरण होते. उत्पन्नाचे पुनर्वितरण म्हणजे दुसऱ्याचे काढून तिसऱ्याला देणे. खाजगीकरण, स्वातंत्र्य, नफा हेतूला प्राधान्य या व्यवस्थात्मक वैशिष्ट्यामुळे धनवंताकडून उत्पन्नातील वाटा काढून घेणे कठीण. अतिरिक्त क्रयशक्तीच्या वसूलीसाठी प्रशासन यंत्रणेवरील खर्च आणि लक्ष्य गटांना देताना कुटुंबाच्या निवडीपासून तर वाटपात प्रशासन यंत्रणेने काढून घेतलेला हिस्सा यामुळे मोठे बदल अशक्य होतात.

समावेशनासाठी आखल्या जाणाऱ्या रोजगार योजनांचा गाभाही प्रयत्न करूनही उत्पादक स्वरूपाचा राहत नाही. रोजगार वंचितांना दिलासा, वृद्धीच्या प्रक्रियेत निर्मित विसंगती दूर करण्यासाठीचा अर्जित नव्हे तर हस्तांतरण स्वरूप उत्पन्नाचा रोजगार अस्तित्वात येतो.

वृद्धी केंद्रित विकास प्रक्रिया अशा प्रकारे मानवी घटकासाठी अपवर्जक बनून दारिद्र्य, विषमता व बेरोजगारीचे दृढीकरण करते. समावेशनाची निकड निर्माण करते. समावेशनाचे प्रयत्न पुनरावर्ती, अर्थव्यवस्थेचे स्थायी वैशिष्ट्य बनते. समावेशनाचे कार्य व्यापक आणि अधिक अवघड बनते.

**२) वृद्धीचे स्वनाशकारी स्वरूप :** अपवर्जन आणि समावेशनाची गरज एवढ्यापुरता वृद्धी केंद्री विकास प्रक्रियेचा परिणाम मर्यादित नसतो. तर स्वनाशकारी किंबहुना नकारात्मक वृद्धीत तिची परिणती होते.

वृद्धी केंद्रित विकास प्रक्रियेचा प्रारंभ वृद्धी सर्व समस्यांवरील उपाय आहे या श्रद्धेतून होतो. ती वस्तू दैववादाकडे वळते. वृद्धीचा दर वाढवण्याच्या त्वरेतून ती विषमता निर्माण व दृढमूल करते. मागणीचा पाया संकुचनशील होऊन वृद्धीच्या सातत्यात अडसर निर्माण करते. अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या वापराने रोजगाराचा पाया संकोचतो. रोजगार वंचितांना जगण्यासाठी सार्वजनिक आधाराची गरज तर उत्पादन वाढीच्या सातत्यासाठी उत्पादक व श्रीमंत उपभोक्त्यांनाही प्रोत्साहन व सवलतींची गरज अशी विसंगती निर्माण होऊन विकासाची स्वचालितता समाप्त होते. उत्पादन वेगाने वाढवताना वृद्धीची अनवीकरणीय संसाधने वेगाने संपवून भविष्यकालीन वृद्धीची क्षमता घटवते. उत्पादन वृद्धीच्या प्रक्रियेत पर्यावरणाच्या अपचनीय क्षमतेपेक्षा जास्त प्रदूषण निर्माण करून वृद्धीचे साधन असलेल्या मानवी संसाधनांच्या उत्पादन क्षमतेत प्रभावी घट करते. याप्रकारे वृद्धी केंद्रित विकास प्रक्रिया स्वनाशकारी बनते. एवढेच नाही तर प्रदूषणजन्य कार्बन मात्रा, भूमी, वायू, जल प्रदूषणादि व त्यातून निर्मित आजार कमी करण्यासाठी वृद्धीची संसाधने वापरते. दुष्परिणाम कमी करण्यासाठी होणाऱ्या उत्पादन वृद्धीद्वारे ऋणात्मक वा नकारात्मक विकासात परिणाम होते.

**3) बाजारपेठीय समाजाची निर्मिती :** वृद्धी केंद्रित विकास प्रक्रियेची एका वेगळ्या प्रकारची निष्पत्ती आम्ही अनुभवतो आहोत. तिचा आशय आम्हाला उमगतो आहे का? हा खरा प्रश्न आहे. मायकेल सॅण्डलच्या प्रतिपादनानुसार आतापर्यंत अबाजारपेठीय आदर्श वा मानदण्डाच्या प्रभावाखाली असलेल्या क्षेत्रांमध्ये बाजाराचा आणि बाजारमूल्यांचा प्रभाव हा बाजाराच्या आधिपत्याखाली गेल्या काही वर्षांत झालेला सर्वात निर्णायक बदल आहे. पण्यवस्तूकरणाच्या प्रवृत्ती व परिणामांचा मागोवा डॉ. पणिक्करांनी घेतलेला होता. सगळ्या गोष्टींचे पण्यवस्तूकरण (commodification) आणि मूल्यांची अनुपस्थिती हे बाजारधिष्टित व्यवस्थेचे वैशिष्ट्य. विनिमय करावयाच्या वस्तूंची किंमत ठरवणे ही अनिवार्य व स्वाभाविक बाब. किंमत फक्त मोबदला असते. त्याला उचित अनुचित, न्याय्य-अन्याय्य सारखा कुठलाही नैतिक पैलू नसतो. गॅरी

बेकरची छळापासून संरक्षण मिळावे म्हणून आश्रय मागणाऱ्यांना अमेरिकेने नागरिकत्वाची विक्री करावी अशी योजना किंवा अन्य पर्यायी योजनेत बाजार नियमाप्रमाणे सर्वांना लाभ मिळतो, फक्त त्यात संकटात सापडलेल्यांना मदत ही भावना कुठेच नसते. अधिक मानवीय जीवनाकडील वाटचालीचा मागमूस किंवा सामाजिक निर्णयात सामाजिक मूल्य जोडली जाण्याचा दुरान्वयाने ही संबंध नसतो. हरिता वायू उत्सर्जन मर्यादा ओलांडल्याबद्दल दंड योजनेऐवजी विक्रेय करार योजनेचा अमेरिकेचा आग्रह याच प्रकारात मोडतो. या योजनेमुळे प्रदूषण करण्याच्या हक्कांची देशाला खरेदी विक्री करता येते. ही जबाबदारी देश स्वत:च्या देशातील कार्बन उत्सर्जन कमी करून पार पाडेल किंवा इतर देशांना त्याची उत्सर्जने कमी करण्यासाठी पैसे देऊन पार पाडेल. पर्यावरण संरक्षणासारख्या चिरंजीवी विकासाची अट असलेल्या बाबतीतही जबाबदारी दुसऱ्यावर ढकलता येईल का एवढेच बघितले जाईल. विषमता युक्त जगात असे ग्राहक प्रलोभन किंवा दडपशाहीने सहज मिळवता येतील. अशी योजना म्हणजे पर्यावरणीय नीतीतत्त्वांना अमान्यता, जागतिक सहकार्याच्या भावनेची अनुपस्थिती आणि उद्दिष्टविहीन समृद्धीचा पाठलाग असेच म्हणावे लागेल.

सेझरसारख्या विकास साधनाच्या वापरात भारत याच मार्गाने जात आहे. गरीब शेतकऱ्यांच्या जमिनी संपादन करताना त्यांचे पिढ्यान्‌पिढ्या पुरणारे जीविकेचे साधन हिरावून संपत्तीचे श्रीमंताकडे हस्तांतरण होते. मोबदल्याची अपर्याप्त, अकार्यक्षम व्यवस्थाही फक्त जमीन मालकापुरती मर्यादित असते. शेतीवर प्रत्यक्षाप्रत्यक्षपणे रोजगार मिळवणाऱ्यांची त्यात दखलही नसते. आर्थिक वृद्धीसाठी रोजगारात नगण्य वाटा असणाऱ्या मोठ्या उद्योगासाठी सेझला परकीय क्षेत्र संबोधून देशाच्या सार्वभौमत्वाच्या विक्रीला मान्यताच नाही तर सर्व सुविधा व प्रचंड अनुदानाद्वारे संपूर्ण व्यवस्था करून दिली जाते. विकासाच्या प्रक्रियेत सामाजिक, नैतिक, मानवी, राष्ट्रीय मूल्ये विरहीत व दारिद्र्य निर्मूलनादि विकासाच्या उद्दिष्ट्यांशी संबंध नसलेल्या समाजाकडील अशी वाटचालच आम्हांला अभिप्रेत आहे का ?

**6) विकासाच्या मूल्यांकनाची तत्त्वे :**

दुसऱ्या महायुद्धानंतर राज्याचे बहुमान्य कल्याणकारी स्वरूप आणि सामाजिक कल्याण हे आर्थिक प्रयत्नांचे प्रयोजन या पार्श्वभूमीवर कल्याणकारी अर्थशास्त्रातून समाजाच्या कल्याणाच्या अटी आणि मूल्यांकनाचे निकष प्राप्त होतात. विकासाच्या वाटचालीसाठी मार्गदर्शन प्राप्त होते. कल्याणकारी अर्थशास्त्रात बहुचर्चित प्रश्न म्हणजे सामाजिक युक्ततमतेचा प्रश्न. संसाधनांच्या युक्त आवंटनाचा प्रश्न.युक्त आवंटन फक्त परिपूर्ण स्पर्धेतच शक्य आहे. त्यामुळे प्रत्यक्षातील स्पर्धेच्या अनुपस्थितीमुळे होणाऱ्या सामाजिक हानीचेही विश्लेषण अध्याहृत आहे. संसाधनांच्या आवंटनाच्या योग्यायोग्यतेत कल्याणाच्या युक्ततमीकरणाकरिता उत्पन्न वितरणाचा आदर्शक प्रश्न विचाराधीन असावा असे केनिथ ॲरोचेही प्रतिपादन आहे. व्यावहारिक दृष्टीने कल्याणाच्या पर्यायाने उत्पन्नाच्या वितरणात बिघाड नसेल तर साधनांच्या आवंटनातील बदल कल्याणवर्धक

मानता येईल.

निरनिराळ्या स्थितीतून निवड करण्याची वेळ येते तेव्हा महत्तम सामाजिक कल्याणाच्या दृष्टिकोनातून कोणत्या प्रकारची सामाजिक व्यवस्था प्राधान्य योग्य असेल त्याचे विश्लेषण सामाजिक निवड सिद्धांतात आढळते. सामाजिक व्यवस्थेला मूल्यात्मक अधिष्ठान अनिवार्यपणे असते. अमर्त्य सेन यांच्या प्रतिपादनानुसार सामाजिक निवड सिद्धांताची विषय वस्तू न्यायाच्या प्रश्नाशी निगडीत आहे. न्यायाचा साधा अर्थ नि:पक्षपातीपणा आहे. त्यात आपल्या मागण्यांच्या आत्मपरिक्षणात्मक छाननीबरोबरच इतरांद्वारेही परीक्षण अभिप्रेत आहे. इतरांच्या नैतिक व वैधानिक हक्कांना मान्यता व त्या मान्यतेशी सुसंगत वर्तन म्हणजे न्याय्य वर्तन. कारण त्यातून महत्तम कल्याणात्मक व्यवस्था अस्तित्वात येते.

'अधिकतम लोकांचे अधिकतम कल्याण' या कल्याणकारी अर्थशास्त्रातील परंपरागत तत्त्वात उपभोगाची समान क्षमता व उत्पन्न वाढीबरोबर घटत्या दराने वाढणारी एकूण उपयोगिता या गृहीताच्या आधारावर समान उत्पन्न वितरणाच्या शिफारशीत न्यायाची संकल्पना आहेच. या संदर्भात रॉल्सचा न्याय सिद्धांत उल्लेखनीय मानला जातो. त्यात केवळ उपयोगितेऐवजी उत्पन्न, संपत्ती, संधी तसेच आत्मसन्मानाला अधिष्ठानभूत असलेल्या अन्य प्राथमिक वस्तूंची प्राप्यता व वितरण न्यायासाठी अधिष्ठानभूत मानली. त्यांचे 'सर्वात वाईट स्थिती असणाऱ्यांना महत्तम लाभाचे तत्त्व' न्यायाची सुस्पष्ट अभिव्यक्ती मानली जाते. अमर्त्य सेन यांनी अधिकारिता या आदर्शक संकल्पनेपासून न्याय सिद्धांताला आरंभ केला. त्याची परिणती शक्यता दृष्टिकोनात झाली. शक्तता (capabilities) दृष्टिकोन मानवी जीवना हे 'करणे आणि असणेचा' संच आहे (a set of doings and beings) याप्रकारे म्हणजे कार्यानुवर्तिता व कार्यानुवर्तनक्षमता या स्वरूपात पाहतो. व्यक्तीकडे क्रियाशील म्हणून पाहतो. त्यामुळे शक्ततांचा विकास व वापराची संधी आणि स्वातंत्र्य म्हणजे न्याय असे सेन मानतात. Idea of Justice या ग्रंथात वैश्विक अन्यायाचा प्रश्न हाताळताना संकुचित दृष्टिकोन बाजूला सारून आर्थिक व्यवहारात नैतिक व राजकीय तत्त्वज्ञान कार्यान्वित करण्याची निकड प्रा. सेन यांनी स्पष्ट केली आहे.

जनसामान्यांच्या दृष्टीने विकास सामाजिक न्यायासह होत असेल तर त्याला अर्थ आहे. लोकशाहीत लोकांना काय हवे आणि प्रत्यक्षात काय झाले यात कमीत कमी विसंगती अपेक्षित आहे. लोकांच्या दृष्टीने न्यायासह विकासाचा अर्थ वृद्धीचे लाभ गरीब व दुर्बल वर्गाला अनुकूल पद्धतीने विखुरले जाणे म्हणजे जास्त रोजगार व आवश्यक वस्तूंची सहज प्राप्यता. या गोष्टी समाजाची कृपा, दान, परोपकार या स्वरूपात किंवा विकास प्रक्रियेत निर्मित विसंगतीची दुरूस्ती या स्वरूपात नाही तर हक्क म्हणून प्राप्त व्हाव्यात. मानवी हक्क न्यायाचे साध्य वा उद्दिष्ट मानले जाते. व्यक्तीला न्यायावर आधारित काही अनुल्लंघनीय असे मानवी वा मूलभूत हक्क असतात. प्रत्येकाला जगण्याचा व जीविकेचा हक्क न्याय्य व्यवस्थेत असलाच पाहिजे. हक्काशी संबंधित गोष्टींची फक्त उद्घोषणा व मान्यता म्हणजे हक्क नाही तर प्रत्यक्षात त्यांचा उपभोग घेता

यावा म्हणून आवश्यक व्यवस्था असणे असा आहे. जगण्याचा हक्क मूलभूत गरजांच्या पूर्ततेशी, रोजगाराशी, दारिद्र्य निर्मूलनाशी निगडीत आहे. अशा व्यवस्थेसाठी हक्काच्या उपभोगाशी संबंधित कर्तव्ये असण्याची आवश्यकता असलेल्या अधिकारितांची व्यवस्था असावी लागते. त्यामुळे एका बाजूने भिन्न व्यक्ती व समूहात वस्तू, सेवा, संधी, लाभ तसेच अधिकार वा सत्ता आणि सन्मानाचे तर दुसऱ्या बाजूने दायित्व, बंधने, नियमने, अधिबंधने आणि कर्तव्याच्या वितरणाचा उचित आधार कोणता असावा हा न्यायाचा मुख्य प्रश्न आहे.

आर्थिक न्यायात उत्पादनाच्या प्रक्रियेत दुसऱ्याचे जीवन नियंत्रित करण्याच्या अधिकाराचा अभाव, प्रत्येकाला योग्यतेनुरूप मोबदला प्राप्त करण्याची संधी व संघर्षात्मक प्रसंगात निर्बल पक्षाला साहाय्य व संरक्षणाची व्यवस्था अपेक्षित आहे. प्रत्यक्ष सामाजिक जीवनात न्यायाची स्थापना कशी करावी याबाबत प्रक्रियात्मक न्याय आणि तात्त्विक न्याय या दोन कल्पना महत्त्वाच्या मानल्या जातात. उदारमतवादाशी निगडीत प्रक्रियात्मक न्यायाची धारणा वस्तूसेवादींच्या आवंटनाची प्रक्रिया (procedure) न्याय्य, नियमाधारित असावी मग कोणाला काय मिळते याचा विचार करण्याची गरज नाही असे मानते. बाजार व्यवस्था स्वातंत्र्य व न्यायावर अधिष्ठित असते.उत्पादन घटकांच्या सर्वोत्तम उपयोगाची स्थिती निर्माण करते असे मानते. त्यामुळे राज्याचे काम स्वातंत्र्य व समानतेच्या आधारावर नियम निर्धारित करण्यापुरते मर्यादित मानते. आजच्या जागतिकीकरणातील बाजार व्यवस्थेचे समर्थन या प्रकारच्या युक्तिवादाचा आश्रय घेते. वस्तू, सेवा,'लाभादींचे व्यक्ती व समाजातील आवंटन केवळ नियमाधारित नाही तर न्याय्य मानले जाईल अशा मापदंडांचा विचार तात्त्विक न्यायात अभिप्रेत आहे. लाभाचे वितरण न्याय्य असावे याकरिता वस्तू, सेवादीच्या आवंटनाच्या प्रक्रियेत योग्य ते समायोजन त्यात अभिप्रेत आहे. डेव्हीड मिलरच्या प्रतिपादानुसार सर्व सक्षम व्यक्तीना श्रमाची अनिवार्यता, सगळ्यांच्या न्यूनतम गरजांच्या पूर्ततेची शाश्वती आणि अतिरिक्त श्रमासाठी अतिरिक्त मोबदल्याची व्यवस्था ही तीन तात्त्विक न्यायाची लक्षणे आहेत.

विकास ही निवडीच्या विस्ताराची प्रक्रिया मानली जाते. या प्रक्रियेतून न्यायाधिष्ठित समाज व्यवस्थेत मानवी जीवनाची गुणवत्ता वा दर्जा वाढून अधिक मानवीय जीवनाकडील वाटचाल अपेक्षित आहे. त्यामुळे विकासाच्या प्रक्रियेची निष्पत्ती विकासाच्या विश्लेषणाचा केंद्रवर्ती भाग आहे. विकास अर्थशास्त्रात जीवनाच्या गुणवत्तेच्या मूल्यांकनासंबंधात उपलब्ध विपुल लिखाण आर्थिक विकासात उपेक्षित दुर्बल घटकांकडे लक्ष वेधणारे असते तेव्हा ते न्यायाची कल्पना व उद्दिष्ट संदर्भित करते. त्यामुळे आर्थिक निर्णयांना न्यायाच्या मूल्याची जोड दिली गेली का? ते विकासाच्या मूल्यांकनात बघावे लागेल. उत्पन्नाच्या वितरणात बिघाड न होऊ देता संसाधनांचे आवंटनात बदल झाला का ? मानवी हक्काच्या कल्पनेनुसार मनुष्याला जीविकेचा हक्क मिळून त्याच्या मूलभूत गरजांची पूर्तता होते आहे का ? रॉल्सच्या सर्वात वाईट स्थिती

असणाऱ्यांच्या महत्तम कल्याणाच्या निकषावर सामाजिक उपलब्धी उतरतात का ? ते पडताळावे लागेल. सेनच्या प्रतिपादनानुसार मनुष्याच्या शक्तता वा क्षमतांच्या विकासासाठी सुविधांची प्राप्यता व मुख्यत: शक्ततांच्या वापरातील वाढीच्या स्वरूपात मूल्यांकन करावे लागेल. सामान्य माणसाच्या भाषेत नियमित, सुरक्षित रोजगाराची सहज प्राप्यता व जीविकेची सुरक्षितता लाभली का याचे सत्यापन व्हावे लागेल. संक्षेपाने, विकासाच्या प्रक्रियेत सर्वांचा सहभाग व अपवर्जितांच्या समोवशनाचे यशस्वी प्रयत्न विकासाची प्रक्रिया न्याय्य, योग्य प्रकारे चालल्याचे गमक असेल.

**7) भारतीय अर्थव्यवस्थेची वाटचाल :**

स्वातंत्र्योत्तर संपूर्ण कालखंडात भारतात विकासाचे नियोजनबद्ध प्रयत्न झाले. भांडवलशाही विकास प्रक्रिया, आर्थिक वृद्धीवर भर, उत्पादन व वितरणातील विलगतेचे धोरण, वृद्धीसाठी बाजाराला आवश्यक तो वाव व वापर, विकासात सरकारचा सक्रिय अभिक्रम आणि आंतरराष्ट्रीय पातळीवरील विचार व मार्गदर्शनाचे निर्णायकत्त्व ही त्यातील सामान्य वैशिष्ट्ये. व्यूहनीतीत मोठे बदल या अर्थाने धोरणात्मक धक्क्यांच्या संज्ञेत विचार केला तर 1980 पर्यंतचा व त्यानंतरचा काळ असे दोन स्थूल टप्पे मानता येतात. भारतीय अर्थव्यवस्थेची धोरणात्मक वाटचाल व विकासाच्या उद्दिष्टांच्या अनुषंगाने परिणामांचा आढावा घेऊ. विकासविषयक विचारांचे प्रतिबिंब त्यात सुव्यक्तपणे जाणवते.

भारताच्या आर्थिक नियोजनातील पहिली दोन दशके पाझर प्रभावावर विश्वासून उत्पन्नात उर्ध्वगामी; तर दारिद्र्यात अधोगामी कल गृहीत धरून आर्थिक वाढीच्या आणि दारिद्र्य निर्मूलनाच्या सामर्थ्य वाढीच्या प्रयत्नांचे होते. दुसऱ्या योजनेत सार्वजनिक क्षेत्रातील गुंतवणूकीद्वारे औद्योगिकरणासाठी पायाभूत सुविधांची निर्मिती व सवलतीच्या दरात पुरवठा करून खाजगी उपक्रमशीलतेला प्रोत्साहन दिले. त्यातून मोठ्या उद्योगांचे सामर्थ्य वाढले. परवाना पद्धती, लघु उद्योगांना संरक्षण, भांडवली लाभावर मर्यादा इ.द्वारे त्यांच्या नियमनाचेही प्रयत्न झाले. कृषी क्षेत्रात भूमी सुधारणा, धारणक्षेत्रावर मर्यादा, जमीनदारी निर्मूलनाद्वारे लहानांना संरक्षण दिले. मात्र धान्य उत्पादनात वाढ झाली तर दारिद्रयात घट होईल या अपेक्षेने तिसऱ्या योजनेत हरित क्रांतीच्या माध्यमातून चयनात्मक व सधन वृद्धीनीतीद्वारे वेगवान उत्पादन वाढ झाली. त्याकरिता समृद्ध अभिकरणे, व्यक्ती व क्षेत्रांना सुविधांचे संपुट पुरवण्याच्या धोरणामुळे त्याचे लाभ विशिष्ट क्षेत्र, प्रदेश, पीक इ.मध्ये बंदिस्त राहून दारिद्र्य निर्मूलनाचे सामर्थ्य वाढवताना अपेक्षेप्रमाणे विषमता वाढली. विषमता कमी करण्याचे उद्दिष्ट अनेक योजनांमध्ये असले तरी त्याचा प्रथम उल्लेख तिसऱ्या योजनेत झाला.

स्वातंत्र्योत्तर तिसरे दशक वृद्धीसह पुनर्वितरणाचे होते. या दृष्टिकोनाशी सुसंगत पद्धतीने सर्वांत वरच्या उत्पन्न गटातील 30 प्रतिशत लोकांचे उत्पन्न वाढवणे, त्यांचा उपभोग प्रतिबंधित करून पुनर्वितरणाद्वारे प्राप्त साधनांद्वारे निम्न उत्पन्न गटातील 30 प्रतिशत लोकांचा उपभोग

वाढविण्याची समष्टी व्यूहनीती प्रथम स्वीकारली. तिच्या मर्यादा लक्षात घेऊन विषमता घटवण्यासाठी राजकोषीय उपायांपेक्षा गरिबांचे उत्पन्न वाढवणे अधिक योग्य असल्याचे ठरले. पाचव्या योजनेनुसार त्यासाठी वेगवान वृद्धी आवश्यक होती म्हणूनच उच्च वृध्दी दराचे लक्ष्य निश्चित केले. मूलभूत गरजा भागवण्यासाठी प्रत्येक वंचितापर्यंत पोहचण्याकरिता कुटुंब हा घटक मानून व्यष्टी व्यूहनीती अंतर्गत लक्ष्य गट दृष्टिकोन स्वीकारण्यात आला. संसाधने प्राप्त करण्याबाबत शासनाच्या आणि लाभ लोकांपर्यंत पोहोचवण्याबाबत प्रशासकीय कार्यक्षमतेच्या मर्यादा त्यात स्पष्ट झाल्या.

आर्थिक वृद्धीद्वारे दारिद्र्य आपोआप दूर होण्याची अपेक्षा असल्यामुळे दारिद्र्य निर्मूलन विकासाचे मूळ उद्दिष्ट असल्याचे मान्य करूनही दारिद्र्याची समस्या व तिच्या निराकरणाच्या प्रारंभिक रूपरेषेचा उल्लेख प्रथमत: पाचव्या योजनेत आढळतो. सहाव्या योजनेनुसार त्यासाठी जोरकस प्रयत्नांची गरज होती. उत्पादन रचनेत बदल, मागास क्षेत्रांचा विकास, पुनर्वितरणाच्या उपायांची कार्यवाही झाली. मात्र मुख्य भर आर्थिक वृद्धीवरच होता. दारिद्र्य निर्मूलनाच्या सामाजिक उद्दिष्टांबाबत योजना आयोगाने सर्वसामान्य युक्तिवादाचाच वापर केला हा तेंडुलकरांचा अभिप्राय या दृष्टीने बोलका आहे. उद्दिष्टांचे सुस्पष्ट निर्देशनाचा अभाव भारतीय नियोजनातील त्रुटी असल्याचा अनेक अभ्यासकांचा अभिप्राय आहे. केवळ उत्पादन वाढीचा वेग वाढवल्याने ती लोकांपर्यंत पोहोचत नाही या नीलकंठ रथ व दांडेकरांच्या प्रतिपादनाची फारशी दखल घेतली गेली नाही.

नियोजनबद्ध प्रयत्नांचे चौथे दशक आर्थिक धोरणातील मूलगामी बदलाचे होते. आधीचा कालखंड भांडवल संचयासाठी आधिक्य निर्मितीची गरज भागवण्यासाठी वरच्या उत्पन्न वर्गात उत्पन्न वाढवण्यासाठी प्रोत्साहनाचा होता. त्याबरोबरच त्यांच्या मागणीवरील प्रतिबंधांचा आणि पुनर्वितरणासाठी त्यांच्याकडून संसाधने मिळवण्याच्या प्रयत्नांचाही होता. त्यातून प्रभावी मागणीच्या कमतरतेचा प्रश्न निर्माण झाला. दुसऱ्या बाजूने औद्योगिकरणासाठी पायाभूत उद्योगांच्या व सुविधांच्या विकासाने अर्थव्यवस्थेच्या उत्पादन क्षमतेत वाढ झालेली होती. तथापि परवाना पद्धत, एकाधिकार नियंत्रण, नफ्यावर मर्यादा, किंमतीवर नियंत्रण इ.मुळे पुरवठ्याच्या बाजूने प्रेरणेचा प्रश्न निर्माण झाला. परिणामत: आर्थिक वृद्धीत अवरोध व माघारीची स्थिती निर्माण होऊन अर्थव्यवस्थेला क्रियाशील करण्याची निकड निर्माण झाली.

या पार्श्वभूमीवर उदारीकरणाचे युग आले. आर्थिक धोरण निर्नियंत्रणाकडे झुकले. औद्योगिक नियंत्रणात घट, कॉर्पोरेट कर व उत्पन्न करात सूट, गुंतवणूकीसाठी अनेक सवलती देऊन उत्पादकांना प्रोत्साहन दिले. आधीच्या धोरणाने श्रीमंताचे उत्पन्न वाढले होते. त्यांना उपभोग वृद्धीसाठी प्रोत्साहन देण्यात आले. टिकाऊ सुखद वस्तूंच्या मागणीत प्रचंड वाढ झाली. मागणी संरचनेशी सुसंगत पद्धतीने उत्पादन संरचना बदलली. या प्रकारच्या मागणीकर्षित वृद्धीमुळे रोजगार वृद्धीचा फायदा गरिबांना मिळेल असे मानले गेले. मात्र त्याचे यश अल्पजीवी ठरले. दशकाच्या प्रारंभी 8 प्रति शतहून

जास्त वाढलेला वृध्दीदर दशकाच्या शेवटी 2 प्रति शतपेक्षा कमी झाला.

नियोजनाचे पाचवे व सहावे दशक जागतिकीकरणाचे होते. जागतिकीकरणाला विकासाची व्यूहनीती मानणारे होते. विकासाच्या प्रारंभीच्या काळात उत्पादन वृद्धी व रोजगार वृद्धीतील विरोध लक्षात आला. न्याय आणि उत्पादन वृद्धीतील अंगभूत संघर्षही अभ्यासकांनी मान्य केला. विकासाच्या वरच्या पातळीवर आठव्या योजनेनंतर उत्पादन व रोजगार वृद्धी किंवा वृद्धी आणि न्याय यांच्या सहअस्तित्वांची अपेक्षा करण्यात आली. ती पूर्ण मात्र होऊ शकली नाही.

आर्थिक विकासातून मानवी विकासाचे उद्दिष्ट जागतिक पातळीवर मान्य होऊन संयुक्त राष्ट्र संघाच्या विकास कार्यक्रमाच्या मार्गदर्शनानुसार विकासाची वाटचाल सुरू झाली. मानवी क्षमतांच्या विकासासाठी शिक्षण, आरोग्य व विशेषत: उत्पन्न वाढीचे प्रयत्न सुरू राहिले. मानव विकासाबाबत वृद्धीच्या मर्यादा लक्षात येऊनही वृद्धीशिवाय मानव विकास होणे नाही अशीच भूमिका राहिली. बाजाराधिष्ठित मुक्त अर्थव्यवस्था, खाजगीकरण, निर्नियंत्रण, आंतरराष्ट्रीय स्पर्धा इ. वैशिष्ट्यांमुळे वृद्धीला चालना मिळाली. परंतु प्राप्यतेबाबत प्रतिकूलता आणि क्षमतांच्या उपयोजनांबाबत दुर्लक्ष यामुळे दारिद्र्यदी समस्यांच्या सोडवणूकीबाबत माघारीची स्थिती निर्माण झाली.

दारिद्र्य निर्मूलनाच्या दृष्टीने कृषी क्षेत्राचे स्थान महत्त्वाचे मानले जाते. सामाजिक सुरक्षिततेच्या दृष्टीने अन्न व रोजगार सुरक्षितता महत्त्वाची असते. जागतिकीकरणानंतरच्या काळात तर अन्नधान्य उत्पादन वाढीचा दर लोकसंख्या परिणाम निरस्त करण्याएवढाही नव्हता. रोजगार सुरक्षितता व अन्नधान्याच्या किंमतीचे स्थैर्य दोन्ही आघाडीवर अपयश आले. कृषीतील अरिष्ट अधिकाधिक गंभीर होऊन शेतकऱ्यांच्या आत्महत्या जणू अर्थव्यवस्थेचे स्थायी वैशिष्ट्य बनले आहे. जागतिकीकरण दारिद्र्य निर्मूलनासाठी सहाय्यक असल्याचा सरकारचा दावा होता. परंतु लकडवाला समितीच्या शिफारशीनुसार एस.पी. गुप्तांनी केलेल्या मापनानुसार दारिद्र्य रेषेखालील लोकांचे प्रमाण 1990 मध्ये 35.5 प्रतिशत होते. ते 1993-94 मध्ये 39 प्रतिशतवर गेले. दारिद्री लोकांची संख्या 1990-91 ते 93-94 एवढ्या अल्पावधीत 297.9 दशलक्ष वरून 346 दशलक्षपर्यंत वाढली. तेंडुलकर समितीच्या मापनानुसार अजूनही भारतातील 37 प्रतिशत तर आंतरराष्ट्रीय प्रमाणकानुसार 40 प्रतिशत भारतीय लोकसंख्या दारिद्र्य रेषेखाली आहे. 60 प्रतिशत जनता निर्भर असलेल्या कृषीसाठी नियोजनातील गुंतवणूकीचे आवंटनही 5 प्रतिशतपेक्षा कमी आहे.

1970 पर्यंत स्थूल राष्ट्रीय उत्पादनात 4 प्रतिशत वाढ, तर रोजगारात 2 प्रतिशत वाढ होत असे. आता स्थूल राष्ट्रीय उत्पादनातील 6 ते 8 प्रतिशत वाढीला 1 प्रतिशत रोजगार वाढ या प्रकारे घटलेले आहे. कृषी क्षेत्रात श्रम सधन पिकाकडून शेतकरी कमी श्रमसधन पिकाकडे वळला आहे. तांत्रिक बदलामुळे कृषीतील श्रम समावेशन दरात घट झाली. रोजगार सधन वृद्धीला प्राधान्य दिल्याचा सरकारचा दावा असिद्ध झाला. उद्दिष्टांच्या तुलनेत

अनुशेष निर्माण होऊन ते क्रमशः वाढतच गेलेला दिसतो. औद्योगिक क्षेत्रातील उत्पादकता वाढीचे नफा आणि उत्पादन वाढले. समष्टी पातळीवर रोजगार वाढीचा दर मात्र वाढू शकला नाही.

अलीकडच्या काळात विषमतेत उल्लेखनीय वाढ झाली. श्रीमंतांचे उत्पन्न इतरांपेक्षा वेगाने वाढणे आणि उत्पन्न वाढीपेक्षा चैनीच्या वस्तूंची मागणी वेगाने वाढणे यातून विषमतेतील वाढ व्यक्त होते. पिण्याचे शुद्ध पाणी, वीज, सांडपाण्याची व्यवस्था यांचा विशेषतः ग्रामीण क्षेत्रात तुटवडा तर शहरात मात्र मॉल, मेट्रो, फ्लॉय ओव्हर, तारांकित हॉटेल्स वेगाने वाढून गरिबांविरुद्ध अभिनती असलेली उत्पादन रचना दृढमूल होत आहे. आर्थिक वृद्धीचा सर्वाधिक फायदा कॉर्पोरेट क्षेत्राला झाला. चालू दशकात स्थूल राष्ट्रीय उत्पादनातील 1 प्रतिशत वाढीला कॉर्पोरेट नफा 2.5 प्रतिशतने वाढला. औद्योगिक क्षेत्राला दिलेल्या सूट व सवलती त्याला कारणीभूत आहे. 6 वर्षाखालील 50 प्रतिशत मुले न्यूनपोषित; तर 80 प्रतिशत ॲनिमियाग्रस्त आहेत. दुसऱ्या टोकाला अब्जपतींच्या (बिलेनियर्सच्या) संख्येबाबत भारताने जपान, चीन, फ्रान्ससारख्या देशांना मागे टाकले. जर्मनीचे उत्पन्न भारताच्या चौपट ,परंतु बिलेनियर्सची संख्या मात्र समान आहे. 2004 ते 07 या तीनच वर्षात त्यांची संख्या भारतात 9 वरून 40 पर्यंत वाढली आहे.

अलीकडे समावेशी वृद्धीची कल्पना, त्यासाठी प्रयत्न व आशादायक निष्पत्तीचा दावा केला जातो. 11 व्या योजनेची व्यूहनीती त्यावर आधारलेली आहे. या संदर्भात अनेक अभ्यासकांनी काढलेल्या निष्कर्षाचा उल्लेख औचित्यपूर्ण ठरतो. विकासातून वगळल्या गेलेल्यांचा वृद्धी प्रक्रियेच्या मुख्य प्रवाहात समावेश म्हणजे समावेशी वृद्धी समावेशनाचा विचार उत्पादन, उत्पन्न व उपभोग वितरणाच्या संदर्भात करता येतो. व्यावहारिक दृष्टीने भौतिक व मानवी संपत्तीच्या अभिदानापासून वंचित, परिणामतः उत्पन्न वितरणाच्या तळच्या पातळीत असल्यामुळे वृद्धीच्या लाभापासून वंचितांना किती लाभ देता आला यावरून समावेशनाचे यश लक्षात येते.

उपभोग व्ययाच्या आधारावर कल्याणात्मक सुधारणेच्या स्वरूपात समावेशनाच्या मापनाचे एम.एच. सूर्यनारायण यांचे निष्कर्ष उल्लेखनीय आहेत. उपभोग व्ययाच्या वितरणाच्या आधारावर आणि अर्थव्यवस्थेच्या सरासरी कामगिरीच्या तुलनेत समावेशनाचे यश मापनाच्या त्यांच्या निष्कर्षानुसार 1993-94 ते 2004-05 या दशकात भारताचे प्रति व्यक्ती उत्पन्न 58.31 प्रतिशतने वाढले. प्रति व्यक्ती उपभोग खर्चातील सरासरी माध्य वाढ 14.91 प्रतिशत झाली. अधिक सुस्पष्ट निष्कर्षासाठी मध्यका उपभोग व्यय जास्त उपयुक्त . तो माध्य उपभोगाच्या निम्म्यापेक्षाही कमी म्हणजे 7.26 प्रतिशतने वाढला. उपभोग प्रवृत्ती उत्पन्न वाढीचे घटते फलन असते. तळातील लोकांचे उत्पन्न वाढले असते तर माध्य व मध्यका उपभोग जास्त वाढला असता. उपभोग व्ययातील मर्यादित वाढ व्यापक पायावर आधारलेली नव्हती. याचा अर्थ वृद्धीच्या लाभाच्या कल्याणात्मक वितरणात फारशी प्रगती होऊ शकली नाही.

समावेशी धोरण व कार्यक्रमाच्या कार्यवाहीसाठी आर्थिक वृद्धी होणे आणि त्यातून

शासनाला जास्त संसाधने प्राप्त होणे अपेक्षित आहे. सामाजिक जीवनात न्यायाचा मुख्य प्रश्न एका बाजूने लाभाचे; तर दुसऱ्या बाजूने दायित्व, अधिबंधनादिचे वितरण कसे करावे हा असतो. सक्षमांवर दायित्व ही न्याय्य बाब ठरते. संपन्न वर्गावर असे दायित्व किती टाकता आले व अपावर्जितांपर्यंत लाभ किती प्रमाणात पोहोचवता आला यावर समावेशनाचे धोरण व कार्यक्रमाचे यश अवलंबून आहे. निर्मलकुमार चंद्र यांनी नवउदारमतवादी समष्टी आर्थिक धोरणाच्या पार्श्वभूमीवर शासनाद्वारे उपयोजित धोरण, कार्यक्रम व कामगिरीचे सामाजिक कल्याण मापनाच्या आधारावर केलेले मूल्यमापन उल्लेखनीय आहे. समावेशनासाठी सक्षमांवर दायित्वाच्या दृष्टीने निष्कर्ष पाहू. निर्मलकुमार चंद्रांच्या मते शासनाच्या अधिकृत नोंदीत कर स्थूल राष्ट्रीय उत्पाद अनुपातात सुधारणा झाल्याचे श्रेय घेतले जाते. परंतु भारताचा कर स्थूल राष्ट्रीय उत्पाद अनुपात हा मूळातच बराच कमी आहे ही बाब लक्षात ठेवली पाहिजे. शिवाय या अनुपाताचे अनेकविध पैलू तसेच सुधारणापूर्व व सुधारणोत्तर काळातील तुलनात्मक विश्लेषणातून समावेशन कार्यक्रमासाठी दायित्व वाढण्याऐवजी धनवंतानुकूल अभिनतीच स्पष्ट होते.

बहुतेक अप्रत्यक्ष कर कृषीतर वस्तूंवर असतात. कृषीतर कर स्थूल राष्ट्रीय उत्पाद अनुपात त्यामुळेच महत्त्वाचा असतो. महत्त्वाच्या केंद्रीय करामध्ये अप्रत्यक्ष कराचे प्रमाण 1980 च्या दशकांतील कृषीतर स्थूल राष्ट्रीय उत्पादाच्या 10 प्रतिशत वरून 2001-07 मध्ये 5.7 प्रतिशतपर्यंत घटले. टिकाऊ सुखद वस्तूंच्या उत्पादनाला प्रोत्साहन देण्यासाठी उत्पादन शुल्क व अन्य करातील मोठी सूट त्याला कारणीभूत आहे. समावेशनासाठी संसाधन प्राप्तीचे संभाव्य स्त्रोत न वापरण्याचे धोरण त्यातून स्पष्ट होते. दुसऱ्या बाजूने मूलभूत गरजा भागविणाऱ्या अन्नधान्य व अन्य वस्तूंवरील करभार मात्र तसाच राहिला. प्रत्यक्ष कर प्रगतिशील स्वरूपाचे. त्यामुळे प्राप्य उत्पन्नाचा न्याय स्त्रोत. प्रत्यक्ष कर ही यशोगाथा असल्याचे सरकारचे प्रतिपादन आहे. करदात्यांच्या संख्येत 1991 ते 2007 या काळात 3.5 दशलक्ष ते 31.9 दशलक्ष एवढी वाढ झाली. ते यशाचे निश्चितच सुस्पष्ट प्रमाण आहे. मात्र कराचे दर घटवले गेले. परिणामत: 1991 मध्ये देयकर एकूण उत्पन्नाच्या 18.2 प्रतिशत होता. तो दशकाच्या शेवटी घटून 8.3 प्रतिशत एवढा झाला. निगमांवरील कराचा त्यांच्या कार्यात्मक नफ्याशी असलेला अनुपात 1881-84 मधील 14 प्रतिशतवरून 9.8 प्रतिशत झाला. 2006 मध्ये त्यात सुधारणा होऊन तो 13.3 प्रतिशतपर्यंत पोहोचला. त्यानंतरच्या काळातील या अनुपात आकडेवारीची अनुपलब्धता असल्यामुळे तो पुन्हा घटला असल्याची अभ्यसकांना शंका येते.

समावेशनाच्या बाजूने असलेली स्थिती लक्षात घेता बँक प्रत्ययाच्या दृष्टीने अपात्र मानल्या जाणाऱ्या छोट्या उत्पादकांना प्रत्यय पुरवठा व्हावा हा बँक राष्ट्रीयीकरणा मागचा एक प्रमुख उद्देश होता. एकूण कृषी प्रत्ययाच्या पुरवठ्यात बँकांचा वाटा 1971 मध्ये 2.4 प्रतिशत होता. तो 1991 मध्ये 35.2 प्रतिशत पर्यंत वाढला. त्यानंतर मात्र घटून 2002 मध्ये 26.8 प्रतिशत झाला. दुसऱ्या बाजूने

याच काळात सावकारांचा वाटा मात्र 36.1 वरून 17.5 पर्यंत घटला आणि पुन्हा 26.3 एवढा वाढला. बँक प्रत्ययात लघु उद्योगांचा वाटा 1980 पासून 1983 पर्यंत वाढत होता; पण त्यानंतर घटत गेला. 2004 मध्ये 9 प्रतिशत असणारा वाटा मात्र 2008 मध्ये 7.1 प्रतिशत पर्यंत घटला.

रोजगाराच्या योजनांद्वारे वृद्धी समावेशनाचा प्रयत्न अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना या प्रकारचा एक महत्त्वाकांक्षी प्रयत्न, 2008-09 मध्ये सुरू झाला. त्यातून 1000 दशलक्ष श्रम दिवस रोजगार निर्मिती होऊन 24.2 दशलक्ष कुटुंब लाभान्वित झाले. तथापि, प्रति कुटुंब रोजगार प्राप्तीच्या स्वरूपातील उपलब्धी वर्षाला फक्त 37.8 दिवस एवढीच होती.

समावेशनाचा या वास्तवावर वेगळ्या अभिप्रायाची गरजच नाही. समावेशनाचा विचार विकास प्रक्रियेत समावेशन आणि विकासाच्या फलनिष्पत्तीत समावेशन असा दोन प्रकारे होतो. प्रक्रियेत समावेशन म्हणजे उत्पादन वाढीच्या वा विकासात्मक प्रयत्नांच्या मुख्य प्रवाहात लोकांचा अंतर्भाव होणे. फलनिष्पत्तीत समावेशन म्हणजे विकास प्रक्रियेतून अपवर्जितांचे उत्पन्न वाढण्याचा प्रयत्न करणे, त्यासाठी सुविधा पुरवणे. विकासाच्या फळात समावेशनाचा समावेश विकासाच्या विचारातील मुख्य प्रवाह असल्याचे जाणवते. समावेशी वृद्धीची कल्पना वृद्धी प्रक्रियेत समावेशनाची असली तरी त्यासाठी आवश्यक मूलगामी बदलाचा प्रयत्न आढळत नाही. समावेशी विकासाच्या विचाराचे रुपांतरही शेवटी विकासाच्या फलात समावेशन असे होण्याचीच शक्यता आहे.

विकासाच्या मूल्यांकनाच्या निकषानुसार न्यायाधिष्ठित सामाजिक व्यवस्थेची निवड आणि निर्मिती अपेक्षित आहे. व्यवस्थात्मक आणि धोरणात्मक घटकांचा प्रभाव निर्णायक स्वरूपाचा असल्याने भारताच्या आर्थिक विकासाच्या वाटचालीचा त्या दृष्टिकोनातून आढावा घेता येईल.

विकासाच्या प्रक्रियेत प्रथम औद्योगिकरणासाठी सर्व सुविधा व त्यानंतर हरितक्रांतीत आदानांचे संपुट साधन संपन्नांना पुरवले. मागणीत वृद्धी वा मुक्त उपभोग व्यूहनीतीत उत्पादक व श्रीमंत उपभोक्त्यांना सवलती देऊन आणि जागतिकीकरणानंतर आंतरराष्ट्रीय स्पर्धा क्षमतेसाठी उद्योगांना सर्वतोपरी साहाय्य केले. या प्रक्रियेत उत्पन्न व संसाधनांचे आवंटन साधन संपन्नांच्या बाजूने झाले. पूर्ण स्पर्धात्मक आवंटन आणि वितरणात बिघाड न होता आवंटन या कल्याणानुकूल युक्त आवंटनाच्या कसोटीवर ते उतरत नाही.

ग्रामीण भागात प्राथमिक सुविधांचा तुटवडा, शहरात मात्र मॉल, मेट्रो, फ्लॉय ओव्हर, तारांकित हॉटेलसाठी संसाधनांची विपुलता, बेकारी दरिद्र्यादी समस्यांचे दृढीकरण, जागतिकीकरणानंतर त्यांच्या तीव्रतेत वाढ म्हणजे जनसामान्यांच्या दृष्टीनेही न्यायासह वृद्धी नाही. 'या बाबी सर्वात वाईट स्थिती असणाऱ्यांचा लाभाच्या' तत्त्वाची विकासाच्या प्रक्रियेतील अनुपस्थिती दर्शक आहे. जनसामान्यांच्या मूलभूत गरजा पूर्ण करण्यासाठी, पुनर्वितरण, लक्ष्य गट दृष्टिकोन, दारिद्र्य निवारण व रोजगार निर्मितीच्या योजनातून अनुदानित सुविधा पुरवल्या. त्यात काही प्रमाणात यशही आले. मात्र

जीविकेसाठी कायम शासन निर्भरतेमुळे हक्काच्या स्वरूपात जीविकेची शाश्वता हे स्वरूप मिळू शकले नाही. गरिबांसाठी अधिकारितांची निर्मिती झाली नाही.

मानव विकासासाठी आरोग्य शिक्षणादी संधी सुविधांच्या विस्ताराचे प्रयत्न प्रारंभीच्या काळात सार्वजनिक क्षेत्राच्या माध्यमातून झाले. या प्रयत्नांची दिशा योग्य होती. जागतिकीकरणानंतर खाजगीकरणाला महत्त्व दिल्यानंतरही या सुविधांचा भरपूर विस्तार झाला. मात्र जनसामान्यांना त्या दुष्प्राप्य झाल्याचे नाकारता येणार नाही.

समावेशी विकासात न्यायाची कल्पना निश्चितच आहे. न्यायाच्या विचारात दायित्व, अधिबंधने, नियमने कर्तव्यादिचा भार टाकण्याच्या उचित आधाराचा प्रश्नही आहे. सक्षमांवर अधिक भार हे त्यातील मान्य गृहीत तत्त्व आहे. समावेशी विकासाच्या मूल्यांकनातून शासनाने सक्षमांवरील भार कमी केल्याचेच आढळते. अलीकडच्या काळात शासनाच्या कल्याणात्मक खर्चाच्या प्रमाणातही वाढ होऊ शकली नाही.

प्रत्यक्ष व्यवस्थेत न्याय प्रस्थापित करण्याच्या प्रक्रियात्मक व तात्त्विक न्यायाच्या संदर्भात परीक्षण केले तर विकासाच्या प्रारंभीच्या काळात सहकार्यात्मक भांडवलशाहीत शासन हस्तक्षेपाने वरच्या वर्गाचे सामर्थ्य वाढले मात्र गरिबांच्या बाजूने संरक्षणाच्या उपायांद्वारे तात्त्विक न्यायाकडेही लक्ष पुरवण्याचा प्रयत्न झाला. जागतिकीकरणानंतर बाजार व खाजगी उत्पादकांवर सर्व सोपवण्याच्या भूमिकेमुळे अर्थव्यवस्था प्रक्रियात्मक न्यायाकडे झुकली आहे. प्रक्रियात्मक न्यायातील बाजार व्यवस्था स्वातंत्र्य व न्यायावर आधारलेली असल्याचे गृहीत वास्तवापासून सुदूर असल्यामुळे आणि मोठ्या उत्पादकांना लाभप्रद ठरेल या प्रकारे सरकार हस्तक्षेप करीत असल्यामुळे प्रक्रियात्मक न्यायापासूनही अपसरण होत आहे.

विकासाच्या वाटचालीची संपूर्ण निष्पत्ती निराशाजनक असल्याचे कोणीच म्हणू शकणार नाही. परंतु आपण पूर्वनिश्चित उद्दिष्टांच्या किती जवळ पोहोचलो या दृष्टीने परीक्षण केले जाते. सामाजिक व्यवस्थेच्या नीतिशास्त्राप्रमाणे सुद्धा उद्दिष्टे व्यक्तीनिगडीत आणि समानतावादी असली पाहिजेत. त्यामुळे विकासाच्या प्रयत्नांत वृद्धीच्या दारिद्र्यऱ्हासक वैशिष्ट्याचे संकुचन झाले का ? तसे न होण्यासाठी विकासाच्या मार्गक्रमणाचा धोरणात्मक संच व या धोरणाच्या संचासाठी काटेकोर तपशीलासह मीमांसा व समर्थनाचा प्रयत्न झाला का ? प्रत्येक वेळी, प्रत्येक पायरीवर आम्ही जे काय करतो ते नेमके कशासाठी करतो आहोत त्याचे परिणाम अपेक्षेप्रमाणे राहतील की नाही याची चिकित्सक तपासणी केली का ? वृद्धीतर उद्दिष्टांच्या सुस्पष्ट निर्देशनाचा अभाव आपल्या नियोजनातील महत्त्वाची त्रुटी असल्याचा अभ्यासकाचा निष्कर्ष आपल्याला अमान्य करता येईल का? हा खरा प्रश्न आहे. आपल्या प्रयत्नांची परिणती उच्च वृध्दीदरात होते का हा निर्णायक मुद्दा नसून वृद्धी लोकांकरिता, जनसामान्यांकरिता काय करते हाच न्याय व्यवस्थेत उपलब्धीच्या परीक्षणाचा निकष असतो.

**8. अनुभवसिद्ध समावेशी विकास पथ :**

दारिद्र्यादी स्वरूपातील जीविकेची असुरक्षितता दूर करणे किंवा किमान मूलभूत गरजा

पूर्ण करण्याकरिता विषमता, बेरोजगारी दूर करण्याच्या स्वरूपात विकासाच्या उद्दिष्टांचा विचार झाला. मानव विकास, अधिक मानवीय जीवनाकडील वाटचाल त्यातून अपेक्षिली गेली. विकासाच्या संपूर्ण वाटचालीत उल्लेखनीय आर्थिक वृद्धी होऊनही किमान पातळीवर समाजातील सर्वांचे समावेशन होऊ शकले नाही. तरीही वृद्धीवरील भर कायम आहे. याचा अर्थ विकासाच्या मूलभूत उद्दिष्टांना केंद्रवर्ती उद्दिष्ट मानण्यात पद्धतशीरपणे दुर्लक्ष होत आहे का ? अमित भादुरींनी म्हटल्याप्रमाणे कोणत्याही किंमतीवर वृद्धी किंवा व्ही. के. आर. व्ही. राव यांच्या शब्दात वृद्धी म्यॅनिया किंवा अमर्त्य सेन यांनी म्हटल्याप्रमाणे गरिबांसाठी चांगल्या जीवन अटीत परिवर्तित न होता, जीवनाचा पायाभूत दर्जा वाढवण्याकडे कोणतेही प्रत्यक्ष लक्ष न देता होणारी म्हणजे उद्दिष्टरहित वृद्धी वा समृद्धीच आम्हांला अभिप्रेत आहे का ? विकासाचे साध्य मनुष्य असल्याचे नाकारून वृद्धीला आम्ही साध्य मानतो आहोत का ? विकासाच्या विचारात किंवा कोणत्याही देशाच्या विकास धोरणात मनुष्य साध्य असल्याचे नाकारले गेलेले नाही. विकासाच्या किमान पातळीवर समावेशनाचे उद्दिष्ट म्हणजे केवळ इच्छाचिंतन किंवा कल्पनारंजन किंवा अप्राप्य उद्दिष्टही नाही हे विशेष. प्रत्यक्षात हे उद्दिष्ट साध्य करणारे देशही आहेत. समावेशनाबाबतच्या व्यापक अपयशाच्या पार्श्वभूमीवर त्यांनी वापरलेल्या यशद मार्गाचा विचार म्हणूनच महत्त्वाचा आहे.

सार्वत्रिक समावेशनाचे उद्दिष्ट गाठण्याचे दोन पर्यायी मार्ग आहेत. वृद्धीच्या माध्यमातून समावेशन किंवा निर्मिती सुरक्षितता आणि सार्वजनिक आधाराद्वारे समावेशन निर्मित सुरक्षितता. पहिल्या दृष्टिकोनात वृद्धीला चालना देऊन तर दुसऱ्या दृष्टिकोनात वृद्धीची वाट न बघता सरळ व्यापक प्रमाणात सार्वजनिक आधाराची व्यवस्था करून जीविकेची सुरक्षितता दिली जाते. दोन्ही व्यूहनीतीत सर्व लोकांचे समावेशन ही समान बाब आहे. त्यांच्यातील मूलभूत साम्य म्हणजे दोन्ही व्यूहनीतीत राज्य क्रियाशील आहे. सर्वांची विकासात भागीदारी व मूलभूत गरजांची पूर्तता हेच दोन्हीचे उद्दिष्ट आहे. त्यासाठी सार्वजनिक संसाधनांचा वापर आणि यशासाठी प्रशासनाच्या कार्यक्षमतेची निकड दोन्ही नीतीमध्ये आहे.

दोन्ही मार्गाद्वारे यश मिळवणारे देश जगात आहेत. तथापि बाजाराधिष्ठित अर्थव्यवस्था आणि वृद्धी मार्गे जाण्याची सार्वत्रिक प्रवृत्ती लक्षात घेता वृद्धीद्वारे सुरक्षितता वा समावेशन व्यूहनीतीचे मर्म समजाऊन घेणे महत्त्वाचे आहे. वृद्धी प्रोत्साहक धोरणात सहभाग आणि वृद्धीच्या प्रक्रियेत जनतेच्या व्यापक सहभागाची व्यवस्था हे त्यांचे वैशिष्ट्य. रोजगार संधीचा व्यापक विस्तार हे अशा अर्थव्यवस्थांचे सामान्य वैशिष्ट्य किंबहुना व्यवच्छेदकत्व. रोजगार निर्मितीसाठी वापरलेले मार्ग देशपरत्वे भिन्न आहेत. कुवैतने कल्याणकारी राज्याशी सुसंगतपणे खाजगी क्षेत्रात रोजगार न मिळालेल्या प्रत्येकाला सार्वजनिक क्षेत्रात रोजगाराची जवळपास हमीच दिली. साऊथ कोरियाने त्यासाठी श्रमप्रधान निर्यात उद्योगांना प्रोत्साहन दिले. श्रमसधन उद्योगातील सापेक्ष लाभ टिकवून ठेवण्यासाठी उच्च स्पर्धात्मक श्रम बाजार

कठोरपणे सुरक्षित ठेवून व सार्वजनिक रोजगार कार्यक्रमाद्वारे सुरक्षितता समावेशन घडवून आणले. समावेशनासाठी अनेक पर्याय असले तरी रोजगार संधीच्या विस्ताराची साधनात्मक भूमिका विकासात सर्वांना सहभागी करून घेण्याच्या दृष्टीने मूलभूत महत्त्वाची आहे ही बाब यात अधोरेखित झालेली आहे.

**9. समावेशी धोरणात आवश्यक सतर्कता :**

उत्पादक रोजगाराची उपलब्धता हा समावेशनाचा प्रभावी मार्ग असल्याचे लक्षात घेऊन प्रयत्न करावयाचे असतील तर प्रयत्नांची रूपरेषा कशी असावी याचा संक्षेपाने विचार करू. रोजगाराच्या संदर्भात अभ्यासकांचे विश्लेषण आणि भारतीय आर्थिक नियोजनाची समीक्षा यांच्या आधारावर हे विवेचन करता येईल.

रोजगार हा विकास वंचित वा विकासातून अपवर्जितांना केवळ दिलासा देणारा, परोपकारक स्वरूपाचा नसावा कारण त्यांचे स्वरूप रोजगार योजनांसाठी प्रत्येक वेळी आखणी, आर्थिक तरतूद व वापराने जवळपास समाप्ती असे होते. भारतातील रोजगार योजनांची संख्या आणि त्यासाठी केल्या जाणाऱ्या वाढीव तरतूदीतून ही बाब स्पष्ट होते. रोजगाराच्या स्वयंसातत्यासाठी रोजगार उत्पादक स्वरूपाचाच असला पाहिजे. त्याकरिता योग्य क्षेत्र म्हणजे उपभोगाच्या किमान दर्जासाठी आवश्यक वस्तू, वेतन वस्तू वा मूलभूत गरजांच्या वस्तूंचे क्षेत्र. तिथे उत्पादनाला मागणी व रोजगाराला वाव आहे.

उत्पन्न व रोजगाराच्या सातत्यासाठी गरिबांनी उत्पादनही करावे आणि निर्मित उत्पादनाचा उपभोगही घेणे गरजेचे आहे. विकासाच्या प्रारंभी वेतन वस्तूंचे उत्पादन ग्रामीण भागात होत असताना सुद्धा त्या ग्रामीण भागात झिरपत नव्हत्या. शहरात विकल्या जात. आज उत्पादनही नागरी भागात स्थलांतरीत झाले. मागणी पुरवठ्याची परस्परतोलक क्रिया प्रतिक्रिया होऊन निर्मित रोजगार पातळी टिकून राहण्यासाठी वेतन वस्तू उत्पादकांच्या स्व-उपभोग दरातील वाढ आवश्यक आहे. उत्पादन होते पण उपभोग नाही याचे एक महत्त्वाचे कारण योग्य मोबदल्याचा अभाव. इतरत्र खपते म्हणजे तेथे जास्त मोबदला म्हणजेच वेतन भेदन.

भारतात ग्रामीण भागातील वेतननिर्धारण प्रक्रिया नागरी भागाशी असंलग्न आहे. संघटित-असंघटित क्षेत्र, कृषी-औद्योगिक क्षेत्र, श्रमाचे भिन्न वर्ग असे सर्वत्र वेतन भेदन आढळून येते. वेतनवस्तू निर्मात्याचे वेतन व उर्वरित अर्थव्यवस्थेतील सरासरी वेतनातील भेदन परिणामांच्या दृष्टीने विशेष प्रभावी असते. वेतनभेदन रोजगार वाढीतील मोठा अडथळा आहे. वेतन भेदन मोठ्या प्रमाणावर असेल तर रोजगार गुणक उत्पादन गुणकापेक्षा कमीच राहील असे अभ्यासकांचे प्रतिपादन आहे.

वेतन उत्पादकता संबंध हा न सुटलेला परंतु रोजगाराच्या संबंधातील आणखी एक महत्त्वाचा मुद्दा. केरळमध्ये वेतनात 1980 च्या दशकात मोठी वाढ झाली. परिणामत: कृषक श्रमसघन पिकाकडून कमी श्रमसघन पिकाकडे वळल्यामुळे श्रम दिवसात मोठी घट झाली. कामाचे स्वरूप व कामाच्या अटीतील संबंधही महत्त्वाचा आहे. आज पांढरपेशा नोकरीत कामाचे तास मर्यादित, कमी प्रभावी काम, जोखीम नाही, जास्त सुरक्षितता यांच्या जोडीला

वेतनही जास्त आहे. उलट ,असंघटित क्षेत्रात काम, कष्ट, जोखीम जास्त,अर्जनाचा कालावधी अनिश्चित तरीही उत्पन्न कमी. ही स्थिती रोजगार वृद्धीला पोषक नाही.

प्रत्यक्ष व्यवहारात उत्पादन तंत्रात 'यु'टर्न शक्य नाही. इष्टही नाही. त्यामुळे रोजगाराचा प्रश्न दीर्घकाळात सोडवण्याचा परंतु मूलगामी प्रश्न उत्पादन तंत्राचा असतो. आधुनिक तंत्रात घटक अनुपात स्थिर व ताठर असतो. त्यामुळे मोठ्या बेरोजगारीच्या स्थितीत उत्पादन तंत्राचा विचार दुर्लक्षित ठेवून रोजगार निर्मितीचे प्रयत्न निष्प्रभावी ठरतात. नवीन तंत्राने श्रम समावेशन दरात घट झाल्याचा अनुभव सार्वत्रिक आहे. त्यामुळे सुयोग्य तंत्रज्ञानात्मक नीती गरजेची आहे. के. भट्टाचार्यांनी रोजगार निर्मितीसाठी अतिरिक्त श्रमाचा प्रभावी वापर जास्तीत जास्त करू शकणाऱ्या तंत्राला युक्त तंत्र म्हटले आहे. तंत्र बदलाची ही दिशा इष्ट आहे.

सध्याचे तंत्र भांडवलसघन, विषमतावर्धक आणि मागणीचा पाया संकुचित करणारे आहे. विषमता व वृद्धीचे परस्पर संबंलन करणारे आहे. त्यातील धनवंताभिमुख अभिनति वाढणार नाही. याप्रकारचे धोरण गरजेचे आहे. शासन खर्चाचा परिणाम भांडवलप्रधान व कौशल्यसघन उत्पादन व उपभोग वृद्धीत होणार नाही याची काळजी घेणे आवश्यक आहे. कारण त्यातूनच धनवंताभिमुख उत्पादन, उपभोग व गुंतवूणक अनुबंध निर्माण व दृढमूल झालेला आहे. उत्पादनाचा अनुबंध हा शेवटी उत्पन्न वितरणाचे फलन आहे. म्हणून विकास प्रक्रिया विषमता ऱ्हासक होणे गरजेचे आहे.

**10. समारोप :**

अपवर्जन व वंचनाची प्रवृत्ती प्रतिबंधित करून समावेशक विकास प्रक्रियेसाठी संकल्पनात्मक चौकट तयार आहे. उत्पादक स्वरूपाच्या रोजगार निर्मितीबाबत प्रच्छन्न बेरोजगारीतून रोजगार निर्मितीचे सिद्धांत, अमित भादुरींचे हिताच्या परस्पर पोषकतेचे तत्त्व, ब्रह्मानंदाचे तिहेरी संपूर्ण वेतन वस्तू प्रतिमान, मूलभूत गरजांची व्यूहनीती इ. अनेक प्रकारे मार्गदर्शन उपलब्ध आहे. विकासातील जनसामान्यांच्या समावेशनासाठी उत्पादक रोजगार हा सर्वात विश्वासार्ह, अनुभवनिष्ठ व प्रभावी मार्ग असल्याचेही सिद्ध झालेले आहे. त्यातील विविध अडचणी दूर होण्यासारख्या असल्या तरी प्रत्यक्षात असे घडवून आणणे सोपे नाहीच. कारण त्यात एक अवघड पण, एक अनुल्लंघनीय संरोध जाणवतो आणि तो म्हणजे वृद्धी हे साध्य तर नाहीच; पण ते विकासाचे मुख्य साधन किंवा विकासाचा मुख्य निर्देशकही नाही हे आम्हाला प्रामाणिकपणे विचारांच्या आणि व्यवहाराच्या पातळीवर वळावे लागेल, स्वीकारार्ह वाटावे लागेल. तसे झाले तर उत्पादक रोजगार मुख्य उद्दिष्ट असेल आणि त्याच्या चौकटीत बसेल, प्रत्यक्ष संभाव्य रोजगार पातळीद्वारे, त्याच्याशी सुसंगत पद्धतीने साध्य होईल तो वृद्धि दर हा परिणाम मग तो कमी असला तरी, आणि तो सध्यापेक्षा कमी असणारच आहे, तरीही तो स्वीकारायला आम्ही तयार असू तरच हे साध्य होण्यासारखे आहे. आजपर्यंत वृध्दीदर मुख्य उद्दिष्ट आणि त्याच्या चौकटीत बसेल अशा पद्धतीने उत्पादन वाढीचे धोरण तर वृद्धी व्यतिरिक्त उद्दिष्टांसाठी पुरवणी स्वरूपाचे कार्यक्रम हा नियोजनाचा गाभा होता. गेल्या दशकातील दोन

अंकी वृद्धिदर, सर्वाधिक वेगाने प्रगती करणाऱ्या दहा मोठ्या विकसनशील देशातील स्थान, जगातील महासत्ता होण्याकडील वाटचाल हे आमचे साध्य असेल तर विकासाच्या वाटचालीतील दारिद्र्य निर्मूलनासाठीची प्रक्रिया ते विकासात्मक दहशतवाद वा अंतर्गत वसाहतवादापर्यंतची आमची वाटचाल योग्यच आहे असे म्हणावे लागेल. विकास ही अधिक मानवीय जीवनाकडील वाटचाल मानणाऱ्यांचे विचार महर्षी व्यासांच्या शब्दांत

''उर्ध्वबाहुर्विरोम्येष न कश्चित श्रृणोति माम्।
धर्मादर्थश्चकामश्च स किमिति न सेव्यते ।।''

या वर्गात जमा होतील. वृद्धीच्या भ्रमजालाची गुलामी की अधिक मानवीय जीवन यातील निवड आम्हाला करायची आहे.

**संदर्भ सूची :**


1. Amit Bhaduri : (2007) : Development with Dignity.
2. Amit Bhaduri (2009) : The face you were afraid to see.
3. Baumol W.J. (1980) : Welfare Economics & The Theory of the State.
4. Brahamananda P.R. (1997) : 50 years of free Indian Economy.
5. Brahamananda P.R. & Others (Ed.) (1992) : Indian Economy : P\olicy Perspectives.
6. C. H. Hanumanth Rao (2010) : Inclusive Growth : An overiew of Performance & Challenges Ahead, IEA Vol. 1.
7. Dandekar, V. M. and Others (1990) : Search for employment oriented growth strategy - A discussion EPW Vol. 21.
8. Fabrizio Coricelli & Others (Ed.) (1998) : New Theories in Growth & Development.
9. Govt. of India (2007) : Eleventh Five Year Plan.
10. Higgins, Benjamin (1966) : Economic Development.
11. Isha Athluwalia & I.M.D. Little (1998) : India's Economic Reforms & Development Essays for Manmohan Singh.
12. Jahagirdar, Mukta & Deshmukh Sushma (Ed.) (2005) : Post Economic Reforms Scenario of Indian Economy.
13. Jahagirdar, D. V. & M. D. (1990) : Above and below the surface Marshallian approach, IEA, 73rd Annual Conference.
14. Kurien, C. T. (1992) : The Economy.
15. Lewis, Arthur (1955) : The Theory of Economic Growth.
16. Meier, Gearald (1984) : Leading Issues in Economic Development.
17. Myint, H. (1974) : The Economics of Developing Countries.
18. Myrdal Gunnar (1955) : Economic theory and under developed regions.
19. M. H. Suryanarayan (2008) : What is exclusive about inclusive growth? EPW. Oct., No. 43.
20. Neetha N, Babu P. Ramesh (2010) : Report on Employment : An Bird's eye view of An eyewash, EPW, Sept., No. 38.
21. Nirmal Kumar Chandra (2010) :

Inclusive growth in New- liberal India : A facade ? EPW, Feb. No. 10.
22. Rakesh Mohan (2002) : Facets of Indian Economy.
23. Rawls John (1971) : The Theory of Justice.
24. Sakiko Fukada - Parr & A. K. Shiva Kumar (2007) : Residings in Human Development.
25. Seeta Prabhu (1996) : Social Sectors in Economic Development (IEA, 79th Annual Conference)
26. Sen, Amartya (1992) : Inequality Re-examined.
27. Sen, Amartya (1987) : On Ethics & Economics.
28. Sen, Amartya (2000) : Development as freedom.
29. Sen, Amartya (2009) : The Idea of Justice.
30. S. Mahendra Dev (2008) : Revising estimates of Poverty, EPW, March Vol. 10.
31. Stewart, Ian (1978) : Reasoning and Methods in Economics.
32. Todaro, M. P. (1977) : Economics for the Developing World.
33. Triwall, A. P. (1983) : Growth and Development.
34. जहागिरदार, मुक्ता (1996) : अभिजात अर्थशास्त्र आणि राज्य हस्तक्षेप नीती.
35. जहागिरदार, मुक्ता (1991) : अल्प विकसित देशातील प्रगत तंत्र : विकास संरचनेतील वर्जन प्रक्रिया, अर्थसंवाद, जाने. - मार्च.
36. जहागिरदार, मुक्ता (2000) : रॉल्सचा न्यायधिष्ठित सामाजिक निवड सिद्धांत, शासकीय वि. ज्ञा. वि. संस्थेतील चर्चासत्र.
37. जहागिरदार, मुक्ता (2005) : सामाजिक निवडीचे सिद्धांत, अर्थसंवाद, जाने.-मार्च.
38. जहागिरदार, मुक्ता (2009) : आर्थिक चिकित्सा.
39. जहागिरदार, मुक्ता (2007) : विकासाचे फलित : समृद्धीत दारिद्र्य (विदर्भ अर्थशास्त्र शिक्षक परिषदेच्या 31 व्या अधिवेशनातील अध्यक्षीय भाषण).
40. जहागिरदार, दि. व्यं. (1998) : जागतिकीकरण, उदारीकरण आणि राज्याची भूमिका – एक विवेचन, अर्थसंवाद, जाने.-मार्च.
41. डोळे, ना. य. (1997) : उदारीकरण : नवे आर्थिक धोरण.
42. खेर, सी. पं. (2010) : दारिद्र्याची संकल्पना आणि निवारण.

●●●

# असंघटित क्षेत्रातील श्रमिकांचा अभ्यास


**ऋता खापर्डे**

कल्याण

भ्रमणध्वनी : 9423955940


**मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या वार्षिक अधिवेशनातील चर्चासत्रासाठी सादर केल्या जाणाऱ्या सर्वोत्कृष्ट शोधनिबंधासाठी कै. ग. प्र. पिंपरकर आणि कांतीभाई ठक्कर ऋणमुक्ती प्रतिष्ठाचे नोबेल पारितोषिक विजेते डॉ. अमर्त्य सेन पारितोषिक दिले जाते. कुळगांव–बदलापूर, जि. ठाणे येथे 13 ते 15 नोव्हेंबर 2010 या कालावधीत संपन्न झालेल्या परिषदेच्या 34 व्या राष्ट्रीय पातळीवरील अधिवेशनात विभागून देण्यात आलेले पारितोषिक प्राप्त शोध निबंध.**

**प्रास्ताविक :**

आपल्या देशात सर्वच क्षेत्रांमध्ये असंघटित श्रमिकांचे प्रमाण जवळजवळ 93% आहे. दिवसेंदिवस हे प्रमाण वाढविण्याकडे कल दिसून येत आहे. लोकसंख्येचा वाढता भार, कर्जबाजारीपणा, ग्रामोद्योगांचे अध:पतन, आजारी उद्योगांच्या समस्या, कामगारांचे दारिद्र्य, कामगारांचे स्थलांतर, एकात्मतेचा अभाव, उद्योगपतींचे प्रतिकूल धोरण, मध्यस्थांच्या शक्तीचा दुरूपयोग, बाहेरच्या व्यक्तींनी कामगार संघाचे नेतृत्व करण्याचा प्रश्न, दिवसेंदिवस शेती उद्योगावर येणारी अवकळा व बेकारी यासारख्या अनेक प्रश्नांमुळे वर्तमानस्थितीत श्रमिक वर्ग असंघटित दिसतो आहे.

**अध्ययनाची ध्येय व उद्दिष्ट्ये :**

**अध्ययनाची ध्येय व उद्दिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत.**

1) आपल्या देशात अर्ध्यापेक्षा जास्त उत्पन्न हे असंघटित क्षेत्रातून मिळते. म्हणून या क्षेत्रातील श्रमिकांचा अभ्यास करणे.

2) भारताच्या अर्थव्यवस्थेत उत्पादन वाढीसाठी श्रमिकांची भूमिका नेमकी काय व कशी असते हे जाणून घेणे.
3) आयात व निर्यात करायला आपला देश किती सक्षम आहे हे समजावून घेणे.

वरील सर्वच उद्दिष्ट्ये असंघटित श्रमिकांच्या अध्ययनात स्पष्ट होतात.

**गृहिते :**

गृहिते खालीलप्रमाणे आहेत.

1) मोठ्या प्रमाणावर श्रमिक हा सर्वच क्षेत्रात असंघटित आहे.
2) असंघटित असण्यासाठी कामगारांचे दारिद्र्य जबाबदार आहे.
3) असंघटित असल्यामुळे न्याय व हक्क या सर्व बाबींपासून श्रमिक दूर असतात.
4) असंघटितपणा कामगाराचे मनोबल कमी करतो.
5) असंघटित असल्यामुळे श्रमिक संघर्ष करीत नाही व अन्याय मुकाट्याने सोसतात.

**माहितीचे स्त्रोत :**

वरील विषयावरील माहिती दुय्यम स्त्रोताद्वारे संकलित केलेली आहे. यात श्रमिकांची संख्या ही ग्रामीण भागातील स्त्रिया व पुरुष तसेच शहरी भागातील स्त्रिया व पुरुष तसेच कामगारांच्या रोजगाराचा प्रकार, उद्योग असल्यास उद्योगाचा प्रकार, व्यवसायाचा प्रकार, कामगारांच्या नेतृत्त्वाचा प्रकार, कामगारांचे विविध क्षेत्र जसे शेती, बांधकाम, कारखाना/व्यापार व वाहतूक, उद्योग व्यवसाय यातील प्रमाण, वयानुसार असंघटीत क्षेत्रातील कामगारांचा अभ्यास यात पुढे स्त्री व पुरुष यांचे ग्रामीण व शहरी भागातील प्रमाण. विविध विभागानुसार कामाची संधी जसे शेती, खाणकाम, उत्पादन, वीज निर्मिती, बांधकाम, घाऊक व किरकोळ व्यापार, वाहतूक साठवणूक व संदेशवहन, विमा व व्यवसाय तसेच सामाजिक व वैयक्तिक सेवा इ. यात पुढे आर्थिक विषमता असणाऱ्या संघटित व असंघटित कामगारांचे विवरण त्यांच्या आर्थिक पातळीवरून केलेले आहे.

**असंघटीत कामगार :**

भारताच्या कामगार संघाच्या चळवळीमध्ये एक दुष्ट चक्र अनेक वर्षांपासून अस्तित्वात आले आहे. या दुष्टचक्रामुळे कामगार संघाची चळवळ म्हणावी तशी व योग्य दिशेने प्रगती करू शकली नाही. या दुष्ट चक्राच्या कड्या पुढीलप्रमाणे आहेत.

1) कामगार संघाचे रचनात्मक कामांकडे दुर्लक्ष
2) बाहेरच्या व्यक्तींकडून कामगार संघाचे नेतृत्व
3) एकाच उद्योगात विभिन्न कामगार संघाचे अस्तित्व
4) कामगार संघामध्ये वैमनस्य
5) कामगारांमध्ये उदासीनता व दारिद्र्य
6) कामगार संघाची अपुरी सदस्य संख्या
7) कामगार संघाचे अपुरे उत्पन्न
8) कामगार संघामध्ये सौदाशक्तीची कमतरता.

**तक्ता क्र.१**

**कामगार वर्गामधून आलेल्या नेत्यांचे बाहेरच्या नेत्याशी असलेले प्रमाण**

| अ.क्र. | नेतृत्वाचा प्रकार | महाराष्ट्र | मुंबई | गुजरात | इतर प्रदेश | सर्व प्रदेश |
|---|---|---|---|---|---|---|
| 1. | कामगारांमधून उत्पन्न झालेले नेतृत्व | 72.1 | 71.6 | 40.6 | 75.4 | 67.0 |
| 2. | बाहेरच्या व्यक्तिचे नेतृत्व | 27.9 | 28.4 | 59.4 | 24.6 | 33.0 |

कधी संघटनेतील नेतृत्वाचा तर कधी बाहेरच्या व्यक्ति नी केलेल्या नेतृत्वाचा परिणाम असंघटित कामगारांना भोगावा लागतो. बऱ्याचदा कामगारांच्या कल्याणापेक्षा स्वय: कल्याणाचा विचार केल्यामुळे मोठ्या प्रमाणावर कामगार असंतोषी व असंघटीत होतो.

**माहितीचे पृथ:करण :**

नॅशनल सँपल सर्व्हे या संघटनेने 2004-05 रोजी संघटित व असंघटित क्षेत्रातील रोजगाराचा सर्व्हे केला. यात दोन्ही क्षेत्रातील रोजगार 45.9 करोड इतका होता. यापैकी 2.6 करोड रोजगार संघटित क्षेत्राशी संबंधीत होता. तर 43.3 करोड रोजगार असंघटित क्षेत्राशी संबंधीत होता. यात 26.9 करोड मजूर शेतीशी संबंधीत होते. 2.57 करोड बांधकाम विभागाशी आणि बाकी उत्पादन, व्यापार व वाहतूकीशी संबंधित होता.

मोठ्या प्रमाणावरील श्रमिक बिडी, अगरबत्ती, पापड, शिवणकाम व एम्ब्रॉयडरीची कामे या व्यवसायाशी संबंधित आहेत.

1) **शेती क्षेत्र :** वरील माहितीवरून शेती क्षेत्रावर 26.9 करोड मजूर अवलंबून असल्याचे सिद्ध होते. भारत हा कृषीप्रधान देश आहे व भारताची जनता ही खेड्यात वसलेली आहे. हे महात्मा गांधीजींचे विधान यावरून सिद्ध होते. वर्तमान स्थितीत शेती हे क्षेत्र जिव्हाळ्याचे आहे याची सिद्धता स्पष्ट होते आहे.

2) **बांधकाम क्षेत्र :** बांधकाम क्षेत्राशी 2.57 करोड श्रमिक अवलंबून आहे. पुरुषाच्या बरोबरीने स्त्रियाही काम करताना दिसतात. 99% स्त्रिया गरोदरपण व बाळंतपण या कठीण काळात सुद्धा आपल्या परिवाराला हातभार लावतात.

3) **कारखाना/व्यापार व वाहतूक :** या अंतर्गत उरलेल्या 13.3 श्रमिकांचा समावेश होतो. या उर्वरित श्रमिकांचा समावेश खाणकाम, बिडी कामगार, इतर छोटे - मोठे कुटीर उद्योग, कुली, हमाल इत्यादींचा समावेश होतो. हे सगळेच प्रकार असंघटित क्षेत्राअंतर्गत येतात.

**तक्ता क्र.२**

**प्रदेशानुसार खालीलप्रमाणे विभागानुसार श्रमिकांचे 9 व्या योजनेनुसार वर्गीकरण होते.**

| विभाग | प्रमाण |
|---|---|
| शेती | 62 प्रतिशत |
| उत्पादन व बांधकाम | 16 प्रतिशत |
| सेवा उद्योग | 10 प्रतिशत |
| किरकोळ नोकरी | 12 प्रतिशत |

**तक्ता क्र.३**

**वयानुसार असंघटीत क्षेत्रातील कामगारांचा अभ्यास**

| वय | 1997 मिलीयन | 2002 | वाढ % |
|---|---|---|---|
| 15-19 | 40.31 | 45.03 | 2.24 |
| 20-24 | 55.45 | 62.91 | 2.55 |
| 25-29 | 56.89 | 61.47 | 1.56 |
| 30-34 | 52.64 | 58.88 | 2.26 |
| 35-39 | 46.60 | 52.80 | 2.53 |
| 40-44 | 39.56 | 46.04 | 3.08 |
| 45-49 | 32.90 | 38.13 | 2.99 |
| 50-54 | 25.86 | 30.27 | 3.20 |
| 55-59 | 18.86 | 22.45 | 3.55 |
| 60 | 28.15 | 31.64 | 2.37 |
| 15 | 397.22 | 449.62 | 2.51 |

वरील कोष्टकाप्रमाणे वयाच्या 20 व्या वर्षापासून ते जवळजवळ 39 वर्षांपर्यंत कामगारांची संख्या वाढताना दिसते आणि नंतर त्याचे प्रमाण कमी होत गेल्याचे आढळले. वाढत्या वयोमानानुसार जडलेल्या व्याधींमुळे, अपुऱ्या मजुरीमुळे तसेच वाढणाऱ्या कुटुंबाच्या जबाबदारीमुळे अनेकदा कामगार स्वत:च्या आरोग्यावर पैसे खर्च करण्याची टाळाटाळ करताना दिसतात. महागाईचे तीव्र पडसाद त्यांच्या जीवनावर उमटते. हे वरील कोष्टकावरून सिद्ध होते.

| कामगाराची वयोमर्यादा | कालावधी | पुरुष | | स्त्रिया | |
|---|---|---|---|---|---|
| | | ग्रामीण | शहरी | ग्रामीण | शहरी |
| 15-29 | 1977-78 | 879 | 746 | 515 | 257 |
| | 1987-88 | 824 | 710 | 478 | 211 |
| | 1993-94 | 804 | 684 | 455 | 204 |
| 30-44 | 1977-78 | 990 | 990 | 619 | 324 |
| | 1987-88 | 980 | 987 | 603 | 301 |
| | 1993-94 | 990 | 986 | 600 | 300 |
| 45-59 | 1977-78 | 963 | 940 | 538 | 291 |
| | 1987-88 | 964 | 933 | 538 | 275 |
| | 1993-94 | 968 | 937 | 543 | 283 |
| 60+ | 1977-78 | 667 | 517 | 221 | 130 |
| | 1987-88 | 670 | 482 | 220 | 123 |
| | 1993-94 | 699 | 443 | 241 | 114 |

वरील कोष्टकाप्रमाणे 15 ते 29 वयोगटातील स्त्रिया व पुरुष शहरी भागापेक्षा ग्रामीण भागात जास्त संख्येने दिसून येतात. 30-44 या वयोगटातील पुरुषांचे प्रमाण जवळजवळ शहरी व ग्रामीण सारखे दिसते. मात्र शहरी भागापेक्षा ग्रामीण भागातील स्त्रिया जास्त संख्येने काम करीत आहेत हे तक्त्यावरून स्पष्ट होते. वयोमर्यादा 60 पेक्षा जास्त असलेल्या स्त्रियाही शहरी भागापेक्षा दुपटीने काम करताना दिसतात. वर्तमान स्थितीत असंघटीत स्त्रियांचा वर्ग हा ग्रामीण भागात जास्त दिसून येतो. शहरी भागापेक्षा ग्रामीण भागातील स्त्रिया दुप्पटीने अर्थार्जन करताना दिसतात.

**तक्ता क्र.५**

**लोकसंख्या व कामगारांचे बळ**

| | 1997 | 2002 | 2007 | 2012 |
|---|---|---|---|---|
| लोकसंख्या | 951.18 | 1028.93 | 1112.86 | 1196.41 |
| कामगारांचे बळ | 397.22 | 449.62 | 507.94 | 562.91 |

वरील कोष्टकात लोकसंख्येच्या अर्ध्यापेक्षाही कमी प्रमाणात कामगारांच्या बळाचा वापर केलेला दिसतो. अनेक प्रदेशामध्ये अजूनही कामगारांच्या हातापर्यंत काम पोचत नसल्याचे

दिसते. दिवसेंदिवस बेकारांचे सैन्य वाढते आहे. कामगारांना कामाची संधी कुठे मिळेल याचे मार्गदर्शन मिळत नाही.

**तक्ता क्र.६**

**1997 ते 2002 मधील विभागानुसार कामाची संधी**

| विभाग | 1997 | 2002 |
|---|---|---|
| शेती | 238.32 | 262.48 |
| खाणकाम | 2.87 | 3.54 |
| उत्पादन | 43.56 | 48.22 |
| विजनिर्मिती | 1.54 | 1.93 |
| बांधकाम | 14.74 | 17.03 |
| घाऊक व किरकोळ व्यापार | 34.78 | 41.67 |
| वाहतूक/साठवणूक व संदेशवहन | 11.96 | 14.57 |
| विमा व व्यवसाय | 4.55 | 5.68 |
| सामाजिक व वैयक्तिक सेवा | 38.98 | 46.41 |
| सर्व विभाग | 391.30 | 441.52 |

वरील कोष्टकानुसार शेती क्षेत्र हे अग्रक्रमावर येते. त्यानंतर उत्पादन, सामाजिक व वैयक्तिक सेवा, घाऊक व किरकोळ व्यापार; तर पाचव्या क्रमांकावर बांधकाम व सहाव्या क्रमांकावर वाहतूक/साठवणूक व संदेशवहन ही क्षेत्रे येतात.

वर्तमान स्थितीत प्रत्येक उद्योगाला कामगारांची गरज असते. अनेक प्रदेशातून कारखान्यासाठी कामगारांची दुर्मिळता ही समस्या जाणवत असते. आपल्या देशात सगळ्यात स्वस्त घटक हा श्रम आहे. कामगारांना योग्य मजूरी देऊन या श्रमाचा योग्य वापर केल्यास आपल्या देशातील परिस्थिती बदलण्यास त्याचा उपयोग होईल असे दुय्यम आकडेवारीवरून लक्षात येते.

कामगारांमध्ये अकुशल व कुशल असे दोन प्रकारचे कामगार असतात. अकुशल कामगारांना प्रशिक्षणाची सोय उपलब्ध करून दिल्यास कामाचा दर्जा वाढवता येईल व उत्पादनही जलद गतीने होईल.

तक्ता क्र.७

आर्थिक विषमता असणाऱ्या संघटित व असंघटीत कामगारांचे विवरण

| विभाग | शेती व व्यवसाय सोडून सगळे कामगार | | शेती व व्यवसायातील कामगार | | गैरशेती व्यवसायातील कामगार | |
|---|---|---|---|---|---|---|
| | संघटित | असंघटित | संघटित | असंघटित | संघटित | असंघटित |
| गरीब | 2.39 | 97.61 | 1.69 | 98.31 | 4.80 | 95.20 |
| थोड्या वरच्या पातळीवरील | 3.37 | 96.63 | 1.75 | 98.25 | 7.78 | 92.22 |
| मध्यम | 4.86 | 95.14 | 1.88 | 98.12 | 10.93 | 89.07 |
| थोड्या वरच्या पातळीवरील श्रीमंत | 9.04 | 90.96 | 2.60 | 97.40 | 17.85 | 82.15 |
| श्रीमंत | 25.89 | 74.11 | 5.55 | 94.45 | 34.51 | 63.49 |

कामगार जर श्रीमंत असेल तर त्याची संघटनेची पातळी चांगली दिसते. असंघटित कामगारांमध्ये ही पातळी जवळजवळ रोडावलेली दिसते.

**गृहीते :**

संशोधनात खालील गृहीते सिद्ध झालेली आहेत.

1) मोठ्या प्रमाणात सर्वच क्षेत्रातील कामगार हा असंघटीत आहे. हे गृहीत बरोबर ठरते.
2) असंघटित असल्यामुळे न्याय व हक्कांपासून श्रमिक दूर राहतात.
3) असंघटित श्रमिकांचे मनोबल कमी होते. कारण वयोमर्यादेनुसार त्यांचे काम करण्याचे प्रमाणही कमी झालेले दिसते.
4) असंघटित असल्यामुळे श्रमिक कायम आपली नोकरी टिकवण्याची धडपड करताना दिसतात. हे गृहीतही पूर्णपणे योग्य आहे.

**निष्कर्ष :**

1) दारिद्र्य, उपासमार, शिक्षणाचा अभाव व कामगार संघटनांचा अभाव ही सर्वच कारणे जबाबदार आहेत.
2) सर्वात जास्त म्हणजे 26.9 करोड मजूर शेतीशी संबंधित आहे व नंतर कारखान्यात काम करणाऱ्या म्हणजेच 13.83 कामगारांचा यात समावेश आहे.
3) 15 व्या वर्षापासून ते 60 च्या वरही कामगारांच्या हाताला काम मिळते. वयाच्या 20 व्या वर्षापासून ते 39 वर्षापर्यंत कामगारांची संख्या वाढताना दिसते नंतर मात्र ती कमी झालेली दिसते.
4) ग्रामीण भागात स्त्रियांचे काम करण्याचे प्रमाण हे शहरी भागापेक्षा दुप्पट असल्याचे दिसते.

**शिफारशी :**

1) दिवसेंदिवस लोकसंख्येचे प्रमाण वाढते आहे. अज्ञानामुळे सगळ्यात जास्त मुलं गरिबांच्या घरी जन्माला येतात. लोकसंख्येवर आळा घालणे आवश्यक आहे.

2) प्रत्येक शाळेने एक गाव दत्तक घेऊन अशिक्षित कामगारांना सुशिक्षित करणे गरजेचे आहे.

3) प्रत्येक कुटुंबाने आपल्या उत्पन्नातील काही भाग सामाजिक संस्थांना द्यावा, जेणे करून त्याचा उपयोग कामगारांच्या आरोग्यावर केला जाईल.

4) सामाजिक संस्थांनी पुढाकार घेऊन कामगारांसाठी आरोग्यविषयक शिबीर आयोजित करावे.

5) कामगारांच्या कामाची योग्य मजुरी देण्यात यावी.

6) ही मजुरी योग्य असल्यास गरोदर स्त्रीला काम करण्याची वेळ येणार नाही. गरोदर स्त्री ही स्वतः कामगार वा कामगाराची पत्नी असल्यास तिच्या बाळंतपणाची सोय करून द्यावी. यात सरकार वा सामाजिक संस्थांनी हातभार लावावा.

7) कामगार आजारी पडल्यास त्याचा त्या दिवशीचा रोजगार बुडतो व स्वतःच्या औषधासाठीही तो खर्च करू शकत नाही ही बाब लक्षात घेऊन कामगारांना 15 पूर्ण पगारीआजारपणाच्या रजा देण्यात याव्यात.

8) असंघटित कामगारांच्या कामाचे तास ठरवून द्यावे.

9) कामगारांना पेन्शनची सोय लागू करावी म्हणजे वृद्धापकाळात ते कुणावरही अवलंबून राहणार नाहीत.

10) जवळपास 90 टक्के इतका कामगार वर्ग असंघटित क्षेत्रात काम करीत आहे. सरकारने त्यांना कायद्याचे संरक्षण द्यावे.

11) कामगारांना प्रशिक्षण देण्यात यावे.

12) कामाच्या संधी कुठे मिळतील व कुठल्या प्रकारच्या मिळतील यासाठी सामाजिक संस्थांनी मार्गदर्शन करावे.

13) कामगारांना नफ्यामध्ये वाटा देण्यात यावा.

14) कामगारांना बोनस देण्यात यावा.

15) प्रत्येक कामगाराला दरवर्षी 18 यार्ड कापडाची गरज भासते; तर कुटुंबाला 72 यार्ड कापडाची गरज पडते. एवढे कापड प्रत्येक कामगाराच्या कुटुंबाला दिल्यास त्यांचे काम करतांना निश्चितच मनोबल वाढेल.

16) जुनी, आवाज करणारी यंत्रे काढून टाकावी, ज्यामुळे कामगारांच्या श्रमाची बचत होईल व कमी वेळेत जास्त काम होईल.

17) 'बुई ॲटीट्युड'ची भावना कामगारांच्या मनात रुजवावी.

18) कामगारांच्या मुलांच्या शिक्षणाची सोय करावी.

19) कामगारांच्यासाठी दर महिन्यातून एकदा सभेचे आयोजन करावे व त्यांना अभिव्यक्ती स्वातंत्र्य देऊन बोलते करावे.

20) कामगारांना चांगले काम करण्यासाठी अभिप्रेरीत करावे.

21) स्त्री कामगारांच्या लहान मुलांसाठी पाळणाघर चालवावे.

22) कामगारांमध्ये वाईट व्यसनांचे प्रमाण बरेच वाढले आहे. पथनाट्य किंवा संवाद-प्रतिसंवाद या माध्यमातून त्यांच्यातील वाईट व्यसनांना दूर करण्यासाठी प्रयत्न करावेत.

23) कामगारांना घराची सुविधा उपलब्ध करून द्यावी.

24) महिन्यातून एकदा तरी कामगारांसाठी करमणूकीचा कार्यक्रम करण्यात यावा.

25) कामगारांना अभिप्रेरीत करता येईल अशा वक्त्याचे व्याख्यान ठेवावे. अनेकदा याचा सकारात्मक परिणाम होतो.

26) काम सोडतांना कामगारांचा इक्सीट इंटरव्ह्यू घेण्यात यावा.

27) राज्यात अडीच कोटी शेतमजूर आहेत. शेतमजूराचे नशीब हे पावसाच्या सरीवर व सरकारच्या धोरणावर अवलंबून असते. पावसाळा सुरू झाल्यावर त्यांना काम मिळत नाही.त्यासाठी पर्यायी व्यवस्था करण्यात यावी वा सेवा उद्योगात त्यांच्या श्रमाचा उपयोग करण्यात यावा.

28) ऊसतोड कामगारांना सहा-सहा महिने आपले कुटुंब घेऊन गावात फिरावे लागते. त्यांच्यासाठी ऊसाला पर्याय म्हणजे शुगर बीट आहे. याचे वैशिष्ट्य म्हणजे ऑक्टोबर ते मे महिन्यापर्यंत याचे उत्पादन घेता येते. पिकाच्या उत्पादनाला कमी पाणी लागते. पर्यावरणासाठी शुगरबीट उपयोगाचे आहे. कारण कार्बन डायऑक्साईड हवेतून शोषून घेतो. ऊसाच्या तुलनेत जास्त प्रमाणात साखर स्पिरीट वा इथेनॉलचे उत्पादन घेता येते. आंध्र प्रदेशात हॅपी प्रोजेक्ट नावाचा एक कारखाना आहे ज्यात 100 टक्के साखरेचे उत्पादन हे शुगरबीट पासून घेतले जाते.

29) सिंजेटा (Syngenta) च्या वेबसाईटवरून अधिक माहिती उपलब्ध होत आहे. अशाच प्रकारची माहिती शेतकऱ्यांना व शेतमजूरांना दिल्यास त्याचा फायदा होतो. यासाठी शेतमजूरांना आधुनिक तंत्रज्ञान देण्याची गरज आहे.

●●●

# सहकारी चळवळ आणि महाराष्ट्राचा आर्थिक विकास

**लालासाहेब ना. घाटगे**
छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा
भ्रमणध्वनी :9850110746

**अनिल कृ. वावरे**
छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा
भ्रमणध्वनी : 9850117226

**मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या वार्षिक अधिवेशनातील चर्चासत्रासाठी सादर केल्या जाणाऱ्या सर्वोत्कृष्ट शोधनिबंधासाठी कै. ग. प्र. पिंपरकर आणि कांतीभाई ठक्कर ऋणमुक्ती प्रतिष्ठाचे नोबेल पारितोषिक विजेते डॉ. अमर्त्य सेन पारितोषिक दिले जाते. कुळगांव-बदलापूर, जि. ठाणे येथे 13 ते 15 नोव्हेंबर 2010 या कालावधीत संपन्न झालेल्या परिषदेच्या 34 व्या राष्ट्रीय पातळीवरील अधिवेशनात विभागून देण्यात आलेले पारितोषिक प्राप्त शोध निबंध.**

**1. प्रास्ताविक :**

1 मे 2010 रोजी महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेला 50 वर्षे पूर्ण झाली. चालू वर्ष हे राज्यात 'सुवर्ण महोत्सवी वर्ष' म्हणून साजरे केले जात आहे. गेल्या पन्नास वर्षात महाराष्ट्राने कृषी, सहकार, उद्योग, बँकिंग, पायाभूत सुविधा इत्यादी क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले आहे. राज्याचे पहिले मुख्यमंत्री कै. यशवंतरावजी चव्हाण व त्यांच्या सहकाऱ्यांनी मोठ्या ध्येयवादाने प्रेरीत होऊन राज्याच्या भविष्यकालीन आर्थिक उन्नतीसाठी कृषी-औद्योगिक समाजरचना विकसित करण्याचे स्वप्न बाळगले होते. 1960 ते 2010 या 5 दशकात महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेत झालेले क्षेत्रीय बदल व त्याचे सर्वसामान्य व्यक्तीच्या जीवनमानावर झालेले परिणाम याचे चिकित्सक विवेचन करणे आवश्यक ठरते. महाराष्ट्रात कै. यशवंतराव चव्हाण, कै. वसंतदादा पाटील, कै. विठ्ठलराव विखे-पाटील, डॉ. धनंजयराव गाडगीळ इत्यादी राजकारणी परंतु समाज हितासाठी झटणाऱ्या कुशल प्रशासकांनी

महाराष्ट्राच्या विकासाला आकार व दिशा दिली. गेल्या 50 वर्षातील राज्याच्या प्रगतीचा आलेख चाळताना सहकाराच्या माध्यमातून महाराष्ट्रात आर्थिक व सामाजिक चळवळ कशी विकसित होत गेली याचा ऊहापोह, राज्याच्या वास्तव स्थितीचे विवेचन करताना महत्त्वाचा ठरतो. महाराष्ट्राच्या भौगोलिक रचनेनुसार विविध प्रकारच्या सहकारी संस्थांनी दिलेले योगदान निश्चितच प्रेरणादायी आहे. आज रोजी राज्यात 2,12,344 विविध प्रकारच्या सहकारी संस्था दुर्बल घटकांच्या आर्थिक उन्नतीसाठी कार्यरत आहेत. महाराष्ट्राच्या आर्थिक विकासात प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्था व साखर उद्योगाचे योगदान अत्यंत महत्त्वपूर्ण ठरले आहे. आर्थिक सुधारणा काळात सहकारी चळवळीसमोर काही आव्हाने निर्माण झाली आहेत. जागतिकीकरण व खाजगीकरणाचे आव्हान पेलण्याचे सामर्थ्य केवळ सहकारातच आहे. म्हणून राज्याचा सुवर्ण महोत्सव साजरा करताना सहकारी चळवळीचे योगदान जाणून घेणे हितावह ठरेल.

**2. शोधनिबंधाची अभ्यास पद्धती :**

महाराष्ट्र हे देशातील एक औद्योगिक व सहकार चळवळीच्या दृष्टीने विकसित घटक राज्य आहे. 2001 च्या जनगणनेनुसार राज्याची लोकसंख्या 9 कोटी 68 लाख इतकी होती. सुमारे 31,000 विविध प्रकारचे उद्योग राज्यात आज रोजी कार्यरत आहेत. सन 2008-2009 मध्ये राज्याचे दरडोई उत्पन्न 54,867 रुपये इतके होते. 18% जलसिंचित क्षेत्र असलेल्या या घटक राज्यात ऊस, कापूस व अलीकडील काळात विविध प्रकारची फळे व भाजीपाला इत्यादींचे उत्पादन घेतले जाते. राज्यातील 55% लोकांचे जीवन आजही कृषी व संलग्न क्षेत्रांच्या विकासावर अवलंबून आहे. 2004-2005 मध्ये महाराष्ट्रात 30.7% लोक दारिद्र्य रेषेखालील जीवन जगत होते. राज्याच्या ग्रामीण भागात दारिद्र्याचे प्रमाण शहरी भागाच्या तुलनेने अधिक आहे. देशाच्या 11 व्या पंचवार्षिक योजनेत 'सर्वसमावेशक आर्थिक विकासाचे' उद्दिष्ट ठरविण्यात आले आहे. हे उद्दिष्ट साध्य करण्याच्या कामी दारिद्र्य व विषमता कमी करण्यासाठी राज्याने योजलेले उपाय व त्यांचा प्रभाव अभ्यासण्याच्या हेतूने महाराष्ट्रातील सहकारी चळवळीचे योगदान विचारात घेणे उचित ठरते. प्राप्त परिस्थितीत जागतिकीकरणाच्या रेट्यात राज्याचे अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी सहकारी चळवळ हीच एक महत्त्वपूर्ण बाब वाटते.

प्रस्तुत शोधनिबंध हा महाराष्ट्र राज्याच्या गेल्या 50 वर्षातील आर्थिक विकासाचे सिंहावलोकन करताना विविध क्षेत्रांची प्रगती चिकित्सकपणे अजमावण्याच्या हेतूने तयार केला आहे.सुवर्ण महोत्सवी महाराष्ट्राची 1960 नंतरची बदलती अर्थव्यवस्था व सहकार क्षेत्राने बजावलेली कामगिरी अजमावण्याचा हा एक प्रयत्न आहे. राज्यातील मनुष्यबळ व इतर साधनसंपत्तीचा पुरेपूर वापर करून घेण्याच्या दृष्टीने सहकारी पतपुरवठा संस्था व सहकारी साखर कारखानदारीचे ग्रामीण विकासातील योगदान अभ्यासणे हा या शोधनिबंधाचा प्रधान हेतू आहे. त्याचप्रमाणे 1991 नंतर महाराष्ट्रातील सहकारी चळवळीसमोर निर्माण झालेल्या विविध आव्हानांचा व उपाय योजनांचा

परामर्ष घेण्याचा प्रयत्न यामध्ये करण्यात आला आहे. हा शोधनिबंध प्रामुख्याने दुय्यम साधनसामुग्रीवर आधारित असून महाराष्ट्राची आर्थिक पाहणी 2009-10 च्या शासकीय दस्तऐवजाबरोबर इतर विविध नियतकालिके आधारभूत मानून तयार करण्यात आला आहे.

**3. महाराष्ट्राच्या आर्थिक विकासाचे स्वरुप :**

महाराष्ट्र राज्याची स्थापना दि. 1 मे 1960 रोजी झाली. सध्या महाराष्ट्र राज्याचा सुवर्ण महोत्सव साजरा होत आहे. गेल्या 50 वर्षांच्या काळात राज्याने शेती, उद्योग, सहकार व सेवा क्षेत्रात वाखाणण्याजोगी प्रगती केली आहे. परिणामी राज्यातील लोकांच्या राहणीमानात वाढ झाली आहे. शेती व उद्योग क्षेत्रात सहकारी चळवळीने मोलाची कामगिरी बजावलेली आहे.

विशेषतः सहकारी बँक व्यवसाय व सहकारी साखर कारखान्यांनी महाराष्ट्राच्या आर्थिक व सामाजिक क्षेत्रात महत्त्वपूर्ण कामगिरी बजावली आहे. राज्याच्या स्थापनेपासून कुशल नेतृत्वाने महाराष्ट्राला देशात एक अव्वल दर्जाचे घटक राज्य म्हणून स्थान मिळवून देण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळेच महाराष्ट्रात शेती, उद्योग व सेवा क्षेत्रात आमूलाग्र बदल झालेला दिसून येतो. 1960-61 ते 2008-2009 या कालावधीत राज्याने विविध क्षेत्रात केलेली प्रगती निवडक 21 निकषांच्या आधारे कोष्टक क्रमांक 1 मध्ये दर्शविली आहे.

**कोष्टक क्र. 1**

| | | महाराष्ट्राच्या आर्थिक विकासाचा तुलनात्मक आढावा | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| क्र. | तपशील | 1960-61 | 1980-81 | 1990-91 | 2000-01 | 2008-09 |
| 1. | लोकसंख्या | 3,95,54,000 | 6,27,84,000 | 7,89,37,000 | 9,68,79,000 | 12,12,05,000 (2010 अपेक्षित) |
| 2. | राष्ट्रीय उत्पन्न (कोटी रुपये) | 2,074 | 14,500 | 62,190 | 2,19,038 | 5,97,542 |
| 3. | दरडोई उत्पन्न (रुपये) | 531 | 2,811 | 7,958 | 22,777 | 54,867 (2007-08) |
| 4. | कृषी क्षेत्रापासूनचे उत्पन्न (कोटी रुपये) | 646 | 4,028 | 12,751 | 36,487 | 7,00,033 |
| 5. | उद्योग क्षेत्रापासूनचे उत्पन्न (कोटी रुपये) | 480 | 5,405 | 20,063 | 55,445 | 1,74,481 (अंदाजे) |
| 6. | सेवा क्षेत्रापासूनचे उत्पन्न (कोटी रुपये) | 948 | 8,067 | 29,376 | 1,27,106 | 3,53,028 |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 7. | साक्षरता प्रमाण | 35.1% | 57.1% | 64.9% | 76.9% | 76.9% |
| 8. | स्त्री-पुरुष प्रमाण | 936 | 937 | 934 | 922 | 922 |
| 9. | पशुधन (000) | 26,048 | 29,642 | 34,255 | 39,638 | 37,211 |
| 10. | वनक्षेत्र (चौ किमी) | 63,544 | 64,222 | 63,798 | 61,935 | 61,939 |
| 11. | वीज निर्मिती (द.ल.कि.वॅट) तास | 3,268 | 18,751 | 37,311 | 62,457 | 83,008 |
| 12. | एकूण वीज वापर | 2,720 | 14,034 | 29,971 | 47,289 | 72,994 |
| 13. | प्राथमिक शाळा | 34,594 | 51,045 | 57,744 | 65,960 | 72,053 |
| 14. | जन्म दर (दरहजारी) | 34.7 | 28.5 | 26.2 | 20.7 | 17.9 |
| 15. | मृत्यू दर (दर हजारी) | 13.8 | 9.6 | 8.2 | 5.7 | 6.9 |
| 16. | स्थूल सिंचित क्षेत्र (००० हेक्टर) | 1,220 | 2,415 | 3,319 | 3,647 | 4,037 |
| 17. | सिंचित क्षेत्राचे एकूण लागवडीखालील क्षेत्राशी असलेले प्रमाण | 6.5% | 12.3% | 15.2% | 16.4% | 17.8% |
| 18. | सहकारी संस्थांची एकूण संख्या | 31,565 | 60,747 | 1,04,620 | 1,58,016 | 2,12,344 |
| 19. | रेल्वे मार्गाची लांबी (कि.मी.) | 50.56 | 5233 | 54.34 | 54.59 | 59.83 |
| 20. | रस्त्यांची एकूण लांबी (कि.मी.) | 39,241 | 1,41,131 | 1,72,965 | 2,16,968 | 2,67,668 |
| 21. | प्राथमिक आरोग्य | 159 | 395 | 1,672 | 1,761 | 1,816 |

केंद्रांची संख्या

(2001)

**संदर्भ** : 1. महाराष्ट्राची आर्थिक पाहणी 2009-10.

2. सुवर्ण महोत्सवी महाराष्ट्राची बदलती अर्थव्यवस्था 2010, सकाळ पेपर्स प्रकाशन, पुणे.

**4. महाराष्ट्राच्या आर्थिक विकासात सहकारी चळवळीची भूमिका :**

महाराष्ट्र हे सहकारी चळवळीच्या बाबतीत देशातील पहिले व अग्रगण्य असलेले राज्य आहे. राज्याला सहकारी चळवळीचा 105 वर्षाचा इतिहास आहे. महाराष्ट्रात पहिली शेती पत पुरवठा सहकारी संस्था धारवाड जिल्ह्यात 'कणगीहाळ' येथे 1905 मध्ये स्थापन झाली. तद्नंतर राज्यात कै. भाऊसाहेब हिरे, कै. विठ्ठलराव विखे-पाटील, कै. डॉ. धनंजयराव गाडगीळ व कै. वसंतदादा पाटील इत्यादी लोकमान्य व कर्तबगार जाणकारांनी सहकारी चळवळीचा विकास घडवून आणण्यासाठी 1950 नंतर विशेष प्रयत्न केले. आज रोजी महाराष्ट्र सहकाराच्या बाबतीत संपूर्ण देशाला अभिमानाने मार्गदर्शन करू शकतो. राज्याच्या ग्रामीण भागातील पददलित, अल्पसंख्यांक, शेतमजूर व लहान शेतकऱ्यांना एकत्र करून आर्थिक उन्नतीचा मार्ग सहकाराने दाखविला आहे. राज्यातील सुमारे 57.6 टक्के ग्रामीण लोकसंख्येला सहकाराच्या माध्यमातून नवसंजीवनी देण्याचे काम सहकाराने केले आहे. महाराष्ट्रात सहकाराने 1960 पासून राज्य, जिल्हा, तालुका व गाव पातळीवर सहकारी चळवळ पोहोचविण्यासाठी विशेष प्रयत्न केले आहेत. राज्यातील सहकारी पत पुरवठा चळवळीने ग्रामीण व शहरी भागातील गरजू व्यक्तींना आर्थिक उन्नतीचा मार्ग दाखविला आहे. सहकारी साखर कारखानदारीचे महाराष्ट्राच्या ग्रामीण विकासातील योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे.महाराष्ट्राच्या आर्थिक विकासात कृषी व बिगर कृषी सहकारी संस्थांचा वाटा अत्यंत महत्त्वाचा आहे. सध्या राज्याच्या आर्थिक विकास प्रक्रियेत पतपुरवठा सहकारी संस्था, सहकारी साखर कारखाने, सहकारी खरेदी-विक्री संस्था, दुग्ध सहकारी संस्था, सहकारी सूत गिरण्या, गृहनिर्माण सहकारी संस्था, शेतमाल प्रक्रिया व निर्यात सहकारी संस्था इत्यादींचे योगदान महत्त्वपूर्ण मानले जात आहे.

1960-61 पासून महाराष्ट्राच्या आर्थिक विकासात विविध प्रकारच्या सहकारी संस्थांनी केलेले कार्य व त्यांची प्रगती महाराष्ट्रातील सहकारी चळवळ एका दृष्टिक्षेपात, 2008 सहकारी आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यामध्ये दाखविलेली आहे.

सहकारी पत पुरवठा चळवळ हा महाराष्ट्राच्या सर्वांगीण आर्थिक विकासाचा व सहकारी संस्थांच्या वृद्धीचा महत्त्वाचा निकष आहे. 2008 मधील महाराष्ट्राच्या एकूण 2,05,753 सहकारी संस्थांमध्ये कृषी व बिगर कृषी सहकारी संस्थांची संख्या 46,389 (22.55%) इतकी होती. तथापि, कार्यक्षम व नफ्यातील सहकारी पत पुरवठा संस्थांची संख्या अवघी 25% इतकी होती. ही बाब सहकारी चळवळीत अग्रेसर असणाऱ्या महाराष्ट्रासारख्या प्रगत घटक राज्याला भूषणावह नाही. 1961 ते 2008 या काळात कृषी पत पुरवठा

सहकारी संस्थांच्या थकबाकीचे येणे कर्जाशी असलेले प्रमाण 20.1% वरुन 42.3% पर्यंत वाढले. ही बाब सहकारी पत पुरवठा संस्थांच्या सदोष व्यवस्थापनाचे व अकार्यक्षमतेचे लक्षण मानावे लागेल.

सहकारी पत पुरवठ्याबरोबर सहकारी खरेदी-विक्री संस्थांची संख्या राज्याच्या स्थापनेपासून सातत्याने वाढत गेलेली दिसून येते. तथापि, नफ्यातील सहकारी संस्थांची संख्या त्या प्रमाणात वाढली नाही. याउलट, 1961 ते 2008 या काळात राज्यातील प्राथमिक स्तरावरील तोट्यातील खरेदी-विक्री सहकारी संस्था 70 वरून 592 पर्यंत वाढली. तर या संस्थांचा तोटा 2 लाखावरून रु. 9 कोटीपर्यंत वाढला. याच कालावधीत दुग्ध सहकारी संस्थांची संख्या लक्षणीय प्रमाणात वाढली. तथापि, खाजगी क्षेत्राशी तुलना करता प्राथमिक दुग्ध सहकारी संस्थांची कार्यपद्धती व व्यवस्थापन अपेक्षित प्रमाणात सुधारले नाही. त्यामुळे गेल्या 20 वर्षात राज्यातील खेडेपातळीवर कार्य करणाऱ्या दुग्ध सहकारी संस्थांची संख्या व सभासद संख्या वाढूनही दुग्ध व दुग्धजन्य पदार्थांचे व्यवहार वाढू शकले नाहीत. येथे एक बाब प्रकर्षाने लक्षात घ्यावी लागते, ती म्हणजे सहकारी संस्थांच्या संख्यात्मक वाढीवर केवळ भर न देता या संस्थांचा गुणात्मक दर्जा कसा सुधारता येईल याकडे दुग्ध सहकारी संस्थांच्या व्यवस्थापनाने लक्ष देणे गरजेचे आहे. सहकारी साखर कारखानदारीमुळे 1960 नंतर महाराष्ट्राच्या ग्रामीण भागाचा कायापालट झालेला आहे. तथापि, आर्थिक सुधारणा काळात सहकारी साखर कारखाने अनेक गंभीर आर्थिक समस्यांना तोंड देत आहेत. आज महाराष्ट्रातील ऊस उत्पादक शेतकरी, साखर कामगार, व्यवस्थापन व शासकीय धोरण या सर्व घटकांमध्ये सहकारी साखर कारखानदारीने प्रश्नचिन्ह उभे केले आहे. राज्यातील सहकारी साखर कारखानदारीचे आजारपण केवळ तात्पुरत्या मलमपट्टीने दूर होणार नाही. त्यासाठी मूलभूत स्वरूपाचे व ठोस उपाय योजण्याची आवश्यकता आहे.

1981 नंतर महाराष्ट्रात सहकारी सूत गिरण्यांची संख्या जरी वाढली तरी त्या प्रमाणात नफ्यातील सूत गिरण्यांची संख्या वाढू शकली नाही. मार्च 2008 मध्ये राज्यात कार्यरत असलेल्या 173 सहकारी सूत गिरण्यांपैकी केवळ 27 गिरण्या नफ्यात; तर 50 गिरण्या तोट्यात कार्य करीत होत्या. ही बाब जागतिकीकरणाच्या आजच्या काळात सहकार क्षेत्रास आव्हानात्मक आहे. याचा आपणास विसर पडता कामा नये. महाराष्ट्रात ग्रामीण विकासाच्या दृष्टीने 1971 नंतर सहकारी तत्त्वावर तेलगिरण्या सुरू करण्यात आल्या. मात्र त्यांची प्रगती अत्यंत मंद आहे. ग्रामीण भागात रोजगार निर्मिती व उत्पादकाच्या दृष्टीने तेल गिरण्यांचा विकास आजही पोषक ठरेल असे वातारवण आहे. मात्र त्यासाठी सहकारावर निष्ठा असणाऱ्या व्यक्तींनी सहकाराच्या विकासासाठी झटणे आवश्यक आहे. सहकारी भात गिरण्यांची प्रगती देखील सहकारी तेलगिरण्यांसारखीच जाणवते. बहुतांशी भातगिरण्या या कोकण व मुंबई विभागात कार्यरत आहेत की, ज्या प्रदेशात सहकारी चळवळ

आजही बाल्यावस्थेत आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार आहे. वरील सर्व सहकारी संस्थांच्या 1960 नंतरच्या प्रगतीचे सिंहावलोकन करताना एक बाब प्रकर्षाने जाणवते, ती म्हणजे राज्यात सहकारी चळवळ संख्यात्मकदृष्ट्या वाढली आहे. मात्र सहकारी चळवळीचा गुणात्मक दर्जा घसरत आहे. परिणामी जागतिकीकरणाच्या रेट्यात सहकारी चळवळीचे सामर्थ्य टिकवून ठेवणे हे आव्हानात्मक व अत्यंत गरजेचे आहे.

### 5. सहकारी चळवळ व महाराष्ट्राचा आर्थिक विकास :

महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीबरोबरच सहकारी चळवळ विकसित होत गेलेली दिसून येते. आज देशात महाराष्ट्र हे सहकारी चळवळीच्या माध्यमातून नावलौकिक प्राप्त झालेले घटक राज्य मानले जाते. 1960-61 नंतर राज्याच्या ग्रामीण आर्थिक परिवर्तनात सहकारी चळवळीचे योगदान महत्त्वपूर्ण ठरले आहे. महाराष्ट्रात गेल्या 50 वर्षात सहकारी पत पुरवठा चळवळ, सहकारी सूत गिरण्या, सहकारी साखर कारखाने, दुग्ध सहकारी संस्था व इतर प्रक्रिया संस्थांचा विकास झाल्यामुळे अर्थव्यवस्थेला बळकटी आली आहे. महाराष्ट्राच्या सर्वांगीण आर्थिक विकासात सहकारी चळवळीचे योगदान पुढीलप्रमाणे विशद करता येईल.

**अ) कृषी विकास :** कृषी विकास हा महाराष्ट्राच्या आर्थिक व औद्योगिक विकासाचा मूलाधार आहे. राज्यातील शेतीच्या व शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नतीसाठी सहकारी पत पुरवठा संस्था, सहकारी सूतगिरण्या, सहकारी साखर कारखाने, शेतमाल प्रक्रिया संस्था, दुग्ध उत्पादक संस्था इ.चे योगदान उत्पादन, उत्पन्न व रोजगाराच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरले आहे. इतकेच नव्हे, तर राज्यातील शेती व्यवसायासाठी आदान सामुग्री (बी-बियाणे, खते, औषधे, अवजारे, जलसिंचन सुविधा इ.) उपलब्ध करून देण्याचे काम सहकारी संस्थांनी केले आहे. परिणामी पश्चिम महाराष्ट्रात साखर कारखानदारीच्या विकासातून ग्रामीण, आर्थिक व सांस्कृतिक क्षेत्रात आमूलाग्र बदल घडून आला आहे.

**ब) पायाभूत सुविधांची निर्मिती :** महाराष्ट्रात 1960-61 नंतर सहकारी संस्थांच्या प्रयत्नातून शिक्षण, आरोग्य, पाणी पुरवठा, रस्ते इत्यादी क्षेत्रात विविध प्रकारच्या सुविधा निर्माण झाल्या आहेत. यामध्ये प्रामुख्याने सहकारी साखर कारखान्यांनी निर्माण केलेल्या शैक्षणिक सुविधा, बँक विषयक सुविधा, रस्ते इत्यादी पायाभूत सुविधांचा उल्लेख करावा लागेल. राज्याच्या आर्थिक विकासास पोषक अशा सुविधांवर सहकारी संस्थांनी भर दिल्यामुळेच व ग्रामीण व शहरी भागातील गरजू व दुर्बल सभासदांच्या राहणीमानात सुधारणा झाली आहे. शासकीय कर्ज वा खाजगी उपक्रमांद्वारे अशा प्रकारच्या सुविधा पुरेशा प्रमाणात निर्माण करता येणे अशक्य आहे.

**क) रोजगार संधी :** वाढत्या लोकसंख्येबरोबर बेरोजगार व्यक्तींच्या संख्येत वाढ होत जाते. राज्यात गरजू बेरोजगार व्यक्तींची वाढती संख्या विचारात घेऊन विविध प्रकारच्या सहकारी संस्थांनी रोजगारांची उपलब्धता करून दिल्या आहेत. विशेषत: सहकारी पत पुरवठा संस्था व

बँका, सहकारी साखर कारखाने, सहकारी दुग्ध व्यवसाय, सहकारी सूत गिरण्या व प्रक्रिया सहकारी संस्थांचे रोजगार निर्मितीत योगदान महत्त्वपूर्ण ठरले आहे. राज्यातील क्रियाशील स्वरूपाच्या एका सहकारी साखर कारखान्यात सुमारे 3000 व्यक्तींना प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगार मिळतो.

**ड) शैक्षणिक विकास :** शैक्षणिक सुविधांची निर्मिती हा कोणत्याही घटक राज्याच्या सर्वांगीण आर्थिक विकासाचा एक सर्वांगीण निकष मानला जातो. महाराष्ट्रात सहकारी साखर कारखानदारीने 1980 नंतरच्या दशकात अभियांत्रिकी, वैद्यकीय, कला, वाणिज्य व विज्ञान, कृषी महाविद्यालये स्थापन करून शैक्षणिक संकुले निर्माण केली आहेत. इतकेच नव्हे, तर सहकारी साखर कारखान्यांनी अलीकडील काळात साखर उद्योगातील असंघटीत कामगारांच्या मुलांसाठी सुरू केलेल्या साखर शाळा ग्रामीण आर्थिक व सामाजिक परिवर्तनाच्या दृष्टीने अधिक महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहेत. अशा प्रकारे महाराष्ट्रात शैक्षणिक विकास घडवून सहकारी संस्थांनी दुर्बल घटकांना आर्थिक उन्नतीचा मार्ग दाखविला आहे.

**इ) बचत संकलन :** महाराष्ट्रात सहकारी पत पुरवठा संस्था व सहकारी बँकांच्या संख्येतील वाढीबरोबर सभासद संख्येत वाढ झाल्यामुळे राज्य च्या ग्रामीण व शहरी भागातील अल्प उत्पन्न गटातील लोकांना बचतीची सवय लागली आहे. या दृष्टीने गेल्या काही वर्षात राज्यातील कृषी, बिगर कृषी पत पुरवठा सहकारी संस्था, नागरी सहकारी बँका व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांनी ठेवी जमा करण्यात चांगली प्रगती केली आहे. उदा. 2007 मध्ये सोलापूर जिल्हा औद्योगिक सहकारी बँकेने 20.50 कोटी रुपयांच्या ठेवी जमा केल्या होत्या. तर याच वर्षी राज्यातील प्राथमिक कृषी पत संस्थांनी 145.97 कोटी रुपयांच्या ठेवी गोळा केल्या होत्या. म्हणजेच महाराष्ट्रात सहकारी बँक व्यवसायाने सभासदांना बचतीची सवय लावून आर्थिक विकास करण्यास प्रवृत्त केले आहे. ही बाब सहकारी चळवळीच्या आर्थिक स्वावलंबनास पोषक अशी मानता येईल.

अशा प्रकारे महाराष्ट्रात सहकारी चळवळीचे ग्रामीण व शहरी भागात उल्लेखनीय कार्य केले आहे. आज राज्यात सहकारी खरेदी-विक्री संस्था, दुग्ध सहकारी संस्था, नागरी सहकारी पत संस्था, सहकारी ग्राहक भांडारे, गृहनिर्माण सहकारी संस्था, मच्छिमार सहकारी संस्था व श्रमिकांच्या सहकारी संस्थांनी ग्रामीण व शहरी भागातील गरजू व्यक्तींना अर्थसाहाय्याचा आधार देऊन उन्नतीस हातभार लावला आहे. राज्याच्या विविध जिल्ह्यातील बहुतांशी सहकारी संस्थांमध्ये संख्यात्मक वाढीबरोबर जरी काही गुणात्मक दोष निर्माण झाले असले तरी त्याचा महाराष्ट्राच्या सर्वसामान्य जनतेस अधिक प्रमाणात लाभ झाला आहे. ग्रामीण भागात सहकाराच्या माध्यमातून संघटन कौशल्य, कृषी विकास, कृषी पूरक व्यवसाय वाढीस प्रेरणा व रोजगार वृद्धीच्या बाबतीत अनुकूल बदल घडून येत आहेत. ही बाब सहकारी चळवळीचे ग्रामीण विकासातील योगदान स्पष्ट करते.

**6) महाराष्ट्राच्या सहकारी चळवळीतील प्रादेशिक असमतोल :**

महाराष्ट्रात 1960 पासून सहकारी चळवळीने

ग्रामीण व शहरी भागाचे आर्थिक परिवर्तन घडवून आणले आहे. 1960 ते 1980 पर्यंत महाराष्ट्रात सहकारी साखर कारखाने व सहकारी बँक व्यवसायाने नेत्रदीपक प्रगती केली. तथापि, या चळवळीच्या विकासात प्रादेशिक असमतोल सुरुवातीपासूनच निर्माण झालेला दिसून येतो. राज्यात सहकारी चळवळीच्या विकासाचे मुंबई, कोकण, नाशिक, पुणे, कोल्हापूर, औरंगाबाद, लातूर, अमरावती व नागपूर असे 9 विभाग कार्यरत आहेत. या सर्व विभागामध्ये सहकारी संस्थांच्या संख्येत, सभासद संख्येत व क्षेत्रीय स्वरूपाचे असे तीन प्रकारचे असमतोल आढळून येतात. सहकारी चळवळ ही महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासात महत्त्वपूर्ण ठरली असली तरी या संस्थांच्या प्रादेशिक असमतोलातून राज्यात प्रादेशिक असमतोलाचा प्रश्न निर्माण झालेला आहे. गेल्या 4 वर्षात महाराष्ट्रातील 9 सहकारी विभागातील सहकारी संस्थांच्या संख्येतील प्रादेशिक असमतोल कोष्टक क्रमांक 2 मध्ये दर्शविला आहे.

**कोष्टक क्रमांक 2**

**महाराष्ट्राच्या सहकारी चळवळीच्या प्रगतीतील प्रादेशिक असमतोल**

| अ. क्र. | विभाग | सहकारी संस्थांची एकूण संख्या | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | 2005 | 2006 | 2007 | 2008 |
| 1. | मुंबई | 24,181 | 25,134 | 26,832 | 28,188 |
| 2. | कोकण | 29,224 | 31,164 | 32,790 | 34,601 |
| 3. | नाशिक | 30,116 | 30,547 | 31,941 | 31,513 |
| 4. | पुणे | 29,008 | 30,957 | 31,800 | 32,638 |
| 5. | कोल्हापूर | 23,618 | 24,269 | 24,976 | 24,531 |
| 6. | औरंगाबद | 10,955 | 11,433 | 11,939 | 12,284 |
| 7. | लातूर | 15,965 | 16,548 | 16,975 | 17,175 |
| 8. | अमरावती | 9,852 | 10,624 | 11,347 | 11,717 |
| 9. | नागपूर | 11,461 | 12,121 | 12,740 | 13,106 |
| | **एकूण** | **1,84,390** | **1,92,797** | **2,00,740** | **2,05,753** |

संदर्भ : महाराष्ट्रातील सहकारी चळवळ – एका दृष्टिक्षेपात, 2005, 2006, 2007 आणि 2008

कोष्टक क्रमांक 2 वरून महाराष्ट्रातील सहकारी चळवळीच्या विकासात सहकारी संस्थांच्या संख्येतील गेल्या 4 वर्षांची विभागवार स्थिती स्पष्ट होते. गेल्या 3 वर्षात मुंबई, कोकण, पुणे व नाशिक या विभागात सहकारी संस्थांची प्रगती तुलनेने अधिक झालेली दिसून येते. मात्र नागपूर, अमरावती व औरंगाबाद विभागात सहकारी संस्थांच्या संख्येत तुलनेने फारशी वाढ झालेली नाही. विशेषत: मुंबई, पुणे व पश्चिम महाराष्ट्रात गेल्या 4 वर्षात सहकारी संस्थांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली. मात्र मराठवाड्यातील अमरावती, नागपूर व लातूर विभागात तुलनेने ती वाढली नाही. याचे प्रमुख कारण आपणास असे सांगता येईल की, राज्यात सहकारी चळवळीच्या विकासातील प्रादेशिक असमतोल हा प्रामुख्याने सहकारी चळवळीच्या सुजाण नेतृत्वाचा अभाव हे होय. महाराष्ट्रासारख्या सहकारी क्षेत्रात विकसित असलेल्या घटक राज्यात सहकार खाते व राज्य सरकार यांनी सहकारी चळवळीच्या समतोल विकासासाठी पुढाकार घेण्याची आवश्यकता आहे. तरच राज्यातील सहकारी चळवळ 21 व्या शतकातील आव्हाने पेलू शकेल व समाजातील दुर्बल घटकांना न्याय देऊ शकेल असे वाटते.

महाराष्ट्राच्या सहकारी चळवळीत निर्माण झालेला प्रादेशिक असमतोल तीन प्रकारचा आहे. पहिला प्रकार सभासदांतर्गत असमतोलाचा असून यामध्ये विविध प्रकारच्या सहकारी संस्थांची सभासद संख्या वेगवेगळी दिसून येते. राज्यात सहकारी साखर कारखान्यांच्या सभासद संख्येच्या तुलनेने सहकारी ग्राहक भांडारांची सभासद संख्या कमी असल्याचे जाणवते. दुसरा असमतोल क्षेत्रीय स्वरूपाचा असून तो राज्यांच्या वेगवेगळ्या विभागात कार्यरत असलेल्या सहकारी संस्थांच्या संख्येतून स्पष्ट होतो. तिसरा असमतोल हा राज्याच्या विविध भागात विविध प्रकारच्या सहकारी संस्थांच्या अपुऱ्या संख्येतून स्पष्ट होतो. सहकारी चळवळीत आढळून येणाऱ्या प्रादेशिक असमतोलाबरोबरच शासनाकडून सहकारी संस्थांना मिळणाऱ्या अनुदानविषयक सूत्रात आर्थिक सुधारणा काळात झालेला बदल सहकारी चळवळीच्या विकासात अडथळे निर्माण करीत आहे. सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे 1961 नंतर राज्यात सहकारी चळवळीची संख्यात्मक वाढ होऊनही सहकाराची तात्विक बैठक व व्यवहाराच्या बाबतीत सहकारी व्यवस्थापनात अनेक दोष आढळून येतात. महाराष्ट्रासारख्या पुरोगामी विचाराच्या घटक राज्यात सहकाराच्या विकासात सुयोग्य शासकीय धोरण राबविण्याची नितांत आवश्यकता वाटते. त्याचप्रमाणे राज्यात सध्या अस्तित्वात असलेल्या विविध प्रकारच्या सहकारी संस्थांनी आपल्या आर्थिक व्यवहारांची हिशेब तपासणी व पर्यवेक्षणाच्या बाबतीत जागरूक असणे गरजेचे आहे. मुक्त अर्थव्यवस्थेच्या सध्याच्या युगात सहकारी चळवळीचे लाभ खऱ्या अर्थाने दुर्बल घटकापर्यंत पोहोचविण्यासाठी सहकारी संस्थांचे सभासद व व्यवस्थापन यांनी साकल्याने विचार करण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी "विना सहकार नहीं उद्धार" हे घोष वाक्य प्रत्यक्ष अंमलात आणावे लागेल.

7) **निष्कर्ष :**

महाराष्ट्राच्या आर्थिक विकासाचे सिंहावलोकन करताना सहकारी चळवळीची भूमिका ही अत्यंत महत्त्वपूर्ण ठरली आहे. 1961 पासूनच्या महाराष्ट्र राज्याच्या आर्थिक विकासाचा आढावा घेताना सहकारी चळवळीने पार पाडलेली भूमिका निष्कर्ष रूपाने आपणास पुढीलप्रमाणे सांगता येईल.

1. महाराष्ट्र राज्याच्या सामाजिक व आर्थिक विकासाबरोबर राज्यात सहकारी संस्थांची संख्याही वाढली. 1960-61 ते 2008-09 या काळात राज्यातील सहकारी संस्थांच्या एकूण संख्येत 31,565 वरून 2,12,344 पर्यंत वाढली.
2. राज्याच्या कृषी विकासात सहकारी पत पुरवठा संस्था, सहकारी बँका व बिगर कृषी सहकारी पत संस्थांचा आणि बँकांचा वाटा महत्त्वाचा ठरला आहे.
3. 1960-61 नंतर महाराष्ट्राच्या कृषी-औद्योगिक विकासात सहकारी साखर कारखाने, सहकारी सूत गिरण्या, दुग्ध सहकारी संस्था, गृहनिर्माण सहकारी संस्था व सहकारी खरेदी-विक्री संस्थांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे.
4. महाराष्ट्राच्या आर्थिक विकासात सहकारी साखर कारखाने, सहकारी बँक व्यवसाय व खरेदी-विक्री सहकारी संस्थांनी रोजगार निर्मितीत मोलाचे योगदान दिले आहे.
5. राज्याच्या आर्थिक विकासात सहकारी संस्थांच्या वाढत्या संख्येबरोबर शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रात गेल्या काही वर्षात महत्त्वपूर्ण बदल घडून आले आहेत.
6. महाराष्ट्राच्या सहकारी चळवळीचा विकास सर्व विभागात समतोल प्रमाणात झालेला नाही. मुंबई, कोकण, नाशिक, पुणे व कोल्हापूर हे विभाग सहकारी संस्थांच्या विकासातील पुढारलेले आहेत. तर लातूर, अमरावती, नागपूर व औरंगाबाद विभागात सहकारी संस्थांची संख्या तुलनेने कमी आहे. परिणामी राज्याच्या प्रादेशिक असमतोलाचा प्रश्न अधिकाधिक गंभीर बनत चालला आहे. ही बाब पुरोगामी विचाराच्या महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने भूषणावह नाही असे वाटते.
7. सहकारी संस्थांच्या प्रादेशिक असमतोलात राज्यात विविधता आढळून येते. 31 मार्च 2008 अखेर राज्यात कार्यरत असलेल्या 2,05,753 सहकारी संस्थांपैकी एकट्या कोकण विभागातील सहकारी संस्थांची संख्या 34,601 म्हणजेच 16.18% इतकी आहे. तर मुंबई विभागात ती 28,188 (13.80%) इतकी आहे. कोकण विभागात कार्यरत असलेल्या 34,601 संस्थांपैकी, 24,245 सहकारी संस्था (70%) एकट्या ठाणे जिल्ह्यात आहेत. येथे सहकारी संस्थांच्या प्रादेशिक असमतोलाबाबत आणखी एक बाब प्रकर्षाने जाणवते ती म्हणजे, कोकण व मुंबई विभागात राज्याच्या इतर विभागांच्या तुलनेने सहकारी संस्थांची संख्या जरी अधिक असली तरी यामध्ये

गृहनिर्माण सहकारी संस्थांचा हिस्सा सर्वाधिक आहे.

8. 31 मार्च 2008 अखेर मुंबई विभागात कार्य करणाऱ्या 28,188 सहकारी संस्थापैकी 20,012 संस्था (70.99%) या गृहनिर्माण सहकारी संस्था होत्या. याचाच अर्थ मुंबई व कोकण विभागात सहकारी संस्थांची उभारणी करताना स्थानिक, नैसर्गिक व मानवनिर्मित साधनसंपत्तीचा पुरेपूर वापर करण्याच्या दृष्टीने पत पुरवठा, खरेदी–विक्री, प्रक्रिया इत्यादी प्रकारच्या सहकारी संस्थांचा विकास अपेक्षित प्रमाणात झालेला दिसून येत नाही. त्यामुळेच कोकण विभागाचे आर्थिक मागासलेपण प्रकर्षाने दृष्टोत्पत्तीस येते.

9. राज्याच्या सहकारी चळवळीतील प्रादेशिक असमतोलाची कारणे सर्वसामान्य असून यामध्ये शासकीय धोरण, सुयोग्य नेतृत्व, सहकारांतर्गत सहकाराचा अभाव, सहकार तत्वे व व्यवहाराबाबतची सभासदांची अनिभिज्ञता, सभासदांची निष्क्रियता इत्यादी घटकांचा समावेश करावा लागेल.

10. 1991 नंतर राज्यात व देशात नव्या आर्थिक धोरणाचा प्रभाव पडत आहे. गेल्या 20 वर्षात सहकारी चळवळीकडे बघण्याचा शासकीय दृष्टिकोन बदलला आहे. परिणामी जागतिकीकरण व आर्थिक उदारीकरणाच्या काळात बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या उत्पादनांपुढे सहकारी संस्था कमकुवत ठरत आहेत. ही बाब राज्यातील सहकारी नेतृत्व, शासन व सहकारी व्यवस्थापनाने प्रकर्षाने ध्यानात घ्यावयास हवी.

11. महाराष्ट्रातील उपलब्ध नैसर्गिक संसाधने व मानवी साधनसंपत्तीचा विचार करता सहकारी चळवळीचा विकास घडवून आणण्यास
अद्यापी वाव आहे.

12. राज्यात कृषी क्षेत्र हे महत्त्वपूर्ण क्षेत्र असल्याने सहकारी संस्थांची कृषी विकासातील व ग्रामीण विकासातील भूमिका महत्त्वाची असून त्यादृष्टीने शेती व शेतीपूरक उद्योगात सहकारी संस्थांचा विकास घडवून आणल्यास महाराष्ट्राचा आर्थिक विकास आणखी उंचावेल.

13. महाराष्ट्रातील सहकारी संस्थांमधील विविध प्रकारचा प्रादेशिक असमतोल दूर केल्यास सहकारी संस्थांची मुक्त अर्थव्यवस्थेतील स्पर्धात्मकता निश्चितपणे वाढू शकेल.

14. राज्याच्या ग्रामीण विकासात 1960-61 पासून सहकारी क्षेत्राने बजावलेली कामगिरी विचारात घेता सध्या सहकार क्षेत्राच्या विकासासाठी सुयोग्य शासकीय धोरण व सहकारांतर्गत सहकार या तत्त्वांचा काटेकोर अंमलबजावणीची नितांत आवश्यकता आहे.

15. महाराष्ट्राचा भविष्यकालीन ग्रामीण व शहरी विकास साध्य करण्यासाठी ''विना सहकार नहीं उद्धार'' या सहकाराच्या घोषवाक्याची जाणीवपूर्वक अंमलबजावणी करण्यासाठी राज्य सरकार व सहकाराशी संबंधित सर्व घटकांनी व्यापक प्रयत्न करण्याची

आवश्यकता आहे.

**संदर्भ सूची :**


1. महाराष्ट्राची आर्थिक पाहणी, 2009-10, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई.
2. पाटील जे एफ. (संपादक), सुवर्ण महोत्सवी महाराष्ट्राची बदलती अर्थव्यवस्था, मे 2010, सकाळ पेपर्स प्रकाशन, पुणे.
3. महाराष्ट्रातील सहकारी चळवळ - एका दृष्टिक्षेपात, सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे 411 001; 2005, 2006, 2007 व 2008.
4. घाटगे व वावरे, भारतीय अर्थव्यवस्था, निराली प्रकाशन पुणे, प्रथम आवृत्ती,जून 2010.
5. सातारा जिल्हा उपनिबंधक कार्यालय, सातारा.
6. Economic Survey of 2009-10, Govt. of India, Oxford Publication, Mumbai.


●●●

---

## मातोश्री बयाबाई श्रीपतराव कदम महिला ग्रंथ पारितोषिक

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या वतीने महिला लेखिकेने लिहिलेल्या सर्वोत्कृष्ट अर्थशास्त्रीय संदर्भ ग्रंथास रु. 11,000/- व शाल, श्रीफळ, साडी, सन्मानपत्र, मानचिन्ह देण्यात येते. 1 जानेवारी, 2010 ते 31 डिसेंबर, 2010 या कालावधीत प्रसिद्ध झालेल्या मराठीतील अर्थशास्त्रीय संदर्भ ग्रंथांच्या महिला लेखिका यांना स्पर्धेत सहभागी होता येईल. स्पर्धेचे नियम व अटी इत्यादींसाठी डॉ. अनिल सूर्यवंशी, कार्यवाह - खजिनदार, मराठी अर्थशास्त्र परिषद, 'गोदाई' शिवशक्ती मैदानाजवळ, शिवाजी नगर, बार्शी, जि. सोलापूर - 413 411 (मो.) 8805691406 यांच्याशी संपर्क साधावा. विहित नमुन्यातील अर्ज, संबंधित ग्रंथाच्या 4 प्रती सह कार्यवाहांकडे दि. 31 ऑगस्ट, 2011 पर्यंत पाठवाव्यात.

●●●

**अनिल सूर्यवंशी**
कार्यवाह - खजिनदार
मराठी अर्थशास्त्र परिषद

# भारतातील बेरोजगारी व शासकीय धोरण-एक चिकित्सा

राहुल शं.म्होपरे
देवचंद कॉलेज अर्जुननगर
भ्रमणध्वनी : 9923879020

**1. प्रास्ताविक :**

भारतीय आर्थिक नियोजनाचे बेरोजगारीचा दर सातत्याने कमी करणे हे एक प्रमुख उद्दिष्ट आहे. काम करण्याची इच्छा व पात्रता असलेल्या प्रत्येक व्यक्तीला रोजगार मिळावा हे प्रत्येक देशाचे आर्थिक,सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक उद्दिष्ट असते. भारताच्या दृष्टिकोनातून विचार केल्यास बेरोजगारीचा प्रश्न हा एक भारतीय अर्थव्यवस्थे समोरील प्रमुख प्रश्न आहे. आजही भारत हा मोठ्या प्रमाणात शेतीवरच अवलंबून आहे. शेतीमध्ये बेकारीचे,हंगामी बेकारीचे प्रमाण मोठे असते. आज भारतातील प्रती एक हजार रोजगारामध्ये शेती,जंगल व मत्स्यमारी क्षेत्रात सरासरी455 (ग्रामीण-576,शहरी-99) एवढा प्रचंड रोजगार आहे.त्यामुळे जोपर्यंत उद्योग,सेवा क्षेत्र व इतर क्षेत्रांमध्ये रोजगारांच्या संधी उपलब्ध होत नाहीत. तसेच ग्रामीण भागाच्या विकासास पूरक अशा नव्या सर्व समावेशक रोजगार योजना निर्माण होत नाहीत तो पर्यंत बेरोजगारीचा प्रश्न सुटणे कठीण आहे. अलीकडेच देशाचे अर्थमंत्री श्री.प्रणव मुखर्जी यांनी असे विधान केले आहे की, देशातील सामाजिक विकास योजनांच्या यशस्वीतेसाठी रोजगार निर्मिती मोठ्या प्रमाणात केली जाईल.''वाढती लोकसंख्या,अयोग्य शिक्षण व्यवस्था,भांडवल प्रधान उत्पादन तंत्राचा स्वीकार अशा अनेक कारणांनी भारतात बेरोजगारीची स्थिती गंभीर होत चालली आहे. प्रस्तुत लेखात भारतातील बेरोजगारीचे व त्या विरोधात शासनाने राबविलेल्या धोरणांचे चित्र वाचकांसमोर थोडक्यात मांडण्याचा प्रयत्न संशोधकाने केलेला आहे.

**उत्पादन तंत्र निवड व रोजगार –**

प्रचंड मोठ्या प्रमाणात असणाऱ्या बेकारांना वाढत्या वेगाने रोजगार उपलब्ध करून देणे ही अविकसित देशांची प्रमुख गरज असते.अशा

परिस्थितीत जलद विकास दराची गरज लक्षात घेता भांडवल प्रधान उत्पादन तंत्राची का श्रम प्रधान उत्पादन तंत्राची निवड करायची हा अत्यंत महत्वाचा यक्ष प्रश्न नियोजन कारांसमोर निर्माण होतो. ज्या उत्पादन तंत्रात भांडवलाच्या तुलनेत श्रमाचा अधिक वापर केला जातो त्याला श्रमप्रधान उत्पादन तंत्र तर याउलट ज्यामध्ये श्रमाच्या तुलनेत भांडवलाचा अधिक वापर केला जातो त्याला भांडवल प्रधान उत्पादन तंत्र असे म्हणतात. भारतासारख्या अतिरीक्त लोकसंख्या/ श्रमशक्ती असलेल्या देशात श्रमप्रधान व भांडवल प्रधान अशा दोन्ही उत्पादनतंत्रांचे मिश्रण वापरणे अत्यावश्यक आहे.

**जागतिक रोजगार स्थिती –**

जगातील जवळ जवळ सर्वच देशांना कमी जास्त प्रमाणात बेरोजगारीचा प्रश्न भेडसावत आहे.उपलब्ध आकडेवारीवरून असे दिसून येते की,10 वर्षापूर्वी म्हणजे 1998-99 च्या जागतिक रोजगार अहवालानूसार,1997 मध्ये अंदाजीत 6 अब्ज लोकसंख्येपैकी 3 अब्ज लोकसंख्येचा समावेश श्रमशक्तीत होता.160 दशलक्ष लोक पूर्णपणे बेकार होते.15 ते 24 वयोगटातील 60 दशलक्ष लोक रोजगाराच्या शोधात होते. विशेष म्हणजे या काळात कुशल व अकुशल मजुरांची अर्थव्यवस्थेतील मागणी मर्यादित होती.2005 मधील संख्यिकी लक्षात घेता असे दिसते की, या वर्षात जगातील 191.8 दशलक्ष लोक बेकार होते. एकूण श्रमशक्ती मधील बेरोजगारीचा दर 6.3% होता.1-37 अब्ज कामगारांचे उत्पन्न प्रती दिन 2 यू.एस.डॉलरपेक्षा देखील कमी होते. तर 520.1 दशलक्ष कामगारांचे प्रती दिन उत्पन्न 1 डॉलर पेक्षाही कमी होते. एकूण श्रमशक्तीपैकी शेती उद्योग व सेवा क्षेत्रात काम करणाऱ्या श्रमिकांचे जागतिक स्तरावरील प्रमाण अनुक्रमे 40.1%,21% व 38.9% होते. तर हेच प्रमाण भारतात अनुक्रमे 58.5%,18.1% व 23.4% होते.यावरून भारतातील शेती क्षेत्रातील पर्यायाने ग्रामीण भागातील श्रमिकांच्या संख्येची स्पष्ट कल्पना येते.

**भारतातील रोजगार स्थिती :-**

भारतातील रोजगार स्थिती लक्षात घेताना श्रमशक्ती संदर्भातील काही प्रमुख संकल्पना लक्षात घेणे गरजेचे आहे.यामध्ये श्रमशक्ती सहभाग दर LFPR कामगार लोकसंख्या प्रमाण (WPR), बेरोजगारप्रमाण (PU)आणि बेरोजगार दर इ मूलभूत संकल्पनांचा समावेश होतो.

(1)श्रमशक्ती सहभाग दर (Labour force Participation Rate) :

LFPR म्हणजे दर एक हजार लोकसंख्येमागे श्रमशक्तीमध्ये समाविष्ट असणाऱ्या लोकांचे प्रमाण होय.

$$LFPR = \frac{\text{No.of employed + No of unemployed persons}}{\text{Total Population}} \times 1000$$

(2) कामगार लोकसंख्या प्रमाण (Workers Population Ratio)

WPR म्हणजे दर हजारी लोकसंख्येमध्ये रोजगार प्राप्त कामगार लोकसंख्येचे प्रमाण होय.

$$WPR = \frac{\text{Number of employed persons}}{\text{Total Population}} \times 1000$$

(3) बेरोजगार प्रमाण (Proporation Unemployed) :

PU म्हणजे दर हजारी लोकसंख्येमागे बेरोजगार लोकसंख्येचे प्रमाण होय.

(4)बेरोजगार दर (Unemployment Rate)

UR म्हणजेदर हजारी श्रमशक्ती लोकसंख्येमध्ये (रोजगार प्राप्त +बेरोजगार)असणारे बेरोजगारांचे प्रमाण होय.

$$UR = \frac{\text{Number of unemployed persons}}{\text{Labour Fource}} X\ 1000$$

भारतात 2003 साली बेरोजगारीचा दर 8.80% होता व जगात भारताचा 110 वा क्रमांक होता.तोच दर 2010 साली 10.70% पर्यंत वाढून आज जगात भारताचा 122 वा क्रमांक आहे.

मार्च, 2010 अखेरचा दर हजारी सांखिकीय माहिती चा अंदाज तक्ता क्र.1 मध्ये दर्शवीला आहे.

**तक्ता क्र.1**

| दर्शक | दर्शक | | | शहरी | | | ग्रामीण+शहरी | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | पुरूष | स्त्री | व्यक्ती | पुरूष | स्त्री | व्यक्ती | पुरूष | स्त्री | व्यक्ती |
| LFPR | 539 | 176 | 365 | 534 | 129 | 340 | 538 | 163 | 359 |
| WPR | 492 | 150 | 329 | 503 | 111 | 314 | 495 | 140 | 325 |
| PU | 46 | 26 | 37 | 32 | 18 | 25 | 43 | 24 | 34 |
| UR | 87 | 148 | 101 | 59 | 138 | 73 | 80 | 146 | 94 |

आधार : Report on Employment & unemployment survey,Govt. of India, oct 2010 chapter IV - P.33.

उपरोक्त तक्त्यावरून असे निदर्शनास येते की, भारताच्या ग्रामीण भागचे प्रमाण सर्वच बाबतीत शहरी भागापेक्षा अधिक आहे व्यक्तीच्या अनुषंगाने विचार केला असता शहरी भागापेक्षा ग्रामीण भागात LFPR,WPR,PU व UR चे प्रमाण अनुक्रमे 7.35%,4.77%,48.0% व 38.36% नी अधिक असलेले दिसून येते, सांख्यिकीय माहिती अंदाजीत स्वरूपाची असलेने ग्रामीण + शहरी सरासरी संख्या जुळत नाहीत.

भारतातील कृती व लिंगनिहाय, ग्रामीण व शहरी भागातील व्यक्तींची मार्च 2010 अखेरची विभागणी तक्ता क्र.2 मध्ये दर्शविलेली आहे.

तक्ता क्र.2

| दर्शक | दर्शक | | | शहरी | | | ग्रामिण+शहरी | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | पुरूष | स्त्री | व्यक्ती | पुरूष | स्त्री | व्यक्ती | पुरूष | स्त्री | व्यक्ती |
| रोजगार | 534 | 163 | 356 | 538 | 117 | 335 | 534 | 151 | 351 |
| बेरोजगार | 51 | 28 | 40 | 34 | 19 | 27 | 46 | 26 | 36 |
| श्रम शक्तीत नसलेले | 415 | 809 | 604 | 428 | 864 | 638 | 420 | 823 | 613 |
| एकूण | 1000 | 1000 | 1000 | 1000 | 1000 | 1000 | 1000 | 1000 | 1000 |

आधार : Report on Employment & unemployment survey, Chapter IV - P.34

उपरोक्त तक्त्यावरून असे निदर्शनास येते की, ग्रामीण व शहरी भागात स्त्रियांपेक्षा पुरूषांची संख्या मोठ्या प्रमाणात अधिक आहे तर श्रमशक्तीत नसलेल्यांमध्ये स्त्रियांचे प्रमाण पुरूषांपेक्षा अधिक आहे. बेरोजगारीचा विचार केला असता शहरी भागापेक्षा ग्रामीण भागातील व्यक्तींमध्ये 48% नी अधिक बेरोजगारी आहे.

भारतातील बेरोजगारीचे मार्च 2010 अखेरचे प्रमाण लक्षात घेता ते 15 ते 59 या वयोगटामध्ये दर हजारी49 व्यक्ती (पुरूष – 61, स्त्रिया –35) एवढे होते.राज्यनिहाय विचार केला असता दर हजारी सर्वात कमी बेरोजगारी असणाऱ्या पहिल्या तीन राज्यांमध्ये अनुक्रमे दिलेली 6 व्यक्ती (पुरूष –9, स्त्रिया –2) चंदीगड 10 व्यक्ती (पुरूष – 10, स्त्रिया –5) व छत्तीसगड 22 व्यक्ती (पुरूष –31, स्त्रिया –11) या राज्यांचा क्रमांक लागतो तर सर्वाधिक बेरोजगारी असणाऱ्या राज्यामध्ये अनुक्रमे गोवा 157 व्यक्ती (पुरूष 165, स्त्रिया 149) झारखंड 146 व्यक्ती (पुरूष – 174, स्त्रिया –117)व बिहार 76 व्यक्ती (पुरूष – 115, स्त्रिया –31)या राज्यांचा क्रमांक लागतो. महाराष्ट्रात प्रती हजारी 35 व्यक ती (पुरूष – 35, स्त्रिया –36) बेरोजगार असल्याचे सांख्यिकीय माहितीवरून दिसून येते. श्रम शक्तीत पुरूषांचे प्रमाण अधिक असल्याने आपोआप बेरोजगारीत देखील पुरूषांचे प्रमाण स्त्रियांपेक्षा अधिक असलेचे दिसून येते.

**उत्पादकता, रोजगार वृध्दी व विकास :**

आर्थिक विकास, उत्पादकता व रोजगार वाढ हे तीनही घटक परस्परांशी मोठ्या प्रमाणात सहसंबंधीत आहेत. विशेषत: उद्योग व शेती क्षेत्रापेक्षा सेवा क्षेत्रात या तीनही घटकांमधील सहसंबंध अधिक असलेला दिसून येतो. भारताचा विचार केला.असता भारतातील श्रमिकांची उत्पादकता इतर विकसीत देशांच्या तुलनेत कमी असलेली दिसून येते. भारतातील श्रमिकांचे दरडोई उत्पादन प्रती दिन 3.5 डॉलर आहे. त्याचवेळी अमेरिका व इंग्लंड या देशातील श्रमिकांचे दरडोई उत्पादन अनुक्रमे 40.72 डॉलर व 30.92 डॉलर असल्याचे दिसून येते. विशेष म्हणजे जगात लोकसंख्येच्या बाबतीत पहिल्या क्रमांकावर असलेल्या चीनच्या श्रमिकांचे दरडोई उत्पादन देखील भारतापेक्षा थोडे अधिक म्हणजे 4.39 डॉलर

एवढे आहे. आजदेखील भारताच्या विविध क्षेत्रांतील तांत्रिक प्रगती ही एवढ्या मोठ्या प्रमाणात झालेली नाही की ज्या ठिकाणी रोजगार वाढीशिवाय आर्थिक वाढ होणे शक्य असते. त्यामुळे आजही भारतात उत्पादकता व रोजगार वाढीस आर्थिक विकास घडवून आणण्यास मोठा वाव आहे.

**रोजगार निर्मीती व शासकीय धोरण :**

स्वातंत्र्योत्तर काळात सुरूवातीपासूनच भारत सरकारने रोजगार निर्मितीसाठी विशेष प्रयत्न केल्याचे दिसून येते. रोजगार वाढीच्या नानाविध योजना केंद्र सरकार व राज्य सरकार यांचेमार्फत भारतात राबविल्याच्या दिसून येतात. शासनाच्या या सर्व प्रयत्नांचा अभ्यास आपण खालील मुद्यांच्या अनुषंगाने थोडक्यात लक्षात घेवू.

**अ)आर्थिक नियोजनातील रोजगार दृष्टिकोन:**

भारतीय नियोजनामध्ये प्रामुख्याने दिर्घकाळातील उत्पादन वाढीवर अधिक भर दिल्याचे दिसून येते.भारताच्या आर्थिक वाढीतील प्रमुख अडथळा म्हणजे श्रमापेक्षा भांडवली साधनांची असलेली कमतरता होय.म्हणूनच नियोजन काळात रोजगार संदर्भातील विशेष धोरण व स्वतंत्र प्रयत्न केल्याचे दिसून येत नाहीत. तर रोजगार परिस्थिती सुधारून आर्थिक वाढ घडवून आणण्यासाठी प्रयत्न केल्याचे दिसते. नियोजनाच्या सुरूवातीच्या काळात श्रमशक्तीच्या होणाऱ्या विस्ताराकडे समस्या म्हणून पाहिले गेले नव्हते. त्यामुळे पंचवार्षिक योजनांमध्ये रोजगार निर्मीती हा एक विकास प्रक्रियेचाच भाग आहे. असे समजून बघितले गेले.. रोजगार निर्मितीकडे ध्येय म्हणून पाहिले गेले नाही.

**ब) भारतातील रोजगार नियोजन :**

भारतातील बेरोजगारीची समस्या सोडविण्यासंदर्भातील दृष्टिकोनंमध्ये वेळोवेळी बदल झालेले आहेत. नियोजन काळातील सुरूवातीच्या वर्षामध्ये स्थूल देशांतर्गत उत्पादनाच्या दरापेक्षा रोजगार वाढीचा दर फारत कमी होता. भारतात पडलेल्या तीव्र दुष्काळांमध्ये तसेच काही वर्षांच्या मान्सूनच्या अपयशामुळे अर्थव्यवस्थेत मोठ्या प्रमाणात बेरोजगारीची परिस्थिती निर्माण झाली होती. अशा काळात शासनाकडून रोजगार निर्मितीच्या विविध योजना सुरू केल्या गेल्या. तसेच जुन्या योजनांची पुर्नबांधणी केली गेली. अशाप्रकारे रोजगार निर्मिती हे ध्येय ठेवून त्यासाठी विशेष प्रयत्न केले गेले. सत्तरच्या आणि ऐंशीच्या दशकात NREP व RLEGP सारख्या रोजगार योजना सुरू करण्यात आल्या. ज्याद्वारे सार्वजनिक कामांना प्राधान्य देवून त्याद्वारे/ गरिबांच्या स्वयंरोजगार व संयोजक वृत्तीला चालना देण्यात आली. साक्षर लोकांमधील वाढत चाललेली बेकारी हा देखील अलिकडील काळातील ज्वलंत प्रश्न निर्माण झाला आहे. शासनामार्फत बेरोजगारी विरोधात राबविण्यात आलेल्या विविध योजनांसंदर्भातील माहितीचा समावेश खालील मुद्यामध्ये करण्यात आलेला आहे.

**क) भारतातील रोजगार निर्मिती योजना :**

भारतातील वाढत्या दारिद्रयाचे व बेरोजगारीचे प्रमाण लक्षात घेवून शासनामार्फत गेल्या कित्येक वर्षापासून विविध योजना राबविल्या जात आहेत. ज्यामुळे रोजगार निर्मिती, उत्पादक

संपत्ती, तांत्रिक व संयोजन कौशल्यातील वाढ आणि गरीबांच्या उत्पन्न पातळीतील वाढ घडून येण्यास मदत होत आहे. शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या व आलेल्या काही प्रमुख रोजगार योजनांचा उल्लेख या ठिकाणी करणे गरजेचे आहे. राष्ट्रीय ग्रामीण रोजगार योजना ग्रामीण भूमिहीन रोजगार हमी योजना व जवाहर रोजगार योजना 1989, आश्वसित रोजगार योजना 1995, जवाहर ग्राम समृध्दी योजना 1999, संपूर्ण ग्रामीण योजना 2002 यासारख्या विविध योजनांचा समावेश होतो. स्वातंत्र्योत्तर ग्रामीण व शहरी भागासाठी ज्याप्रमाणे केंद्रामार्फत अनेक रोजगार योजना सुरू केल्या गेल्या तसेच राज्य शासनांमार्फत देखील विविध योजना सुरू केल्या गेल्या. या सर्व रोजगार योजनांचा कळस म्हणजे केंद्राने सुरू केलेला राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा 2005 हा होय. अलीकडे या कायद्याचे महात्मा गांधींच्या नावाने नामकरण केलेले आहे. या कायद्यान्वये ग्रामीण भागातील प्रत्येक कुटुंबाला वर्षातून किमान 100 दिवस रोजगार देण्याचे आश्वासन शासनाने दिलेले आहे. या कायद्याद्वारे मागेल त्याला काम दिले जाते. जगातील अशा प्रकारे मागेल त्याला काम पुरवणारी योजना राबविणारा भारत हा बहुधा एकमेव देश असावा. या कायद्याद्वारे 7 डिसेंबर 2010 पर्यंत 4.1 कोटी ग्रामीण कुटुंबांना रोजगार पुरविण्यात आला होता. या योजनेत अनुसुचित जाती 1 जमातींचा सहभाग 47% नी वाढला आहे. योजनेच्या प्रारंभापासून शासनाने या योजनेवर 12861 कोटी रू. खर्च केले आहेत. यापैकी 74677 कोटी रू. फक्त वेतनावर खर्च झाले आहेत सदर योजना अतिशय पारदर्शक स्वरूपाची आहे.

**समारोप :**

अशा प्रकारे स्वातंत्र्योत्तर काळातील भारताची रोजगार स्थिती व त्या अनुषंगाने शासकीय धोरणांचा विचार केला असता असे लक्षात येते की, विकसीत देशांच्या तुलनेत भारत रोजगाराबरोबरच श्रमशक्तीचे विविध पैलू पिछाडीवर आहेत परंतू ही बेरोजगारीची समस्या सोडविण्यासाठी सुरूवातीपासूनच शासन प्रयत्नशील आहे. तरीदेखील या प्रयत्नांमध्ये अजूनदेखील योग्य दिशेने वाढ होणे गरजेचे आहे. त्यासाठी शिक्षण व्यवस्थित योग्य तो बदल करणे, वेतन कायद्यामध्ये बदल करणे, वेतन कायद्यांमध्ये बदल करणे, कामगार सुविधांमध्ये वाढ करणे, संघटीत कामगारांप्रमाणे असंघटीत कामगारांना लाभ देणे, ग्रामीण भागांबरोबरच शहरी बेरोजगारीबाबत विशेष धोरण आखणे यासारख्या बाबींचा विचार प्राधान्याने व गांभीर्याणे करणे गरजेचे आहे असे वाटते.

**संदर्भ :**

1. Report on Employment and unemployment Survey 2010-Govt. of Indio, Ministry of Labour & Employment Chandigarh, Oct.2010, Chapter IV. P 36.
2. i) Ray P.K. PPT on "Employment, Unemployment and Training Issues, Director General of Employment & Training, Ministry of Labour and Employment, Govt.Of India.
   ii) www.globallshiksha.com/ Emplyment- and -Unemployment-Scenariv-In-India / UGC/

737257616179941.
3) www.indexmundi.com/india/ unemployment rate.html.
4) Report on Employment and unemployment Stat P.36
5) Ray P.K.
6) www.globalshiksha.com
7) दै.सकाळ-कोल्हापूर आवृत्ती दि.20/2/2011 पृ.3

**इतर संदर्भ ग्रंथ :**

1)Jeti Narindar K.(Edu.)-India : Manpower, Employment policy and labour welfare - 1947 to 2007, New century pubilication, new delhi.2006.
2) Kumar Ashok &Mamgain R.P.- Manpower Planing in India, criterian Publication, New Delhi. 1989.
3) Misra S.K. & Puri V.K.- Indian economy,Himalaya publishing House, New,Delhi.2008.
4) Singh V.B.An Introduction to the study of Indian Labour problems, Shiva Lal Agarwal & company,Agra, 1967.
5) खारोडे विनोद चिंतामणी- ''अकोला जिल्ह्यातील संपूर्ण ग्रामिण रोजगार योजनेच्या आर्थिक परिणामांचे आर्थशास्त्रीय अध्ययन'' पी.एच.डी. प्रबंध (अप्रकाशित), संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ,अमरावती, डिसेंबर 2005.

---

## मराठी अर्थशास्त्र परिषद
## अर्थसंवाद साठी अनुदान

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या विनंतीला प्रतिसाद देऊन महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई यांचेकडून अर्थसंवादच्या प्रकाशन खर्चासाठी 2010-2011 या वर्षाकरिता रुपये पंचवीस हजार अनुदान प्राप्त झाले आहे. या विशेष अनुदानाबद्दल मराठी अर्थशास्त्र परिषद महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळांची कृतज्ञ आहे.

**जगन्नाथ पाटील**

प्रमुख संपादक

# सातारा जिल्ह्यातील सौर ऊर्जा उपकरणांच्या घरगुती वापरासंबंधीच्या बाजारपेठेचे स्वॉट (SWOT) विश्लेषण

**उदय मारुती लोखंडे**
सद्गुरू गाडगे महाराज कॉलेज, कराड.
भ्रमणध्वनी : 9422033650

## 1. प्रस्तावना :

अपारंपारिक स्रोतातील सौर ऊर्जा ही अत्यंत महत्त्वाची असून मानव जातीला विकासासाठी एक नैसर्गिक देणगी आहे. कारण ही ऊर्जा सर्व जगभर कमी अधिक प्रमाणात उपलब्ध आहे. मानव कोणतेही नैसर्गिक संतुलन बिघडवू न देता आपले दैनंदिन जीवन सुखकर करण्यासाठी सौर ऊर्जेचा वापर करू शकतो. त्यामुळे क्षय होणारे कोळसा, लाकूड, गॅस, तेल, पेट्रोल, डिझेल इ. पारंपारिक ऊर्जा प्रकार विसरायला हरकत नाही. कारण आपण अपारंपारिक ऊर्जेची आर्थिक विकासातील जादूची करामत अनुभवू शकतो. सौर ऊर्जा अत्यंत पुरातन काळापासून वापरण्यात येत असली तरी 1970 पर्यंत शास्त्रीय स्वरूपात संशोधन व त्याचा वापर झालेला नव्हता. मात्र 1970 च्या दशकात पेट्रोलियम पदार्थांच्या किंमती वाढल्यामुळे अनेक देशांनी सौर ऊर्जेवर संशोधन व विकास करण्यास सुरुवात केली.

भारतीय अर्थव्यवस्था जगात अग्रेसर अर्थव्यवस्था समजली जाते. भारताचा आर्थिक विकासाचा दर सध्या 8.5% असून शाश्वत आर्थिक विकासासाठी देशातील नैसर्गिक साधन संपत्तीचा पर्याप्त वापर होणे आवश्यक आहे. उत्पादनासाठी आदानांमध्ये भांडवल, श्रम, कच्चा माल, तंत्रज्ञान या बरोबरच ऊर्जेला अनन्यसाधारण महत्त्व आहे. उद्योग, व्यवसाय, कारखाने, सेवा क्षेत्र, कृषि क्षेत्र व घरगुती वापरासाठी ऊर्जा हा उत्पादन घटक अनिवार्य आहे. सध्या भारतातील ऊर्जेची मागणी सातत्याने वाढत आहे. ऊर्जेच्या मागणीचा वृद्धी दर प्रति वर्षी 8 ते 9% आहे.

भारतामध्ये ऊर्जेची वाढती मागणी व ऊर्जेची कमी उपलब्धता यामध्ये मोठ्या प्रमाणात तफावत आहे. लाकूड, गॅस, पेट्रोलियम पदार्थ, कोळसा, अणुइंधन इ. स्रोतांचा वापर वाढती मागणी पूर्ण करण्यासाठी येतो पण ऊर्जा स्रोतांच्या साठ्यांची मर्यादा व उत्पादन खर्च यांचा विचार करता सौर ऊर्जा हा सहज व सर्वत्र उपलब्ध ऊर्जा स्रोत आहे. सौर ऊर्जा विविध उपकरणांद्वारे प्रत्यक्ष वापरता येते. उदा. सौर चूल, सौर ड्रायर, सौर दिवे, सौर कंदील, सौर बंब इ.

सातारा हा पश्चिम महाराष्ट्रातील आर्थिक, सामाजिक व औद्योगिकीकरणासाठी अग्रेसर जिल्हा म्हणून ओळखला जातो. या जिल्ह्याचे भौगोलिक स्थान दख्खनच्या पठारावरील असल्यामुळे सौर ऊर्जा प्रचंड प्रमाणात उपलब्ध आहे. उपलब्ध सौर ऊर्जेचा वापर सातारा जिल्ह्याच्या सर्वांगीण आर्थिक विकासासाठी करणे अत्यंत आवश्यक आहे. त्या दृष्टीने सातारा जिल्ह्यातील सौर उपकरणांच्या बाजारपेठेचा अभ्यास करणे आवश्यक वाटले.

**2. अभ्यासाची उद्दिष्टे :**

1. सातारा जिल्ह्यातील ऊर्जा वापराच्या पद्धती ओळखणे.
2. सातारा जिल्ह्यातील सौर उपकरणांच्या बाजारपेठेची शक्तीस्थान (strenght) कमकुवत बाजू (weaknesses), संधी (opportunities), आणि अडथळे (threats) यांना ओळखणे.

**3. अभ्यासाची व्याप्ती व मर्यादा :**

1. सदरचा अभ्यास हा सातारा जिल्ह्यातील 11 तालुक्यांचा आहे.
2. अभ्यासामध्ये केवळ सौर उत्पादनांच्या बाजारपेठेचा विचार केला आहे.

**4. अभ्यास पद्धती :**

**4.1 प्राथमिक माहिती मार्ग :**

प्राथमिक माहिती ही प्रत्यक्ष मुलाखती व प्रश्नावलीच्या आधारे जमा केलेली आहे. सातारा जिल्ह्याचा विचार करता असे लक्षात आले की, लोकसंख्या सर्व तालुक्यात सारख्या प्रमाणात विखुरलेली नाही. सर्व माहिती प्राथमिक स्वरूपात सारखी उपलब्ध व्हावी म्हणून खालील पद्धतींचा अवलंब केला आहे. अभ्यासाची व्याप्ती लक्षात घेता, संशोधकाने ठरवले की प्रत्येक तालुक्याची लोकसंख्या हीच नमुना निवडीसाठी आधार म्हणून वापरणे शास्त्रीय आहे.

**❋ निश्चित वाटा (Quota) नमुना पद्धत :**

प्रथमतः घरगुती सौर उपकरणे वापरणारे व न वापरणारे प्रत्येकी 250 असे एकूण 500 नमुना एकक निश्चित केले. (घरगुती वापर – जी उपकरणे स्वतःसाठी किंवा कुटुंबाच्या वापरासाठी आणली जातात.)

**❋ प्रमाणित नमुना (proportional) पद्धत :**

सर्व नमुना एककांना प्रमाणित हिस्सा मिळविण्यासाठी सर्व तालुक्यांची लोकसंख्या आधार मानून प्रमाणित नमुना पद्धत तालुक्यांना अवलंबली.

नमुना एकक खालील सुत्रानुसार निश्चित केले.

$$\text{तालुक्याची नमुना संख्या} = \frac{\text{तालुक्याची लोकसंख्या}}{\text{सातारा जिल्ह्याची एकूण लोकसंख्या}} \times \text{निश्चित वाटा नमुना}$$

**✲ सोईस्कर नमुना (Convenience) पद्धत :**

प्रतिसादक निवडताना सोईस्कर नमुना पद्धत वापरली.

**4.2 दुय्यम माहिती मार्ग :**

दुय्यम माहिती ही विविध पुस्तके, नियतकालिके, मासिके, वर्तमानपत्रे, विविध कंपन्यांचे वार्षिक अहवाल तसेच विविध शासकीय विभागांना भेटी देऊन जमा केली आहे.

**5. माहितीचे विश्लेषण व स्पष्टीकरण :**

सातारा जिल्ह्यातील सौर उपकरणांच्या बाजारपेठेतील मिळविलेल्या प्राथमिक माहितीचे विश्लेषण करून शक्तीस्थाने (Strengths), कमकुवत बाजू (Weaknesses), संधी (Opportunity) व अडथळे (Threats) यांना ओळखण्याचा प्रयत्न केला.

**कोष्टक क्र. 1 : विविध ऊर्जा साधनांचा वापर**

| ऊर्जा प्रकार | न वापरणारे | % | वापरणारे | % |
|---|---|---|---|---|
| रॉकेल | 115 | 46 | 72 | 28.8 |
| कोळसा | 10 | 4 | 0 | 0 |
| लाकूड | 73 | 29.2 | 38 | 15.2 |
| वीज | 250 | 100 | 250 | 100 |
| बायो गॅस | 3 | 1.2 | 1 | 0.4 |
| घरगुती गॅस | 235 | 94 | 250 | 100 |
| सौर | 0 | 0 | 250 | 100 |

संदर्भ : प्रत्यक्ष पाहणीवरून

दररोजच्या गरजा भागविण्यासाठी लोक विविध ऊर्जा साधनांचा वापर करतात. ही साधने म्हणजे रॉकेल, कोळसा, लाकूड, वीज, जैव इंधन, घरगुती गॅस व सौर ऊर्जा होय. कोष्टक क्र. 1 वरून हे स्पष्ट होते की, सौर ऊर्जा वापरणारे सौर ऊर्जा सोडून जास्तीत जास्त प्रतिसादक घरगुती गॅसच्या नंतर वीज, रॉकेल अशा ऊर्जांचा वापर करतात. तर सौर ऊर्जा न वापरणारे अनुक्रमे वीज, घरगुती गॅस व रॉकेलचा ऊर्जा म्हणून वापर करतात.

**कोष्टक क्र. 2 : स्वयंपाकासाठी वापरली जाणारी ऊर्जा साधने**

| ऊर्जा प्रकार | न वापरणारे | % | वापरणारे | % |
|---|---|---|---|---|
| रॉकेल | 19 | 7.6 | 5 | 2 |
| घरगुती गॅस | 236 | 94.4 | 250 | 100 |
| इलेक्ट्रीक भट्टी | 0 | 0 | 4 | 1.6 |
| सौर चूल | 0 | 0 | 31 | 12.4 |
| बायो गॅस | 0 | 0 | 0 | 0 |
| लाकूड | 22 | 8.8 | 9 | 3.6 |
| कोळसा | 4 | 1.6 | 0 | 0 |
| इतर | 1 | 0.4 | 1 | 0.4 |

संदर्भ : प्रत्यक्ष पाहणीवरून

अन्न शिजविण्यासाठी सौर उपकरणे वापरणारे व न वापरणारे घरगुती गॅसचा जास्तीत जास्त वापर करतात. सौर उपकरणे न वापरणारे अनुक्रमे लाकूड, रॉकेल आणि कोळसा यांचा पर्यायी ऊर्जा साधने म्हणून स्वयंपाकासाठी वापर करतात. केवळ 12.4% सौर उत्पादने वापरणारे सौर चुली स्वयंपाक करण्यासाठी वापरतात. यावरून असे स्पष्ट होते की सौर उपकरणे वापरणाऱ्यांमध्ये सौर चुलीचा वापरदेखील अत्यंत अल्प आहे.

**कोष्टक क्र. 3 : पाणी गरम करण्यासाठी वापरली जाणारी ऊर्जा साधने**

| ऊर्जा प्रकार | न वापरणारे | % | वापरणारे | % |
|---|---|---|---|---|
| रॉकेल | 51 | 20.4 | 33 | 13.2 |
| घरगुती गॅस | 119 | 47.6 | 29 | 11.6 |
| लाकूड/कोळसा | 70 | 28 | 15 | 6 |
| वीज | 26 | 10.4 | 10 | 4 |
| सौर बंब | 0 | 0 | 165 | 66 |
| इतर | 2 | 0.8 | 1 | 0.4 |

संदर्भ : प्रत्यक्ष पाहणीवरून

पाणी गरम करणे ही दैनंदिन समस्या असते. त्यासाठी जादा खर्च व वेळ द्यावा लागतो. पाणी गरम करण्यासाठी विविध ऊर्जा साधने रॉकेल, गॅस, लाकूड किंवा कोळसा, वीज इ. वापरली जातात. जास्तीत जास्त सौर उपकरणे न वापरणारे (47.6%) घरगुती गॅस वापरतात, तर 66% सौर ऊर्जा वापरणारे सौर बंब वापरतात. 20.4% सौर उपकरणे न वापरणारे आणि 13.2% वापरणारे रॉकेल वापरतात. सौर उपकरणे न वापरणारे प्रतिसादक पाणी गरम करण्यासाठी जास्तीत जास्त घरगुती गॅस किंवा रॉकेल वापरतात. सौर बंबाव्यतिरिक्त सौर उपकरणे वापरणारे हे रॉकेल, गॅस, लाकूड आणि वीज यावर अवलंबून आहेत मात्र ते विजेचा वापर इतर ऊर्जा साधनांचा विचार करता कमीत कमी करतात.

**कोष्टक क्र. 4 : सौर ऊर्जा उपकरणांबाबत माहिती**

| सौर उपकरणे | न वापरणारे | | | | | | वापरणारे | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | माहित आहे | % | थोडे माहित आहे | % | माहित नाही | % | माहित आहे | % | थोडे माहित आहे | % | माहित नाही | % |
| सौर चूल | 102 | 40.8 | 86 | 34.4 | 62 | 24.8 | 188 | 75.2 | 37 | 14.8 | 25 | 10 |
| सौर कंदील | 110 | 44 | 105 | 42 | 35 | 14 | 210 | 84 | 31 | 12.4 | 9 | 3.6 |
| घरगुती सौर दिवे | 73 | 29.2 | 105 | 42 | 72 | 28.8 | 180 | 72 | 33 | 13.2 | 37 | 14.8 |
| सौर पंप | 16 | 6.4 | 29 | 11.6 | 205 | 82 | 38 | 15.2 | 34 | 13.6 | 178 | 71.2 |
| सौर टोपी | 19 | 7.6 | 27 | 10.8 | 204 | 81.6 | 40 | 16 | 30 | 12 | 180 | 72 |
| सौर बंब | 103 | 41.2 | 105 | 42 | 42 | 16.8 | 209 | 83.6 | 30 | 12 | 11 | 4.4 |
| सौर मोबाईल | 17 | 6.8 | 33 | 13.2 | 200 | 80 | 47 | 18.8 | 31 | 12.4 | 172 | 68.8 |
| चार्जर इतर | 55 | 22 | 55 | 22 | 140 | 56 | 81 | 32.4 | 48 | 19.2 | 121 | 48.4 |

संदर्भ : प्रत्यक्ष पाहणीवरून

बाजारपेठेमध्ये विविध ऊर्जा उपकरणे उपलब्ध आहेत. उदा. सौर चूल, सौर कंदील, घरगुती सौर दिवे, सौर पंप, सौर टोपी, सौर बंब, सौर मोबाईल चार्जर इत्यादी या सौर उपकरणांचा फायदा लोकांना माहिती असेल तर ते लोक खरेदी करण्याकडे वळतात. त्यांना या उपकरणांची योग्य ओळख नसेल तर ते खरेदी करत नाहीत. सौर चुलीच्या बाबतीत वापरणारे व न वापरणारे यांना अनुक्रमे 25% व 62% प्रतिसादकांना माहिती नाही. सौर कंदिलाच्या माहितीबाबत सौर उपकरणे न वापरणारे यांना माहिती कमी आहे. केवळ 44%

न वापरणारे यांना सौर कंदील माहिती आहे तर 84% वापरणाऱ्यांना याची माहिती आहे. प्रकाशासाठी सौर दिवे हे चांगले पर्यायी साधन आहे. सौर दिव्यांच्या बाबतीमध्ये न वापरणाऱ्या लोकांना माहिती खूपच कमी आहे. तर 72% वापरणाऱ्या लोकांना सौर दिव्याची माहिती आहे. सौर बंबांच्या बाबतीत 41% न वापरणाऱ्यांना व 84% वापरणाऱ्यांना माहिती आहे. सौर पंप, सौर टोपी, सोलर मोबाईल चार्जर आणि इतर उपकरणांच्या बाबतीत सौर उपकरणे वापरणारे व न वापरणारे यांना खूपच कमी माहिती आहे.

सौर उपकरणे पारंपारिक ऊर्जा साधनांपेक्षा कमी खर्चिक आहेत याविषयी संशोधकाने निरीक्षण केले असता असे दिसून आले की, सौर उपकरणांना चालविण्यासाठी कमी खर्च लागतो; परंतु त्यांच्यापासून फायदा खूप होतो. तसेच जास्तीत जास्त 98.8% वापरकर्ते हे मान्य करतात की, पारंपारिक ऊर्जा साधनांपेक्षा सौर उपकरणांचा चालविण्याचा खर्च कमी आहे.

प्रत्यक्ष पाहणीवरून असे दिसून आले की, अनेक अपघात हे इलेक्ट्रीक उपकरणांमुळे होत असतात. अनेक उपकरणे धोकादायक परिस्थिती निर्माण करतात. उपकरणे धोकादायक नसतील तर सर्व कुटुंब त्यांचा सहजासहजी वापर करू शकतात. कुटुंबामध्ये अनेक वृद्ध लोक आणि लहान मुले असतात. त्यांना उपकरण वापरण्याची माहिती नसते. त्यामुळे अनेक वेळा अपघात घडतात. सौर उपकरणांच्या वापरकर्त्यांचा धोकादायकतेबद्दलचा दृष्टिकोन महत्त्वाचा आहे. सौर उपकरणे जर धोकादायक नसतील तर त्यांचा उपयोग अनेक लोक करतील.

सौर उपकरणे धोकादायक नाहीत. जरी सौर ऊर्जा ही बॅटरीमध्ये रुपांतरीत करून ठेवली जाते. तरी तेथे कोणत्याही प्रकारचा इलेक्ट्रीक शॉर्ट सर्किटचा धोका उद्‌भवत नाही. त्यामुळे सौर उपकरणे धोकादायक नाहीत या मताशी सर्व वापरकर्ते सहमत आहेत.

पारंपारिक ऊर्जा साधने पर्यावरण प्रदूषित करतात. अन्न शिजविण्यासाठी अनेक लोक लाकूड व कोळशाचा वापर करतात. त्यामुळे वातावरणात मोठ्या प्रमाणात कार्बन डायऑक्साईड सोडला जातो. त्यामुळे हवा प्रदूषण वाढते. पारंपारिक ऊर्जा ही प्रामुख्याने प्रकाश, अन्न शिजविणे, वाहतुक इत्यादी कारणांना वापरली जाते. त्यामुळे प्रदूषण होते. सौर ऊर्जा उपकरणे वरील सर्व कामे प्रदूषण विरहीत करतात. संशोधन माहितीवरून असे दिसून आले की, 98.8% वापरकर्ते सौर उपकरणे ही प्रदूषणमुक्त आहेत असे मान्य करतात.

शासकीय योजनांच्या माहितीबाबत असे दिसून आले की, सर्वसाधारणतः शासनाचा सौर उपकरणांची माहिती वाढावी यासाठी प्रयत्न जास्त आहे. परंतु 1/4 वापरकर्त्यांना विविध शासकीय योजना उपलब्ध आहेत याची माहिती नाही. तेव्हा सौर उपकरणांच्या बाजारपेठ विस्तारासाठी अनेक प्रसिद्धी माध्यमांचा वापर करणे आवश्यक आहे. यापैकी मौखिक प्रसिद्धी ही सौर उपकरणे विक्रय वृद्धीसाठी अत्यंत चांगला प्रकार असून विश्वसनीय आहे. सर्व वापरकर्ते इतरांना सूचना करतात की, सौर उपकरणांचा जास्तीत जास्त वापर करावा.

जर ग्राहक एखाद्या उत्पादनाबद्दल समाधानी

असेल तरच तो पुनर्खरेदी करतो तसेच इतरांना ती वस्तु खरेदी करण्यास उद्युक्त करीत असतो. संशोधकाच्या असे निरीक्षणास आले की, सौर चूल, सौर कंदील, सौर घरगुती दिवे, सौर टोपी आणि सौर बंब, सौर उपकरणे वापरणाऱ्यांना खूप समाधान देतात. ही बाब विक्रय वृद्धी करणाऱ्यांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण आहे.

**कोष्टक क्र. 5 : सौर उपकरणांचा वापर**

| सौर उपकरणे | प्रतिसादकांची संख्या | % |
|---|---|---|
| सौर चूल | 56 | 22.4 |
| सौर कंदील | 74 | 29.6 |
| सौर घरगुती दिवे | 27 | 10.8 |
| सौर पंप | 0 | 0 |
| सौर टोपी | 1 | 0.4 |
| सौर बंब | 164 | 65.6 |
| सोलर मोबाईल चार्जर | 0 | 0 |
| इतर | 0 | 0 |

संदर्भ : प्रत्यक्ष पाहणीवरून

कोष्टक क्र. 5 वरून हे स्पष्ट होते की, जास्तीत जास्त 65.6% वापरकर्ते सौर बंबाचा वापर करतात आणि 29.6% सौर कंदील व 22.4% सौर चूल वापरतात. सोलर मोबाईल चार्जर, सौर पंप आणि इतर उपकरणे वापरणारे कुणीही नाही. 250 प्रतिसादकांपैकी केवळ एकच प्रतिसादक सौर टोपीचा वापर करतो.

**कोष्टक क्र. 6 : खरेदी करताना विचारात घेतलेले घटक**

| घटक | प्रतिसादकांची संख्या | % |
|---|---|---|
| क्षमता | 84 | 33.6 |
| किंमत | 211 | 84.4 |
| सेवा | 194 | 77.6 |
| नाव (ब्रँड) | 86 | 34.4 |
| इतर | 1 | 0.4 |

संदर्भ : प्रत्यक्ष पाहणीवरून

जेव्हा ग्राहक वस्तुची खरेदी करतात तेव्हा काही मूलभूत गोष्टींचा विचार करतात. याच गोष्टी खरेदीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या असतात. त्यापैकी काही म्हणजे किंमत, उपयुक्तता, वापरातील साधेपणा, दर्जा, विक्री पश्चात सेवा, ब्रँड, क्षमता इत्यादी. वरील काही घटकांचा खरेदीचा निर्णय घेताना विचार केला जातो. हा प्रश्न सौर उपकरणांची खरेदी करताना कोणत्या घटकांचा विचार केला आहे हे स्पष्ट करतो.

वरील कोष्टकानुसार किंमत ही सौर उपकरणे खरेदी करण्यातील महत्त्वाचा घटक आहे. सौर उपकरणांची किंमत 84.4% आणि विक्री पश्चात सेवा 77.6% या घटकांचा उपकरणे खरेदी करताना प्रामुख्याने विचार केला जातो. इतर घटक म्हणजे ब्रँड आणि क्षमता. सौर उपकरणे ही टिकाऊ आणि खर्चिक असली तरी देखभाल खर्च मुक्त आहेत असे प्रतिसादकांचे मत आहे.

सौर उपकरणे ही सौर ऊर्जेवर चालतात. त्यामुळे सौर उपकरणे किती दिवस चालतात हे माहिती असणे महत्त्वाचे आहे. सूर्य प्रकाशाची तीव्रता ही ऋतूमानानुसार बदलत असते. 55.4% सौर चूल वापरकर्ते त्यांचा वापर 90 दिवसांपर्यंत करतात आणि राहिलेले 39.3% सौर चूल वापरकर्ते त्यांचा वापर 91 ते 180 दिवस करतात.

सर्वसाधारणत: अनेक देश ऊर्जेच्या समस्येला तोंड देतात. त्या ठिकाणी अपारंपारिक ऊर्जा स्त्रोतांचा वापर वाढावा अशी शासनाची जबाबदारी असते. सौर उपकरणांच्या विक्रय वृद्धीसाठी सौर उपकरणे वापरकर्ते शासनाला सूचना करतात की, ग्राहकांना अनुदान, जाहिरात, कायदेशीर सक्ती आणि कमी व्याजदराने कर्ज उपलब्धता करावी. वरील बाबी शासन योजनांमध्ये काही प्रमाणात आहेत परंतु त्यांची योग्य पद्धतीने कार्यवाही केली जात नाही. तेव्हा शासनाने अधिक कार्यक्षम सेवेसाठी प्रयत्न करावा. तर उत्पादकांनी कमी किंमतीचे उत्पादन बाजारात आणावे. कारण सौर उपकरणांच्या किंमती अधिक आहेत. किंमत कमी करणे हे संशोधन व तंत्रज्ञान विकास कार्यक्रमामुळे शक्य आहे. त्याचप्रमाणे सौर ऊर्जा वापरकर्ते चांगली विक्री पश्चात सेवा उपलब्ध असण्याची अपेक्षा करतात.

संशोधन अभ्यासासाठी निवडलेल्या प्रतिसादकांचे वीज बिलासंदर्भात विचार अभ्यासल्यानंतर असे दिसून येते की, जास्तीत जास्त सौर उपकरणे वापरणारे व न वापरणारे अनुक्रमे 40.4% व 56.8% प्रतिसादक असे मत व्यक्त करतात की, वीज बिल हे काही प्रमाणात जास्त आहे. 43.2% न वापरणारे 26.4% वापरणाऱ्यांचे मत असे आहे की, वीज बिल हे योग्य आहे. तसेच सर्व प्रतिसादक हे विजेवर अवलंबून आहेत. कारण हे प्रमुख ऊर्जा साधन आहे. असे असले तरी, वीज पुरवठा नियमित नाही. त्यामुळे प्रतिसादक वीज पुरवठ्यावर समाधानी नाहीत. सौर उपकरणे वापरणारे व न वापरणारे 75% प्रतिसादक वीज पुरवठ्यावर असमाधानी आहेत व केवळ 25% प्रतिसादक समाधानी आहेत. संशोधक अशी अपेक्षा करतो की, जे जास्तीत जास्त लोकांचे असमाधान पर्यायी ऊर्जा साधनांकडे (सौर उपकरणांकडे) वळविता येईल.

पर्यायी ऊर्जा स्त्रोतांच्या विचारांविषयी असे दिसून आले की, वीज पुरवठ्यातील अडथळे उदा. भारनियमन इत्यादीमुळे जास्तीत जास्त वापरणारे आणि न वापरणारे अनुक्रमे 92.4% व 73.2% प्रतिसादक पर्यायी ऊर्जा स्त्रोतांचा शोध घेतात. तसेच सौर उपकरणे खरेदीच्या विचारावरून हे स्पष्ट होते की, वापरकर्ते व न वापरकर्ते यांच्या खरेदीच्या मतातील भिन्नता निरीक्षणीय आहे. 91.2% वापरकर्त्यांना व 34% न वापरकर्त्यांना सौर उपकरणे खरेदी करण्याची खूप इच्छा आहे. 21.2% न वापरणाऱ्यांना खूप कमी सौर ऊर्जा उपकरणे खरेदीमध्ये इच्छा आहे. सौर उपकरणे वापरकर्त्यांना त्याच्या वापरातील फायदे माहिती असल्यामुळे भविष्यात ते इतर सौर उपकरणे खरेदीचा विचार करतील. सौर उपकरणे न वापरणाऱ्यांमध्ये 34% प्रतिसादकांच्यामध्ये खरेदीची शक्ती असून ते सौर उपकरणे खरेदीला प्रमुख प्राधान्य देत आहेत.

सौर उपकरणांच्या भविष्यकालीन खरेदीविषयी विचारले असता असे दिसून आले की, 41.2% सौर ऊर्जा उपकरणे न वापरणारे लोक एका वर्षात खरेदी करण्यात तयार आहेत आणि 22% लोक अशी उपकरणे पाच वर्षांनंतर खरेदी करण्यास तयार आहेत. परंतु अजूनही 36.8% प्रतिसादकांनी खरेदीचा निर्णय घेतलेला नाही. यावरून हे स्पष्ट होते की, येणाऱ्या काही वर्षात योग्य व्यावसायिक व्यूहरचना आखली तर लोक सौर उपकरणांची खरेदी करतील.

**कोष्टक क्र. 7 सौर उपकरणांच्या किंमतीबाबत मते**

| प्रतिसाद | न वापरणारे | % | वापरणारे | % |
|---|---|---|---|---|
| खूप जास्त | 176 | 70.4 | 213 | 85.2 |
| जास्त | 21 | 8.4 | 24 | 9.6 |
| सरासरी | 8 | 3.2 | 9 | 3.6 |
| कमी | 3 | 1.2 | 3 | 1.2 |
| खूप कमी | 0 | 0 | 0 | 0 |
| सांगू शकत नाही | 42 | 16.8 | 1 | 0.4 |
| एकूण | 250 | 100 | 250 | 100 |

संदर्भ : प्रत्यक्ष पाहणीवरून

लोकांना जेव्हा वस्तूची माहिती असते तेव्हा ते खरेदीचा विचार करतात. जर वस्तूची किंमत जास्त असेल तर केवळ माहिती असून चालत नाही. सौर उपकरणे ही भांडवली खर्चात येतात त्यामुळे त्यांना मोठ्या गुंतवणूकीची गरज असते.

वरील कोष्टक स्पष्ट करते की, जास्तीत जास्त न वापरणारे 70.4% आणि वापरणारे 85.2% हे समजतात की, सौर उपकरणांच्या किंमती खूप जास्त आहेत. या कारणांमुळेच सौर

उपकरणे न वापरणारे लोक सौर उपकरणांच्या खरेदीकडे वळत नाहीत असे वाटते.

सौर उपकरणे खरेदी न करण्यापाठीमागे अनेक कारणे आहेत. त्यातील महत्त्वाचे कारण म्हणजे सौर उपकरणांची जास्त किंमत. 10% न वापरणाऱ्यांना सौर उपकरणांबाबत माहिती पटलेली नाही. 6.4% न वापरणारे खरेदी करण्यास इच्छुक नाहीत कारण त्यांच्या स्वत:च्या मालकीचे घर नाही.

**6. निष्कर्ष**

**1. ऊर्जा वापराची पद्धती :**

1) सातारा जिल्ह्यातील जास्तीत जास्त प्रतिसादक, वीज, घरगुती गॅस, रॉकेल व सोलर उपकरणांचा वापर करतात.
2) अन्न शिजवण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या ऊर्जेसाठी 94% सौर ऊर्जा उपकरणे न वापरणारे आणि 100% सौर उपकरणे वापरणारे घरगुती गॅस वापरतात. केवळ 12.4% सौर उपकरणे वापरणारे सौर चुलीचा वापर करतात.
3) पाणी गरम करण्यासाठी 47.6% सौर उपकरणे न वापरणारे आणि 11.6% सौर उपकरणे वापरणारे घरगुती गॅस वापरतात. तर 28% सौर उपकरणे न वापरणारे लाकूड/कोळसा पाणी गरम करण्यासाठी वापरतात, 66% सौर उपकरणे वापरणारे सौर बंबाचा वापर करतात.

2. स्वॉट (SWOT) विश्लेषण :

**शक्तिस्थाने (Strenghts)**

1) प्रत्यक्ष मुलाखती मध्ये संशोधकास आढळून आले की, जवळपास 15 वितरक सर्व प्रकारच्या सौर उपकरणांचे वितरण सातारा जिल्ह्यात करतात.
2) सौर उपकरणे वापरणारे व न वापरणारे यांना सौर चूल, सौर कंदील, सौर घरगुती वीज आणि सौर बंब यांची माहिती आहे.
3) जास्तीत जास्त सौर उपकरणे वापरणारे व न वापरणारे मान्य करतात की सौर उपकरणे अत्यंत उपयुक्त आहेत व पारंपारिक ऊर्जा साधनांशी तुलना करता ही खूप बचतीची आहेत.
4) सौर उपकरणे टिकाऊ आहेत व ती जवळजवळ 20 ते 30 वर्षे सेवा देऊ शकतात.
5) सौर कंदील, सौर घरगुती योजना, सौर बंब यांचा वार्षिक देखभाल सरासरी खर्च रु. 200/- पेक्षा कमी आहे.
6) सर्व प्रतिसादक मान्य करतात की सौर उपकरणे ही अपघातापासून मुक्त व पर्यावरणास संवर्धक अशी आहेत.
7) 75% प्रतिसादकांना सरकारच्या सौर उपकरणांच्या विक्री वृद्धी प्रयत्नांची माहिती आहे.
8) सौर उपकरणे वापरणारे पूर्ण समाधानी असल्यामुळे ते इतरांना सौर उपकरणे वापरा असा सल्ला देतात.
9) सौर उपकरणे वापरणाऱ्यांना सौर चूल, सौर कंदील, सौर घरगुती योजना आणि सौर बंब या उपकरणांच्या वापरात पूर्ण समाधान आहे.
10) 65.6% प्रतिसादक सौर बंब वापरतात,

29.6% प्रतिसादक सौर कंदील वापरतात. तर 22.4% प्रतिसादक सौर चुलीचा वापर करतात.

**कमकुवत बाजू (Weaknesses)**

1) संशोधकाला प्रत्यक्ष मुलाखती दरम्यान असे समजले की सौर उपकरणे टिकाऊ आहेत. पण कधी बिघाड झाल्यास दुरूस्ती करणारे तज्ञ कमी प्रमाणात उपलब्ध आहेत.

2) जास्तीत जास्त सौर उपकरणे वापरणारे व न वापरणारे यांना सौर पंप, सौर टोपी, सौर मोबाईल चार्जर व इतर उत्पादनांबद्दल माहिती नाही हे सौर उत्पादनांच्या कमी प्रचाराचे उदाहरण आहे.

3) सौर मोबाईल चार्जर व इतर उत्पादने वापरत नाही. पूर्ण जिल्ह्यात केवळ 1 सौर टोपी वापरणारा प्रतिसादक आढळला. सौर उत्पादनांच्या विक्रय वृद्धीच्या प्रयत्नातील कमतरतेमुळेच हे सर्व आहे असे आढळते.

4) जास्तीत जास्त सौर उत्पादने वापरणारे व न वापरणारे यांचे असे मत आहे की, सौर उत्पादनांची किंमत खूप जास्त आहे. ही सौर उत्पादनांच्या बाबतीतील कमकुवत बाजू आहे. कारण सौर उपकरणे वापरणारे सांगतात की त्यांनी खरेदी करताना अनुक्रमे किंमत, सेवा, ब्रँड आणि क्षमता या क्रमाने विचार केला आहे.

**संधी (Opportunities)**

1) जास्तीत जास्त सौर उपकरणे न वापरणारे सौर उपकरणांसारखा ऊर्जा विकल्प शोधत आहेत.

2) जास्तीत जास्त प्रतिसादकांना वाटते वीज बिल खूप जास्त येते आणि ते सध्याच्या विद्युत पुरवठ्यावर नाखूष आहेत. त्यामुळे सौर उत्पादनांच्या विक्री वृद्धीमध्ये तसेच पैसे व ऊर्जा बचतीची संधी आहे.

3) जास्तीत जास्त सौर ऊर्जा उपकरणे वापरणारे विविध इतर सौर उपकरणे व सौर ऊर्जा न वापरणारे सौर ऊर्जा उपकरणे खरेदी करण्यास तयार आहेत. त्यामुळे सौर उपकरणे विक्रीस खूप मोठी संधी आहे. 42% सौर उपकरणे वापरणारे प्रतिसादक एका वर्षाच्या आत खरेदी करण्यास तयार आहेत आणि 22% सौर उत्पादने न वापरणारे 5 वर्षात सौर उपकरणे खरेदी करू असे सांगतात.

**अडथळे (Threats)**

1) संकलित केलेल्या माहितीवरून असे स्पष्ट होते की, सौर उपकरणे टिकाऊ आहेत.परंतु काही सौर उपकरणे एका ठिकाणाहून दुसरीकडे हलविणे अवघड असते. ज्या लोकांची स्वमालकीची घरे नसतात त्यांना अशा उपकरणांमध्ये रुची नसते.

2) सातारा जिल्ह्याची भौगोलिक स्थिती लक्षात घेता काही भागात मोठ्या प्रमाणात पाऊस पडतो त्यामुळे वर्षातील तीन ते चार महिने सौर उपकरणे कार्यक्षमतेने कार्य करू शकत नाहीत.

**7. शिफारशी :**

**अ) शासनासाठी शिफारशी :**

1) शासनाने सौर उपकरणे खरेदी करणाऱ्यांना अनुदान उपलब्ध करून द्यावे.

2) शासनाने जास्तीत जास्त सौर उपकरणांची जाहिरात करावी त्यामुळे लोकांमध्ये जागरूकता निर्माण होईल.

3) शासनाने सौर उपकरणे वापरण्याची कायदेशीर सक्ती करावी.

4) शासनाने सौर उपकरणे खरेदी करणाऱ्यांसाठी बँकामार्फत उपलब्ध केलेले कमी व्याज दराचे कर्ज ताबडतोब व कमीत कमी त्रासात ग्राहकांना उपलब्ध करावे.

**ब) सौर उपकरणे उत्पादकांना शिफारशी:**

1) सौर उपकरणे उत्पादक कंपन्यांनी कमीत कमी किंमतीची उपकरणे बाजारात आणावीत.

2) उत्पादक कंपन्यांनी उत्पादन खर्च कमी करण्यासाठी जास्तीत जास्त संशोधन करावे.

3) उत्पादन कंपन्यांनी जेव्हा आवश्यक असेल तेव्हा वापरकर्त्यांना जास्तीत जास्त चांगली विक्री पश्चात सेवा उपलब्ध करावी.

**संदर्भसूची :**


1) Rai G.D. (2007) - Non-conventional Energy Sources - Khanna Publishers, Delhi - 6.
2. Meenakshi P. (2006) - Elements of Environmental Science and Engineering - Prentice Hall of India Pvt. Ltd., New Delhi - 1.
3. Ghosh G. K. (1997) - Solar Energy - The Infinite Source - Ashish Publishing House, New Delhi - 26.

**Websites**

4. www.mnes.com
5. www.education.teri.res.in
6. www.mahaurja.com
7. www.ireda.com


●●●


## निवेदन

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या आजीव सदस्य वर्गणी दर खालीलप्रमाणे आहेत.

1. आजीव सदस्य वर्गणी – रु. 2000/-
2. इमारत निधी – रु. 1000/-

एकूण – रु. 3000/-

आजीव सदस्य वर्गणी व इमारत निधी असे एकत्रित रुपये 3000/- चा डिमांड ड्राफ्ट 'मराठी अर्थशास्त्र परिषद' या नावावर काढून कार्यवाह यांचेकडे पाठवावा याची कृपया नोंद घ्यावी.

**अनिल सूर्यवंशी**
कार्यवाह – खजिनदार
मराठी अर्थशास्त्र परिषद

# अर्थ शब्दांची वाट पाहे

**शि. ना. माने**
सातारा
फोन : (02162) 231139

" No dictionary of a living tongue can ever be perfect. Scince some words are budding and some others are falling away"

Dr. Samuel Johnson, Dictionary of English Language, 1755

**प्रास्ताविक**

Pharoah Capitalist (फेरो कॅपिटॅलिस्ट) : या संज्ञेचे मूळ प्राचीन इजिप्तमधील राजा, त्याचा उत्तुंग प्रासाद, त्याचे पद, इत्यादींच्या चर्चेत सापडते. पुढे तिचा विस्तार व्यवसाय संघटनांपर्यंत वाढला. कोणत्याही व्यवसायांतर्गत परिव्यय – लाभ विश्लेषण हा त्या संज्ञेचा एक अविभाज्य हिस्सा मानला गेला. आज कोणत्याही आर्थिक सत्तेचा सोपान/मनोरा त्याच्या तळातील मोठ्या प्रमाणावरील कर्मचारी व त्याच्या शिखरावरील मर्यादित प्रमाणावरील सूत्रधार यांच्याशिवाय पूर्ण होऊ शकत नाही. एका टोकाला वस्तुंचे उत्पादन,प्रक्रिया व परिवहन करणारे कर्मचारी,तर दुसऱ्या टोकाला त्या वस्तुंचे सेवन करणारे, असे सर्वसाधारणपणे दोन प्रमुख वर्ग निर्माण झाले. स्पष्ट शब्दात सांगावयाचे तर कोणत्याही क्षेत्रातील उद्योगात, मग ते सार्वजनिक असो वा खाजगी, कर्मचारी–सूत्रधारी असे दोन प्रमुख गट–तट दिसतात.

या संज्ञेचे मूळ असलेल्या प्राचीन इजिप्तमध्ये निरंकुश राजेशाही होती. तिची प्रमुख वैशिष्ट्ये म्हणजे सैन्यावरील तसेच गुप्तहेर खात्यावरील मोठा खर्च, सरकारी उद्योगातील खर्चिक प्रयोग व आदिष्ट नियोजन.येथे इजिप्तमधील सरकारी उद्योगातील खर्चिक प्रयोगाचा एक भाग म्हणून 'आजीवन कामांचा' [Jobs for Life] येथे उल्लेख करणे जरुर आहे.आणि

आपण अर्थशास्त्राचे अभ्यासक जाणतो की काम [ Job ] म्हणजे रोजगारी [Employment] नव्हे. स्पष्टीकरणासाठी पुढील दोन गोष्टींचा उल्लेख करु. पहिली आहे ग्रीक पुराणातील 'सिसीफसचे मिथक' [ Myth of Sisyphus] ही गोष्ट. शिक्षा म्हणून एक मोठा दगड टेकडीच्या माथ्यावर ढकलत नेणे.हे सिसि फसचे हयात भर न संपणारे काम दगड. माथ्यावर गेला न गेला इतक्यात तो पायथ्यापर्यंत घसरत येणे.शिक्षेत तशी तरतूद असणे. परत पायथा ते माथा असे सिसीफसचे न संपणारे, कष्टाचे व समाजासाठी अनावश्यक काम. दुसरे उदाहरण आहे, जोनाथन स्विफ्ट यांच्या गलिव्हर्स ट्रॅव्हल्स [1726] या अन्योक्ति [satire] अर्थालंकारी गोष्टीचे. एकदा महाकाय गलिव्हर टीचभर उंचीच्या माणसांच्या लिलिपुट बेटात प्रवेश करतो. छोटी माणसे आश्चर्यचकित होऊन गलिव्हरकडे निव्वळ पाहात उभी राहतात. गालिव्हर म्हणतो : ''निव्वळ उभे राहू नका. काही तरी करा.''लगेच काही माणसे गलिव्हरचे पाय बांधतात. काही हात बांधतात. तर काही त्याचे डोके चेपतात. आज काम सुरु आहे. कदाचित उद्या कामाचा मोबदलाही मिळेल. परंतु हरकाम्यांच्या उत्पादनातील भर शून्य ! ज्या इजिप्तमध्ये आजीवन काम उपलब्ध होते तेथे टॉयलेट पेपर व साबण यांची टंचाई होती. येथे या विरोधाभासाचा उल्लेख करण्याचा एक हेतू आहे. तो म्हणजे अशी विरोधाभासी पार्श्वभूमी असलेल्या सद्यस्थितीतील तथाकथित फेरो कॅपिटॅलिझम वित्तीय घोटाळे व लबाड्या यांच्याशिवाय फोफावला असता तरच नवल.

या प्रस्तावनेनंतर फेरो कॅपिटॅलिस्ट संज्ञेचा अर्थ, स्वरुप व मराठी पर्याय यांचा विचार करु.

**अर्थ :**

1. क्रेग हॅंक्स फेरो कॅपिटॅलिझमची व्याख्या करताना म्हणतात. ''फेरो कॅपिटलिझम हा एक मनोरा/सोपान, सामाजिक संरचना असून त्याला आपण सेवन करतो अशा वस्तूंचे उत्पादन, प्रक्रिया व परिवहन/हस्तांतरण करण्यासाठी विपुल प्रमाणावरील श्रमिकांची जरुरी असते. मनोऱ्याच्या तळातील मोठ्या संख्येतील श्रमिक मनोऱ्याच्या शिखरावरील निवडक अभिजनांना आधार देतात.

2. माझ्या माहितीनुसार दि इकॉनॉमिस्ट नियतकालिकात प्रथम फेरो कॅपिटॅलिस्ट या संज्ञेचा वापर करण्यात आला. या संज्ञेचे एक प्रमुख वैशिष्ट्य स्पष्ट करताना नियतकालिक म्हणते की हा एक मनोसदृश व्यवसाय समूह असतो. त्यात परिव्यय – लाभ विश्लेषणावर जोर दिला जातो. काही देशात अल्प मताधिकार धारण करणाऱ्या, परंतु मोठी संख्या असलेल्या भागधारकांच्या सामान्य भागांची किंमत निवडक सूत्रधारी भागधारकांच्या भागांच्या किंमतीपेक्षा 40 टक्क्याने अल्प असते. नियतकालिक पुढे म्हणते की तरीदेखील अल्प मताधिकारी (नामधारी) भागधारक त्या व्यवसाय समूहात सहभागी होणे पसंत करतात.

पहिली व्याख्या फेरो भांडवलशाहीची, तर दुसरी फेरो भांडवलदाराची आहे. पहिलीत श्रमिक व सूत्रधार या विभागणीवर जोर देण्यात आला आहे. तर दुसरी भाग भांडवल रचनेवर जोर देते. या व्याख्या पाहिल्यानंतर पुढील दोन प्रश्न निर्माण होतात. एक, संख्येने मोठे परंतु मताधिकाराने दुय्यम भागधारक अशा व्यवसाय समूहात सहभागी का होतात ? दोन, विशेषतः मोठी संख्या असलेल्या भागधारकांचा सामान्य भाग भांडवलाचा एकूण भांडवलातील हिस्सा जास्त असताना हे कसेकाय

चालवून घेतले जाते? या प्रश्नांची उत्तरेअलीकडील बदलते व्यवसाय संघटन व काहीशा कुंठित व बऱ्याच प्रमाणात एकसुरी व्यवस्थापन विद्या संस्था यांच्यातील नातेसंबंधात दडली आहेत. त्या संबंधांचा आत शोध घेवू व त्याच्या आधारे फेरो कॅपिटॅलिस्ट संज्ञेचे स्वरुप स्पष्ट करु.

**स्वरुप :**

1. पूर्वीच्या भागीदारी मालकी संस्थेतील वरिष्ठ व्यवस्थापक तिचा मालक होता. उलट आजचा व्यवस्थापक भाग धारकांच्या पैशाशी जुगार खेळण्यासाठी नेमलेला पगारी नोकर झाला.

2. भागीदारी मालकी संस्था गेली. तिच्या जागी निगम संस्कृती आली. मालकी व नियंत्रण यांच्या फारकतीचा फायदा सत्यमचे रामलिंग राजू व एन्रॉनचे केनेथ ले यांच्यासारख्या महत्त्वाकांक्षी व्यवस्थापकीय संचालकांनी/कार्याध्यक्षांनी घेतला. त्यांचा सरकारात वट वाढला. पूर्वीच्या अभिजात, नवप्रवर्तनशाली उपक्रमीकडून बँकर, व्यापारी व राजकारणी यांच्या नवीन वर्गाकडे कंपनीविषयक महत्त्वाच्या निर्णयांचे संक्रमण सुरू झाले.

3. दुसऱ्या टोकाला एकसुरी व्यवस्थापन विद्या संस्थांमधून सुटबूटवाल्या पदवीधरांच्या फौजा बाहेर पडू लागल्या. त्यांच्याकडे पदव्या आहेत. ज्ञान (knowledge) आहे; परंतु व्यावहारिक शहाणपण व निर्णयक्षमता (wisdom) अभावानेच दिसून आली. त्यामुळे ले व राजू यांच्यासारख्या वजनदार व्यवस्थापकांना त्या पदवीधरांना नमविणे सहज शक्य झाले.

4. उपरोक्त बँकर व व्यापारी म्हणजे गस्टावस स्मिथ(Branded meat),जॉन एफ. वेल्थ (G.E.) किंवा थॉमस वॅटसन (IBM) नव्हेत. पैसा व अधिक पैसा मिळविण्याच्या एकमेव हेतुने प्रेरित झालेली ती हाडा-मांसाची (पौंड ऑफ फ्लेशवर भिस्त ठेवणारी) माणसे आहेत.

5. मोठी सरकारी कामांची कंत्राटे मिळविणे व प्रसंगी निवडणुकांना वित्तपुरवठा करणे हा त्यांच्या हातचा मळ बनला. सरकारातील त्यांचा वाढता वट ध्यानात घेऊन मनोऱ्याच्या तळातील कंपन्यांची साधनसंपत्ती लीलया मनोऱ्याच्या शिखरावरील कंपन्यांकडे वळविणे त्यांना शक्य झाले. लेहमन ब्रदर्ससारख्या सर्वाधिक मोठ्या गुंतवणूक बँकेने 26 बि. डॉलर भाग भांडवलावर 60 बि. डॉलरचे कर्ज व्यवहार करण्याचा वित्तीय महामूर्खपणाचा कळस केला. दुसऱ्या शब्दात, अठराव्या-एकोणीसाव्या शतकातील भांडवलदार कामगारांचे आर्थिक शोषण करत होता. आजचा मनोऱ्याच्या शिखरावरील फेरो कॅपिटॅलिस्ट मनोऱ्याच्या तळातील सामान्य भागधारकांच्या कंपन्यांचा सूत्रधार म्हणून वागतो.

आतापर्यंतच्या विवेचनात स्पष्ट झालेल्या फेरो कॅपिटॅलिस्ट संज्ञेच्या घटकावयवांच्या आधारे त्या संज्ञेसाठी पुढील मराठी पर्याय सुचविले आहेत.

1. आर्थिक मनोरारचित भांडवलदार
2. पिरॅमिडी भांडवलदार
3. आर्थिक मनोराधिपति

अर्थातच, सुरुवातीला उल्लेख केलेल्या डॉ. जॉन्सन यांच्या विधानातील वास्तव ध्यानात घेऊन हे पर्याय सुचविले आहेत, याचा विसर न व्हावा.

**संदर्भ सूची :**

1. Hanks Craig, "Capitalism Is An Economic Pyramid", Ezine

# मराठी अर्थशास्त्र परिषदेचे ३४ चे वार्षिक अधिवेशन
# सूत्रसंचालकांचे अहवाल-चर्चासत्र दुसरे
# असंघटित क्षेत्रातील श्रमिकांचा अभ्यास

**बबनराव खामकर,**

कणकवली

भ्रमणध्वनी :9423203745

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे 34 वे वार्षिक राष्ट्रीय अधिवेशन, आदर्श कला आणि वाणिज्य महाविद्यालय, कुळगांव-बदलापूर, ता. अंबरनाथ, जि. ठाणे या ठिकाणी दि. 13 ते 15 नोव्हेंबर 2010 या कालावधीमध्ये संपन्न झाले. या अधिवेशनामध्ये रविवार दि. 14 नोव्हेंबर 2010 रोजी दुसरे चर्चासत्र 'असंघटित क्षेत्रातील श्रमिकांचा अभ्यास' या विषयावर संपन्न झाले. या चर्चासत्राचे सूत्रसंचालन डॉ. बबनराव खामकर तर वृत्तसंकलन प्रा. राजश्री काशीकर यांनी केले. व्यासपीठावर परिषदेचा अध्यक्ष डॉ. मुक्ता जहाँगिरदार, कार्याध्यक्ष डॉ. डी. के. पाटील, स्थानिक कार्यवाह डॉ. श्याम कुलकर्णी उपस्थित होते.

या चर्चासत्रामध्ये एकूण 21 शोधनिबंध सादर झाले. त्यांचे तीन विभागात वर्गीकरण करण्यात आले होते. पहिल्या गटामध्ये भारतातील असंघटित क्षेत्रातील श्रमिकांच्या स्थितीचा आढावा घेण्यात आला. दुसऱ्या गटामध्ये सादर झालेले शोधनिबंध असंघटित क्षेत्रातील विशिष्ट गटाचे (Target Group) विवेचन करणारे होते. तर तिसऱ्या गटात सादर झालेले शोधनिबंध प्राथमिक माहितीवर आधारीत आणि असंघटित कामगारांच्या स्थानिक समस्यांचा आढावा घेणारे होते.

पहिल्या गटामध्ये महाराष्ट्र श्रम विज्ञान संस्था, मुंबईचे संचालक डॉ. राजन तुंगारे आणि अधिव्याख्याता डॉ. पी. एम्. कडुकर यांनी भारतातील असंघटित क्षेत्र आणि सामाजिक सुरक्षितता या विषयावर अत्यंत अभ्यासपूर्ण विवेचन केले. यामध्ये असंघटित कामगाराची संकल्पना, त्यांचे भारतातील प्रमाण, त्यांची वैशिष्ट्ये, त्यांची भारतातील आणि महाराष्ट्रातील परिस्थिती, असंघटित कामगारांसाठीच्या केंद्रशासनाच्या सामाजिक सुरक्षितता उपाययोजना, विविध राज्यांमधील सामाजिक सुरक्षितता उपाययोजना,

महाराष्ट्रातील सामाजिक सुरक्षितता योजना यांचा अत्यंत अभ्यासपूर्ण आढावा घेतला. तसेच असंघटित कामगारासाठी सामाजिक सुरक्षा कायदा 2008 ची मांडणी केली.

या विभागात दुसरा शोधनिबंध डॉ. ऋता खापर्डे यांनी सादर केला. त्यांच्या मते सर्वाधिक असंघटित कामगार शेती क्षेत्रामध्ये काम करतात. त्यांच्या मते, कामगाराच्या दुरावस्थेला दारिद्र्य, उपासमार, शिक्षणाचा अभाव आणि कामगार संघटनांचा अभाव ही कारणे जबाबदार आहेत. असंघटित क्षेत्रात 15 ते 60 या वयोगटातील कामगार काम करतात. ग्रामीण भागात असंघटित स्त्री कामगारांचे प्रमाण शहरांच्या तुलनेने दुप्पट आहे. हा श्रमिक न्याय व हक्कापासून दूर आहे. वयोमानानुसार त्यांचे काम करण्याचे प्रमाणही कमी होते. ते आपले काम टिकविण्यासाठी धडपडत असतात. यावर त्यांनी लोकसंख्यावाढीला आळा, कामगार शिक्षण, आरोग्य सुधारणा आणि उत्पन्नातील विषमता कमी करणे या उपाययोजना सुचविल्या आहेत.

या विभागात तिसरा शोधनिबंध दारव्हा, यवतमाळ येथील डॉ. शंकर मारोती सावंत यांनी सादर केला. यामध्ये त्यांनी असंघटित श्रमिकांचे प्रमाण, सामाजिक सुरक्षा उपायांच्या मर्यादा, आणि त्यांची स्थिती सुधारण्यासाठीच्या उपाययोजनांचा आढावा घेतला.

या विभागात चौथा शोध निबंध प्रा. मुरलीधर पंडीत गायकवाड, मुरुड-जंजिरा यांनी सादर केला. त्यांनी संघटित आणि असंघटित क्षेत्रातील फरक, असंघटित कामगाराची सद्य:स्थिती, असुरक्षितता. स्त्री-पुरुष भेद या समस्यांचा आढावा घेवून शासकीय उपाययोजनांबरोबर विविध उपाययोजना सुचविल्या.

या विभागातील पाचवा शोधनिबंध अर्जुननगर येथील डॉ. राहुल शंकर म्होपरे यांनी सादर केला. यामध्ये त्यांनी असंघटित कामगार संकल्पना, सद्य:स्थिती, त्यांचे प्रमाण यांचा आढावा घेवून असंघटित कामगारांची व्यवसायनिहाय, कामाच्या स्वरुपानुसार, विशेष कष्टप्रद (specially distressed), सेवा पुरविणारे कामगार अशी विभागणी केली. याशिवाय शेती क्षेत्रातील कामगार, बांधकाम क्षेत्रातील कामगार, गृह उद्योग कामगार, घरगुती कामगार, शरीर विक्रय करणाऱ्या महिला, खाण कामगार या प्रवर्गातील कामगारांच्या समस्यांचा आढावा घेतला. असंघटित कामगारांची वैशिष्ट्ये सांगण्याबरोबरच त्यांच्यासाठीच्या सरकारी आणि बिगर सरकारी उपाययोजनांचा आढावा घेतला व विविध उपाययोजना सुचविल्या.

यानंतर जाफ्राबाद-जालना येथील डॉ. एरंडे यांनी असंघटित क्षेत्रातील श्रमिकांच्या कामगारांच्या समस्यांचा आढावा घेतला. त्यांनी 1999 ते 2005 या काळात असंघटित कामगारांच्या संस्थेतील वाढीचा आढावा घेतला. विविध उद्योगातील असंघटित कामगारांचे प्रमाण त्यांच्या खर्चाचे विवरण दिले. त्यांच्या समस्यांचा आढावा घेवून विविध उपाययोजना सुचविल्या.

यानंतर या विभागातील सातवा शोधनिबंध शिरुर येथील प्रा. रमेश कटके यांनी सादर केला. असंघटित क्षेत्रातील कामगारांच्या समस्यांचा

आढावा घेताना कामगार संघटनेचा अभाव, कायद्याच्या संरक्षणाचा अभाव, परंपरागत तंत्राचा अवलंब या तीन मुद्यांचा परामर्ष घेतला. त्यांनी शेतीतील कामगारांच्या समस्या, मोलकरणींच्या समस्या विशेषत्वाने मांडल्या.

दुसऱ्या गटामध्ये विशिष्ट गटाचे (Target Group) विवेचन करणारे शोधनिबंध सादर झाले. यामध्ये शिवाजी विद्यापीठातील प्रा. विजय ककडे आणि त्यांचे संशोधन विद्यार्थी यांनी असंघटित क्षेत्रातील मानवी विकास निर्देशांकाची मांडणी केली आहे. त्यांच्या मते,या कामगारांचा उत्पन्न निर्देशांक 24% इतका आहे. उत्पन्न कमी असूनही या कामगारांची बचत प्रवत्ती चांगली आहे. शिक्षणाबाबतचा दर्शक 27.61% इतका म्हणजे शैक्षणिक मागासलेपणा दर्शवितो. या कामगारांचा बचत गटातील सहभाग चांगला आहे. हा निर्देशांक 50% आहे. घर आणि सा. सुविधा निर्देशांक समाधानकारक व अनुक्रमे 80% व 61% आहे. हा कामगार आजारपणावर खूप कमी खर्च करतो. त्यांना संकटकाळात मदतीचा मार्ग कमी प्रमाणात (44%) उपलब्ध आहे.

या विभागात दुसरा शोधनिबंध इचलकरंजी येथील डॉ. शकुंतला पाटील यांनी असंघटित क्षेत्र आणि स्त्रिया या विषयावर सादर केला. त्यांनी क्षेत्रनिहाय स्त्री रोजगाराच्या प्रमाणाचा आढावा घेतला. त्यांच्या समस्यांचा आढावा घेण्याबरोबरच वेतनभेदाचा मुद्दा प्रकर्षाने मांडला.

या विभागात तिसरा शोधनिबंध अमरावती येथील डॉ. सु. रा. जगताप यांनी शेती क्षेत्रातील कामगारांच्या तुटवड्याची समस्या या विषयावर सादर केला. ही समस्या निर्माण होण्यामागे शहरीकरणाची वाढती प्रवृत्ती, शेतीचा मागासलेपणा, ग्रामीण भागातील सामाजिक सुविधांचा अभाव, शेतीतील कमी वाढावा आणि न्यून मजुरी वाढती शैक्षणिक पातळी,मजुरांचा बदललेला दृष्टिकोन ही कारणे जबाबदार असल्याचे स्पष्ट केले. याचा शेती क्षेत्रावर प्रतिकूल परिणाम झाल्याचे स्पष्ट केले. यातून मार्ग काढण्यासाठी शेती व्यवसायाला संरक्षण देणे, गुंतवणूक वाढविणे, ग्रामीण भागात नागरी सुविधा वाढविणे, शेतीचा विमा उतरविणे, पिण्याच्या शुध्द पाण्याचा पुरवठा, तसेच शासनाच्या शेती व शेतमजूरांसाठीच्या धोरणास अमुलाग्र बदल या उपाययोजना सुचविल्या.

अमरावती येथील डॉ. प्रशांत काटोले यांनी असंघटीत क्षेत्रातील स्त्री रोजगाराचा क्षेत्रनिहाय आढावा घेतला. त्यांच्या मते,सर्वात अधिक स्त्री मजूर शेती क्षेत्रात काम करतात. त्यांच्या मते, दुय्यम क्षेत्रातील स्त्रियांचा सहभाग अत्यंत कमी आहे. स्त्री मजूरांच्या समस्यांचा आढावा घेताना असुरक्षितता, कमी वेतन, कौशल्याचा अभाव, प्रशिक्षण सोयींचा अभाव, कामाच्या ठिकाणी प्राथमिक सोयींचा अभाव यांची मांडणी केली.

या विभागातील पाचवा शोधनिबंध प्रज्ञा प्रतिष्ठानच्या डॉ. मधुरा मनीष बेदरकर यांनी शासन व अशासकीय संस्थांची बाल-मजुरीच्या निर्मूलनातील भूमिका या विषयावर सादर केला. त्यांच्या मते, बाल मजुरीचा मुद्दा गरीब देशाच्या दृष्टिने गुंतागुंतीचा आहे. शासन आणि अशासकीय संस्था यांनी प्रयत्न करुनही या प्रश्नाचे निराकरण

साध्य झालेले नाही. याचे कारण बालमजुरीच्या संपूर्ण उच्चाटनातून इतर अनेक समस्या निर्माण होतील. शासकीय उपाययोजनांचे मूल्यमापन करण्याबरोबरच अशासकीय संस्थाचे प्रयत्न अधिक परिणामकारक व्हावेत, दोघांनी एकत्रित काम करावे असा उपाय सुचविला आहे. त्यांच्या मते या विश्वात जन्मणाऱ्या प्रत्येक बालकास अन्न, वस्त्र,निवारा व शिक्षण यांचा नैसर्गिक हक्क आहे. प्रयत्नांची दिशा अशी असावी की जेणेकरुन हे जग 'बालमजुरीपासून मुक्त व्हावे.'

या विभागात सहावा शोधनिबंध कुरुंदवाड येथील प्रा. डी. जी. धट यांनी बांधकाम व्यवसायातील कामगारांच्या समस्या आणि उपाय या विषयावर सादर केला. त्यांच्या मते, बांधकाम व्यवसायात कुशल,अर्धकुशल व अकुशल कामगर कंत्राटी पध्दतीने काम करतात. 2004-05 मध्ये त्यांचे प्रमाण एकूण असंघटित कामगारांमध्ये 6% होते. सामाजिकमागासलेपणा,अशिक्षितपणा, अकुशलता, स्थलांतरीत, आर्थिक व सामाजिक शोषण या त्यांच्या समस्याआहेत. चुकीच्या नोंदी, अपघाताच्या नोंदींचा अभाव, कामगारांची कामांची धरसोड प्रवृत्ती, कामाचे हंगामी स्वरुप, हंगाम नसताना बेरोजगारी इ.समस्यांना त्यांना सामोरे जावे लागते.

तिसऱ्या गटामध्ये प्राथमिक माहितीवर शोधनिबंध सादर झाले. यातील पहिला शोधनिबंध बदलापूर कॉलेजच्या स्नेहल देशमुख यांनी ठाणे जिल्ह्यातील असंघटित क्षेत्रातील महिलांच्या सक्षमीकरण बचत गटांचे योगदान या विषयावर सादर केला. त्यांच्या मते, 2007 मध्ये ठाणे जिल्ह्यात महिला बचत गटांची संख्या 2687 एवढी होती. त्यांच्या मते, शहरी भागाच्या तुलनेत ग्रामीण महिलांचे कर्तृत्व अधिक गौवास्पद आहे. त्यांची कुटुंबात, समाजात व गावात पत वाढली आहे. ग्रामीण महिला बचत गट घरगुती लोणचे, पापड, मेणबत्त्या, कुक्कुटपालन, शेळीपालन, दुग्धव्यवसाय, अगरबत्ती उद्योग इ. व्यवसाय करतात. या महिला वस्तीतील स्थानिक साधने व गरजा यांची सांगड घालून रोजगार निर्मिती करीत आहेत. तरीही अशिक्षितपणामुळे या चळवळीच्या यशस्वीतेबद्दल त्यांना शंका वाटते.

या गटामध्ये दुसरा शोधनिबंध अकलूज येथील डॉ. दत्तात्रय बागडे यांनी माळशिरस तालुक्यातील शेतमजूरांच्या सामाजिक आर्थिक समस्यांवर सादर केला. त्यांच्या मते, शेतमजूरांची 32% कुटुंबे दुसऱ्याच्या जागेत राहत असल्याने त्यांना इंदिरा आवास योजनेचा लाभ घेता येत नाही. दुग्ध व्यवसाय करणाऱ्यांपेक्षा पशुधन सांभाळून विक्री करणाऱ्यांना अधिक उत्पन्न मिळते. 96% शेतमजूर कुटुंब इंधनासाठी पिकाचे अवशेष वापरतात. या मजूरांपैकी 37% कुटुंब दारिद्र्य रेषेखाली आहेत. 8% कुटुंब कर्जबाजारी आहेत. 60% कुटुंब राखीव प्रवर्गातील आहेत. 31% कुटुंबप्रमुख निरक्षर आहेत. त्यांना शेतमजुरीपासून महिन्याला सरासरी 3845 रु. उत्पन्न मिळते.

या विभागात तिसरा शोधनिबंध मंचर येथील डॉ. जयवंत इंगळे यांनी आंबेगांव तालुक्यातील आदिवासी व बिगरआदिवासी असंघटित कामगारांच्या स्थितीवर सादर केला. त्यांच्या मते आदिवासींकडे असणाऱ्या जमिनीपैकी 25 ते 30%

जमीन नापीक आहे. वाढती महागाई, अल्प मोबदला, जंगलातील उत्पन्नाला कमी भाव, कच्च्या घरात वास्तव्य, पिण्याच्या पाण्याचा अभाव या त्यांच्या समस्या आहेत. कुटुंबाचा मोठा आकार, अपुरी मजुरी, अवलंबित व्यक्तीचे अधिक प्रमाण, अल्प जमीन, जलसिंचनाचा अभाव, हंगामी मजुरी, कुपोषण, आजारांवर होणारा अधिक खर्च या शेतमजुरांच्या प्रमुख समस्या आहेत.

यानंतर वाडिया कॉलेजच्या प्रा. स्वाती आदक यांनी पुणे शहरातील असंघटित क्षेत्रात काम करणाऱ्या श्रमिकांचा अभ्यास या विषयावर शोधनिबंध सादर केला. त्यांनी खाद्य पदार्थांची विक्री करणारे श्रमिक, पेय विक्री करणारे, धार्मिक व सांस्कृतिक कला सादर करणारे, प्राण्यांवर आधारीत व्यवसाय करणारे, घरगुती उपयोगाच्या वस्तु विकणारे, खेळणी विकणारे, यांत्रिक वस्तु विकणारे, शालेपयोगी वस्तु विकणारे अशी कामगारांची विभागणी केली.

यानंतरचा शोधनिबंध सांगली येथील श्री. शरद कुलकर्णी व डॉ. सौ. शर्वरी कुलकर्णी यांनी सांगली जिल्ह्यातील कृषी प्रक्रिया उद्योगातील श्रमिकांच्या समस्या या विषयावर सादर केला. त्यांच्या मते कामाच्या तुलनेत कृषी प्रक्रिया उद्योगातील कर्मचाऱ्यांना मिळणारे वेतन अपुरे आहे. त्यामुळे ते त्यांच्या जीवनावश्यक गरजाही भागवू शकत नाहीत. कच्च्या मालाचा पुरवठा संपताच या उद्योगातील कामगारांचा रोजगार संपुष्टात येतो. अद्ययावत तंत्रज्ञान अवगत नसेल तर कामगारांना रोजगाराला मुकावे लागते. कृषी प्रक्रिया उद्योग केवळ निवडक कामगारांना प्रशिक्षण देतात; त्यामुळे उर्वरित कामगारांची रोजगार क्षमता संपुष्टात येते. प्रवासाचा खर्च कामगारांना परवडत नाही. बिगर हंगामी काळात त्यांना बेरोजगार राहावे लागते. कुटुंबातील सर्वच सदस्यांना रोजगाराच्या शोधात फिरावे लागते. या समस्यांवरील शासन व उद्योग यांची उपाययोजना अत्यंत अपुरी आहे.

या विभागातील सहावा शोधनिबंध डोंगरकठोरे, यावल-जळगांव येथील डॉ. सुरेश ढाके आणि डॉ.अशोक खाचणे यांनी मुक्ताईनगर येथील शेतमजुरांच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास या विषयावर सादर केला. त्यांच्या मते, 2000 च्या तुलनेत 2010 मध्ये 52% शेतमजूर असे होते की त्यांना वर्षभर काम मिळाले होते. या काळात मजुरीच्या दरात 271.43% वाढ झाली आहे. त्यामुळे शेतमजुरांचे सरासरी उत्पन्न वाढले आहे. जीवनावश्यक गरजा भागल्यामुळे हे कामगार सुखद वस्तुंच्या उपभोगाकडे वळले आहेत. 85% मजूर मागास प्रवर्गातील आहेत.गरिबी व निरक्षरता या त्यांच्या समस्या आहेत. कामाच्या वेळेबाबत अनियमितपणा आहे. मालकांकडून मजूरांना हीन दर्जाची वागणूक मिळते.10% कमिशन काम पुरविणाऱ्या दलालाला द्यावे लागते. व्यसनाधिनता आणि कर्जबाजारीपणा या त्यांच्या समस्या आहेत. हंगाम नसताना बेरोजगार रहावे लागते. हंगाम नसतांना शहरांकडे स्थलांतरीत व्हावे लागते. ठेकेदारी पध्दतीमुळे ठेकेदार कामगारांचे शोषण करतो. यांत्रिकीकरणामुळे शेतमजूरांचा रोजगार वेगाने कमी होत आहे. वयोवृध्द शेतमजूरांची संख्या खूप अधिक आहे.

या विभागातील सातवा शोधनिबंध नसरापूर

येथील डॉ. मोहन चौधरी यांनी पुणे जिल्ह्यातील असंघटित श्रमिकांचा वाटा या विषयावर सादर केला. त्यांच्या मते ग्रामीण भागात पुरुष शेतमजूरांचे प्रमाण 50.75% आहे. खाणकाम व्यवसायात ते 58.24% आहे. भंगार गोळा करण्याच्या व्यवसायात स्त्रियाचे प्रमाण शहरी भागात 24.79% आहे. या प्रमाणे त्यांनी दुकानात काम करणाऱ्या, पाणीपुरवठा विभागात काम कणाऱ्या, कचरा व साफसफाई विभागात काम करणाऱ्या, हॉटेल उपहारगृहात काम करणाऱ्या मजूरांचे शहरी ग्रामीण आणि स्त्री–पुरुष प्रमाण दिलेले आहे. असंघटित कामगारांसाठीच्या केंद्र सरकारच्या योजना स्पष्ट केल्या आहेत.

या विभागातील शेवटचा शोधनिबंध प्रवरानगर येथील प्रा. डॉ. आर. जी. रसाळ यांनी अहमदनगर तालुक्यतील असंघटित क्षेत्रातील स्त्री शेतमजूरांवर सादर केला. त्यांच्या मते 36 ते 45 या वयोगटात स्त्री शेतमजूरांची संख्या सर्वाधिक आहे.स्त्री शेतमजूरांमध्ये अशिक्षितपणाचे प्रमाण 41% आहे. विभक्त कुटुंबातील स्त्री मजूरांचे प्रमाण 68% आहे. 68.5% स्त्री मजूर विवाहित आहेत. 22% मजुरांकडे स्वत:ची जमीन नाही. ठराविक हंगामातच काम मिळते. 50 ते 70 रु. वेतन मिळणाऱ्या स्त्रियांचे प्रमाण सर्वाधिक 54% आहे. त्यांच्या मते, हा वर्ग शोषित, पीडित व मागास आहे. निरक्षर, अकुशल व अंधश्रध्दाळू आहे. हंगामी रोजगार, असंघटितपणा, सौदाशक्तीचा अभाव, कमी वेतन, कर्जबाजारीपणा यामुळे शेतमजूर स्त्रियांची स्थिती हलाखीची आहे. स्त्रियांचे समाजातील स्थान दुय्यम आहे. मिळालेल्या पैशावर तिचा हक्क नाही. निर्णयात सहभागी करुन घेतले जात नाही. सौदाशक्तीचा अभाव, आत्मविश्वासाचा अभाव यामुळे त्या स्वत:च्या अस्तित्वासाठी झगडण्यासाठी कमी पडतात. सरकारी योजनांचा त्यांना पुरेसा लाभ झालेला नाही.

याशिवाय शोधनिबंध सादरीकरणानंतर झालेल्या चर्चेत डॉ. के. के. पाटील, डॉ. पठाण, डॉ.श्रीराम जोशी, डॉ . सहस्त्रबुध्दे, डॉ. एम्. एन्. शिंदे, डॉ. आ.गो. पुजारी, डॉ. मिसाळ, डॉ. ठाकरे, डॉ.सुभाष दगडे, प्रा. लाखे यांनी आपले विचार मांडले.

डॉ. खामकर यांनी सर्व शोधनिबंधाचा आढावा घेवून आभार मानले.

●●●

# चर्चासत्र तिसरे
## महाराष्ट्राच्या आर्थिक विकासाचे वास्तव व भवितव्य


मुलाणी एम्. यू.
सूत्रसंचालक
भ्रमणध्वनी : 9881161893

खाडे आर. के.
समीक्षक


**प्रस्तावना :**

महाराष्ट्र राज्य हे पुरोगामी विचार मंथनाची पार्श्वभूमी असणारे घटक राज्य असून विविध अर्थाने नामोल्लेख केला जात असला तरी भौगोलिकदृष्ट्या महान राष्ट्र या अर्थाने महाराष्ट्र परिचित आहे. महाराष्ट्राच्या हीरक महोत्सवी वर्षामध्ये ''महाराष्ट्राच्या आर्थिक विकासाचे वास्तव व भवितव्य'' या शीर्षकावर 35 शोधनिबंध सादर झालेले आहेत. या शोधनिबंधामध्ये ''महाराष्ट्राच्या बदलत्या अर्थव्यवस्थेचा'' ऊहापोह केला असून गेल्या 50 वर्षात महाराष्ट्राने कोणकोणत्या क्षेत्रात उत्तुंग भरारी घेतलेली आहे याचा सांख्यिकीय स्त्रोताद्वारे आढावा घेतलेला आहे. त्याचप्रमाणे महाराष्ट्राच्या सर्वसमावेश स्वरूपात राज्य शासनाच्या धोरणाचा चिकित्सक आढावा घेतलेला आहे. या विषयावर परिषदेच्या 35 संशोधकांनी शोधनिबंध सादर केलेले आहेत ही स्वागतार्ह घटना आहे. सादर झालेल्या शोधनिबंधाचे विषय निहाय वर्गीकरण पुढीलप्रमाणे

| | शोधनिबंधाचे वर्गीकरण | संख्या |
|---|---|---|
| 1) | आर्थिक, सामाजिक, पायाभूत सेवा सुविधा | 13 |
| 2) | सहकार | 06 |
| 3) | शेती | 04 |
| 4) | राजस्व | 03 |
| 5) | महाराष्ट्राच्या विकास योजना | 03 |
| 6) | प्रादेशिक विकास | 02 |
| 7) | औद्योगिक विकास | 02 |
| 8) | महिला सबलीकरण | 02 |

**निबंधाचा सारांश :**

**1) आर्थिक सामाजिक पायाभूत सेवा सुविधा :**

महाराष्ट्राच्या आर्थिक व सामाजिक विकासात रस्ते, वीज, दळणवळण, वाहतूक, शिक्षण, आरोग्य, पाणी, वित्तीय संस्था या घटकांचे महत्त्वपूर्ण योगदान आहे. म्हणून या विषयावर पुढील संशोधकांनी शोधनिबंध सादर केलेले आहेत.

**1) डॉ. सुहास आव्हाड :** ''आर्थिक विकासात पायाभूत सेवा सुविधांचे योगदान'' या शीर्षकात रस्ते, रेल्वे, वीज, दूरध्वनी यांची संख्यात्मक स्थिती दर्शवून विकासामध्ये महत्त्वपूर्ण योगदान दिलेले आहे असे प्रतिपादन केलेले आहे.

**2) डॉ. मंजूषा ठाकरे :** महाराष्ट्राच्या विकासात वीज या मूलभूत साधनाचे महत्त्व विशद करून वीज निर्मिती वापर, भारनियमन, वीज गळती याचा ऊहापोह केलेला आहे.

**3) डॉ. राजेंद्र शिंदे :** सूक्ष्म वित्तचा साह्याने ग्रामीण दारिद्र्य निर्मूलन करण्यास मदत झालेली असून सद्य परिस्थितीत सूक्ष्म वित्त आवश्यक आहे असा निष्कर्ष आहे.

**4) प्रा. वैशाली नाईक :** मानव विकास साध्य करण्याकरिता आरोग्य, शिक्षण या क्षेत्रात शासकीय हस्तक्षेप आवश्यक असून या सुविधा निम्न स्तरावर प्राप्त होणे आवश्यक आहे.

**5) प्रा. दिपक शिंदे :** महाराष्ट्रामधील आरोग्य सुविधा मध्ये रुग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्रे, टी.बी. दवाखाने यांची लोकसंख्या निहाय संख्यात्मक वाढीचे सुतोवाच केले आहे.

**6) डॉ. सुरेश मगरे :** लोकसंख्या गुणवत्ता हे विकासाचे द्योतक असून लोकसंख्या गुणवत्ता विकासात योगदान देते.

**7) सौ. विद्या म्होपरे :** लोकसंख्या वृद्धीमुळे शहरीकरण झपाट्याने होत असून मानवी निर्देशांकात बदल झाल्याची नोंद घेतली पाहिजे.

**8) प्रा. भिमराव मोरे :** महाराष्ट्रातील दलित वस्तीध्ये रस्ते, पिण्याचे पाणी, शाळा, अंगणवाडी, वित्तीय संस्था, वीज या सुविधा अद्यापपर्यंत पोहचल्या नाहीत. अशी वास्तविकता प्रतिपादन केली आहे.

**9) प्रा. एम. सदामते :** महाराष्ट्राच्या आर्थिक विकासात जलसिंचनाचे योगदान महत्त्वपूर्ण असून पाणी घटकाचे समान वितरण प्रतिपादन केले.

**10) प्रा. अनंतहोन कवळस :** महाराष्ट्राच्या विकासात पाणी व्यवस्थापन कार्यक्षम करून समान वितरण आवश्यक आहे.

**11) प्रा. कसबे :** महाराष्ट्रामध्ये सामाजिक सुविधा तळागाळापर्यंत पोहचलेल्या नसून काही सुविधांमध्ये कमतरता जाणवत आहे.

**12) डॉ. संजय तुपे :** शहरी दारिद्र्यांचे सैद्धांतिक चिंतन करताना शहरी दारिद्र्य निर्मूलनाकरिता प्रभावी योजना नाहीत.

**13) डॉ. सुभाष दगडे :** महाराष्ट्राच्या विकासात आर्थिक सामाजिक घटकांचा लाभ सर्वांना समप्रमाणात मिळाल्यास महाराष्ट्राची औद्योगिक प्रगती झपाट्याने होवू शकेल असे व भविष्यवाणी वर्तविली आहे.

**2) सहकार :**

महाराष्ट्राच्या प्रगतीमध्ये सहकाराने फार

महत्त्वपूर्ण योगदान दिलेले असले तरी 6 शोधनिबंध सादर झालेले आहेत.

**1) डॉ. लालासाहेब घाटगे :** महाराष्ट्राच्या आर्थिक विकासात सहकार चळवळीने विविध क्षेत्रात उत्तुंग भरारी घेतली असून राष्ट्रीय पातळीवर महाराष्ट्राचे नाव उज्वल केले आहे.

**2) डॉ. अविनाश निकम :** सहकारी अधिकोषन व्यापारी अधिकोषण पेक्षा अधिक प्रमाणात कर्जवाटप करतात म्हणून सहकारी अधिकोषनाची उभारणी भक्कम पायावर व्हावी अशी मनिषा व्यक्त केली आहे.

**3) अमृता सूर्यवंशी :** ग्राहक सहकारी चळवळीची उभारणी ही ग्राहकांचा सहभाग वृद्धी, सभासद, निष्ठा यावर अवलंबून आहे.महाराष्ट्र हीरक महोत्सवी ग्राहक चळवळ टिकून राहणे याकरिता प्रयत्न आवश्यक आहेत.

**4) प्रा. सुभाष पाटील :** सहकार चळवळीला योग्य व कार्यक्षम नेतृत्व ग्राहक सेवा तत्पर, स्पर्धा, तंत्रज्ञान यांची उपलब्धता केल्यास सहकाराची वाटचाल कौतुकास्पद असेल.

**5) कदम गजानन :** महाराष्ट्रातील सहकारी बँकांनी ग्रामीण भागात बँकिंग सुविधा निम्न स्तरावर कार्यक्षम व तत्परता दाखवून कार्य करीत आहे.

**6) डॉ. श्रीरंग कुडूक :** सहकार चळवळीने शेतमाल प्रक्रिया उद्योगसंस्था, शहरी नागरी, भागात गृहबांधणी भांडार, देखरेख अशा संस्थांचे भवितव्य वर्तविले आहे.

**3) कृषि :**

**1) प्रा. वनिता चौरे :** अमरावती जिल्ह्यातील फळ उत्पादन धोरणांचा अभ्यास करून फळ उत्पादन खर्च आणि प्राप्ती याचे प्रमाण नमूद करून खर्चापेक्षा प्राप्ती जास्त असल्याने त्या फळ पिकांचे उत्पादन घेणे आवश्यक आहे असे प्रतिपादन केलेले आहे.

**2) संदीप इरोळे :** आर्थिक विकासात कृषी आणि औद्योगिक क्षेत्राची विभाग वार स्थिती नमूद करून कृषी क्षेत्र हे विकासाचे महत्त्वपूर्ण साधन आहे असे प्रतिपादन केले.

**3) प्रा. बुरूडे प्रकाश :** महाराष्ट्राच्या आर्थिक विकासामध्ये शेती क्षेत्राची भूमिका महत्त्वपूर्ण असून शेती क्षेत्रातील गुंतवणूक वाढणे गरजेचे आहे असा निष्कर्ष काढण्यात आला.

**4) डॉ. शामराव कुलकर्णी :** शेती संदर्भात महाराष्ट्र व भारत यांचा प्राथमिक द्वितीय आणि सेवा क्षेत्रांचा विभिन्न दराने बदलत आहे हे विकासाचे गमक आहे असा निष्कर्ष काढण्यात आले.

**4) राजस्व :**

**1) डॉ. अरूण सोनेगावकर :** अंदाजपत्रकीय धोरणांचा राज्याच्या आर्थिक विकासाकरिता निश्चितपणे उपयोग होतो. परंतु कर्जाऊ भांडवलाच्या वापराने आर्थिक स्वातंत्र्य गमवावे लागते. गेल्या 50 वर्षात महाराष्ट्राचे राजस्वाचे स्वरूप बदलले आहे असे निष्कर्ष प्राप्त झाले.

**2) डॉ. वैदही दप्तरदार :** महाराष्ट्राच्या राजस्वामधील तुटीचे विश्लेषण करून पिकास खर्चापेक्षा विकासेतर खर्च वाढ आहे.ही बाब चिंताजनक असल्याचे स्पष्ट केले.

**3) प्रा. सुरेंद्र डावरे :** महाराष्ट्राच्या राज्यकोषीय धोरणांचा आढावा घेऊन त्या धोरणांचा अर्थव्यवस्थेवर अनुकूल परिणाम दर्शवून विकासाला पोषक धोरणांची अंमलबजावणी केलेली आहे.

**5) महाराष्ट्राच्या विकास योजना :**

**1) प्रा. विशाल पावसे :** महाराष्ट्राच्या ग्रामीण पिकामध्ये संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानाचे महत्त्व विशद करून ग्रामीण आरोग्य राखण्यास योजनेने महत्त्वपूर्ण भूमिका बजावलेली आहे असा निष्कर्ष व्यक्त केला.

**2) प्रा पठाण आर. एम. :** महाराष्ट्रातील आरोग्यविषयक योजनेचे आर्थिक विकासातील योगदान स्पष्ट करून आरोग्याची दक्षता खाजगी आणि सार्वजनिक क्षेत्रांनी घेतली असून त्या आवश्यक सुविधांची पुर्तता केली जात आहे.

**3) प्रा. राजश्री काशिकर :** दारिद्र्य रेषेखालील लोकांचे आर्थिक, सामाजिक सबलीकरण करण्यामध्ये सुवर्ण जयंती ग्राम स्वयंरोजगार योजना महत्त्वपूर्ण योगदान करीत असून त्याद्वारे स्वयंसहायता बचत गट सक्षमी होत आहेत असा निष्कर्ष व्यक्त केला.

**6) प्रादेशिक असमतोल :**

**1) रमजान मुजावर :** राज्यात कृषी उद्योग आणि सेवा क्षेत्राची प्रगती असमाधानकारक असून या तिन्ही क्षेत्रांच्या विकासात प्रादेशिक असमतोल निर्माण होऊन पश्चिम महाराष्ट्र हा विभाग विकासाबाबत अग्रेसर आहे.

**2) प्रा. विनोद बागवाले :** महाराष्ट्राच्या हीरक महोत्सवात राज्याच्या विभागनिहाय विषमता वाढलेली असून मराठवाडा आणि विदर्भ यांचा अनुशेष भरून काढण्याची शिफारस केलेली आहे. अन्यथा हे विभाग स्वतंत्र राज्याच्या मागणीला छुपा पाठिंबा देत असतात.

**7) औद्योगिक विकास :**

**1) डॉ. देवगिरीकर, डॉ. तळुले, प्रा. शिंदे :** महाराष्ट्राच्या औद्योगिक विकासास उपलब्ध साधनसामग्री अपुरी असली तरी साधन सामग्रीचा पुर्नवाटप होवून समतोल विकास करणे गरजेचे आहे त्यासाठी कौप डगलस सिद्धांताच्या आधारे स्पष्ट केला.

**2) प्रा. बी. एल्. महाजन :** महाराष्ट्राच्या औद्योगिक प्रगतीमध्ये रोजगार, प्रत्यक्ष परकीय गुंतवणूक व त्यांचा विविध क्षेत्रातील विस्तार गुंतवणूकीचा कालपरत्वे तपशील या संबंधीचे विवेचन नोंदवून परकीय गुंतवणूकीला महाराष्ट्राने योग्य वातावरण निर्मिती केलेली आहे.

**8) महिला सबलीकरण :**

**1) प्रा. श्रीकांत फुलसुंदर :** ग्रामीण महिलांचे दारिद्र्य निर्मूलन करण्याकरीता आणि समाजात कुटुंबात मानाचे स्थान निर्माण करण्या करीता स्वयं सहायता बचत गट उपयुक्त ठरत आहेत. त्याद्वारे महिलांचे आर्थिक, सामाजिक सबलीकरण होत आहे. त्याकरीता बचत गट चळवळ प्रेरणादायी ठरत आहे.

**2) डॉ. तेजस्विनी मुडेकर :** विकासाच्या प्रक्रियेमध्ये सामाजिक समानतासह आर्थिक विकास झाला पाहिजे.तसेच लिंगभेद विरहीत विकास करून दुर्बल व कमकुवत घटकांना शासकीय मदत मिळाली पाहिजे. विशेषत: महाराष्ट्रातील महिलांचे

आयुष्यात, आरोग्याचा दर्जा, आर्थिक, सामाजिक सहभाग यामध्ये वाढ झाली पाहिजे असे प्रमुख निष्कर्ष निवडलेले आहेत.

महाराष्ट्राचा आर्थिक विकास या विषयाची व्याप्ती फार मोठी असूनही संशोधकांनी विविध मुद्यांचा परामर्ष घेतलेला आहे या चर्चासत्रात प्रत्यक्षात 35 शोधनिबंध सादर झालेले असून परिषदेच्या अगोदर 53 शोधनिबंध स्मरणिकेमध्ये आलेले आहेत याचाच अर्थ 86 टक्के परिषदेत सादर झालेले आहेत हे मराठी अर्थशास्त्र परिषदेचे फलीत मानले जाते.

या चर्चासत्रामध्ये लोकसंख्येच्या समृद्धीत वाढ, रोजगार निर्माण संधी, नवे तंत्रज्ञान व रिटेल क्षेत्रात थेट परदेशी गुंतवणूक या मुद्यांवर खुली चर्चा पार पडली असती तर सर्व समावेशक विकास हे फलीत स्पष्ट झाले असते.

●●●

---

## मराठी अर्थशास्त्र परिषद
## डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ
## ग्रंथ पारितोषिक

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या वतीने मराठी भाषेत प्रसिद्ध झालेल्या सर्वोत्कृष्ट अर्थशास्त्रीय ग्रंथास रु. 1000/- चे डॉ. बाबसाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ ग्रंथ पारितोषिक प्रति वर्षी देण्यात येते. 1 जानेवारी, 2010 ते 31 डिसेंबर, 2010 या कालावधीत प्रसिद्ध झालेल्या मराठीतील अर्थशास्त्रीय ग्रंथांच्या लेखकांना यंदाच्या स्पर्धेत सहभागी होता येईल. स्पर्धेचे नियम व अटी इत्यादींसाठी डॉ. अनिल सूर्यवंशी, कार्यवाह – खजिनदार, मराठी अर्थशास्त्र परिषद, 'गोदाई' शिवशक्ती मैदानाजवळ, शिवाजी नगर, बार्शी, जि. सोलापूर – 413 411 (मो.) 8805691406 यांच्याशी संपर्क साधावा. विहित नमुन्यातील अर्ज, संबंधित ग्रंथाच्या 4 प्रति सह कार्यवाहांकडे दि. 31 ऑगस्ट, 2011 पर्यंत पाठवाव्यात.

●●●

**अनिल सूर्यवंशी**
कार्यवाह – खजिनदार
मराठी अर्थशास्त्र परिषद

# कार्यवाहांचा अहवाल
# 34 वे वार्षिक अधिवेशन 2009-2010

**अनिल बाबूराव सूर्यवंशी**
कार्यवाह-खजिनदार
मराठी अर्थशास्त्र परिषद

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे 34 वे वार्षिक राष्ट्रीय अधिवेशन शनिवार दिनांक 13 नोव्हेंबर ते सोमवार दिनांक 15 नोव्हेंबर 2010 या तीन दिवसांच्या कालावधीत आदर्श विद्या प्रसारक संस्थेचे आदर्श कला आणि वाणिज्य महाविद्यालय, कुळगांव-बदलापूर, ता. अंबरनाथ, जि. ठाणे येथे यशस्वीरित्या संपन्न झाले. डॉ. सौ. मुक्ता जहागिरदार, माजी विभागप्रमुख, पदव्युत्तर अर्थशास्त्र विभाग, शासकीय विदर्भ ज्ञान, विज्ञान संस्था, अमरावती या अधिवेशनाच्या अध्यक्षस्थानी होत्या.

**अधिवेशन उद्घाटन समारंभ :**

शनिवार दिनांक 13 नोव्हेंबर 2010 रोजी सकाळी 10.00 वाजता उद्घाटन सोहळ्याचा प्रारंभ ईशस्तवन व दीप प्रज्वलनाने झाला. प्रमुख पाहुणे मा. अच्युत गोडबोले, संगणक तज्ञ व सुप्रसिद्ध लेखक, मुंबई हे होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि उपस्थित मान्यवरांचे स्वागत व सत्कार संस्थेचे अध्यक्ष मा. जनार्दनजी घोरपडे व प्राचार्या डॉ. वैदेही दप्तरदार यांनी केले.अधिवेशनाचे प्रमुख अतिथी मा.अच्युत गोडबोले यांनी भारतातील शेतीच्या विकासात संगणकाचा उपयोग कशा प्रकारे होऊ शकतो याबाबत उदाहरणांसह सविस्तर विवेचन केले. माहिती तंत्रज्ञानातील प्रगतीचा उपयोग शेती संवर्धन व शाश्वत विकासासाठी केला पाहिजे असे प्रतिपादन केले.

अधिवेशनाच्या अध्यक्षा डॉ. मुक्ता जहागिरदार यांनी 'परामर्ष विकासाचा : परिप्रेक्ष्य अपवर्जन व समावेशनाचा' या विषयावर अत्यंत अभ्यासपूर्ण विवेचन केले. विकास ही अधिक मानवीय जीवनाकडील वाटचाल की वृद्धीच्या भ्रमजालाची गुलामी यातील निवड आम्हाला करायची आहे, असे प्रतिपादन केले. 'अर्थमंथन' या स्मरणिकेचे प्रकाशन प्रमुख

पाहुण्याचे हस्ते करण्यात आले. या उद्घाटन प्रसंगी व्यासपीठावर परिषदेच्या अध्यक्षा डॉ. मुक्ता जहागिरदार, कार्याध्यक्ष प्राचार्य डॉ. दिलीप पाटील, कार्यवाह-खजिनदार डॉ. अनिल सूर्यवंशी, अर्थसंवादचे प्रमुख संपादक प्राचार्य डॉ. जगन्नाथ पाटील, परिषदेचे गतवर्षीचे अध्यक्ष डॉ. विनायक देशपांडे, **प्रमुख अतिथी मा. अच्युत गोडबोले, संस्थेचे अध्यक्ष मा. जनार्दनजी घोरपडे,** प्राचार्य वैदेही दप्तरदार व स्थानिक कार्यवाह डॉ. शामराव कुलकर्णी आदि उपस्थित होते. कार्यवाह डॉ. अनिल सूर्यवंशी यांनी परिषदेच्या वाटचालीचा संक्षिप्त आढावा घेतला. कार्याध्यक्ष डॉ. दिलीप पाटील भावी वाटचाल व विशेषत: परिषदेची पुण्यनगरीत स्ववास्तु याबाबत विवेचन केले. भूतपूर्व अध्यक्ष डॉ. विनायक देशपांडे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रम अध्यक्ष मा. घोरपडे यांच्या भाषणानंतर स्थानिक कार्यवाह डॉ. शामराव कुलकर्णी यांनी उपस्थितांचे आभार मानले.

**चर्चासत्रे :**

अधिवेशन कालावधीत नेहमीच्या प्रथेप्रमाणे एकूण 4 चर्चासत्रे संपन्न झाली. शनिवार दिनांक 13 नोव्हेंबर रोजी दुपारी 3 ते 6 या वेळेत नोबेल पारितोषिक विजेते **'पॉल सॅम्युअलसन यांचे अर्थशास्त्रातील योगदान'** या पहिल्या चर्चासत्राचे सूत्रसंचालन डॉ. ज्ञानोबा मोरे यांनी यशस्वीरित्या केले. या चर्चासत्रात एकूण 14 शोधनिबंध सादर झाले. रविवार दिनांक 14 नोव्हेंबर रोजी सकाळी **'असंघटित क्षेत्रातील श्रमिकांचा अभ्यास'** या दुसऱ्या चर्चासत्रात 21 शोधनिबंध सादर करण्यात आले व डॉ. बबनराव खामकर, कणकवली यांनी सूत्रसंचालनाचे काम पाहिले. **'महाराष्ट्राच्या आर्थिक प्रगतीचे वास्तव आणि भवितव्य'** हे तिसरे चर्चासत्र दुपारी 3 ते 6 दरम्यान डॉ. एम. यू. मुलाणी यांच्या सूत्रसंचालनाखाली संपन्न झाले. या चर्चासत्रात सर्वाधिक 53 शोधनिबंध सादर करण्यात आले.

**सोमवार दिनांक 15 नोव्हेंबर 2010 सकाळी 9 ते 11 या दरम्यान** '13 वा वित्त आयोग' या आयत्या वेळेच्या विषयावर चौथे चर्चासत्र संपन्न झाले. डॉ. श्रीनिवास खांदेवाले, नागपूर, डॉ. मधुकर एन. शिंदे, सांगली, डॉ. नाडकर्णी, मुंबई व डॉ. मस्के औरंगाबाद आदींनी 13 व्या वित्त आयोगाच्या विविध पैलूंवर अभ्यासपूर्ण विवेचन केले.

**प्रा. नी. वी. सोवनी स्मृती व्याख्यान - एक नाविन्यपूर्ण उपक्रम :**

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे संस्थापक अध्यक्ष 'प्रा. नी. वी. सोवनी स्मृती व्याख्यान' या एका नाविन्यपूर्ण उपक्रमास या अधिवेशनापासून प्रारंभ झाला. या उपक्रमाचे पहिले पुष्प मा. डॉ. अजित रानडे, प्रमुख अर्थतज्ज्ञ, आदित्य बिर्ला समूह यांनी 'आर्थिक विकास व वित्तीय व्यवस्था - परस्परसंबंध व परिणाम' या विषयावर गुंफले. डॉ. अजित रानडे यांनी वित्तीय क्षेत्र आणि वास्तविक क्षेत्र यातील आंतरसंबंध अत्यंत सोप्या व ओघवत्या भाषेत स्पष्ट केला. व्याजदरातील बदल आणि अर्थव्यवस्थेवर होणारे परिणाम डॉ. रानडे यांनी विविध उदाहरणांच्या सहाय्याने स्पष्ट केले. हा उपक्रम शनिवार दि. 13 नोव्हेंबर 2010 रोजी सायंकाळी संपन्न झाला.

हा उपक्रम फलद्रुप होण्यासाठी ज्येष्ठ सदस्य डॉ. व्यं. सु. पाटणकर, डॉ. मुक्ता जहागिरदार व डॉ. दि. व्य. जहागिरदार यांनी विशेष परिश्रम घेतले आणि 47 आजीव सदस्यांनी एकूण रु. 80,050/- असा उत्स्फुर्त आर्थिक प्रतिसाद दिला याबद्दल मन:पूर्वक आभार !!! प्रा. नी. वी. सोवनी स्मृती व्याख्यानासाठी रु. 1,00,000/- निधी ठेवण्याचे उद्दिष्ट आहे. तरी उर्वरीत रक्कम रु. 20,000/- जमा होण्यासाठी आपण आर्थिक योगदान द्यावे ही विनंती.

**वार्षिक सर्वसाधारण सभा :**

रविवार दिनांक 14 नोव्हेंबर 2010 रोजी सायंकाळी 6.00 वाजता डॉ. मुक्ता जहागिरदार यांच्या अध्यक्षतेखाली वार्षिक सर्वसाधारण सभा संपन्न झाली. सभेच्या प्रारंभी दिवंगत आजीव सदस्य व मान्यवरांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. वार्षिक सर्वसाधारण सभेतील काही महत्त्वाचे निर्णय पुढीलप्रमाणे 35 वे वार्षिक अधिवेशन.

ऑक्टोबर/नोव्हेंबर 2011 मध्ये होणाऱ्या 35 व्या वार्षिक अधिवेशनाचे यजमानपद स्वीकारण्यासाठी एकच निमंत्रण प्राप्त झाले. कार्यकारी मंडळाच्या शिफारशीनुसार सर्वसाधारण सभेने देवचंद कॉलेज, अर्जुननगर, ता. कागल, जि. कोल्हापूर यांचे नियंत्रण एकमताने स्वीकारले.

34 व्या अधिवेशनासाठी पुढील तीन विषय निश्चित करण्यात आले.

1) जगदिश भगवती यांचे आर्थिक योगदान
2) भारताची आर्थिक महासत्ता बनण्याकडे वाटचाल.
3) ग्रामीण महाराष्ट्राची आधारभूत संरचना

**निवडणूक :**

35 व्या अधिवेशनाच्या अध्यक्षपदी प्राचार्य डॉ. आ. गो. पुजारी, सांगोला यांची बहुमताने निवड झाली. 2011 ते 2014 या तीन वर्षासाठी माजी अध्यक्ष डॉ. मधुकर तथा एम. एन. शिंदे, सांगली यांची विश्वस्त म्हणून एकमताने निवड झाली. तसेच परिषदेचे मुखपत्र 'अर्थसंवाद' या त्रैमासिकाचे प्रमुख संपादक या पदावर डॉ. अविनाश निकम, शहादा-नंदुरबार यांची 2011 ते 2014 या तीन वर्षासाठी एकमताने निवड झाली.

2011 ते 2014 या तीन वर्षांसाठी कार्यवाह-खजिनदार म्हणून डॉ. अनिल बा. सूर्यवंशी यांची सलग दुसऱ्यांदा बहुमताने निवड झाली.

2011 ते 2014 या तीन वर्षांसाठी कार्यकारी मंडळावर

1) डॉ. श्रीराम देविदासराव जोशी, जळगांव
2) डॉ. हरिहर रामकृष्ण तिवारी, वाशिम
3) डॉ. सुरेश भास्कर ढाके, डोंगरकठोरे, जळगांव

या तिघांची निवड करण्यात आली.

**समारोप सोहळा :**

सोमवार दिनांक 15 नोव्हेंबर 2010 रोजी सकाळी 11.00 वाजता समारोप सोहळ्यास प्रारंभ झाला. या सोहळ्याचे प्रमुख पाहुणे मा. श्यामकांत अत्रे, निवृत्त प्राचार्य, मुंबई होते. व्यासपीठावर संस्था अध्यक्ष मा. जनार्दनजी घोरपडे, उपाध्यक्ष मा. तुषार आपटे, सचिव मा. उदय कोतवाल आणि अधिवेशनाच्या अध्यक्षा डॉ. मुक्ता जहागिरदार, कार्याध्यक्ष प्राचार्य डॉ. दिलीप पाटील, कार्यवाह-

खजिनदार, डॉ. अनिल सूर्यवंशी, अर्थसंवादचे प्रमुख संपादक प्राचार्य डॉ. जगन्नाथ पाटील, नवनिर्वाचित अध्यक्ष प्राचार्य डॉ. आ. गो. पुजारी, नवनिर्वाचित संपादक डॉ. अविनाश निकम, प्राचार्या डॉ. दप्तरदार, स्थानिक कार्यवाह डॉ. श्यामराव कुलकर्णी आदि उपस्थित होते. प्रमुख पाहुणे मा. अत्रे यांनी अधिवेशन काळात संपन्न झालेल्या विविध चर्चासत्रांबाबत प्रशंसा केली. अशी अधिवेशने समाजपयोगी व उपयुक्त आहेत. असे प्रतिपादन केले.

या प्रसंगी परिषदेचे अध्यक्षा डॉ. मुक्ता जहागिरदार, कार्याध्यक्ष प्राचार्य डॉ. दिलीप पाटील, कार्यवाह डॉ. अनिल सूर्यवंशी यांनी अधिवेशन यशस्वीरित्या पार पाडल्याबद्दल यजमानांचे आभार व्यक्त केले. नवनिर्वाचित अध्यक्ष प्राचार्य डॉ. आ. गो. पुजारी यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

**परिषदेतर्फे विविध पारितोषिकांचे वितरण :**

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्यावतीने दिल्या जाणाऱ्या विविध पारितोषिकांचे वितरण या समारोप समारंभात प्रमुख पाहुणे व संस्था पदाधिकारी यांच्या हस्ते करण्यात आले.

**1) डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, उत्कृष्ठ ग्रंथ पारितोषिक रु. 501/- (2010-11) :**

'आदिवासींची आर्थिक आणि सामाजिक स्थिती' - डॉ. जयवंत इंगळे, अ. आ. कॉलेज, मंचर पुणे आणि 'आदिवासी विकास आणि वास्तव' - डॉ. मारोती तेगमपूरे, औरंगाबाद या दोन ग्रंथांना विभागून देण्यात आले.

**2) प्रा. मो. स. भावे पारितोषिक : (अर्थसंवादमधील सर्वोत्कृष्ट लेख रु. 251/-) :**

'कृषी विकासाचे शाश्वत (चिरंतन) विकृतीकरण-महाराष्ट्राच्या ऊस पीक पट्ट्यातील संसाधनाचे विद्रुपीकरण' डॉ. वसंतराव जुगळे, प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्या लेखास देण्यात आले, हा लेख अर्थसंवाद खंड 33, अंक 2-3 यात प्रसिद्ध झाला आहे.

**3) म. अ. परिषदेचे पाचवे वार्षिक अधिवेशन, पारितोषिक :**

शिवाजी विद्यापीठात एम. ए. अर्थशास्त्र या विषयात सर्वाधिक गुण मिळालेल्या विद्यार्थ्यास देण्यात आले. (एप्रिल 2009)

**4) भाऊसाहेब गेणूजी दरेकर-पाटील स्मृती पारितोषिक :**

पुणे विद्यापीठात एम. ए. अर्थशास्त्र विषयात प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास देण्यात आले.

**5) मातोश्री बयाबाई श्रीपतराव कदम स्मृती पारितोषिक :**

अर्थशास्त्र विषयातील मराठी भाषेत महिला लेखिकेने लिहिलेल्या सर्वोत्कृष्ठ ग्रंथास रोख रु. 11,000/-, स्मृतीचिन्ह, शाल, श्रीफळ, प्रमाणपत्र असे पारितोषिक 33 व्या अधिवेशनापासून सुरू केलेले आहे. सन 2008 मध्ये डॉ. मुक्ता जहागिरदार यांच्या 'आर्थिक चिकित्सा' या ग्रंथास देण्यात आले. परंतु 2009 मध्ये एकही ग्रंथ प्राप्त झालेला नाही. तरी सर्व महिला लेखिकांनी याची नोंद घ्यावी. 35 व्या अधिवेशनासाठी सन 2010 मधील ग्रंथ पाठवावेत.

**अधिवेशन काळातील पारितोषिके :**

अधिवेशन काळात सादर होणाऱ्या सर्वोत्कृष्ठ शोधनिबंधांना खालीलप्रमाणे पारितोषिके दिली जातात.

**1) कै. ग. प्र. पिंपरकर व कांतीभाई ठक्कर ऋणमुक्ती प्रतिष्ठानचे डॉ. अमर्त्य सेन पारितोषिक रु. 501/-**

डॉ. लालासाहेब धाटगे व डॉ. अनिल कृ. वावरे, सातारा यांनी संयुक्तपणे लिहिलेल्या 'सहकारी चळवळ आणि महाराष्ट्राचा आर्थिक विकास' आणि प्रा. डॉ. ऋता खापर्डे, कल्याण (प.), मुंबई यांच्या 'असंघटीत क्षेत्रातील श्रमिकांचा अभ्यास' या दोन शोधनिबंधांना विभागून देण्यात आले.

**2) पद्मजा गंधे पारितोषिक रु. 1001/- :**

वार्षिक अधिवेशनात महिला सदस्याने सादर केलेल्या सर्वोत्कृष्ट शोधनिबंधास हे पारितोषिक दिले जाते. 'पॉल सॅम्युअलसन यांचे आंतरराष्ट्रीय व्यापार सिद्धांतातील योगदान' या डॉ. कुंदा दामले, पुणे यांच्या शोधनिबंधास देण्यात आले.

**3) डॉ. ज. फा. पाटील पारितोषिक रु. 1111/- :**

वार्षिक अधिवेशनात विद्यार्थी सभासदाने सादर केलेल्या उत्कृष्ट शोधनिबंधाचे पारितोषिक श्री. रमजान मुजावर, कोल्हापूर यांच्या 'महाराष्ट्रातील प्रादेशिक असमतोल' या शोधनिबंधास देण्यात आले.

समारोप सोहळ्याचे प्रास्ताविक व स्वागत प्राचार्य डॉ. वैदेही दप्तरदार व अहवाल वाचन डॉ. श्यामराव कुलकर्णी यांनी केले. प्रा. जी. एस. कलशेट्टी, अक्कलकोट व प्रा. डॉ. अंजली कुलकर्णी यांनी प्रतिनिधींच्या वतीने मनोगत व्यक्त केले. प्रमुख पाहुण्यांच्या मार्गदर्शनानंतर डॉ. श्यामराव कुलकर्णी यांनी कॉलेज व संस्थेच्यावतीने आणि डॉ. अनिल सूर्यवंशी यांनी परिषदेच्यावतीने सर्वांचे आभार मानले. अशा प्रकारे मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या 34 व्या वार्षिक अधिवेशनाची यशस्वीरित्या सांगता झाली.

या अधिवेशनासाठी डॉ. एम. एन. शिंदे इस्लामपूर, सांगली, डॉ. के. के. पाटील, परभणी, डॉ. टी. एल. बारबोले, उस्मानाबाद, डॉ. मुलाणी एम. यू., बारामती, डॉ. उत्तम वाकोडकर, अंबेजोगाई यांनी तज्ञ परीक्षक म्हणून मानद सेवा दिली. तसेच डॉ. ज्ञानोबा मोरे, उस्मानाबाद, डॉ. मुलाणी एम. यू., बारामती; डॉ. बबनराव खामकर, कणकवली यांनी अधिवेशन काळातील चर्चासत्रांचे सूत्रसंचालन यशस्वीरित्या पार पाडले. डॉ. मंजुषा मुसमाडे, डॉ. खाडे व डॉ. काशीकर यांनी त्यांना सहकार्य केले. तसेच डॉ. ज्ञानोबा मोरे यांनी डॉ. विकास सुकाळे व प्रा. एच. जी. वलांडकर यांच्या सहकार्याने शांततेने निवडणूक प्रक्रिया पार पाडली. या सर्वांचा मी परिषदेच्या वतीने ऋणी आहे.

●●●

# अर्थसंवाद वार्षिक अहवाल

2009-2010 (खंड 33, अंक 1 ते 4)

**जगन्नाथ शामराव पाटील**
प्रमुख संपादक

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या अर्थसंवाद या त्रैमासिकाचा 2009-2010 या वर्षाचा 33 व्या खंडाचा वार्षिक अहवाल परिषदेच्या सर्व सदस्यासमोर सादर करताना मला अत्यंत आनंद होत आहे. माझ्या संपादकीय कारकिर्दीतला हा दुसरा अहवाल. अर्थसंवादाचे आजपर्यंत 33 खंड अखंडपणे प्रकाशित झाले. मराठी अर्थशास्त्र परिषदेचे सर्व सन्माननीय सदस्य, अर्थसंवादचे लेखक, जाहिरातदार, वर्गणीदार यांच्या सहकार्यामुळे परिषदेस हे त्रैमासिक चालू ठेवणे शक्य झाले आहे. इंडियन कौन्सिल ऑफ सोशल सायन्य रिसर्च, दिल्ली आणि महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई या संस्थानी नियमितपणे अर्थसंवादच्या प्रकाशनासाठी अनुदान मंजूर करून यात वेळोवेळी वाढ देखील केली आहे. त्याबद्दल मी या संस्थांचा परिषदेच्या वतीने अत्यंत कृतज्ञ आहे.

सन 2009-10 या वर्षामध्ये अर्थसंवादचे चारही अंक परिषदेच्या प्रथेप्रमाणे प्रकाशित झाले. अर्थसंवादला ISSN क्रमांक प्राप्त झाल्याने अर्थसंवाद जागतिक पातळीवरील नियतकालिकाच्या यादीमध्ये समाविष्ट झाला. अर्थसंवादच्या लेखकांना यामुळे अधिक प्रतिष्ठा प्राप्त होत आहे.

सन 2009-10 या वर्षाच्या तेहतीसाव्या खंडात परिषदेच्या वार्षिक अधिवेशनातील अध्यक्षीय भाषण, 25 स्वतंत्र लेख, 2 पारितोषिक प्राप्त लेख, 2 प्रबंधांचे सारांश, 3 ग्रंथ परीक्षणे, 33 व्या अधिवेशनाचा वृत्तांत, अर्थसंवाद 2008-09 चा अहवाल चौतिसाव्या वार्षिक अधिवेशनासाठीच्या विषयांची रुपरेषा असा विविधांगी मजकूर करण्यात आला आहे. या व्यतिरिक्त नोबेल विजेत्यासंबंधीचा लेख या खंडात देऊन इलिनॉर ऑस्ट्राम व ऑलिव्हर विल्यम्सन या नोबेल विजेत्या अर्थशास्त्रज्ञाचा गौरव करण्यात

आला.

सन 2009-10 या वर्षात 43 लेखकांचे योगदान अर्थसंवादला मिळाले. या सर्व लेखकांचा मी परिषदेच्या वतीने अत्यंत आभारी आहे. चारही अंकांची मिळून एकूण 432 पाने झाली. पानांची मर्यादा पाळण्याचा प्रयत्न करून गुणवत्ता वाढविण्यासाठी प्रयत्न करण्यात आले आहेत. मराठी अर्थशास्त्रीय विषयावरील उपयुक्त साहित्य उपलब्ध करून देणारे अर्थसंवाद हे अत्यंत महत्त्वपूर्ण नियतकालिक सर्वसंपन्न बनविण्याच्या उपक्रमात सर्व सदस्यांनी व वाचकांनी आपआपला वाटा उचलला आहे हे विसरून चालणार नाही.

अहवाल वर्षात जाहिरातींविना एकही पान कोरे नाही. चारही अंकात 12 जाहिराती आपण प्रकाशित केल्या. अर्थसंवादची वित्तीय बाजू सावरण्यास यामुळे निश्चितच हातभार लागला आहे.

अर्थसंवादची तूट भरून काढण्यासाठी वार्षिक वर्गणीदार म्हणून महाविद्यालयाची संख्या वाढविणे आवश्यक आहे. परिषदेच्या सर्व सदस्यांनी आपआपल्या महाविद्यालयात अर्थसंवाद घेतला जाईल याकडे लक्ष दिल्यास वर्गणीदार महाविद्यालयांच्या संख्येत वाढ होऊन अर्थसंवादचे उत्पन्न वाढण्यास मदत होऊ शकेल. तसेच अर्थसंवादची वार्षिक वर्गणी नवीन आर्थिक वर्ष (1 एप्रिल ते 31 मार्च) सुरू होताच लवकरात लवकर पाठवली जाईल याची दक्षता घेण्यात यावी. दुसरे अत्यंत महत्त्वाचे म्हणजे जाहिरात प्राप्त करणे. सर्व पदाधिकारी, कार्यकारिणी सदस्य व सभासद बंधुंनी आपआपल्या परिसरातील एखादी पूर्ण पानाची जाहिरात उपलब्ध करून दिल्यास अंक वेळेत निघणे शक्य होईल व अर्थसंवादची तूट कमी होण्यास मदत होईल. आता अर्थसंवादच्या आर्थिक व्यवहारांची थोडक्यात माहिती करून घेऊ.

**तक्ता**

**अर्थसंवादची महत्त्वपूर्ण तौलनिक माहिती**

| क्र. | तपशील | 2007- 08 | 2008 - 09 | 2009 - 10 |
|---|---|---|---|---|
| 1. | चार अंकाच्या एकूण प्रती | 6295 | 6400 | 6400 |
| 2. | चार अंकाची एकूण पृष्ठे | 442 | 420 | 432 |
| 3. | चार अंकाचा एकूण खर्च (रु.) | 2,04,347 | 216233 | 197464 |
| 4. | दर नगाचा सरासरी खर्च (रु.) | 33.65 | 33.78 | 30.85 |
| 5. | दर पानाचा सरासरी खर्च (रु.) | 0.30 | 0.32 | 0.28 |
| 6. | जाहिराती पासून उत्पन्न (रु.) | 81170 | 39000 | 68000 |

वरील तक्त्याच्या आधारे पुढील बाबी ध्यानात घेता येतील.

आता अर्थसंवादच्या प्रत्येक अंकाच्या 1600 प्रती छापल्या जात आहेत. आजीव सदस्य व वर्गणीदार यांची संख्या सातत्याने वाढत आहे ही अर्थसंवादची जमेची बाजू आहे.

चारही अंकाच्या एकूण पृष्ठसंख्या 432 इतकी ठेवण्यात आली असून प्रत्येक अंक साधारणत: 100 पानांच्या जवळपास राखण्याचे धोरण शक्यतोवर अवलंबिण्याचा प्रयत्न केला आहे.

चारही अंकाचा अहवाल वर्षात एकूण खर्च रु. 197464 इतका झाला. हा खर्च 2008-09 या वर्षातील खर्चाचा तुलनेने रु. 19000 ने कमी आहे. अर्थसंवादवरील खर्च काटकसरीने केल्याने एकूण खर्चात घट झाली आहे. ही उल्लेखनीय बाब सभासदांच्या निदर्शनास आणीत आहे.

2009-10 दर अंकाचा छपाई खर्च गतवर्षीच्या तुलनेत 8.70 टक्क्यांनी कमी झाला आहे. ही बाब निश्चितच महत्त्वाची आहे.

जाहिरातीपासून एकूण उत्पन्न रु. 68000/- मिळाले आहेत. गतवर्षीच्या तुलनेने हे उत्पन्न रु. 29000 ने जास्त आहे. ही अत्यंत समाधानाची बाब आहे. हे उत्पन्न मिळविण्यासाठी सुहास सहस्रबुद्धे, बबनराव खामकर, बाळासाहेब माने, के. जी. पठाण, जयवंत इंगळे, जे.टी.पाटील, विनायक भिसे, भारत खंदारे, वसंतराव जुगळे, सुरवसे बी.ए. यांनी विशेष प्रयत्न केले. या सर्वांचा मी परिषदेच्या वतीने अत्यंत आभारी आहे.

अर्थसंवादची तूट भरून काढण्यासाठी भारतीय सामाजिक विज्ञान अनुसंधान परिषद, दिल्ली आणि महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई यांचे योगदान देखील मोलाचे आहे. भारतीय सामाजिक विज्ञान अनुसंधान परिषदेने 2009-10 मध्ये अर्थसंवादच्या प्रकाशनासाठी रु. 50,000/- अनुदान दिले आहे; तर महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाने 2009-10 साठी रु. 25000/- अनुदान दिले आहे. या दोन्ही संस्था दर वर्षी अनुदान देत असतात. या दोन्ही संस्थांचा परिषदेच्या वतीने मी अत्यंत आभारी आहे.

देशात व जागतिक पातळीवर घडणाऱ्या विशेष महत्त्वाच्या घटनांविषयी खास लेख देण्याचा प्रयत्न या वर्षातही आम्ही चालू ठेवला. नोबेल पारितोषिक विजेते इलिनॉर ऑस्ट्राम आणि विल्यमसन ऑलिव्हर यांच्या कार्याची माहिती करून देणारा स्वतंत्र लेख, सैद्धांतिक लेख, कृषी विकास सेवा क्षेत्र, आदिवासी विकास, पर्यटन, पर्यावरण, महिला बचत गट, रोजगार, प्रक्रिया उद्योग, भाववाढ, शेतकऱ्यांच्या आत्महत्या, बँकींग व वित्तीय संस्था, यावर लेख आपल्या अर्थसंवादमध्ये प्रकाशित करण्यात आले. थोर अर्थशास्त्रज्ञ दिवंगत पॉल सॅम्युअलसन यांच्या कार्यावर एक स्वतंत्र लेख प्रकाशित करण्यात आला.

अर्थसंवादाचा प्रत्येक तिमाहीचा अंक त्या तिमाहीच्या अखेरीस आजीव सदस्य व वर्गणीदारांना देण्याचा मनोदय शक्य झाला नाही हे खेदाने नमूद करावे लागते. छापण्यायोग्य मजकुराचा आता दुष्काळ जरी नसला तरी सर्वच लेख नियतकालिकात प्रकाशित करण्याच्या दृष्टीने आवश्यक निकष पूर्ण करतात असे नाही. उदाहरणार्थ संदर्भ सूची एका विशिष्ट स्वरूपात नमूद

केलेली असावी असा साधारणपणे दंडक आपण पाळण्याचा प्रयत्न करतो. मराठीतील प्रमाणित संकल्पना देखील बऱ्याच लेखांमध्ये आढळत नाहीत. लेखकांसाठी सूचना आपण अर्थसंवादमध्ये वेळोवेळी प्रकाशित केल्या आहेत. त्या सूचनांचे तंतोतंत पालन होतेच असे नाही. यात स्वाभाविकच संपादनाच्या प्रक्रियेत वेळ जातो. तसेच आपण अर्थसंवादच्या प्रत्येक अंकात फक्त तीनच जाहिराती देतो त्या वेळेवर उपलब्ध होत नाहीत. त्याकरीता पदाधिकारी,कार्यकारिणी,सदस्य, सल्लागार मंडळ, आजीव सदस्य यांनी आपआपला वाटा उचलून अर्थसंवादला मदत करण्याची गरज आहे.

शारदाबाई पवार महिला महाविद्यालय, शारदानगर, माहेगाव बु।। बारामती, जि. पुणे येथे संपन्न झालेल्या तेहतिसाव्या वार्षिक अधिवेशनात 12 जानेवारी 2010 रोजी अर्थसंवादच्या सल्लागार मंडळाची बैठक संपन्न झाली. विचारांचे आदान-प्रदान होऊन पदाधिकारी व सदस्यांनी अर्थसंवादाचा दर्जा वाढविण्यासाठी उपयुक्त मार्गदर्शनपर सूचना केल्या. अर्थसंवादचे सहाय्यक/संपादक संतोष यादव, सल्लागार मंडळाचे सदस्य लालासाहेब घाटगे, मोहन चौधरी, संतोष कदम, शिवाजी अंभोरे यांचा मी परिषदेच्या वतीने अत्यंत आभारी आहे.

अर्थसंवादच्या 32 व्या खंडाची जडण-घडण करण्यासाठी अनेकांनी मोलाची मदत केली. आदरणीय गुरूवर्य ज. फा. पाटील यांचे बहुमोल मार्गदर्शन लाभल्यामुळेच हा खंड पूर्ण होऊ शकला. लेखक, जाहिरातदार, सहाय्यक संपादक संतोष यादव, सल्लागार मंडळाचे सदस्य, कार्यकारिणी मंडळाचे सदस्य, कार्याध्यक्ष दिलीप पाटील, अध्यक्ष विनायक देशपांडे, कार्यवाह खजिनदार अनिल सूर्यवंशी, विश्वस्त के. जी. पठाण, चारुदत्त गोखले, संतोष दास्ताने, माजी अध्यक्ष शि. ना. माने, दि. व्य. जहागिरदार, विद्यमान अध्यक्षा मुक्ता जहागिरदार यांचे मार्गदर्शन व योगदान अत्यंत महत्त्वाचे ठरले. या सर्वांचा मी अत्यंत ऋणी आहे. तेहतीसाव्या अधिवेशनासाठी निश्चित केलेल्या विषयाची रुपरेषा तयार करून देणारे ज्ञानोबा मोरे, बबनराव खामकर व मुलाणी एम.ए. यांचा मी परिषदेच्या वतीने अत्यंत आभारी आहे.

अर्थसंवादचा हा खंड छापणाऱ्या प्रतिमा, ऑफसेट, इस्लामपूरचे सुमंत कुलकर्णी व त्यांच्या सर्व सहकाऱ्यांचा मी परिषदेच्या वतीने अत्यंत आभारी आहे.

अर्थसंवादची वर्षभरातील जबाबदारी पार पाडताना मला मात्र परिषदेचे माजी कार्याध्यक्ष व विद्यमान विश्वस्त ज. फा. पाटील, अध्यक्ष विनायक देशपांडे, कार्याध्यक्ष दिलीप पाटील, कार्यवाह खजिनदार अनिल सूर्यवंशी या सर्वांचे सहकार्य लाभले. या सर्वांचा मी अत्यंत आभारी आहे. कार्यकारी मंडळाचे सदस्य, विश्वस्त, सल्लागार मंडळाचे सदस्य, सहाय्यक संपादक, परिषदेचे सर्व सदस्य यांच्या सदिच्छा व सततच्या प्रोत्साहनामुळेच हा खंड पूर्ण करू शकलो. या सर्वांना मन:पूर्वक धन्यवाद. राष्ट्रीय पातळीवरील मराठी अर्थशास्त्र परिषदेचे अर्थसंवाद हे त्रैमासिक अधिक दर्जेदार व उपयुक्त बनविण्यासाठी आपआपल्या परीने आपण सर्वचजण यथाशक्ती प्रयत्न करू या !

●●●

# निबंध लेखकांच्या मार्गदर्शनासाठी विषयांची रुपरेषा

# 1) प्रा. जगदीश नटवरलाल भगवती यांचे अर्थशास्त्रातील योगदान

**कैलास काशिनाथ पाटील**

सहयोगी प्राध्यापक व संशोधन मार्गदर्शक - अर्थशास्त्र विभाग,

कै. सौ. कमलताई जामकर महिला महाविद्यालय, परभणी.

दूरध्वनी: (02452) 222863 Email : dr.kkpatil@gmail.com

**प्रस्तावना :**

अर्थशास्त्राच्या अभ्यासाच्या विस्तारलेल्या कक्षा आणि व्याप्ती तसेच त्यात समाविष्ट करण्यात येणाऱ्या नवनवीन संकल्पना, सिद्धांत यात 'आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्राचे' विशेष महत्त्व आहे. प्रामुख्याने सन 1991 पासून खाजगीकरण,उदारीकरण व जागतिकीकरण या नव्या पर्वास सुरूवात झाल्यानंतर जग व विभिन्न देश जवळ आलेत तेव्हा पासून आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्राचे महत्त्व दिवसेंदिवस वाढत आहे. अर्थशास्त्राच्या या शाखेत वैविध्यपूर्ण भर घालणारा, नवीन संकल्पनांचा, प्राथमिक व द्वितीयक सामग्रीच्या सहाय्याने, आपल्या कसदार संशोधनाने जागतिक पातळीवर, एक प्रभावी अर्थतज्ज्ञ म्हणून जगदीश भगवती यांना ओळखले जाते. अध्यापन व संशोधन यात विशेष रुची असणाऱ्या भगवती यांनी 'आंतरराष्ट्रीय व्यापार' क्षेत्रात उत्तुंग कामगिरी केलेली आहे. आज कोणत्याही उद्योगांपासून ते आंतरराष्ट्रीय स्वतरावरील सेवा, उद्योग यांच्या बाबतीत बोलतांना 'खाऊजा' धोरणाचा संदर्भ असतोचही प्रक्रिया खुल्या अर्थव्यवस्थेच्या पुढाकाराने गतिमान होत चालली आहे. ही प्रक्रिया केवळ अर्थकारणापुरती सीमित न राहता, देशाच्या, समाजाच्या, जागतिक पटलावरील सर्वच क्षेत्रांना स्पर्श करीत असल्याने एकूणच समाज जीवन या बदलांमुळे पूर्णत: ढवळून निघाले आहे.

या पार्श्वभूमीवर बदलत्या स्थित्यंतरांचा भविष्याचा, वर्तमानकालीन स्थितीचा, लेखाजोखा मांडणारे भगवती हे अर्थतज्ज्ञ, सल्लागार, आंतरराष्ट्रीय स्तरावरील अभ्यासू भाष्यकार म्हणून संपूर्ण जगाला परिचित आहेत.

1970 मधील अर्थशास्त्राचे नोबेल पारितोषिक विजेते सॅम्युअल्सन यांनी प्रा. भगवतींच्या 70 व्या जन्म दिवसानिमित्त (गेनसविले – फ्लोरिडा) या ठिकाणी व्यक्त केलेले मत खूपच बोलके आहे.

''मी एखाद्या विद्वानाची सर्वगुणसंपन्नता त्याच्या भरपूर अशा प्रकाशित साहित्यात मोजत नाही, त्या क्षेत्रातील त्याच्या प्रत्येक लेखामधील नाविन्यता आणि शहाणपण यात संबंधिताची गुणवत्ता असते – प्रा. भगवती हे हेडन पेक्षाही विद्वान आहेत, अखिल मानवजातीच्या संघर्षामध्ये सुधारणा करण्यासाठी प्रा. भगवती – जागतिकीकरणात न थकता भाग घेतात, वस्तुस्थिती स्पष्ट करून सांगतात – श्रीमंत अशा अमेरिकेला व गरीब स्थितीत असणाऱ्या आशिया व आफ्रिका यांनाही उत्पादकता वाढविण्यासाठी उपाय सुचवितात.''

**जीवन परिचय :**

प्रा. भगवती यांचा जन्म 26 जुलै 1934 रोजी मुंबई येथे झाला. मुळचे गुजरात राज्यातील रहिवाशी आहेत. वाणिज्य शाखेतील पदवीपर्यंतचे शिक्षण मुंबई येथील सिडनेहॅम महाविद्यालयात पूर्ण केले. तद्नंतर 1956 साली केंब्रिज विद्यापीठाची अर्थशास्त्रातील पदवी प्राप्त केली. पुढे एम.आय.टी. (Massachusetts Institute of Technology) व ऑक्सफर्ड विद्यापीठात अध्ययन केले. त्यानंतर त्यांनी अध्यापनासाठी पुन्हा भारतात येण्याचे ठरविले, त्याप्रमाणे सन 1961 साली भारतीय सांख्यिकी संस्थेत (Indian Statistical Institute) प्राध्यापक म्हणून सेवा केली. नंतर दिल्ली येथील 'अर्थशास्त्र अध्ययन संस्थेत' आंतरराष्ट्रीय व्यापाराचे प्राध्यापक म्हणून ही काम केले. अध्यापनाचे काम करीत असतांनाच सन 1967 मध्ये एम.आय.टी. संस्थेतून त्यांनी डॉक्टरेट पदवी मिळविली. पुढे सन 1968 मध्ये अध्यापनासाठी, संशोधनासाठी एम.आय.टी. संस्थेत दाखल झालेत. या संस्थेत एका तपाची सेवा दिल्यानंतर त्यांनी कोलंबिया विद्यापीठात आपली कारकीर्द सुरू केली. याच ठिकाणी त्यांनी अर्थशास्त्राच्या विभिन्न शाखांपैकी 'आंतरराष्ट्रीय व्यापार क्षेत्रात' अतिशय अभ्यासपूर्ण व कसदार योगदान देत आहेत. अलीकडील गत दहा वर्षात प्रा. भगवती प्रगत देश व अप्रगत देश यांच्या विकासासाठी एक 'महामेरु' म्हणून काम करत आहेत. ते स्वत:ला जागतिक अर्थव्यवस्थेचा मानवीय चेहरा म्हणून व्यक्त करतात. आंतरराष्ट्रीय व्यापार क्षेत्रात प्रा. भगवती यांची 200 पेक्षा अधिक लेखातून, विभिन्न पुस्तकातून, निरनिराळ्या व्याख्यानातून या विषयावरची अत्यंत मजबूत पकड असल्याचे दिसते. त्यांनी आपल्या सात दशकाच्या आयुष्यात जागतिक पातळीवरील संस्थांमध्ये आपला ठसा उमटविलेला आहे. उदा. सन 1991-93 मध्ये व्यापार आणि प्रशुल्क विषयक सामान्य करार (General Agreement on Trade and Tariff - GATT) या संस्थेत आर्थिक धोरणांचे सल्लागार, 2001 - संयुक्त राष्ट्र संघटनेचे विशेष सल्लागार (जागतिकीकरण), विद्यमान स्थिती जागतिक व्यापार संघटनेचे (World Trade Organization) बहिस्थ सल्लागार म्हणूनही कार्यरत आहेत. याशिवाय मानवी हक्क (Human

Rights) आशिया, आणि सेंटर फॉर सिव्हील सोसायटी, विदेशी संबंध (Foreign Relation) समितीचे वरिष्ठ पदाधिकारी, सन 2004 मध्ये कोपन हेगन समिती प्रकल्प समितीचे तज्ञ, 2006 मध्ये अंकटाडच्या कार्याचे मूल्यांकन समितीचे तज्ञ सदस्य इत्यादी.

**सन्मान आणि पुरस्कार (Honors and Awards)**

1. अर्थशास्त्रातील नोबेल पारितोषिकासाठी नामांकन.
2. 1974 - भारतीय अर्थसमिती संस्थेच्या वतीने – महालनोबीस स्मृती पदक.
3. 1998 - आंतरराष्ट्रीय राजकीय व्यवस्थेच्या वतीने सिडमन पुरस्कार.
4. 2000 - भारत सरकारच्या वतीने पद्मविभूषण पुरस्कार.
5. 2004 - मध्ये इंडियन चेंबर ऑफ कॉमर्सच्या वतीने जीवन गौरव पुरस्कार.
6. 2006 - जपानच्या वतीने उगवता सूर्य पुरस्कार.
7. जर्मनीच्या वतीने बर्नहार्ड हार्यस पारितोषिक, संयुक्त राष्ट्राच्या वतीने केनन एंटरप्राईज पुरस्कार, स्वीत्झरलँडच्या वतीने फ्रीडम पारितोषिक, जॉन आरकॉमन पुरस्कार. ससॅक्स व इरॅसमस विद्यापीठाच्या वतीने मानद पदवी.

**प्रा. जगदीश भगवती यांचे योगदान :**

अर्थशास्त्रातील आपल्या कारर्किदीला प्रा. भगवती यांनी प्रथम केंब्रिज विद्यापीठातून अर्थशास्त्राची पदवी प्राप्त करून सुरुवात केली. काही दिवस भारतात अध्यापन व संशोधन केले. तद्नंतर ते सन 1968 मध्ये एम.आय.टी. ह्या अर्थशास्त्राच्या अध्यापन व संशोधन केंद्रात त्यांनी आपल्या संशोधनास एका वेगळ्या पद्धतीने गती दिली. या संस्थेतूनच त्यांनी ''आंतरराष्ट्रीय व्यापार'' क्षेत्रात आपले योगदान सुरू केले. या क्षेत्रात त्यांनी विषयाशी संबंधित जगाचा चेहरा मोहरा बदलण्यासाठी प्रगत व अप्रगत राष्ट्रांच्या हितासाठी निर्यात प्रोत्साहन व आयात पर्यायीकरण यातून जागतिक स्तरावर विभिन्न राष्ट्रांना स्वतंत्र प्रक्रिया उभारण्यासाठी प्रतिमाने सुचविलीत. **व्यापाराच्या अटी आणि आर्थिक विकास** – या संदर्भात वेगळे विचार मांडलेत – एखाद्या राष्ट्राने अंतर्गत उत्पादन वाढ करून आर्थिक विकास साधतांना वाढीच्या फायदेशीर प्रमाणाबरोबरच त्या देशातील विकासाच्या वाढीबरोबरच व्यापार अटी प्रतिकूल बनत जातात त्यामुळे देशाचा आर्थिक विकास होऊनही देशातील दारिद्र्यात वाढ होत जाते, तात्पर्य, देशाचा आर्थिक विकासच देशाच्या दारिद्र्यातील वाढीस कारणीभूत ठरतो. त्यालाच दारिद्र्यकारी अभिवृद्धी, दारिद्र्यप्रजनक वृद्धी किंवा दारिद्र्यकारी विकास (Immiserizing Growth) म्हणतात. देशाच्या आर्थिक विकासाच्या गतीपेक्षा व्यापाराच्या प्रतिकूल अटी अधिक वेगाने आणखी प्रतिकूल होत जातात. त्यामुळे आर्थिक विकासातून होणाऱ्या लाभाच्या तुलनेत प्रतिकूल व्यापार अटीने निर्माण होणाऱ्या तोट्याचे प्रमाण जास्त असते.

जागतिकीकरण – एका देशाचा जगातील सर्व देशांशी संपर्क प्रस्थापित होण्याची प्रक्रिया अथवा देशाच्या राजकीय सीमेबाहेर आर्थिक

व्यवहारांचा विस्तार म्हणजे जागतिकीकरण. जागतिकीकरणात विभिन्न देशांच्या अर्थव्यवस्थांचे एकीकरण होय. जागतिक स्तरावर विकासाची जागतिकीकरणाची प्रक्रिया ही नवीन नाही. विसाव्या शतकाच्या प्रारंभी विभिन्न देशामध्ये खुला व्यापार होता. पूर्वीचे जागतिकीकरण व आताच्या जागतिकीकरणात काही बाबतीत फरक आहे; पण तेव्हाच्या व आताच्या स्थितीत खुलेपणा व आर्थिक उदारीकरण या बाबतीत साम्य दिसते. 1991 मध्ये उदारीकरणाचे धोरण स्थिरीकरणाचे होते; पण 1994 नंतर उदारीकरण संरचनात्मक, समायोजन कार्यक्रमाचा पुरस्कार करणारे धोरण म्हणून ओळखले जाऊ लागले. **सन 1960 च्या दशकात प्रा. भगवती यांनी भारतासाठी अशा प्रकारचे धोरण आवश्यक असल्याचे स्पष्ट केले होते.** भारताने 1980 मध्ये या दिशेने पाऊले टाकणे सुरू केले; परंतु खऱ्या अर्थाने भारतात 1991 नंतरच या प्रक्रियेस सुरुवात झाली. भारतीय स्तरावर नरसिंहम समिती, अर्जुन सेनगुप्ता समिती, अबिद हुसेन समिती, जगदीश भगवती यांच्या अहवालातून उदारीकरणाचे समर्थन केल्याचे दिसते. प्रा. भगवती यांच्यावर राबर्ट सोलो यांच्या विचारांच्या त्यांच्या लेखन शैलीतून बाहेर पडणाऱ्या अविष्कार कृतीवर प्रचंड प्रभाव दिसतो. परंतु त्यांच्या या जागतिकीकरणाच्या विचार धारेला जोसेफ इ. स्टिगलर, डॅनी रोड्रीक यांनी प्रारंभ पासून विरोध केल्याचे दिसते. जेव्हा ही प्रक्रिया सुरू झाली तेव्हा 2008 मधील अर्थशास्त्रातील नोबेल पुरस्कार प्राप्त अर्थशास्त्रज्ञ पॉल क्रुगमन यांच्या मनात जागतिकीरणाच्या कल्पनेबाबत बरीचशी साशंकता होती; पण त्यांच्या या कृतीचे प्रा. भगवती यांनी विभिन्न लेखांतून, व्याख्यानांतून खंडन करून त्यांनी जागतिकीकरणाची प्रक्रिया संपूर्ण जगाच्या हितासाठी कशी आवश्यक आहे याचे जोरदार समर्थन केले.

**निबंध लेखकांना खालील मुद्यांवर शोध निबंधाचे लेखन करता येईल हे लेखन प्रा. जगदीश भगवती यांच्याशी संबंधित असावे.**

1. दारिद्र्य प्रजनक विकास संकल्पना / दारिद्र्यप्रजनक वृद्धी / दारिद्र्यकारी विकास
2. भांडवली खात्यावरील परिवर्तनियता – एक दुर्लक्षित विवेचन
3. विद्यमान खुल्या व्यापाराचे धोरण.
4. मुक्त व्यापार आणि श्रमिक
5. व्यापार आणि दारिद्र्य – गरीब देशांच्या संदर्भात.
6. विकास व व्यापार
7. 21 व्या शतकातील खुला व्यापार.
8. आंतरराष्ट्रीय व्यापार आणि आर्थिक विस्तार
9. भारताची आजची व्यापारविषयक व्यूहनिती
10. जागतिकीकरणाबाबतचे विचार.
11. जागतिक व्यापार संघटनेचे मूल्यांकन
12. आर्थिक अरिष्ट विषयक विचार
13. चीन व भारत यांच्या विकासाचा तुलनात्मक अभ्यास
14. स्थलांतरातील बदलत्या प्रवृत्त्या
15. बौद्धिक मालमत्तेवरील हक्क विषयक दृष्टिकोन
16. भारतातील भ्रष्टाचार – एक विलक्षण चिंतन
17. आर्थिक स्वातंत्र्य : समृद्धी आणि सामाजिक प्रगती.

18. आर्थिक सुधारणा व भारत

19. प्रा. भगवती यांचे असे कोणते योगदान – ज्यामुळे नोबेल पारितोषिकासाठी – नामांकन

**Books :**


1. International Trade : Selected Readings. Edited Volume, second edition (MIT Press, 1987)
2. Jagdish N. Bhagwati (Editor), Robert E. Hudec (Editor) (1996). Fair Trade and Harmonization, Vol. 1 : Economic Analysis, MIT Press ISBN 0-262-02401-2.
3. Lectures on International Trade, Second edition, Co-authored with Arvind Panagariya and T. Srinivasan (MIT Press, 1998).
4. James H. Mathis, Jagdish Bhagwati (Foreword) (2002). Regional Trade Agreements in the GATT/WTO : Article XXIV and the Internal Trade Requirement. Norwell/TMC Asser Press,ISBN 90-6704-139-4.
5. Jagdish Bhagwati (2002), The Wind of the Hundred Days : How Washington Mismanaged Globalization. MIT Press, ISBN 0-262-52327-2.
6. Jagdish Bhagwati (2004), In Defense of Globalization. Oxford University Press, ISBN 0-19-517025-3
7. Jagdish Bhagwati (2008), Termites in the Trading System : How Preferential Agreements Undermine Free Trade, Oxford University Press, ISBN 978-0195331653.
8. Off Shoring of American Jobs : What Response from U.S. Economic Policy ? With Alan S. Blinder (The MIT Press, 2009).
9. Alvin Hansen Symposium on Public Policy at Harvard University, Skilled Immigration Today : Prospects, Problems and Policies with Gordon Hanson (Oxford University Press, 2009).


**References :**


1. "The Miracle that Did Happen : Understanding East Asia in Comparative Perspective" Kaynotespeech, Conference on "Government and Market : The Relevance of the Taiwanese Performance to Development Theory and Policy" in honor of Professors Liu and Tsiang, Cornell University, May 3, 1996.
2. "Economic Freedom : Prosperity and Social Progress" Keynote Speech : Conference on Economic Freedom and Development, Tokyo, June 17-18 1999.
3. "Crony Capitalism : Rent-creating versus profit-sharing Corruption", February - 2000.
4. "Free Trade and Labour". Abbreviated version appeared in The Financial Times on August 29, 2001. Full text in Nihon Keizai Shimbun on September 10, 2001.
5. Trade and Poverty in the Poor Countries". (with T. N. Srinivasan)

American Economic Review, May 2002.

6. "Globalization Gets Mixed Report Card in U.S, Universities" Wall Street Journal, Jon E. Hilsenrath, December 2, 2002.
7. "Great Expectation" (with Arvind Panagoriya) Wall Street Journal, May 24, 2004.
8. "Bhagwati's Thoughts on the Financial Crisis", September 2008.
9. "India Today and Yesterday," India Today, December 4, 2009.
10. "Corruption Exaggerated in India" Hindustan Times, December 02, 2010.
11. Profile Series : Jagdish Bhagwati, by Doughlas A. Irwin.
12. http://www.law.columbia.edu/media_inquiries/news_events/2010/November2010/Bhagwati-Trade-Panel.

●●●

## निवेदन
## प्रा. डॉ. सौ. अरुणा रारावीकर
## स्मृती आर्थिक लेख पुरस्कार

मराठी अर्थशास्त्र परिषदेतर्फे २०११ पासून वरील पुरस्कार सुरू करीत आहोत. परिषदेच्या आजीव सदस्यांनी आर्थिक विषयांवर सतत वाचन-मनन करून त्यावर जिल्हा व राज्य पातळीवरील मराठी दैनिक वृत्तपत्रांसाठी वैचारिक व प्रबोधनात्मक लेख लिहिण्यास उद्युक्त व्हावे हा त्यामागील हेतू आहे. त्यांच्या अशा प्रसिद्ध झालेल्या व निवड समितीने शिफारस केलेल्या लेखांना दोन पुरस्कार दिले जातील. प्रथम पुरस्कार रु. 1000/- चा व द्वितीय पुरस्कार रु. 500/- .

या पुरस्कारासाठी 1 जानेवारी 2010 ते 31 डिसेंबर 2010 चे वर्षातील लेख विचारात घेतले जातील. तरी त्यासाठी आपले प्रसिद्ध झालेले सर्व लेख वृत्तपत्रांच्या नाव व दिनांकासह झेरॉक्स करून 31 ऑगस्ट 2011 पूर्वी वा लवकरात लवकर कार्यवाह, म.अ.प. बार्शी यांचेकडे पाठवावे. परिषदेच्या 2011 च्या अधिवेशनात हे पुरस्कार दिले जातील.

**अनिल सूर्यवंशी**
कार्यवाह-खजिनदार
मराठी अर्थशास्त्र परिषद

## 2) भारताची आर्थिक महासत्ता बनण्याकडील वाटचाल

**सुहास आव्हाड**
संगमनेर
भ्रमणध्वनी : 9922435871

भारत 2020 च्या सुमारास एक वैश्विक महासत्ता होईल असे भारताचे भूतपूर्व राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचे स्वप्न आहे. या स्वप्नाची पार्श्वभूमी अर्थातच भारत सरकारने स्वीकारलेले 1991 चे नवीन औद्योगिक धोरण होय. नव्या औद्योगिक धोरणात स्वातंत्र्योत्तर 40 वर्षे जोपासलेल्या सार्वजनिक क्षेत्राला कमी वाव दिला जाऊन खाजगी क्षेत्राच्या विस्ताराला चालना देणारी धोरणे राबविली जात आहेत. त्याचे काही अनुकूल परिणाम विशेषतः द्वितीय आणि तृतीय क्षेत्रात दृश्य स्वरूपात जाणवू लागले आहेत. भारताचा आर्थिक वृद्धीदर जो मागे गेली 40 वर्षे सरासरी 3.5% होता; तो अलीकडील काळात 7, 8, 9 अशा चढत्या क्रमाने वाढत गेला आहे. यामध्ये सर्वाधिक मोठा वाटा सेवा क्षेत्राचा असून द्वितीय क्षेत्र स्थितीशील, तर प्राथमिक क्षेत्राचा वाटा घटत आहे. प्राथमिक क्षेत्राचा राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा ज्या वेगाने घटतो आहे त्याच्या अत्यल्प प्रमाणातही शेतीवर अवलंबून असणाऱ्या लोकसंख्येचा भाग कमी झालेला दिसून येत नाही. औद्योगिक उत्पादनाचा निर्देशांक वाढता असून पारंपारिक उद्योगांची जागा अत्याधुनिक उत्पादनांनी घेतली आहे. मक्तेदारी नियंत्रण शिथील केल्यामुळे उद्योगांचे आकारमान, गुंतवणूक क्षमता आणि निर्याती वाढत आहेत. परंतु त्याचबरोबर आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापरापोटी आयाती देखील वाढत आहेत. आपल्या निर्यातीत लक्षणीय वाढ होऊनही व्यापार शेष मात्र सदैव तुटीचाच राहत आला आहे. त्याची अनेक कारणे आहेत. त्या कारणांचा मागोवा संशोधनपर निबंध लिहिणाऱ्या लेखकांनी घ्यावा अशी अपेक्षा आहे.

भारताचा सर्वसाधारण विकास होत असल्याचे चित्र दिसत असले तरी देखील भारत आर्थिक महासत्ता होण्यात अनेक अडसर आज स्पष्टपणे जाणवत आहेत. 1960-70 च्या दशकातील हरित क्रांतीनंतर काही प्रमुख ठिकाणांच्या बाबत भारतीय शेतीची उत्पादकता वाढलेली असली तरी 1970 पासून हरित क्रांतीची जादू संपुष्टात आल्याचे चित्र आहे. आता दुसऱ्या हरित क्रांतीची गरज असल्याचे आर्थिक क्षेत्रात बोलले जाते. ही दुसरी हरित क्रांती कशी व कोणी आणावी, तिची व्याप्ती फक्त अन्न पिकापुरतीच मर्यादित रहावी का ? शेतीची लाभप्रदता वाढविण्यासाठी शेतकरी अन्य पिकाकडे वळला तर आपली अन्न सुरक्षा धोक्यात येईल का ? या सारखे अनेक प्रश्न शेती आणि ग्रामीण विकासात आज आहेत. ग्रामीण भागातील अतिरिक्त मनुष्यबळ खेड्यातच निरनिराळ्या बिगर कृषी उद्योगात सामावून घेण्याची भक्कम योजना आजही अस्तित्वात नाही. हे मनुष्यबळ जवळपासच्या नागरी भागात प्रस्थान करीत असून तेथे असणाऱ्यांची स्थिती अगोदरच अत्यंत शोचनीय आहे. त्यांच्या रोजगाराचा प्रश्न नागरी भागात देखील समाधानकारकपणे सुटलेला नाही.

आर्थिक महासत्तेच्या दृष्टीने लोकसंख्येचा विचार करता जगाच्या एक षष्ठांश लोकसंख्या भारतात सामावलेली आहे. हे आपले मोठे बलस्थानच मानले जात असून येत्या दशकात भारत हा एकूण लोकसंख्येच्या 28% तरुणांचा देश म्हणून गणला जाणार असला तरी या तरुण युवकांमध्ये सामावलेल्या युवाशक्तीचा पुरेपूर वापर करणे, त्यांच्यातील कौशल्य क्षमता ओळखून कौशल्यक्षम कर्मचारी निर्माण करणे, रोजगार निर्मिती करण्याची क्षमता असलेले तरुण उद्योजक आणि व्यावसायिक व्यापक पातळीवर निर्माण करणे, सर्जनशील तरुणांना/युवकांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणणे आणि देशाचा सर्वसमावेशक विकास घडवून आणणे ही महत्त्वाची आव्हाने भारतापुढे आहेच.

नवीन आर्थिक धोरणामुळे भारताने आज विज्ञान, तंत्रज्ञान व अंतराळ यात लक्षणीय झेप घेतली आहे. देशात झपाट्याने आर्थिक बदलही घडून येत आहेत. भारतीय शेतीचीही प्रगती होत आहे. असे असले तरी भारतीय उद्योगापुढे आज अनेक आव्हाने उभी आहेत. या आव्हानांना समर्थपणे सामोरे गेल्याशिवाय भारताला आर्थिक महासत्ता बनणे कठीण आहे. या आव्हानांना कसे सामोरे जावे या संदर्भातही संशोधनपर निबंध लेखकांनी मागोवा घेण्याची गरज आहे.

भारतीय अर्थव्यवस्थेत सेवा क्षेत्र हे अधिक गतीने वाढणारे क्षेत्र आहे. पारंपारिक अर्थशास्त्रात सेवा क्षेत्र हे प्राथमिक आणि द्वितीय क्षेत्राच्या विकासाबरोबर वाढत जाते असे मानले जाते. भारतीय अर्थव्यवस्थेत मात्र याबाबत विपरीत असे चित्र दिसून येते आहे. शेती क्षेत्र स्थितीशील असून उद्योग क्षेत्र 7 ते 10 टक्क्याने वाढत असले तरी सेवा क्षेत्राच्या विकासाचा दरही दोन अंकीच राहिला आहे. त्याची सखोल कारणमीमांसा होणे गरजेचे आहे. सार्वजनिक वस्तू सेवा क्षेत्रात समाविष्ट होतात मात्र भारतात आजही मोठ्या प्रमाणात त्या सरकारकडूनच पुरविल्या जातात. रेल्वे, रस्ता

वाहतूक, वीज निर्मिती आणि वितरण, जलसिंचन इत्यादी महत्त्वाच्या सेवा आजही सार्वजनिक क्षेत्राकडेच आहे. आणि सार्वजनिक क्षेत्राची कार्यक्षमता निसंदिग्धपणे सिद्ध झालेली नाही. दूरसंचार, हवाई वाहतूक, रस्ते वाहतूक व तत्सम अनेक क्षेत्रात सरकारने खाजगी भागीदारी स्वीकारली आहे. ही खाजगी भागीदारी सर्वसामान्य जनतेला कितपत परवडणारी आहे याचा विचार धोरणकर्त्यांनी केलेला नाही. अशा बाबींवरही लिखाणास भरपूर वाव आहे.

खाजगी क्षेत्र आणि शासन या व्यतिरिक्त सेवा क्षेत्रात सहकारी संघटनांचाही मुक्त वावर आहे. या सहकारी संस्थांची कार्यप्रणाली आणि वित्तीय प्रबंधन आज टिकेस पात्र ठरत आहे. काही सन्मान्य अपवाद वगळता अनेक सहकारी साखर कारखाने, सूत गिरण्या व अन्य सहकारी उपक्रम तोट्यात सुरू आहेत. या संस्था आपल्या अस्तित्वासाठी संघर्ष करतानाही दिसत नाहीत. शासकीय तिजोरीवर भार टाकून आपले अस्तित्व टिकविणे किंवा दिवाळखोरी जाहीर करणे हीच सर्वसामान्य प्रवृत्ती सहकार क्षेत्रात आढळते. वास्तविक एकेकाळी ही सहकारी चळवळ भारताची अर्थव्यवस्था भक्कम करेल अशी प्रेरणादायी होती. विविध प्रकारच्या सहकारी संस्था सुधारण्यासाठी कोणते उपाय योजावेत अथवा सहकाराऐवजी कोणते पर्यायी संघटन अस्तित्वात आणावेत यावर चिंतनातून लिखाण अपेक्षित आहे. तसेच दळणवळण व वाहतूक, साठवणूक व्यवस्था, विपणन व्यवस्था, वीज, पाणी पुरवठा यात आज अनेक उणिवा आहेत. समर्थ भारत अभियानासाठी या उणिवा दूर करण्यावर संशोधकांनी आपले लेख सादर करणे अपेक्षित आहे.

अलीकडील काळात संरक्षण आणि अंतर्गत सुरक्षा हे भारतापुढील सर्वात महत्त्वाचे आव्हान मानता येईल. भारताच्या चीन व पाकिस्तानकडील सीमा सुरक्षित आहेत असे म्हणणे धाडसाचे ठरेल. या दोन राष्ट्रांची उघड आणि छुपी घुसखोरी भारतात सुरू आहे. याखेरीज दहशतवादी हल्ल्याचे भय, अंतर्गत बंडाळी, नक्षलवादी हल्ले, जातीय दंगली या सातत्याने वाढत आहेत. यासाठी केंद्र आणि राज्य सरकारांनी भक्कम तरतूदी करून जनतेला जिवित आणि वित्त हानीची सुरक्षा पूर्णपणे दिल्याचे जाणवत नाही. या भयाची छायाच आपला विकासाचा दर कमी असण्याचे कारण असू शकते. अन्य क्षेत्रांच्या विकासासाठी सरकारने केलेल्या प्रयत्नांना भरपूर प्रसिद्धी मिळते. त्यातील इष्टांक आणि साध्ये यांची थोडी फार जाणीव जनसामान्यांना असते; परंतु जेव्हा परकीय आक्रमण आणि अशांतता एखाद्या वावटळीसारख्या येऊन आदळतात तेव्हा आपली सिद्धता किती अपुरी होती याचे वैशम्य वाटते. या संदर्भातील सरकारची समर्थने पटणारी वाटत नाही. संरक्षणावरील खर्चाची जाहीर वाच्यता केली जात नाही त्यामुळे देशाचे परकीय आक्रमणापासून संरक्षण व अंतर्गत शांतता व सुव्यवस्था यासाठी सरकारने नेमकी कोणती पाऊले उचलावीत या विषयावरीलही शोधनिबंधांचे स्वागतच होईल.

भारताने आर्थिक महासत्तेच्या दृष्टीने अनेक क्षेत्रात उल्लेखनीय प्रगती केली असली तरी प्रत्यक्षात आर्थिक महासत्ता होण्याच्या दृष्टिने

असलेले प्रमुख अडथळे आणि त्या दृष्टिने केले जाणारे प्रयत्न त्या संदर्भात शोध निबंधकारांना खालील विषयांवर आपले शोधनिबंध सादर करता येतील.

1) नवे आर्थिक धोरण व कृषी क्षेत्रापुढील आव्हाने.
2) कृषी शेत मालाचा विदेश व्यापारातील वाटा.
3) जागतिक स्पर्धेतील भारतीय शेतीच्या व्यापार शर्ती.
4) भारतातील शेतमजुरांची सद्यस्थिती आणि भवितव्य.
5) कृषी क्षेत्र आणि ग्रामीण रोजगार.
6) मनुष्यबळ विकासापुढील आव्हाने.
7) संघटित उद्योगापुढील आव्हाने.
8) संघटित मोठे उद्योग आणि लघुउद्योग यांच्यातील सहअस्तित्वाचा प्रश्न.
9) भारतीय चलननीती व राजकोषीय धोरण आणि उद्योग क्षेत्र.
10) नवे आर्थिक धोरण आणि कामगार जगत.
11) पायाभूत सुविधांची टंचाई–औद्योगिक विकासातील एक अडसर.
12) उद्योग जगतापुढील वर्तमान समस्या.
13) भारतीय रेल्वे – आव्हाने आणि विकासाची संधी.
14) जलसिंचन आणि जल व्यवस्थापन.
15) पारंपारिकआणि आधुनिक ऊर्जा स्रोतांच्या विकासाची आव्हाने.
16) ग्रामीण रस्ता वाहतूकीची आव्हाने.
17) जलसंपदा विकास प्रकल्प–काल, आज आणि उद्या.
18) दूरसंचार आणि भारत.
19) पर्यावरण संवर्धन – भारताची सद्यस्थिती व आव्हाने.
20) भारताच्या ग्रामीण विकासापुढील आव्हाने.
21) भारतातील अंतर्गत कायदा व सुव्यवस्था.
22) दहशतवाद आणि भारत.
23) भारताचे लष्करी सामर्थ्य.

वरील विषयांखेरीज संशोधकांना स्वत:ला आणखी नवीन विषयात आपला शोध निबंध सादर करण्याचे स्वातंत्र्य राहील.

---

## MARATHI ARTHSHATRA PARISHAD (Estd. 1977) ANNOUNCEMENT

The Parishad has constituted an Endowment Fund for the award, on an annual basis, of Dr. R. S. Sabnis Memorial Prize of Rupees Four Thousand only for outstanding contribution in the form of an article published during calender year 2009 - 2010 in standard accrediated journals on themes belonging to the areas : Central Banking, Industrial Finance and General Industrial Economics . Last date for the submission of entries (Two Copies) for this year's contest is 31st August, 2011. For further details contact the undersigned at his Address : Dr. D. K. Patil. Sadanand Banglow, Opp. Venketesh Plaza, Mahadevnagar, Urun - Islampur Tal. Walwa, Dist. Sangli - 415 409.

**D. K. Patil** (Executive President)

# 2) ग्रामीण महाराष्ट्रातील आधारभूत संरचना

**बाळासाहेब माने,**
श्रीमती कुसुमताई राजाराम बापू पाटील कन्यामहाविद्यालय, इस्लामपूर
भ्रमणध्वनी : 9822195990

महाराष्ट्र हे देशातील प्रमख राज्यांपैकी एक महत्त्वपूर्ण घटक राज्य आहे. शेती, उद्योग दळणवळण, रस्ते सुविधा, शिक्षण, आरोग्य सेवा, क्रीडा, साहित्य, कला, संस्कृती, शांतता यासारख्या विविध घटकांच्या अनुषंगाने विचार करता महाराष्ट्राने देशाच्या आर्थिक विकासामध्ये स्वत:चा एक स्वतंत्र ठसा उमटवलेला आहे. 1 मे 1960 रोजी महाराष्ट्राची घटक राज्य म्हणून स्थापना झाली. सुवर्ण महोत्सव साजरा करणाऱ्या महाराष्ट्राचा देशात लोकसंख्येच्या दृष्टीने दुसरा क्रमांक लागतो.स्थापनेच्या वर्षात राज्याची लोकसंख्या 3.9 कोटी होती ती 2001 मध्ये 9.6 कोटी झाली. यामध्ये पुरुषांचे प्रमाण 52.07%, तर स्त्रियांचे प्रमाण 47.93% होते. दर हजारी पुरुषांमागे स्त्रियांचे प्रमाण 922 इतके आढळते. ग्रामीण लोकसंख्या प्रमाण 48%; तर शहरी प्रमाण 42% आहे. राज्यामध्ये नागरी लोकसंख्येचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढलेले आहे. महाराष्ट्र हे देशातील सर्वाधिक नागरीकरण झालेले राज्य आहे. राज्याच्या लोकसंख्येमध्ये 18.59% प्रमाण अनुसूचित जाती-जमातींचे आहे. लोकसंख्येची घनता दर चौ.कि.मी. ला 324 असून साक्षरता प्रमाण 76.9% आहे. यापैकी पुरुष साक्षरता प्रमाण 86% आणि स्त्री साक्षरता प्रमाण 67% आहे.

2011 मध्ये महाराष्ट्राची लोकसंख्या 11.27 कोटी इतकी असेल असा अंदाज असून घनता दर चौ.कि.मी. ला 366 आणि दर हजारी स्त्री-पुरुष प्रमाण 919 अपेक्षित आहे.

1990 च्या किंमती पायाभूत मानता 1960-61 या वर्षात राज्याचे उत्पन्न 12,074 कोटी रु. इतके होते. ते उत्पन्न 2008-09 मध्ये 5,97,542 कोटी रु. इतके झाले. उत्पन्न वाढीचा वार्षिक दर सर्वसाधारणपणे 5.76% या दरम्यान आढळतो. या उत्पन्नामध्ये प्राथमिक क्षेत्राचा हिस्सा 11.72%

उद्योग क्षेत्राचा 29.19% आणि सेवा क्षेत्राचा 59% इतका आहे. राज्याचे दरडोई उत्पन्न 54000 रु. या दरम्यान आढळते.

1960-61 मध्ये 18.82 लाख हेक्टर जमीन पिकाखाली होती;ते प्रमाण 2008-09 मध्ये 22.65 लाख हेक्टर इतके झाले. पिकाखालील जमिनीचे सिंचन प्रमाण 6.5% वरुन 17.8% इतके झाले. अन्नधान्य उत्पादनासाठी 68.8% इतके असणारे प्रमाण 2008-09 मध्ये 50-56% झाले. वाढलेल्या सिंचन सुविधांमुळे नगदी पिकांखालील क्षेत्रामध्ये मोठी वाढ झाली. ऊसाखाली असणाऱ्या क्षेत्रामध्ये 0.82% वरून 3.34% इतके झाले. कापूस उत्पादन क्षेत्राचे प्रमाण 13.28% वरुन 13.88% असे नाममात्र वाढले. राज्याचा जंगलव्याप्त प्रदेश 18% या दरम्यान आहे.

1980-81 पायाभूत वर्षाशी तुलना करता 2008-09 मध्ये कृषी उत्पादनाचा निर्देशांक 161 इतका आहे. यामध्ये अन्नधान्य 116 तेलबिया 80.4 इतका होता. दर हेक्टरी कृषी उत्पादकता 7.4 इतकी अल्प प्रमाणाची आहे. राज्याच्या 3-4 जिल्ह्यामध्ये सरासरीच्या जादा पाऊस पडतो. 15-16 जिल्ह्यांत सरासरी इतका पाऊस पडतो आणि उर्वरीत जिल्ह्यांमध्ये सरासरीपेक्षा खूप कमी पाऊस पडतो. राज्यामध्ये 5 ते 5.5 लाख मेट्रिक टन माशांचे उत्पादन होते. यापैकी सर्वसाधारणपणे 1.3 लाख मे.टन निर्यात होते, 53,000 कुटुंबे मासेमारी व्यवसायामध्ये कार्यरत आहेत.

कृषी क्षेत्राचा विचार करता इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्र खूप पाठीमागे आहे. दूध, फळे, फुले, ऊस यासारख्या उत्पादनात समाधानकारक वृध्दी असली तरी अन्नधान्य उत्पादनात चिंताजनक परिस्थिती आहे. मासेमारी, पशुपालन, दुग्धव्यवसाय, रेशीम पैदास, शेळी-मेंढीपालन वगैरे शेतीपूरक व्यवसायातून कृषी आणि ग्रामीण विकासाची मोठी संधी उपलब्ध आहे. ग्रामीण पाणीपुरवठा, परिसरांची स्वच्छता, ग्रामीण भागात विविध जलसंधारण प्रकल्प, पाणलोट क्षेत्र विकास, ग्रामीण आरोग्य सेवा, प्राथमिक शिक्षण यासारख्या घटकांच्या अनुषंगाने विकासांच्या संधी उपलब्ध होत आहेत.

1996 मध्ये नवीन कृषीविषयक धोरणाचा मसूदा तयार करण्यात आला. कृषी उत्पादनाची वाढ करणे, बाजार यंत्रणेच्या सुविधांमध्ये वाढ करणे, कृषी व्यवसायात व्यावसायिकता निर्माण करणे, जिरायती शेतीच्या विकासाला चालना देणे, फळे आणि पालेभाज्या उत्पादनाला आणि प्रक्रियेला चालना देणे यासारख्या बाबींवर अधिक भर देण्यात येत आहे.

जून 2009 पर्यंतचा विचार करता राज्यातील जलसिंचन प्रकल्पांसंदर्भात असे दिसून येते की, 56,970 सिंचन प्रकल्प पूर्ण झाले होते, यामध्ये स्थानिक पातळीवरील 54,271 लघुसिंचन प्रकल्प होते आणि 2,483 राज्य पातळीवर होते. सरासरीने 40% इतकी क्षमता या प्रकल्पांची वापरात असल्याचे दिसून येते.कृषी आणि ग्रामीण विकासासाठी आवश्यक असणारी जलसंपदा पर्याप्ततेने वापरण्याची गरज आहे. शेतीला आधुनिक तंत्राने पाणी उपलब्ध करुन देण्याचीही आवश्यकता निर्माण झालेली आहे. नाबार्डच्या माध्यमातून सिंचनासाठी केल्या जाणाऱ्या

अनुदानास पर्याप्त वापराची मोठी संधी दिसून येते.

ग्रामीण विकासामध्ये सहकार क्षेत्राचा असणारा हिस्सा महत्त्वाचा आहे.गेल्या 20 वर्षात जागतिकीकरणाच्या प्रवाहात खाजगीकरण आणि नफा-प्रेरित बाजारातील उत्पादन प्रवृत्तीमुळे सहकाराकडे मोठे दुर्लक्ष झाले आहे. स्वत:चा लाभ नजरेसमोर ठेवून सहकार मोडीत काढणारी प्रवृत्ती महाराष्ट्रात निर्माण झाली. महाराष्ट्राच्या सहकार चळवळीत असणारे दोष दूर करुन कृषी आणि ग्रामीण विकास संरचनेत सहकार क्षेत्राचे अस्तित्व टिकवून ठेवणे गरजेचे आहे. राज्यामध्ये 2,10,000 पेक्षा जास्त सहकारी संस्था असून त्यांचे वसूल भांडवल 13,344 कोटी रु. आणि खेळते भांडवल 2,05,120 कोटी रु. इतके आहे. दीड लाख कोटीपेक्षा जास्त ठेवी या सहकारी संस्थांनी गोळा केलेल्या आहेत. या संस्थांनी 86,480 कोटी रु. चा कर्जपुरवठा केला आहे. 10% सहकारी संस्था पत पुरवठा,22% शेतीमाल प्रक्रिया, 1% शेतीमाल सहकारी विपणन संस्था आहेत. राज्यामध्ये 1780 शेतीमाल सहकारी विपणन संस्था असून ग्रामीण विकासासाठी या संस्थांच्या येणाऱ्या काळात गुणात्मक वाढ होणे गरजेचे आहे. शेतीमाल किंमत निश्चितीमध्ये या संस्थांचे योगदान महत्त्वाचे ठरणारे आहे.

राज्याच्या ग्रामीण विकासात सहकारी साखर कारखान्यांचा वाटा खूप मोलाचा आहे. केंद्र आणि राज्य सरकारचे अनिश्चित असणारे साखर धोरण सहकारी साखर उद्योगाला मारक ठरत आहे. साखर निर्यातीसाठी अनुकूल संधी असूनही त्यासंदर्भात सरकारचा निर्णय होऊ न शकल्याने अडचणींमध्ये वाढच झाली आहे. साखर आणि पूरक उत्पादनातून सहकारी साखर उद्योगाने ग्रामीण अर्थव्यवस्थेचा चेहरा बदलून टाकला आहे. राज्यामध्ये 200 पेक्षा जास्त सहकारी साखर कारखाने कार्यरत असून आजारी साखर कारखान्यांची संख्या लक्षणीय आहे. सहकारी साखर कारखान्यांप्रमाणेच सहकारी सूत गिरण्या, विणकर संस्था, हातमाग प्रक्रिया संस्था यांच्या माध्यमातून ग्रामीण विकासाची नवीन संरचना ठरविण्याची संधी आहे.

दूध संकलन आणि दुग्ध प्रक्रिया संस्थांचे जाळे सहकार क्षेत्रात विस्तारलेले आहे. ग्रामीण भागात गाव पातळीवर कार्यरत असणाऱ्या सहकारी दूधसंस्था, तालुका आणि जिल्हा स्तरावर कार्य करणारे दूध संघ यांनी ग्रामीण अर्थव्यवस्थेत उत्पन्नाचा आणि रोजगार निर्मितीचा स्त्रोत निर्माण केला आहे.

ग्रामीण भागात शेतीमाल प्रक्रिया उद्योग निर्माण झाल्यामुळे विकासाचा एक विशिष्ट पाया निर्माण झाला आहे. ऊस, कापूस,दूध प्रक्रिया, डाळ प्रक्रिया, रेशीम पैदास, फळ प्रक्रिया यासारख्या कृषी उद्योगांनी ग्रामीण उद्योग व्यवसाय वाढीस लावलेला आहे. लघु-कुटिरोद्योगांद्वारे ग्रामीण विकासाला प्रेरणा देण्याची संधी अद्यापही उपलब्ध आहे.

ग्रामीण विकासासाठी शेती आणि शेती संलग्न व्यवसाय उद्योगाद्वारे चालना देणे शक्य आहे. अर्थात यासाठी ऊर्जा शक्ती,दळणवळण सुविधा अत्यावश्यक आहेत. महाराष्ट्रात सध्या वीज निर्मिती ही मागणीच्या तुलनेने अत्यंत कमी

असल्यामुळे सध्या वीज टंचाईला तोंड द्यावे लागत आहे.एकूण वीज निर्मितीपैकी 51% वीजनिर्मिती कोळशापासून होते. सर्वसाधारणत: 4000 मे. वॅ. विजेची टंचाई राज्यात भेडसावते.

भविष्यात ऊर्जा शक्ती साधनांमध्ये पारंपारिक ऊर्जा स्त्रोतांचा अधिक व्यापकतेने विचार करणे गरजेचे आहे. सोलर, बायो गॅस, समुद्र लाटांपासून वीज निर्मिती, पवनचक्कीपासून वीज निर्मिती यासारख्या ऊर्जा साधनांचा ग्रामीण विकासात पायाभूत स्तरावर विचार होण्याची गरज आहे.रस्ते, वाहतूक व्यवस्था ही ग्रामीण विकासासाठी महत्त्वपूर्ण विकास रचना आहे. राज्यात 4500 किमी. लांबीचे राष्ट्रीय महामार्ग, तर 33,900 किमी. लांबीचे राज्यमार्ग आहेत. खेड्यांना जोडणारे 1,03,604 किमी लांबीचे रस्ते आहेत. या रस्त्यांच्या बांधणीचा आणि दुरुस्तीचा दर्जा प्रत या घटकांना आता महत्त्व प्राप्त झाले आहे.रस्ते वाहतूक व्यवस्था अधिक दर्जेदार करुन राज्य आणि राष्ट्रीय महामार्गाशी संलग्नीत करुन ग्रामीण साधनसामग्री विकास प्रक्रियेत गतिमान करणे शक्य आहे. अस्तित्वात असणाऱ्या अनेक ग्रामीण रस्त्यांना पर्यायी रस्ते, बोगदे, पूल निर्माण करुन ग्रामीण विकास प्रक्रिया गतिमान करण्यास चालना देता येऊ शकते. ग्रामीण भागात सार्वजनिक वाहतूक व्यवस्था महत्त्वाची आहे. उपलब्ध असणारी परिवहन यंत्रणा त्याचा खेड्याशी असणारा संपर्क उपलब्ध असणारी प्रवासी वाहतूक संधी यांचा विचारही महत्त्वाचा आहे.

रस्ते वाहतूक यंत्रणेशिवाय रेल्वे वाहतूक, सागरी वाहतूक यंत्रणा, इतर दळणवळण यंत्रणा जसे पोस्ट, तार, दूरध्वनी, भ्रमणध्वनी यंत्रणा यांचाही प्रभाव संपर्क यंत्रणेत महत्त्वाचा आहे.

ग्रामीण विकास प्रक्रियेमध्ये प्राथमिक आरोग्य आणि वैद्यकीय सुविधा, प्राथमिक शिक्षण सोयी, महिला - बालकल्याण यासाठीची संरचना महत्त्वाची ठरत आहे. ग्रामीण भागात उपलब्ध असणारी प्राथमिक आरोग्य केंद्राची व्यवस्था, याचा मिळणारा लाभ याचा विकासात मोठा प्रभाव आहे. विशेषतः आदिवासी जिल्ह्यांमध्ये आरोग्य केंद्राची आवश्यकता आहे. 366 ग्रामीण रुग्णालये असून 1816 प्राथमिक आणि 10,557 उप-प्राथमिक आरोग्य केंद्रे कार्यरत आहेत. विविध स्तरावरील सामान्य नागरिकांसाठी या आरोग्य केंद्राचा उपयोग महत्त्वाचा आहे. त्या दृष्टीने ग्रामीण संरचनेत आरोग्य व्यवस्था उपयुक्त आहे. आरोग्य केंद्राद्वारे राबविल्या जाणाऱ्या योजना, कार्यक्रम त्यांचे यशापयश यांचे मूल्यमापन संशोधनात्मक दृष्टीने अभिप्रेत आहे. याचप्रमाणे ग्रामीण शिक्षण व्यवस्था, त्यामधील क्षमता, मानव विकास निर्देशांकात आणि पर्यायाने सक्षम ग्रामीण विकासातील शिक्षणाचे योगदान यांचा अभ्यास संशोधनात्मक दृष्टिकोनातून अभ्यासाने गरजेचे आहे.

ग्रामीण विकास प्रक्रियेत स्त्री शक्ती अत्यंत महत्त्वाची आहे. महिलांच्या विकासासाठीच्या योजना प्रकल्प, त्याचे सर्वंकष परिणाम, स्वयं-सहायता गटांचे ग्रामीण विकासातील योगदान यासारख्या घटकांचा अभ्यास मार्गदर्शक ठरणार आहे.

महाराष्ट्र हे रोजगाराची हमी देणारे जगातील पहिले राज्य आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवर त्याची

नोंद घेतली गेली आहे. ग्रामीण विकास रचनेत विविध कार्यरत असणाऱ्या रोजगार निर्मिती कार्यक्रमांचे मूल्यमापन संशोधन स्तरावर करणे आवश्यक ठरते.

राज्याला गोव्यापासून मुंबईपर्यंत 720 किमी लांबीचा समुद्र किनारा लाभला आहे. किनाऱ्यालगत व्यवसाय वाढीला मोठी चालना आहे. याशिवाय विविध ठिकाणी असणारी तीर्थस्थाने, देवालये यांच्याद्वारे ग्रामीण अर्थव्यवस्थेत पर्यटन व्यवसायासाठी खूप मोठी संधी आहे.

सारांश, महाराष्ट्राच्या ग्रामीण विकासामध्ये शेती, शेतीसारख्या व्यवसाय पशुपालन, दुग्ध प्रक्रिया, विपणन, शेतीमाल प्रक्रिया, सहकार क्षेत्रातील व्यवसाय, जल संधारण पाणी पुरवठा, वीज, ऊर्जा, वाहतूक, दळणवळण, आरोग्य सेवा, महिला विकास पर्यटन या घटकांच्या अनुषंगाने ग्रामीण विकासासाठी आवश्यक असणारी आधारभूत असणारी संरचना उभारणे शक्य आहे.

संशोधकांना पुढील मुद्यांच्या अनुषंगाने शोधनिबंध तयार करता येतील.

1) महाराष्ट्र आणि कृषी व्यवसाय.

2) शेतीमाल प्रक्रिया संस्था आणि ग्रामीण विकास

3) ग्रामीण विकास – सहकारी क्षेत्र/ चळवळ

4) ग्रामीण विकास – शेतीमाल विपणन यंत्रणा

5) ग्रामीण विकासात – मासेमारी / दुग्ध प्रक्रिया, रेशीम पैदास इत्यादी.

6) ग्रामीण पायाभूत सुविधा

7) ग्रामीण पाणीपुरवठा योजना

8) ग्रामीण रस्ते – दळणवळण व्यवस्था

9) ग्रामीण आरोग्य सोयी – व्यवस्था

10) ग्रामीण विकास आणि वीज पुरवठा

11) पारंपारिक आणि अपारंपारिक ऊर्जा स्रोत आणि ग्रामीण विकास

12) ग्रामीण रोजगार योजना

13) पर्यटनातून ग्रामीण विकास

14) महाराष्ट्र आणि मानव विकास

**संदर्भ :**

1) Economic Survey of Maharashtra, 2006 to 2010.

2) Maharashtra At A Glance

3) Co-operative Movement At A Glance In Maharashtra 2007.

4) The Maharashtra Co-operative Quarterly, Published by The Maharashtra Rajya Sahakari Sangh, Pune.

5) "Co-operative Perspective" Vaikunth Mehta National Institute of Co-operative Maharashtra,Pune.

6) Agricultural Economy of India, Dr. Govil R. K., Dr. Tripati B. B., Kitab Mahal, Allahabad.

7) Textbook of Rural Development. Sagar Mondal Ray, G. L. Kalyany Publishers.

8) अर्थसंवाद – विविध अंक

9) महाराष्ट्राची अर्थव्यवस्था, डॉ. कुरलकर र. पु. विद्या प्रकाशन 2006.

10) महाराष्ट्र,प्रा. सवदी ए. बी. निराली प्रकाशन, पुणे – 2001.

# मराठी अर्थशास्त्र परिषद
# पस्तीसावे वार्षिक अधिवेशन

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे पस्तिसावे वार्षिक अधिवेशन पीपल्स कॉलेज, नांदेड येथे ऑक्टोबर – नोव्हेंबर, 2011 मध्ये आयोजित होणार आहे. सांगोला महाविद्यालय, सांगोला येथील आ. गो. पुजारी हे अध्यक्षस्थान भूषवतील. परिषदेच्या अधिवेशनातील चर्चासत्रासाठी खालील विषय निश्चित करण्यात आले आहेत.

1. प्रा. जगदीश भगवती यांचे अर्थशास्त्रातील योगदान.
2. भारताची आर्थिक महासत्ता बनण्यासाठी वाटचाल.
3. ग्रामीण महाराष्ट्रातील आधारभूत संरचना.

वरील विषयांची रुपरेषा याच अंकात देण्यात आलेली आहे. चौथा विषय तत्कालीन परिस्थितीशी संबंधित असेल आणि तो परिषदेचे अध्यक्ष यथावकाश जाहीर करतील. त्या विषयावर निबंध मागविले जात नाहीत.

निबंध लेखकांनी जास्तीत जास्त 2000 शब्दात विषय मांडावयाचा असून निबंधासोबत 300 शब्दात त्याचा गोषवारा सादर करणे अनिवार्य आहे. निबंध श्री देवरत्न 7.0 फॉन्ट 2336, पेजमेकर फाईल मध्ये तयार करुन त्याची सॉफ्ट कॉपी (सी.डी.) व दोन हार्ड कॉपीज अध्यक्षांकडे पाठवाव्यात. निबंध लेखक मराठी अर्थशास्त्र परिषदेचा सभासद असला पाहिजे.

निबंध मराठीत असावेत, ते पूर्वी कोठेही सादर केलेले किंवा प्रसिद्ध केलेले नसावेत. लेखकांनी आपले संपूर्ण नाव व पत्ता, महाविद्यालयाचे/विद्यापीठाचे/शैक्षणिक संस्थेचे नाव व पत्ता हा सर्व तपशील मराठीत देणे आवश्यक आहे.

प्रत्येक निबंध लेखकाचा केवळ एकच निबंध (स्वतंत्र वा संयुक्तपणे लिहिलेला) अधिवेशनासाठी स्वीकारला जाईल, याची कृपया नोंद घ्यावी. दि. 31 ऑगस्ट, 2011 ही निबंध स्वीकारण्याची अंतिम तारीख असून त्यानंतर पाठविलेले निबंध स्वीकारले जाणार नाहीत. निबंध लेखकांनी आपले निबंध पुढील पत्त्यावर पाठवावेत.

**आ. गो. पुजारी**
मु. पो. अंधळगाव, एम.एस.ई.बी. शेजारी, ता. मंगळवेढा, जि. सोलापूर 413 305
भ्रमणध्वनी 9960125015

**अनिल सूर्यवंशी**
कार्यवाह – खजिनदार
मराठी अर्थशास्त्र परिषद

●●●

# निबंध लेखकांसाठी महत्त्वाच्या सूचना

1. चर्चासत्रासाठी विषयाचे जे शीर्षक जाहीर केलेले असते तेच आपल्याही निबंधाला देणे आवश्यक नाही. त्याच्या अंतर्गत एखादा उप-विषय निवडून त्या अनुषंगाने योग्य असे शीर्षक आपणास देता येईल.
2. सामान्यपणे विषयाचा ऐतिहासिक आढावा घेण्यासाठी पूर्ण निबंधाचा उपयोग करू नये. त्यात अनेक वादग्रस्त मुद्यांचे विश्लेषण असल्यास आणि त्यातून नवीन अर्थ लावण्याचा प्रयत्न करणार असल्यासच विस्तृत आढावा घ्यावा.
3. जी माहिती एम. ए. पर्यंतच्या पाठ्यपुस्तकांमध्ये उपलब्ध असते तिचा संदर्भ म्हणून उपयोग करावा. परंतु त्या पातळीचे विश्लेषण असू नये; कारण ते सर्वांना माहीत असते. त्या माहितीतील सांख्यिकी संबंध शोधून त्यापलीकडे जाऊन विश्लेषणाचा प्रयत्न करणे योग्य राहील.
4. समाजाच्या आर्थिक जीवनाचा (राष्ट्रीय/प्रादेशिक आणि आवश्यकतेनुसार स्थानिक) सामाजिक-सांस्कृतिक जीवनाशी येणारा संबंध, त्यात होणारे बदल आणि शासनाचे आर्थिक धोरण यावर निबंधात त्या त्या विषयाच्या अनुषंगाने भर असावा.
5. निबंधात वेगवेगळ्या भागांमध्ये जे संबंध आपण दर्शवितो आणि निष्कर्ष प्रस्थापित करतो त्यांच्यात अंतर्गत सुसंगती साधण्याचा प्रयत्न केला जावा.
6. निबंधात शक्यतो महाराष्ट्र शासनाच्या भाषा संचालनालयाने प्रकाशित केलेल्या 'अर्थशास्त्र परिभाषा कोश' आणि 'शासन व्यवहार कोश' यातील परिभाषेचा उपयोग करावा. त्यातील शब्दांचा अर्थ पटत नसल्यास इतर शब्दांचा उपयोग करावा. महत्त्वाच्या मराठी संज्ञांचे मूळ इंग्रजी शब्द कंसात द्यावेत.
7. निबंधातील आकडेवारीचे संदर्भ अचूक, सुस्पष्ट, परिपूर्ण आणि मान्य पद्धतीनुसार असणे आवश्यक आहे.
8. निबंधाची मांडणी केवळ सांख्यिकी माहितीचे संकलन करून वर्णन करणारी न ठेवता संशोधनात्मक पद्धतीची असावी. त्यामुळे निबंधाची पातळी उंचावेल. निबंध इतर भाषांतून केवळ भाषांतरित नसावेत.
9. निबंधाच्या शेवटी संदर्भ टीपा/संदर्भ सूची प्रमाणित पद्धतीने असावी.
10. निबंधाच्या अखेरीस गोषवारा द्यावा. (300 शब्द)

●●●

# अर्थसंवादच्या लेखकांना आवाहन

- लेखकांनी आपल्या शोधनिबंधात महाराष्ट्र शासनाच्या भाषा संचालनालयाने प्रकाशित केलेल्या 'अर्थशास्त्र परिभाषा कोश' आणि 'शासन व्यवहार कोश' यातील परिभाषेचा शक्यतो उपयोग करावा. त्यातील शब्दांचा अर्थ आवडत नसल्यास इतर शब्द वापरावेत.
- लेखकांनी आपला शोधनिबंध श्री देवरत्न 7.0, 2336 पेजमेकर फाईल मध्ये तयार करून दोन हार्ड कॉपीज् व एक सॉफ्ट कॉपी (सीडी) पाठवावी. फॉण्ट साईज सोळा ठेवावी.
- महत्त्वाच्या मराठी संज्ञांचे मूळ इंग्रजी शब्द कंसात द्यावेत. निबंधामध्ये वापरल्या जाणाऱ्या तक्त्याचे शीर्षक मराठीतूनच असावे.
- शोधनिबंध पूर्वमुद्रित नसावा. त्यामध्ये कॉपीराईटचा भंग न करता संदर्भाचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख असावा.
- विषयाला तात्कालिक संदर्भ, अद्ययावत सांख्यिकी, मांडणी, विश्लेषणाची शास्त्रशुद्धता, भाषाशैली, नेमके संदर्भ या गोष्टींची दखल घेऊन अर्थसंवादमध्ये लेखन छापण्यासंबंधी निर्णय घेतला जाईल.
- अर्थसंवादसाठी आपल्या सूचनांचा योग्य तो विचार केला जाईल. लेखकांनी आपले शोधनिबंध नवनियुक्त प्रमुख संपादक अविनाश निकम यांच्याकडे पाठवावेत.

**अविनाश रामलाल निकम**
नवनियुक्त प्रमुख संपादक अर्थसंवाद
प्लॉट नं. 30, परिमल कॉलनी,
यशवंत क्लासेसच्या मागे, शहादा,
जि. नंदुरबार : 425 409
मोबा. 9822665141

# मराठी अर्थशास्त्र परिषद

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक

अर्थसंवाद

## जाहिरातीचे दर

| | | कृष्णधवल (B/W) | रंगीत |
|---|---|---|---|
| 1) | समोरचे आतील पृष्ठ | रू.4,000/- | रू.11,000/- |
| 2) | मागील पृष्ठ (आतील) | रू.4,000/- | रू.11,000/- |
| 3) | मागील शेवटचे पृष्ठ | रू.5,000/- | रू.15,000/- |

आपल्या जाहिरातीचा मजकूर - डिझाईन - (1/5 = 150 X 210 mm) आणि सोबत वरील रकमेचा ड्राफ्ट खालील पत्त्यावर पाठवावा. ड्राफ्ट मराठी अर्थशास्त्र परिषद या नांवे काढावा. जाहिरात प्रसिध्द होताच तो अंक आपल्याला मिळेल. आपल्या सहकार्याबद्दल धन्यवाद, कळावे.

**आपले विश्वासू**

**अनिल बाबुराव सूर्यवंशी**
कार्यवाह-खजिनदार
गोदाई, शिवशक्ती मैदानाजवळ,
शिवाजीनगर,बार्शी-413411 जि.सोलापूर
फोन:(02184)224294
भ्रमणध्वनी:9011339906

**जगन्नाथ शामराव पाटील**
प्रमुख संपादक
शांती प्लाझा, बी-9,880/881, शनिवार पेठ,
सातारा. 415002 फोन : (02162) 233152
भ्रमणध्वनी : 9423261796


## मराठी अर्थशास्त्र परिषद
## अर्थसंवादसाठी अनुदान


भारतीय सामाजिक विज्ञान अनुसंधान परिषद, दिल्ली यांचेकडून २०१०-११ या वर्षात अर्थसंवादसाठी रूपये सत्तर हजार ( ७०,००० ) चे अनुदान प्राप्त झालेले आहे. त्याबद्दल मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या वतिने मी ऋणी आहे.

**अनिल सुर्यवंशी**
कार्यवाह/खजिनदार
मराठी अर्थशास्त्र परिषद

## सन 2010-2011 या वर्षात झालेले आजीव सभासद

| अ.क्र. | नांव | सभासद क्रमांक |
|---|---|---|
| 1 | भालेराव रमेश मुंजाजी | 1421 |
| 2 | प्रतिमा चिमाजीराव जोगदंड | 1422 |
| 3 | सुदाम कोरडे | 1423 |
| 4 | उर्मिला महेश चव्हाण | 1424 |
| 5 | शेंडगे दत्तात्रय भगवानराव | 1425 |
| 6 | पी.एम. कडुकर | 1426 |
| 7 | पुरषोत्तम आर. गाटे | 1427 |
| 8 | सारंगे आनंदा रामराव | 1428 |
| 9 | जनकवाडे शिवानंद तातेराव | 1429 |
| 10 | बोरा चंदन खुशालचंद | 1430 |
| 11 | कडेकर शंकर हरीभाऊ | 1430 |
| 12 | शिंदे माधव हनुमंतराव | 1432 |
| 13 | गोंडे सतिश अशिनाथ | 1433 |
| 14 | धीरज सुभाषराव कदम | 1434 |
| 15 | गायकवाड मनोजकुमार जोतिराम | 1435 |
| 16 | काळे संजय पांडूरंग | 1436 |
| 17 | पाटील संजीव खंडू | 1437 |
| 18 | बुरूटे प्रकाश यशवंत | .1438 |
| 19 | मोरे राहूल प्रभाकर | 1439 |
| 20 | सोनिया जी. चव्हाण | 1440 |
| 21 | महाजन रविंद्र रंगनाथ | 1441 |
| 22 | हिरे मुरलीधर विठ्ठल | 1442 |

| अ.क्र. | नांव | सभासद क्रमांक |
|---|---|---|
| 23 | पवार गजेंद्र तापीराम | 1443 |
| 24 | जाधव रामदास काळू | 1444 |
| 25 | कांबळे आकाश पंढरीनाथ | 1445 |
| 26 | प्रतिभा एस. गायकवाड | 1446 |
| 27 | बोधगिरे नंदकुमार बाबुराव | 1447 |
| 28 | पुपलवाड ज्ञानेश्वर आनंदराव | 1448 |
| 29 | ऋता खापर्डे | 1449 |
| 30 | पवार शंकर सुदामराव | 1450 |
| 31 | कलशेट्टी गणपतराव सिध्दप्पा | 1451 |
| 32 | पुंड गोकुळ चांगदेव | 1452 |
| 33 | घाडगे सुनिल जगन्नाथ | 1453 |
| 34 | डावरे सुरेंद्र जयमिम | 1454 |
| 35 | मुक्टे रामदास धोंडबाराव | 1455 |
| 36 | मुळे संतोष अशोकराव | 1456 |
| 37 | फड ज्ञानेश्वर विठ्ठलराव | 1457 |
| 38 | मुंढे नामदेव निवृत्ती | 1458 |
| 39 | कवठाळे अमित रामलिंग | 1459 |
| 40 | सोळुंके जीवन भानुदासराव | 1460 |
| 41 | विनोद मधुकरराव गावंडे | 1461 |
| 42 | नामदेव मारोतराव पाटील | 1462 |
| 43 | शबाना शब्बीर रजवी | 1463 |
| 44 | ढोके राहूल विठ्ठलराव | 1464 |

# अर्थसंवाद

(खंड 34, 2010-11)

**(अ) लेख सूची :**


| अ.क्र. | स्वतंत्र लेख | पान नंबर |
|---|---|---|
| 1 | मराठवाड्याच्या मानवी विकासाचा आढावा | 1-25 |
| 2 | जागतिक घसरण व आर्थिक मंदीची सैध्दांतिक मीमांसा | 26-38 |
| 3 | गोवा राज्याच्या पर्यटनातील समस्या | 39-44 |
| 4 | टाटांची कामगिरी : एक पुनरावलोकन | 45-54 |
| 5 | भाववाढ न रोखणारे मध्यममार्गी बजेट | 55-61 |
| 6 | महिलांच्या आर्थिक व सामाजिक सबलीकरणात स्वयंसहाय्यता बचत गटाचे योगदान - विशेष अभ्यास बारामती ता.जि. पुणे | 62-78 |
| 7 | गांधीजी आणि केन्स | 101-106 |
| 8 | राजर्षी शाहू महाराजांचे कामगारविषयक धोरण | 107-119 |
| 9 | डाळींचे भडकले भाव- उत्पादन व उपलब्धता | 120-126 |
| 10 | बुलडाणा जिल्हा ग्राहक तक्रार निवारण न्याय मंचाचा कार्यपध्दतीचा चिकित्सक अभ्यास (1995-2004) | 127-133 |
| 11 | शेतमजुरांचा तुटवडा भारतीय शेती समोरील मोठे आव्हान- यावल तालुक्याचा क्षेत्रीय अभ्यास | 134-143 |
| 12 | महाराष्ट्राचा सामाजिक विकास - वास्तव व विपर्यास | 144-155 |
| 13 | स्त्री श्रमिकांच्या शोषणाचे मराठी कादंबरीतील प्रतिबिंब - काही निवडक कादंबऱ्यांचा अभ्यास | 156-162 |
| 14 | पंचायतराज, महिला आणि पुरूषसत्ता | 163-168 |
| 15 | जागतिक व्यापार संघटनेचे भारतीय सेवा क्षेत्रावरील परिणाम | 169-174 |
| 16 | भारतीय सेवा कर आकारणीचे दीड शतक - एक सिंहावलोकन | 175-186 |
| 17 | शेतमजूरांचा प्रश्न - भारतीय शेतीपुढील एक नवे आव्हान | 187-197 |
| 18 | अर्थ शब्दांची वाट पाहे | 205-207<br>387-389 |
| 19 | आदर्श गोसेवा आणि अनुसंधान प्रकल्प, म्हैसपूर जि. अकोला य संस्थेचा आर्थिक अभ्यास | 212-221 |
| 20 | महाराष्ट्रातील सहकारी साखर उद्योगाची सद्यस्थिती व उपाययोजना | 222-228 |
| 21 | प्राचीन भारतातील आधुनिक तत्थ्ये : ग्राहक संरक्षणाच्या विशेष संदर्भात | 229-235 |

| अ.क्र. | स्वतंत्र लेख | पान नंबर |
|---|---|---|
| 22 | राष्ट्रीयकृत व खाजगी बँकांच्या ए.टी.एम. सेवा वापरणाऱ्या ग्राहकांच्या समाधानपातळीचा तुलनात्मक अभ्यास | 236-243 |
| 23 | सुवर्ण महोत्सवी महाराष्ट्रात 'आदिवासी' | 256-268 |
| 24 | दक्षिण आशियातील (सार्क) आर्थिक एकात्मिकरण | 269-278 |
| 25 | सांगली जिल्ह्यातील लघु उद्योगांच्या अपयशाच्या कारणांचा अभ्यास | 279-285 |
| 26 | सातारा व सांगली जिल्ह्यातील मेंढपाळांच्या सामाजिक व आर्थिक स्थितीचा अभ्यास | 286-294 |
| 27 | भारतातील बेरोजगारी व शासकीय धोरण – एक चिकित्सा | 368-374 |
| 28 | सातारा जिल्ह्यातील सौर ऊर्जा उपकरणांच्या घरगुती वापरासंबंधीच्या बाजारपेठेचे स्वॉट (SWOT) विश्लेषण | 375-386 |
| | **भाषणे** | |
| 1 | परामर्ष विकासाचा : परिप्रेक्ष्य अपवर्जन व समावेशनाचा | 315-345 |
| | **पारितोषिक प्राप्त लेख** | |
| 1 | असंघटित क्षेत्रातील श्रमिकांचा अभ्यास | 346-354 |
| 2 | सहकार चळवळ आणि महाराष्ट्राचा आर्थिक विकास | 355-367 |
| | **पीएच्. डी. प्रबंधाचा सारांश** | |
| 1 | जालना आणि लातूर जिल्हा उद्योग केंद्र – तुलनात्मक अध्ययन | 90-100 |
| 2 | जमीन सुधार आणि नागपूर विभागातील अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती | 198-204 |
| 3 | स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेचा लाभार्थींवरील आर्थिक परिणाम | 244-255 |
| 4 | ब्रिटीश काळातील (1850-1947) पश्चिम भारतातील (महाराष्ट्रातील) उद्योजकतेचा अभ्यास | 295-297 |

| अ.क्र. | स्वतंत्र लेख | पान नंबर |
|---|---|---|
| | **ग्रंथ परिक्षण** | |
| 1 | अधिअपसामान्य अर्थशास्त्र | 298-311 |
| | **श्रध्दांजली** | |
| 1 | पॉल ॲथनी सॅम्युअलसन<br>स.ह.देशपांडे – थोर प्रज्ञावंत व्यक्तिमत्व | 298-311 |
| | **३४ व्या अधिवेशनाचा वृत्तांत** | |
| 1 | असंघटीत क्षेत्रातील श्रमिकांचा अभ्यास | 390-395 |
| 2 | महाराष्ट्राच्या आर्थिक विकासाचे वास्तव व भवितव्य | 396-400 |
| 3 | चौतिसावे – वार्षिक अधिवेशन | 401-405 |
| 4 | अर्थसंवाद – वार्षिक अहवाल | 406-409 |
| | **विषयांची रूपरेषा** | |
| 1 | प्रा. जगदीश नटवरलाल भगवती यांचे अर्थशास्त्रातील योगदान | 410-415 |
| 2 | भारताची आर्थिक महासत्ता बनण्याकडील वाटचाल | 416-419 |
| 3 | ग्रामीण महाराष्ट्रातील आधारभूत संरचना | 420-424 |

# अर्थसंवाद

(खंड 34, 2010-11)

**(आ) लेखक सूची :**


| अ.क्र. | स्वतंत्र लेख | पान नंबर |
|---|---|---|
| 1 | भारती दीपक | 1-25 |
| 2 | शिंदे एम्.एन., डी. के. मोरे | 26-38 |
| 3 | सावंत वासुदेव नारायण | 39-44 |
| 4 | जोशी वसुधा | 45-54 |
| 5 | गोविलकर विनायक म. | 55-61 |
| 6 | मुलाणी एम.यू. | 62-78 |
| 7 | राजदेरकर उमेश मधुकर | 101-106 |
| 8 | म्होपरे राहूल शं., जगन्नाथ पाटील | 107-119 |
| 9 | तुपे संजय | 120-126 |
| 10 | बारड (कळाखे) सुनिता प्रदीप | 127-133 |
| 11 | ढाके सुरेश, अशोक खाचणे | 134-143 |
| 12 | कांबळे पी.एस., बी.डी. अवघडे, आर. जी. कोरबू | 144-155 |
| 13 | मुडेकर तेजस्विनी बी. | 156-162 |
| 14 | सुतार विद्या शि. | 163-168 |
| 15 | तवार ए. टी., व्ही. सी. बेलुरे | 169-174 |
| 16 | अभंग संदिप बाबूराव | 175-186 |
| 17 | चव्हाण हिरालाल वामन | 187-197 |
| 18 | माने शि. ना. | 205-207 |
| | | 387-389 |
| 19 | राऊत श्रीकृष्ण | 212-221 |
| 20 | लाड प्रताप बापूसो | 222-228 |
| 21 | सोनवणे बी. आर. | 229-235 |
| 22 | कुंभार विजय मा. | 236-243 |
| 23 | तेगमपुरे मारोती | 256-268 |
| 24 | साळुंखे उषा य. | 269-278 |
| 25 | माळकर उल्हास महादेव | 279-285 |
| 26 | महानवर टी.डी., जे.एस.चौधरी | 286-294 |

| अ.क्र. | स्वतंत्र लेख | पान नंबर |
|---|---|---|
| 27 | म्होपरे राहूल शं | 368-374 |
| 28 | लोखंडे उदय मारूती | 375-386 |
| | **भाषणे** | |
| 1 | जहागिरदार मुक्ता दिगंबर | 315-345 |
| | **पारितोषिक प्राप्त लेख** | |
| 1 | खापर्डे ऋता | 346-354 |
| 2 | घाटगे लालासाहेब ना., अनिल कृ. वावरे | 355-367 |
| | **पीएच्.डी. प्रबंधाचा सारांश** | |
| 1 | राऊत राधेशाम किसनराव | 90-100 |
| 2 | कांबळे गौतम खु. | 198-204 |
| 3 | शिंदे राजेंद्र य. | 244-255 |
| 4 | मुसमाडे मंजूषा | 295-297 |
| | **ग्रंथ परीक्षण** | |
| 1 | माने शि. ना. | 298-311 |
| | **श्रध्दांजली** | |
| 1 | भानुशाली सु.गो. | 79-89 |
| 2 | रारावीकर यशवंत रा. | 208-209 |
| | | |

| अ.क्र. | स्वतंत्र लेख | पान नंबर |
|---|---|---|
| | ३४ व्या अधिवेशनाचा वृत्तांत | |
| 1 | बबनराव खामकर | 390-395 |
| 2 | मुलाणी एम.यू. | 396-400 |
| 3 | सुर्यवंशी अनिल बाबूराव | 401-405 |
| 4 | पाटील जगन्नाथ शामराव | 406-409 |
| | विषयांची रूपरेषा | |
| 1 | पाटील कैलास काशीनाथ | 410-415 |
| 2 | सुहास आव्हाड | 416-419 |
| 3 | बाळासाहेब माने | 420-424 |
| | अंकांचा तपशील | |
| 1 | एप्रिल – जून २०१० | 100 |
| 2 | जुलै – सप्टेंबर २०१० | 111 |
| 3 | ऑक्टोबर – डिसेंबर २०१० | 100 |
| 4 | जानेवारी – मार्च २०११ | 124 |


हे त्रैमासिक अनिल सूर्यवंशी यांनी मराठी अर्थशास्त्र परिषद या संस्थे करिता, प्रतिमा ऑफसेट, ब्राह्मणपूरी, इस्लामपूर येथे छापून मराठी अर्थशास्त्र परिषद, गोदाई, शिवभक्ती मैदानाजवळ, शिवाजीनगर, बार्शी, ४१३ ४११ जिल्हा सोलापूर येथे प्रसिध्द केले.

# अर्थसंवाद या त्रैमासिकाच्या स्वामित्व व इतर बाबींविषयी निवेदन

## (फॉर्म 4,नियम 8 नुसार)

| | | |
|---|---|---|
| 1. प्रकाशन स्थळ | : | मराठी अर्थशास्त्र परिषद, द्वारा/डॉ.अनिल सूर्यवंशी<br>गोदाई, शिवशक्ती मैदानाजवळ,<br>शिवाजीनगर, बार्शी- 413411 जि. सोलापूर |
| 2. नियतकाल | : | त्रैमासिक |
| 3. मुद्राकाचे नांव | : | अनिल सूर्यवंशी |
| राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| पत्ता | : | गोदाई, शिवशक्ती मैदानाजवळ,<br>शिवाजीनगर, बार्शी 413411<br>जि. सोलापूर |
| 4. मुद्रणस्थळ | : | प्रतिमा ऑफसेट, ब्राह्मणपुरी, इस्लामपूर. |
| 5. प्रकाशनाचे नांव | : | बाब क्र.3 प्रमाणे |
| 6. संपादकाचे नांव | : | जगन्नाथ शामराव पाटील |
| 7. राष्ट्रीयत्व | : | भारतीय. |
| पत्ता | : | शांती प्लाझा, बी-9, 880/881,<br>शनिवार पेठ, सातारा 415 002 |
| 8. मालकाचे नांव | : | मराठी अर्थशास्त्र परिषद, द्वारा/सेंटर फॉर<br>दि स्टडी ऑफ सोशल चेंज, एम.एन. रॉय<br>ह्यूमन डेव्हलपमेंट कँपस, फ्लॅट 6, ब्लॉक एफ,<br>कार्डिनल ग्रेशियस शाळेजवळ, सरकारी वसाहत<br>इमारत क्र.323 समोर, बांद्रे (पूर्व) मुंबई-400051 |

मी अनिल सूर्यवंशी असे जाहीर करतो की, वर दिलेला तपशील माझ्या माहिती आणि समजुतीनुसार खरा आहे.

**अनिल सूर्यवंशी**
मुद्रक व प्रकाशक